# भारतीय समाजाची
# ओळख




## समाजशास्त्र
## इयत्ता बारावी

# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-2116/(प्र.क्र.43/16) एसडी-4 दिनांक 25.4.2016 अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक 30.01.2020 रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन 2020-21 या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# समाजशास्त्र

## इयत्ता बारावी

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

V7D4C2

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या शीर्षक पृष्ठावरील Q.R.Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक, त्या पाठासंबंधित असलेले अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

**प्रथमावृत्ती : २०२०**
**पुनर्मुद्रण : ऑक्टोबर २०२१**

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**समाजशास्त्र विषय समिती**

डॉ. प्रल्हाद माने, सदस्य
डॉ. वैशाली जोशी, सदस्य
डॉ. वैशाली दिवाकर, सदस्य
डॉ. अमृता नाडकर्णी, सदस्य
डॉ. विशाल जाधव, सदस्य
डॉ. अनघा तेंडुलकर, सदस्य
डॉ. विद्या अवचट, सदस्य
श्रीमती वर्षा सरोदे, सदस्य सचिव

**समाजशास्त्र अभ्यासगट समिती**

डॉ. आयवन जॉन
डॉ. श्रीकांत पारखी
डॉ. प्रकाश खेत्री
डॉ. व्यंकटेश खरात
श्री. सुनील शिंदे
डॉ. हेमंत सोनकांबळे
श्री. रोनाल्ड लुईस
डॉ. मदनमोहन विश्वकर्मा
श्री. दयाशंकर वैद्य
डॉ. सलमा अजीज
श्री. अधिकराव हजारे
डॉ. रेणुका बडवणे
श्रीमती सुरेखा किनगांवकर
श्री. गुणवंतराव काळगापुरे
श्री. चंद्रकांत खंडागळे

**लेखक**

डॉ. प्रल्हाद माने
डॉ. अनघा तेंडुलकर
डॉ. आयवन जॉन

**भाषांतर**

डॉ. शुभांगना अत्रे
डॉ. अनघा तेंडुलकर
श्रीमती देवयानी देशपांडे

**मुखपृष्ठ व सजावट**
**श्री. देवदत्त बलकवडे**

**अक्षरजुळणी**
**डी.टी.पी. विभाग,**
बालभारती, पुणे

**कागद**
७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश**
N/PB/2022-23/Qty.- 30,000

**मुद्रक**
M/s. Saraswati Book Company, Pune

**संयोजक**

**सौ. वर्षा सरोदे**
सहायक विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

**श्री. सच्चितानंद आफळे,**
मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. प्रभाकर परब,**
निर्मिती अधिकारी
**श्री. शशांक कणिकदळे,**
सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

**प्रिय विद्यार्थी मित्रांनो,**

आजच्या डिजिटल युगात तुम्हाला तुमची संस्कृती आणि समाजाचे आकलन करून घेण्याची गरज आहे. भारतीय समाजातील विविधता, बहुलता आणि भारताचे अंतर्गत सामर्थ्य याविषयी जगातील बहुतांशी लोक अनभिज्ञ आहेत.

समाजशास्त्राचे विद्यार्थी म्हणून तुम्हाला बहुतांश वेळेला बऱ्याच प्रश्नांची उत्तरे माहित नसतील, 'भारतीय असण्याचा अर्थ काय आहे? भारतीय समाजावर प्रभाव पाडणारे घटक कोणते? भारतीय समाजातील विभाग कोणते आहेत? आणि ते कसे जोडले गेले आहेत? डिजिटलायझेशनचा आपल्या जीवनशैलीवर कसा परिणाम झाला?' वगैरे. अशा वेळी आपल्या समाजात काय घडत आहे, कोणत्या प्रकारचे बदल घडत आहेत आणि त्याशिवाय आंतरिक आणि बाह्य आव्हानांची जाणीव आपल्याला असणे आवश्यक आहे.

इयत्ता अकरावीच्या पाठ्यपुस्तकामध्ये तुम्हाला विविध प्रमुख समाजशास्त्रीय संकल्पनांची ओळख करून दिलेली आहे. इयत्ता बारावीच्या पाठ्यपुस्तकामध्ये भारतीय संदर्भात भारतीय समाजातील विविध सामाजिक समूह, विविध सामाजिक समस्या, सामाजिक चळवळी आणि सामाजिक परिवर्तन यावर भर दिला आहे. आपण केवळ भारतीय समाजातील विविधता समजून घेणार नाही तर भारतीय समाजातील राष्ट्रीय एकात्मता वाढविण्यासाठी प्रत्येक सांस्कृतिक समूहाचे आकलन आणि त्याचा आदर करणेही शिकणार आहोत.

या पाठ्यपुस्तकामध्ये काही माहिती चौकटीत दिली आहे. शिवाय प्रात्यक्षिकासाठी कृती करण्यास सुचवले आहे. तुमचे स्वयंअध्ययन सोपे व्हावे, त्यामध्ये रस निर्माण व्हावा यासाठी क्यूआर कोडचा उपयोग केला आहे आणि यामुळे तुमच्या क्रियाशील सहभागाला चालना मिळेल. या पाठ्यपुस्तकामुळे समाजशास्त्राच्या अभ्यासकास भारतीय समाजाचे अनेक स्तर आणि वैविध्यपूर्ण संस्कृती समजून घेणे सुलभ होईल. या पाठ्यपुस्तकात अधोरेखित भारतीय समाजाचे प्रभावी स्वरूप तुम्हाला आवडेल आणि तुम्ही भारतीय समाजाचे नवीन दृष्टिकोनातून आकलन करून घ्याल, अशी आम्हाला अपेक्षा आहे.


**(विवेक गोसावी)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.


**पुणे**
**दिनांक : २१ फेब्रुवारी २०२०**
**भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१**

# शिक्षकांसाठी

**समाजशास्त्र विषय अध्यापनाचा दृष्टिकोन :**

समाजशास्त्र हा विषय अध्यायनार्थ्यांना भारतीय समाजाची ओळख करून देतो. भारतीय समाजाचे नागरिक म्हणून आपणांस भारतीय समाज, त्यातील विभाग, विविधता, समृद्‌ध संस्कृती, सामाजिक समस्या, आज घडणाऱ्या विविध बदलांचे मूलस्रोत असणाऱ्या विविध सामाजिक चळवळी असे सर्वसमावेशक ज्ञान असणे महत्त्वाचे आहे. खाली सुचविलेल्या अनुदेशन पद्‌धतींचा वापर करून समाजशास्त्राचा अभ्यास जिवंत आणि रंजक बनवता येईल.

१. **यु-ट्यूब वरील दुव्यांवर आधारित चर्चा** : शिक्षकाने स्वतः आधी youtube वरील चित्रफिती पहाणे गरजेचे आहे. (Whats App) समाज माध्यमांच्या मदतीने विद्यार्थ्यांना हे दुवे (links) द्यावेत. अथवा संगणक प्रयोगशाळेतील फलकावर link लिहावी. या चित्रफितीनंतर वर्गात चर्चा अथवा लेखी कार्य द्यावे.

२. **छोट्या गटातील चर्चा** : तुमच्या वर्गातील विद्यार्थ्यांचे छोटे गट तयार करावेत. सर्व गटांना ३ ते ४ मिनिटे चिंतन/विचार करण्यासाठी एखादा विषय द्यावा. त्यानंतर १० मिनिटे गटचर्चेसाठी वेळ द्यावा. प्रत्येक गटाचा प्रतिनिधी आपल्या चर्चेतील ३ महत्त्वाचे मुद्‌दे संपूर्ण वर्गासमोर सादर करेल. शिक्षक फलकावर अध्ययन मुद्‌द्यांचा सारांशरूपाने आढावा घेतील.

३. **समवयस्कांसोबत/सहाध्यायी अध्ययन** : पाठ्यक्रमाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या संबंधित असलेल्या आपल्या आवडीच्या एखाद्या विषयावर विद्यार्थी PPT तयार करतील. त्याचे वर्गात सादरीकरण करतील. शिक्षक त्याप्रसंगी इतर पूरक माहिती पुरवतील.

४. **वादविवाद** : अनेक घटकांना विविध पैलू असतात व ते चर्चेचे सहज विषय बनतात. या विषयांआधारे वर्गात औपचारिक वादविवाद सादर करता येईल.

५. **सहयोगी अध्ययन** : प्रभावी, सर्जनशील आणि आनंददायी अध्ययन अनुभवांसाठी सहयोगी अध्ययन तंत्रांचा वापर करता येईल. उदा., विचार-जोडी, देवाणघेवाण, जिगसॉ, वर्तुळाच्या आत-बाहेर, इ.

६. **कृतिपत्रिका/स्वाध्याय** : प्रत्येक घटकाअंती, उजळणी स्वरूपाचा स्वाध्याय संपूर्ण वर्गासाठी आयोजित करता येईल. या स्वाध्यायावर वर्गात चर्चा घेता येईल किंवा गृहपाठ म्हणूनही देता येईल.

७. **मुलाखत** : एखाद्या विषयावरील छोट्या सर्वेक्षणाच्या (नमुना संख्या-५) आधारे अहवाल लेखन करता येईल.

८. **क्षेत्रभेट** : एखादा छोटा गट बिगरशासकीय संस्था (NGO) अथवा खेडे अथवा आदिवासी क्षेत्र वा वस्तुसंग्रहालय अशा ठिकाणांना भेट देईल. मोबाइल फोनच्या मदतीने छोटी चित्रफित बनवून वर्गात सादर करता येईल अथवा अहवाल लेखन करता येईल. वर्गातील सादरीकरणानंतर त्यावर आधारित चर्चेचे नियोजन करता येईल.

प्रत्येक घटकाच्या शेवटी नमुन्यादाखल काही प्रश्न दिले आहेत. ही प्रश्नांची परिपूर्ण अशी यादी नाही. शिक्षक आणि विद्यार्थी मिळून HSC बोर्डाच्या कृतिपत्रिकेनुसार अशी प्रश्नपेढी विकसित करतील अशी अपेक्षा आहे. केवळ पाठांतर करून घेण्यापेक्षा, अध्यापकांनी विद्यार्थ्यांना ज्ञानाचे उपयोजन करून स्वतःतील कौशल्ये वाढवण्यासाठी प्रोत्साहित करावे. यासाठी संकल्पना चित्रे, स्वअभिव्यक्तीचे प्रश्न (स्वमत), उताऱ्यावरील प्रश्न यांसारख्या प्रश्नांचा समावेश इ.बारावीतही केला आहे.

भारतीय समाजाचा अभ्यास रोमांचक व संस्मरणीय बनवण्यासाठी खूप शुभेच्छा!

## क्षमता विधाने

| अ.क्र. | घटक | क्षमता |
| --- | --- | --- |
| १. | **भारतीय समाजाचा परिचय** | • भारतीय समाजाच्या विकासाचे स्पष्टीकरण करता येणे.<br>• भारतीय समाजाला प्रभावित करणाऱ्या घटकांवर चर्चा करून समजावून घेणे.<br>• भारतीय समाजावर पडणाऱ्या प्रभावाच्या कालावधीची तुलनात्मक चर्चा करता येणे.<br>• भारतातील समाजावर प्रभाव पाडणाऱ्या विविध घटकांचे आकलन करता येणे. |
| २. | **भारतीय समाजाचे वर्गीकरण** | • भारतीय आदिवासी, ग्रामीण आणि शहरी समुदायाच्या वैशिष्ट्याचे वर्णन करता येणे.<br>• भारतातील विविध समाजांची तुलना करता येणे.<br>• प्रत्येक समुदायाला येणारी आव्हाने ओळखणे व त्यावर चर्चा करणे.<br>• भारतातील प्रत्येक समुदायाला येणाऱ्या समस्यांच्या उपाययोजना समजावून घेणे. |
| ३. | **भारतीय समाजातील विविधता आणि एकता** | • भारतीय समाजातील विविधतेची ओळख करून घेणे.<br>• भारतीय समाजात विविधता असूनही एकता कशी आहे, हे स्पष्ट करणे.<br>• भारतातील राष्ट्रीय एकात्मतेमधील अडथळा निर्माण करणाऱ्या घटकांविषयीची माहिती जाणून घेणे.<br>• भारतातील राष्ट्रीय एकात्मता टिकून राहण्यासाठी विविध उपाययोजना समजावून घेणे. |
| ४. | **भारतातील समाज परिवर्तनाच्या प्रक्रिया** | • भारतीय समाजातील सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रिया समजावून घेणे.<br>• भारतीय समाजामध्ये होणाऱ्या परिवर्तनाच्या परिणामांचे मूल्यमापन करता येणे.<br>• समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचे तुलनात्मक मूल्यमापन करणे.<br>• भारतीय समाजात होणाऱ्या बदलाविषयीच्या प्रक्रियेचे गंभीरपणे अवलोकन करून उपाययोजना समजावून घेणे. |
| ५. | **भारतातील सामाजिक चळवळी** | • सामाजिक चळवळीचा अर्थ व महत्त्व जाणून घेणे.<br>• भारतातील विविध सामाजिक चळवळीचे स्वरूप समजावून घेणे.<br>• सामाजिक चळवळीची आवश्यकता व उपयोगिता समाजवून घेणे.<br>• भारतीय समाजावर विविध सामाजिक चळवळींच्या झालेल्या प्रभावाचे मूल्यमापन करता येणे. |
| ६. | **भारतातील सामाजिक समस्या** | • भारतीय समाजातील विविध सामाजिक समस्यांची ओळख करणे.<br>• भारतीय समाजातील सामाजिक समस्येच्या घटकांची चर्चा करता येणे.<br>• भारतातील विविध सामाजिक समस्यांचा परिणाम दर्शवता येणे.<br>• भारतातील सामाजिक समस्यांवरील उपाययोजना समजावून घेणे. |

# अनुक्रमणिका

## विभाग – १


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | भारतीय समाजाचा परिचय | १ |
| २. | भारतीय समाजाचे वर्गीकरण | २५ |
| ३. | भारतीय समाजातील विविधता आणि एकता | ४६ |
| ४. | भारतातील समाज परिवर्तनाच्या प्रक्रिया | ६१ |
| ५. | भारतातील सामाजिक चळवळी | ७१ |
| ६. | भारतातील सामाजिक समस्या | ८५ |


## विभाग – २


| | | |
|---|---|---|
| | उतारे | १०६ |

# १. भारतीय समाजाचा परिचय

१.१ प्राचीन आणि मध्ययुगीन भारत
१.२ वसाहतकालीन भारत
१.३ स्वातंत्र्योत्तर काळातील भारत

## प्रस्तावना

समाजशास्त्राचे विद्यार्थी या नात्याने तुम्ही हे मान्य कराल की समाजशास्त्राचा भर मानवी सामाजिक वर्तनाच्या संदर्भातील 'काय' 'कसे' आणि 'का' यांसारख्या प्रश्नांचा धांडोळा समजून घेण्यावर असतो. समाजशास्त्र हे भूतकाळ आणि वर्तमानकाळामध्ये मानवी वर्तनावर प्रभाव पाडणारी विविध कारणे, परिस्थिती, घटना आणि क्रिया यांचे आकलन करीत असते. आपण ज्या अनेक सामाजिक नातेसंबंधांमध्ये गुंतलेले असतो त्यानुसार आपले वर्तन आकार घेत असते. त्यामध्ये आपली विचारसरणी आणि कृती, प्राधान्यक्रम, आवडीनिवडी, पूर्वग्रह, श्रद्धा, आचार आणि दैनंदिन जीवनात आपण ज्यांचे अनुसरण करतो असे धार्मिक विधी यांसारख्या अनेक गोष्टींचा समावेश आहे. उदाहरणार्थ, तुम्ही ज्या कुटुंबामध्ये मोठे झालात त्या कुटुंबामध्ये सकाळी पूजाअर्चा करण्याअगोदर स्नान करण्याची शिस्त असेल तर तुम्ही ती शिस्त मोडत नाही. तसेच तुम्ही या शिस्तीचा प्रचार इतरांपुढे करण्याची शक्यताही मोठ्या प्रमाणावर असते. आपण दुसरे उदाहरण घेऊया. पुरुष किंवा स्त्री यांपैकी कुणा एकालाच श्रेष्ठ मानण्याकडे तुमचा कल असेल तर त्यानुसार तयार झालेल्या तुमच्याच दृष्टिकोनाचा तुम्ही आग्रह धरता.

भारतीय संस्कृतीचा उगम हजारो वर्षांपूर्वीचा आहे. त्याकाळी 'समाजशास्त्र' नावाची स्वतंत्र ज्ञानशाखा अस्तित्वात आलेली नव्हती. तुम्हांला हे माहीतच आहे की, समाजशास्त्र १९व्या शतकाच्या मध्यावधीस युरोपमध्ये उदयाला आले. साहजिकच, "प्राचीन काळातील समाजजीवन आपल्याला कशाच्या आधारे समजते?" असा प्रश्न तुम्हाला पडणे बरोबरच आहे. प्राचीन काळातील समाजजीवन समजून घेण्याचा प्रमुख स्रोत म्हणजे पुरातत्त्वज्ञ आणि इतिहास संशोधकांनी शोधून काढलेल्या 'पुरातनवस्तू'. त्याखेरीज प्रवासवर्णने, एखाद्या घटनेच्या प्रत्यक्षदर्शींनी केलेल्या नोंदी, चरित्रग्रंथ, साहित्य, कोरलेल्या किंवा लिखित राजाज्ञा, दरबारी दप्तरे, यांसारखे लिखित पुरावे उपलब्ध असतात. पुरातनवस्तू म्हणजे प्राचीन संस्कृतीची ओळख पटवून देणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण मानवनिर्मित वस्तू. उदाहरणार्थ, हत्यारे आणि अवजारे, भांडी, दागिने, कलावस्तू, शिल्पे, उत्खनित वस्तू, चित्रे, दफनस्थळे आणि समाधीस्थळे, नाणी, शस्त्रास्त्रे इत्यादी. त्याखेरीज मानवी अस्थि आणि प्राण्यांची हाडे, जीवाश्म, प्राचीन स्थळांचे भौगोलिक स्थान या गोष्टीही प्राचीन काळातील समाजजीवन समजून घेण्यासाठी उपयुक्त असतात. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे या प्राचीन अवशेषांचे वय निश्चित करणे आणि इतर गुणधर्मांचे विश्लेषण करता येते. अशा पद्धतीने केलेल्या संशोधनातून प्राचीन समाजाचे पुनर्रचित चित्र उभे करता येते. त्यातून दिसणाऱ्या विविध पैलूंच्या आधारे आपले प्राचीन संस्कृतींविषयींचे आकलन स्पष्ट झालेले आहे.

एखाद्या हजारो वर्षांपूर्वीच्या संस्कृतीचे वर्णन सारांशाने करणे, ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. तरीही भारतीय संस्कृतीच्या ज्या विशिष्ट पैलूंमुळे भारतीय लोकांची जडणघडण झाली, त्यांबद्दल खूप काही शिकता येणे शक्य आहे.

शिकण्याच्या सोयीसाठी पहिल्या पाठाचा मूळ घटक तीन उपघटकांमध्ये विभागला आहे.

(१) प्राचीन आणि मध्ययुगीन भारत

(२) वसाहतकालीन भारत

(३) स्वातंत्र्योत्तर काळातील भारत

२१ व्या शतकातील समाजशास्त्राचे विद्यार्थी या नात्याने पुढे दिलेल्या माहितीचे धागेदोरे तुम्ही व्यवस्थित समजून घ्याल, त्यांचे मनन कराल, त्यांचे मर्म जाणून घ्याल तसेच त्यांची चिकित्साही कराल, अशी अपेक्षा

आहे. अर्थातच हे करण्यासाठी ऐतिहासिक चौकटीतून उपलब्ध असलेल्या माहितीचा उपयोग करून काही हजार वर्षांचा भूतकाळातील प्रवास करणे अपरिहार्य आहे. त्यातून हाती लागलेल्या काही वैशिष्ट्यपूर्ण पैलू आणि महत्त्वपूर्ण टप्प्यांच्या आधारे मानवी जीवनपद्धतीचे असंख्य प्रकार सामाजिक-पर्यावरणीय हितसंबंध, आचारपद्धती, धार्मिक विधी, झालेले अन्याय, चुका, मानवी स्थलांतरे तसेच हे सर्व घडण्यासाठी आवश्यक असलेले घटक यांबद्दल तुम्हांला आश्चर्य वाटल्याखेरीज राहणार नाही. संमिश्र स्वरूपाच्या या माहितीच्या मंथनातून खूप काही हाती लागू शकते. आपली भूतकाळासंबंधीची जाणीव आपला वर्तमानकाळ घडवत असतो आणि त्यातूनच आपल्या विचारांची आणि वर्तणुकीची दिशा निश्चित होत असते, हे निःसंशय आहे. आपली जडणघडण कशी झाली आहे हे समजून घेत असताना जी नवी अंतर्दृष्टी तुम्हाला प्राप्त होईल त्याआधारे तुमचा उत्साह वाढेल. कारण तुम्हांला भूतकाळाकडून मिळालेला विविधांगी वारसा तसेच तुमचे वर्तमान आणि नजीकचा व दूरस्थ भविष्यकाळ या सर्वांची असंख्य पाळेमुळे किती खोलवर रुजलेली आहेत, याची कल्पना तुम्हांला येईल.

समाजशास्त्राच्या या वर्षीच्या अभ्यासक्रमात काही निवडक, वैशिष्ट्यपूर्ण पैलूंच्या आधारे आपण प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील भारतीय समाज कसा होता, हे जाणून घेणार आहोत. त्यामध्ये खालील सूत्ररूप गोष्टींचा समावेश आहे.

**(i) धार्मिक श्रद्धाप्रणाली आणि आचार**

**(ii) स्त्रियांचे समाजातील स्थान**

**(iii) शिक्षणपद्धती**

**(iv) समाजजीवन**

**(v) नागरीकरण**

या सूत्ररूप गोष्टींचा संक्षिप्त परिचय पुढे करून दिला आहे.

**(i) धार्मिक श्रद्धाप्रणाली आणि आचार :** अभ्यासकांच्या मते सध्या उपलब्ध असलेल्या धार्मिक श्रद्धाप्रणाली आणि आचारासंबंधींचे साहित्य हे बहुस्तरीय आणि गुंतागुंतीचे आहे. हडप्पा संस्कृतीच्या उत्खननांमधून मातीच्या विविध पुरुष आणि स्त्रीमूर्ती मिळालेल्या आहेत. त्या देवतांच्या मूर्ती आहेत, असे सर्वसाधारणपणे समजले जाते. परंतु तत्कालीन देवालये किंवा मूर्तीपूजा


| हडप्पा संस्कृती | वेदकालीन भारत | दुसरे नागरीकरण | अभिजात काळ | मध्ययुगीन भारत |
|---|---|---|---|---|
| इ.स.पू. २६००-१५०० | इ.स.पू. १५००-५०० | इ.स.पू. ५००-२०० | इ.स.पू. २००-इ.स. ६५० | इ.स. ६५०-१५०० |

## १.१ प्राचीन आणि मध्ययुगीन भारत

इथे दिलेल्या कालरेषेच्या आधारे भारताच्या प्राचीन इतिहासाचे विभाजन वेगवेगळ्या कालखंडात कसे केले जाते, याची साधारण कल्पना तुम्हांला येऊ शकेल. या कालरेषेत दर्शवलेली वर्षे ही अचूक नाहीत, तर साधारणपणे दर्शवलेली आहेत. तुमच्या शालेय विद्यार्थीदशेत या ऐतिहासिक कालखंडांचा आणि त्यातील इतिहासाचा अभ्यास तसेच त्यासंबंधीच्या चर्चा केल्याचे तुमच्या स्मरणात असेलच. मग समाजशास्त्राचे विद्यार्थी म्हणून आपण सामाजिक इतिहासाच्या वाचनातून नेमके काय समजून घेणार आहोत?

यांचा निश्चित पुरावा मिळालेला नाही. नंतरच्या वैदिक संस्कृतीमध्ये सूर्य, पर्जन्य, जल, वादळ अशा अनेक नैसर्गिक घटकांना देवतास्वरूप मानून त्यांची प्रार्थना केली जाई. कालांतराने इंद्र, अग्नी यांसारख्या देवांना महत्त्व प्राप्त झाले. स्थानिक अवैदिक समूहांच्या स्वतःच्या श्रद्धाप्रणाली होत्या. या श्रद्धाप्रणाली कोणत्याही विशिष्ट धर्माच्या नावाने ओळखल्या जात नव्हत्या किंवा त्यांचे काही धार्मिक ग्रंथही नव्हते. त्यामुळे त्यांच्या श्रद्धाप्रणालींची माहिती फक्त प्राचीन धर्मग्रंथांमधील संदर्भांच्या आधारे मध्ययुगीन नोंदींमधून आणि वसाहतकालीन समूहविशिष्ट वर्णनांच्या (Ethnography) आधारे मिळू शकते. मानववंशशास्त्रज्ञांनी

समूहविशिष्ट श्रद्धाप्रणालींचे वर्गीकरण भूतप्रेतांवरील श्रद्धा (animism), अमानवी पूर्वजांवरील श्रद्धा (totemism) यांसारख्या शीर्षकांखाली केले. त्यासंबंधीचे तपशीलवार वर्णन तुम्हांला पुढील पाठात वाचता येईल.



हडप्पा पुरातत्त्वीय उत्खनन स्थळ

**मानववंश शास्त्र :** युरोपीय नसलेल्या, विदेशी समाज आणि संस्कृतींच्या अभ्यासाची गरज निर्माण झाल्यामुळे वसाहतकाळामध्ये मानववंश शास्त्राचा उदय झाला. मानववंशशास्त्र हे भौतिक मानववंशशास्त्र व सामाजिक/सांस्कृतिक मानववंशशास्त्र अशा दोन विस्तृत शाखांमध्ये विभागले गेले.

वसाहतिक अभ्यासाचा भाग म्हणून मानववंशशास्त्राचे टीकाकार एडवर्ड सैद यांनी 'प्राच्यविद्याशाखेचा' अभ्यास केला.

हिंदू जीवनपद्धतीच्या संदर्भातील श्रद्धाप्रणाली आणि धार्मिक आचार यांची माहिती अनेक वैदिक ग्रंथातून मिळते. त्यातील काही लिखित स्वरूपातील आहेत तर काही मौखिक परंपरेने जपलेले आहेत. त्यामध्ये वेदसंहिता उपवेद, वेदांगे, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके आणि महाकाव्ये यांचा समावेश होतो. वैदिक संस्कृतीचा काळ 'पूर्व वैदिक' (इ.स.पू. सुमारे १५००ते १००० वर्षे) आणि 'उत्तर वैदिक' (इ.स.पू. सुमारे १००० ते ५०० वर्षे) अशा दोन कालखंडात विभागलेला आहे. कारण या दोन कालखंडांच्या दरम्यान अनेक बदल घडून आले. त्या बदलांची चर्चा ओघाओघात होईलच.

पुराणे आणि धर्मशास्त्रावरील ग्रंथांमधून हिंदूंच्या आचारपद्धतीचे आणि सामाजिक वर्तनाच्या नियमांचे वर्णन केलेले आहे. हे नियम 'कर्मसिद्धान्त' यावर आधारलेले आहेत. त्यालाच 'कार्यकारणपरंपरेचा सिद्धान्त' असेही म्हटले जाते. 'करावे तसे भरावे' ही म्हण तुम्हाला परिचित असेलच. जन्ममृत्यूच्या चक्रावर हिंदूंचा विश्वास असतो. त्यानुसार व्यक्तीच्या एका जन्मातील कर्मसंचित पुढील जन्माचा आलेख निश्चित करते. जीवात्मा हा मोक्षप्राप्ती होईपर्यंत 'पुन्हापुन्हा जन्म आणि पुन्हापुन्हा मृत्यू' या चक्रामध्ये अडकलेला असतो. हिंदू व्यक्तीच्या आयुष्यात चार पुरुषार्थ (उद्दिष्टे) महत्त्वाची मानलेली आहेतः

| धर्म | अर्थ |
|---|---|
| • फलाची आशा न धरता निरपेक्ष वृत्तीने विहित कर्मे करत राहणे | • विहित मार्गाने संपत्ती मिळवणे. |

| काम | मोक्ष |
|---|---|
| • विहित मार्गाने शारीरिक सुखांची आणि आनंदाची प्राप्ती करून घेणे. | • जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटका मिळवण्याचे आयुष्यातील परमोच्च ध्येय. |

विविध अभ्यासक आणि संशोधक यांनी मांडलेल्या मतानुसार पूर्व वैदिक काळातील समाज हा व्यवसायाधिष्ठित सामाजिक वर्णपद्धतीच्या (या पद्धतीची चर्चा पुढे केली जाईल) बाबतीत ताठर नव्हता. मात्र काही काळाने वर्णपद्धतीत अधिकाधिक ताठर सीमा निर्माण झाल्या आणि जातिव्यवस्था निर्माण झाली आणि तिचे रुपांतर उच्चनीचतेच्या स्तरांमध्ये विभागलेल्या रचनेत झाले. पुरोहितवर्गाचे वर्चस्व असलेल्या आणि "पवित्र आणि अपवित्र" या कल्पनांवर आधारलेल्या जातिव्यवस्थेत स्तरांची ही उतरंड खोलवर रुजत गेली. याचा अर्थ जातीच्या अंतर्गत विवाहाची सक्ती, धार्मिक आचारविधींना प्रमाणाबाहेर महत्त्व आणि जातीजातींमधील सीमा अत्यंत कडक होत गेल्या.

या पार्श्वभूमीवर महावीर वर्धमान आणि गौतम बुद्ध यांनी वेदप्रामाण्याला आणि पुरोहितांच्या वर्चस्वाला विरोध करणाऱ्या नवीन तत्वज्ञानाची शिकवण लोकांना दिली. दोघांचा जन्म क्षत्रिय कुळांमध्ये झाला असला तरी त्यांनी यज्ञविधींना प्राप्त झालेले अत्याधिक महत्त्व आणि पशुबळीची प्रथा तसेच सामाजिक उतरंड या गोष्टींना विरोध केला. त्यांचे तत्वज्ञान भारतीय परंपरेत 'बौद्ध धर्म' आणि 'जैन धर्म' म्हणून रूढ झाले. जैन धर्माची परंपरा अत्यंत प्राचीन असल्याचे समजले जाते. जैन परंपरेत एकूण २४ तीर्थंकर होऊन गेले. वर्धमान हे चोविसावे तीर्थंकर होते. हिंदू परंपरेप्रमाणेच जैन परंपरेतही कर्मसिद्धान्ताला मान्यता आहे. मात्र 'अहिंसा' आणि 'तपस' या दोन तत्त्वांना जैन जीवनपद्धतीत अत्यंत महत्त्व आहे. वर्धमान महावीरांनी त्यांच्या उपदेशात 'देव' या संकल्पनेचा समावेश केलेला नाही. त्यांनी 'निर्वाण' या तत्वावर भर दिला. त्यांनी लोकांना उपदेश करताना 'अर्धमागधी' या लोकभाषेचा उपयोग केला.

**जाणून घ्या**

जैन परंपरेमध्ये पूजनीय मानल्या जाणाऱ्या १६ स्त्रियांमधील द्रौपदी, कौसल्या, सीता, कुंती आणि दमयंती यांना हिंदू परंपरेमध्येही महत्त्वाचे स्थान आहे.

वैदिक परंपरेत यज्ञविधी आणि पशुबळी यांना तर जैन परंपरेत व्रतस्थ जीवनपद्धतीच्या दैनंदिन नियमांना महत्त्व देण्यात आले.

गौतम बुद्धांनी 'चार आर्यसत्ये' आणि 'अष्टांगमार्गा' वर आधारित 'मध्यममार्गा'चा उपदेश केला.

जैन परंपरेप्रमाणेच गौतम बुद्धांनाही 'देव' ही संकल्पना मान्य नव्हती. 'तिपिटक' (त्रिपिटक) हे बौद्ध धर्माचे पवित्र ग्रंथ 'पाली' या लोकभाषेत लिहिलेले आहेत. गौतम बुद्धांनी 'भिक्खूसंघ' स्थापन केला आणि भिक्खूसंघाला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले. व्यक्तिगत आणि सामाजिक पुनरुत्थानासाठी आवश्यक अशी पार्श्वभूमी निर्माण करणे, हे भिक्खू आणि भिक्खूसंघाचे महत्त्वाचे कार्य होते.

**जाणून घ्या**

भारतीय तत्वज्ञानातील जैन आणि बौद्ध या तत्वज्ञानाला 'नास्तिक' असे (म्हणजे ईश्वराचे अस्तित्व अमान्य करणारी) म्हटले जाते. उरलेल्या तत्वज्ञानामध्ये दर्शनांमधील 'चार्वाक दर्शन' तसेच 'आजीविका' या पंथाचा अपवाद वगळता भारतीय तत्वज्ञान आणि पंथ 'आस्तिक' (म्हणजे ईश्वराचे अस्तित्व मान्य करणारी) आहेत.

चार्वाक दर्शन आणि आजीविका पंथ हेही भारतीय तत्वज्ञानाच्या परंपरेचा भाग आहेत. चार्वाकाचे तत्वज्ञान हे अनिश्वरवादी आणि ऐहिक विचारसरणीच्या पायावर उभारलेले आहे. आजीवक पंथाचा उगम दैववाद आणि तापसी जीवनपद्धती यातून झालेला आहे.

**तुम्हाला माहीत आहे का?**

जातक कथा (इ.स.पू.३०० ते इ.स.४००) जातक कथासाहित्याचा विस्तार मोठा आहे. त्यामध्ये गौतम बुद्धांच्या मानवीरूपातील आणि प्राणीरूपातील पूर्वजन्मांच्या कथांचा समावेश आहे. भविष्यातील बुद्धांचा जन्म राजा, जातीबाहेरील व्यक्ती किंवा हत्ती अशा कोणत्याही रूपात असू शकेल. कोणत्याही स्वरूपात बुद्धांनी जन्म घेतला तरी त्यांच्यातील काही लक्षणे आणि त्यांची नैतिकता यांवरून बुद्धांची ओळख जाातककथांमधून पटते.

या कथांमध्ये विविध प्रकारची अनेक पात्रे एकमेकांशी संबंधित असतात. ती पात्रे वेगवेगळ्या संकटात सापडतात आणि बुद्ध स्वतः त्यांच्या समस्या दूर करतात. जीवसृष्टीतील नैसर्गिकतेचा संदर्भ हा या कथांचा अनिवार्य भाग आहे.

जैन आणि बौद्ध धर्मांकडे प्रस्थापित धर्माला विरोध करणारे बंडखोर धर्म म्हणून पाहिले जाते. या दोन्ही धर्मांनी समाजाच्या सर्व थरांमधील व्यक्तींना प्रवेश दिला. त्यामुळे मोक्षाचा हक्क समाजातील विशिष्ट

वर्गापुरताच मर्यादित राहिला नाही. जैन धर्माच्या तुलनेत बौद्ध धर्मामधील नियम हे सौम्य होते. त्यामुळे बौद्ध धर्माकडे लोक मोठ्या संख्येने आकृष्ट झाले, हे समजण्यासारखे आहे. बौद्ध धर्माचा प्रसार दूरवर झाला. मौर्य सम्राट अशोकाच्या आश्रयामुळे त्याचा प्रसार भारताच्या सीमा ओलांडून तिबेट, चीन, मंगोलिया, म्यानमार, जावा, सुमात्रा, श्रीलंका अशा बाहेरील अनेक प्रदेशांमध्ये झाला. आजही या प्रदेशांमधील लोकांच्या दृष्टीने भारत ही त्यांच्या धर्माच्या उगमाची भूमी म्हणून पवित्र आहे. ज्या व्यक्तींनी बौद्ध भिक्खू आणि भिक्खूणीची दीक्षा स्वीकारली त्यांच्यासाठी बौद्ध संघांची स्थापना करण्यात आली.

बौद्ध धर्मामध्ये व्यक्तीच्या नैतिक उन्नतीला आणि त्यावर आधारित जीवनपद्धतीला महत्त्वाचे स्थान देण्यात आले. त्यामध्ये दानवृत्ती, स्वार्थत्याग, संयम, विचार आणि कृतीमधील अहिंसा या गुणांनी युक्त अशा आचरणावर भर देण्यात आला. उपनिषदांमध्येही या गुणांवर भर दिलेला आहे. हे गुण बौद्ध जीवनपद्धतीत मोठ्या प्रमाणात आचरणात आणले जातात.

कालांतराने जैन आणि बौद्ध या दोन्ही धर्मांमध्ये स्वतंत्र पंथ निर्माण झाले. बौद्ध धर्मातील 'हीनयान' (छोटे वाहन) पंथामधील अनुयायी मूळ नियमांचे पालन काटेकोरपणे करत असल्यामुळे त्यांची संख्या 'महायान' (मोठे वाहन) पंथाच्या अनुयायांच्या तुलनेने कमी होती. महायान पंथाचे नियम हे अधिक व्यवहार्य आणि सहज आचरता येण्याजोगे होते. त्यामुळे त्या पंथातील अनुयायांची संख्या अधिक होती. जैन धर्मामध्ये 'दिगंबर' (आकाश हेच वस्त्र असे मानणारे मुनी ज्या पंथात आहेत) आणि श्वेतांबर (श्वेत वस्त्र परिधान करणारे मुनी ज्या पंथात आहेत) असे दोन पंथ निर्माण झाले. बौद्ध धर्माचा तिसरा पंथ वज्रयान हा पुढे इसवीसनाच्या ८व्या शतकात उदयाला आला.

**कृती १**

बौद्ध धर्मातील 'अष्टांगमार्गा'ची माहिती गोळा करा.

वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांच्या निर्वाणानंतर काही काळाने त्यांच्या उपदेशाचा प्रसार कमी झाला. पुढे सुमारे बाराशे वर्षांच्या कालखंडात कोणताच नवीन आणि प्रभावी धर्म उदयाला आला नाही. इतिहासकार आर.एस. शर्मा यांच्या मते, हा कालखंड अनेक घडामोडींमुळे होणाऱ्या सततच्या सामाजिक विघटनाचा आणि विकेंद्रीकरणाचा होता.

**आता आपण मध्ययुगीन कालखंडातील** (इ.स. सुमारे ६०० ते १५००) महत्त्वाच्या धार्मिक आचार आणि श्रद्धाप्रणालींची माहिती घेऊया. या कालखंडात भारतामध्ये काही धर्म बाहेरून आले. त्यामध्ये ज्युडाइझम, ख्रिश्चन, इस्लाम आणि कालांतराने आलेल्या पारशी धर्मांचा समावेश होतो.

**संघम कालखंड** (इ.स.पू.६ वे शतक ते इ.स.३ रे शतक) हा दक्षिण भारतातील (म्हणजे साधारणपणे आजचे तमिळनाडू आणि केरळ या राज्यांचा प्रदेश) प्राचीन इतिहासाचा काळ आहे. या काळाला प्राचीन तमिळ कवी आणि साहित्यिकांच्या मदुराईतील संघमांमुळे (परिषदा) 'संघम कालखंड' असे म्हटले जाते. या कालखंडात समाजावरील धर्माचा पगडा फार तीव्र नव्हता. लोकांचे धार्मिक आचरण विविध प्रकारचे विधी आणि भक्ती या दोन्हींवर आधारलेले होते. धार्मिक विधी भूतप्रेतादी आणि तत्सम स्वरूपाच्या देवतांच्या उपासनेशी संबंधित होते. तसेच वृक्ष, दगड, जल, प्राणी, तारे आणि ग्रह यांनाही देवतास्वरूप मानून त्यांची पूजा केली जाई. संघम काळातील लोकांना काही आध्यात्मिक आणि तात्त्विक सत्यांची जाणीव होती. जीवरूपी चैतन्य हे शरीराहून भिन्न असते, असे ते समजत असत. त्यानुसार चैतन्यरूपी जीवाचे स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व असते, परंतु त्याच्याखेरीज असलेल्या शरीराला अस्तित्व नसते. संघमकालीन लोकांचे पूर्वजपूजा, पुनर्जन्म यांसारख्या गोष्टींभोवती गुंफले गेलेले तत्त्वज्ञान मृत्यू आणि मृत्यूनंतरचे जीवन यांचा विचार करणारे होते.

काही अभ्यासकांच्या मते, पारशी धर्माचा उगम वैदिक काळाच्याही पूर्वीचा आहे. या धर्माचे मूळ मध्य पूर्वेच्या प्रदेशात आहे. या धर्माच्या अनुयायांचा धार्मिक छळ होत होता म्हणून त्यांनी स्थलांतर केले आणि ते भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर गुजरातमध्ये पोचले. ते तेथेच स्थिरावले. तेथील संस्कृतीत मिसळले. बाहेरून

आलेल्या लोकांमध्ये फक्त पारशी समाजाचे लोक असे आहेत की जे अजूनही त्यांच्या समाजाबाहेरच्या व्यक्तीशी सहसा लग्न करत नाहीत. पारशी धर्म बाहेरील व्यक्तींना आपल्या धर्मात घेण्यास परवानगी देत नाही. तसेच त्यांच्या अग्यारीत पारशी व्यक्तींखेरीज इतरांना प्रवेश करण्यास बंदी असते.

बाहेरून भारतात आलेल्या धर्मांच्या अनुयायांपैकी ज्यूधर्मीय लोक हे सर्वप्रथम होत, असे मानले जाते. ते हिब्रू राजा सॉलोमन याच्याबरोबर व्यापारासाठी भारतात आले. कोचीमधील ज्या लोकांनी ज्यू धर्माचा स्वीकार केला, त्यांना 'कोची ज्यू' असे नाव मिळाले. कोचीच्या किल्ल्यामध्ये आजही ज्यू सिनॅगॉग पहायला मिळते. भारतातील ज्यू समाजाची लोकसंख्या कमी झाली आहे. 'बेने इस्रायल ज्यू' या समाजाचे काही लोक मुंबईमध्ये आणि मिझोराम या राज्यात आहेत. ज्यूधर्मीय लोक 'तोरॉ' या धर्मग्रंथातील नियमांचे पालन करतात. (तोरॉमध्ये बायबलच्या 'जुना करार' या ग्रंथाचा समावेश आहे.) ज्यू धर्म हा एकेश्वरवादी आहे. पृथ्वीतलावर देवाच्या प्रेषिताचे आगमन अजून व्हायचे आहे अशी ज्यू धर्मीयांची श्रद्धा आहे. 'शबाथ' हा त्यांच्यासाठी एक पवित्र विधी आहे. मानवी इतिहासामध्ये ज्यू समाजातील लोकांचा अनन्वित छळ केला गेला, हे तुम्हाला माहीत असेलच.

**पारशी धर्म** : हा जगातील प्राचीन धर्मांपैकी एक आणि आजतागायत टिकून राहिलेला धर्म आहे. चांगले आणि वाईट अशा ध्रुवीय संकल्पना या धर्माच्या मध्यवर्ती आहेत (उदाहरणार्थ, स्वर्ग आणि नरक) 'अवेस्ता' हा या धर्माचा पवित्र ग्रंथ आहे. त्यामध्ये 'अहुर मज्द' हा विश्वाचा निर्माता असून 'आशा' म्हणजे वैश्विक सत्याचा उगम त्याच्यापासून होतो, असे म्हटलेले आहे. अग्नी आणि जल ही दोन तत्त्वे 'शुद्धते'ची माध्यमे आहेत. 'अग्यारी' म्हणजे अग्निमंदिर हे पारशी धर्माचे पूजास्थान असते. इराणहून गुजरातमधील नवसारी येथे येताना पारशी पुरोहितांनी स्वतःबरोबर पवित्र अग्नी आणला (इ.स. ९ वे शतक).

स्वतःची मूळ सांस्कृतिक ओळख हरवू न देता, संख्याबळ उत्तरोत्तर कमी होत असतानाही, पारशी समाजाने भारतीय जनजीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. दादाभाई नौरोजी, फिरोजशाह मेहता, फिल्ड मार्शल सॅम मानेकशॉ, झुबीन मेहता ही पारशी समाजातील काही प्रसिद्ध व्यक्तिमत्वे आहेत. तसेच भारतातील आधुनिक उद्योगांची उभारणी करण्यात टाटा, गोदरेज आणि वाडिया या पारशी कुटुंबांची कामगिरी फार मोलाची आहे. भारताला आण्विक सत्ता म्हणून ओळख मिळवून देण्यात डॉ. होमी भाभा यांचा सहभाग महत्त्वाचा होता. नानी पालखीवाला, सोली सोराबजी आणि फली नरिमान यांच्यासारख्या सुप्रसिद्ध कायदेपंडितांनी भारतीय समाजाला कायद्याची ओळख करून दिली.



ज्यू सिनॅगॉग, कोची

## हे माहीत करून घ्या

**वंशविच्छेदाची भट्टी :** इ.स.१९४५ पासून 'होलोकॉस्ट' या इंग्रजी शब्दाला एक भयानक परिमाण प्राप्त झाले आहे. हा शब्द युरोपमधील लाखो ज्यू तसेच जिप्सी, समलैंगिक, समाजवादी, साम्यवादी आणि इतर लोकांना जिवंत जाळण्यात आले त्या घटनेचा निर्देश करण्यासाठी वापरला जातो. दुसऱ्या जागतिक महायुद्धात नाझी राजवटीने हे घडवले. भट्टीत जिवंत जाळण्यात आलेल्यांची संख्या सुमारे ११ दशलक्षाच्या जवळपासची असल्याचा अंदाज आहे.

दुसऱ्या जागतिक युद्धाच्या काळात युरोपमध्ये प्रस्थापित केल्या गेलेल्या छळ छावण्यांची अधिक माहिती मिळवा.

१९४८ ते १९५१ या काळात सुमारे १ लाख ३६ हजार विस्थापित ज्यू लोकांनी इझ्रायल येथे स्थलांतर केले. अनेकजण अमेरिका आणि युरोपबाहेरील देशांमध्ये स्थिर झाले.


अनेक शतके ज्यू लोकांना त्यांची स्वतःची भूमी नव्हती आणि त्यामुळे ते वेगवेगळ्या खंडांमध्ये विखुरले होते. त्यांना स्वतःची म्हणून म्हणण्याजोगी भूमी स्वतःचा देश 'इझ्रायल' मिळण्यासाठी २० वे शतक उजाडावे लागले. त्यासाठी त्यांना राजकीय संघर्ष करावा लागला.

इसवीसनाच्या पहिल्या शतकात येशू ख्रिस्त यांचे शिष्य सेंट थॉमस हे त्यांच्यासोबत दक्षिण भारतातील मलबारच्या किनाऱ्यावर ख्रिश्चन धर्म घेऊन आले. येशू ख्रिस्तांच्या अनुयायांना 'ख्रिश्चन' म्हणून ओळखण्यात येऊ लागले. सेंट थॉमस यांच्या मलबारमधील स्थानिक अनुयायांना 'सिरियन ख्रिश्चन' म्हटले जाऊ लागले. ख्रिश्चन धर्मही ज्यू धर्माप्रमाणे एकेश्वरवादी आहे आणि त्यांचा जीवनाबद्दलचा दृष्टिकोन एकरेषीय आहे. म्हणजे प्रत्येकाला एकच जन्म मिळतो आणि त्या जन्मातील त्यांच्या वर्तणुकीच्या आधारे त्यांना स्वर्गात प्रवेश मिळेल की नाही याचा निवाडा केला जातो, हा विचार त्यांच्या श्रद्धाप्रणालीच्या मुळाशी असतो. 'प्रेम' हे ख्रिश्चन धर्माचे पायाभूत तत्व आहे आणि सर्व ख्रिश्चन धर्मियांच्या मनात प्रेषित येशू ख्रिस्तांचा मृत्यू आणि पुनरुत्थान यांबद्दल विश्वास असतो. वसाहतवादी काळात ख्रिश्चन धर्माचा भारतामध्ये लक्षणीय प्रभाव होता.




**पलयूर येथील सिरोमलबार चर्चमध्ये सेंट थॉमस यांनी प्रतिष्ठापित केलेला क्रूस**

भारतामध्ये इस्लामचे आगमन इसवीसनाच्या ६ व्या शतकात झाले असले तरी त्याचा प्रभाव ठळकपणे दृश्यमान होण्यास बराच अवधी जावा लागला. ज्यू आणि ख्रिश्चन या धर्मांप्रमाणेच इस्लाम हा धर्मही एकेश्वरवादी आहे आणि 'पवित्र कुराण' हा ग्रंथ इस्लामच्या श्रद्धाप्रणालीचा स्रोत आहे.




मध्ययुगामध्ये इस्लामचा प्रसार दूरवर झाला. अनेक मुस्लीम सत्ताधीशांनी इस्लामचा प्रसार करण्याचे कार्य केले. दिल्लीच्या इस्लामिक सत्तांनी एक मोठे साम्राज्य उभे केले आणि ५ मुस्लीम राजघराण्यांनी दिल्लीमधून सुमारे ३२० वर्षे राज्य केले.





अकबर बादशहाने इसवी सन १५७९ मध्ये नैतिक तर्कवादाच्या आधारावर 'दिन-ई-इलाही' या नवीन धर्माची स्थापना केली. तसेच सर्व धर्मांच्या तत्वज्ञानाचे मंथन करून त्यातून पुढे आलेल्या 'वैश्विक सहिष्णुता'

या तत्त्वाच्या आधारावर अकबर बादशहाने या धर्माची उभारणी केलेली होती. या धर्मपद्धतीमध्ये पुरोहित-धर्मगुरू, धार्मिक विधी, श्रद्धाप्रणाली आणि धर्मग्रंथ यांपैकी काही नव्हते. विविध पवित्र ग्रंथांतील शिकवणीचे सार या धर्मामध्ये होते.

ख्रिश्चन, मुस्लीम आणि ज्यू अशा विविध धर्माच्या लोकांशी स्थानिकांच्या आलेल्या सामाजिक संबंधातून धर्मांतरे झाली. ख्रिश्चन धर्मप्रचारक त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक सेवेसाठी ओळखले जातात. या सेवा देत असताना त्यांनी लिंग, जात, धर्म, समाज असा भेदभाव केला नाही.

शीख धर्माचा उदय १५ व्या शतकामध्ये झाला. गुरू नानक (इ.स.१४६९-१५३९) यांनी शीख धर्माची स्थापना केली. त्याचा प्रसार सुरुवातीला पंजाबमध्ये झाला. या धर्मामध्ये जातीवर आधारित उच्चनीचतेला स्थान नव्हते. धर्म आणि इतर सामाजिक क्षेत्रात प्रत्येकाच्या समानतेला शीख धर्मामध्ये मान्यता होती. शीखांच्या दहा गुरूंनी केलेला उपदेश हा शीख धर्मियांच्या श्रद्धाप्रणालीचा पाया आहे. 'श्रीगुरूग्रंथसाहिब' हा त्यांचा पवित्र ग्रंथ आहे.




**शीख धर्मातील पंचकार**

सार्वजनिक स्वयंपाकघराला पंजाबी भाषेमध्ये 'लंगर' म्हणतात. १६ व्या शतकातील संस्थापक गुरूंनी लंगरला संस्थात्मक रूप दिले. लंगरचे संस्थात्मक स्वरूप हे दान आणि समानता या तत्त्वांचे एकमेवाद्वितीय असे प्रतीक आहे. तिथे जातपात, वय, स्त्री-पुरुष, सामाजिक प्रतिष्ठा असा कोणताही भेदभाव न करता येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला शाकाहारी भोजन पुरवले जाते. सर्व शीख गुरूद्वारांमध्ये लंगर असते. तिथे काम करणाऱ्या स्वयंसेवकांना 'सेवादार' असे म्हटले जाते. अभ्यागतांशी त्यांची वर्तणूक सौजन्य, काळजी आणि अगत्य या तिन्ही गोष्टींनी युक्त अशी असते.



**लंगर**

भेदाभेदाच्या पार्श्वभूमीवर मध्ययुगीन कालखंडात भक्ती तत्त्वाला प्राधान्य देणाऱ्या चळवळी उदयाला आल्या. हिंदू धर्मपद्धतीत त्यामुळे मोठ्या प्रमाणावर बदल घडून आले. या बदलांमधून समाजाच्या सर्व जातिंमधील आणि स्तरांमधील लोकांना सामावून घेणारे भक्तीपंथ भारतातील विविध प्रदेशांमध्ये उदयाला आले. भक्तीपंथांमध्ये धार्मिक विधींच्या अतिरेकावर टीका केली गेली आणि साधेपणावर भर देण्यात आला. परमेश्वरापुढे सर्वजण समान असतात हे आग्रहाने मांडण्यात आले. कीर्तन आणि अखंड नामस्मरण यांना भक्तीपंथांमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. अनेक संतकवींच्या कामगिरीमुळे भक्तीपरंपरेतील कीर्तन आणि अखंड नामस्मरण या दोन गोष्टी समाजाच्या सर्व स्तरांमध्ये कायमस्वरूपी रुजल्या. भक्तीतत्त्वावर भर देणारा इस्लाममधील सुफीपंथही याच काळात उदयाला आला. या पंथातही मानवतेची एकता आणि अल्लाहच्या दरबारातील सर्वांचे समान स्थान या तत्त्वांना महत्त्व होते. कबीर, रहीम आणि गुरू नानक यांसारख्या संतमहात्म्यांचे भारतभरच्या भक्ती चळवळीतील स्थान अनन्यसाधारण आहे. कबीर आणि रहीम यांनी विधी, अंधश्रद्धेवर आधारलेल्या प्रथा, मूर्तीपूजा आणि तीर्थयात्रा यांसारख्या धार्मिक बाह्योपचारांचा निषेध केला. गुरू नानक यांनी जातिव्यवस्था धार्मिक विधी आणि मूर्तीपूजा इत्यादींना मनाई केली.

**महाराष्ट्रातील भक्तीचळवळ :** महाराष्ट्रामध्ये भक्तीचळवळीचा उगम इसवीसनाच्या १३ व्या शतकात संत ज्ञानेश्वरांच्या काळात झाला. पंढरपूरचा विठोबा हे दैवत या चळवळीचा केंद्रबिंदू होते. संत नामदेव (इ.स. १२७०-१३५०) हे संत ज्ञानेश्वरांचे समकालीन होते. त्यांनी उपवास तीर्थयात्रा आणि इतर सर्व प्रकारच्या धार्मिक बाह्योपचारांवर टीका केली.



**(ii) भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान :** भारतीय वैदिक साहित्य आणि इतिहास संशोधनाच्या आधारे असे दिसते की पूर्व वैदिक काळातील स्त्रियांचे सामाजिक स्थान तुलनेने अधिक उच्च दर्जाचे होते. परंतु त्यांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा होता असे मात्र म्हणता येणार नाही. त्या काळी पितृप्रधान समाजव्यवस्था होती आणि आजही ती तशीच आहे.

पूर्व वैदिक काळातील स्त्रियांना वेदांचे शिक्षण घेण्याची मुभा होती. त्यांना उपनयन संस्काराचा अधिकार होता. त्यामुळे त्यांना गुरूगृही राहून शिक्षण घेता येत असे. ऋग्वेदामध्ये वेदविद्या प्राप्त केलेल्या स्त्रियांना अत्यंत मानाचे स्थान होते. अशा स्त्रियांचे दोन प्रकार ऋग्वेदात सांगितलेले आहेत : 'सद्यवधू' म्हणजे उपनयनाचा संस्कार पूर्ण होताच गुरूगृही न जाता विवाह होऊन सासरी पाठवल्या गेलेल्या मुली. 'ब्रह्मवादिनी' म्हणजे उपनयनाचा संस्कार प्राप्त झाल्यानंतर वेदांचे शिक्षण घेऊन वेदविद्येत पारंगत झालेल्या स्त्रिया. त्या आजन्म अविवाहीत राहून वेदांचे अध्ययन आणि अध्यापन करत असत. स्त्रियांना वेद आणि वेदांच्या स्पष्टीकरणाशी निगडित असलेली वेदांगे या दोन्हींचे शिक्षण दिले जात असे. नंतर मात्र स्त्रियांचे शिक्षण फक्त धार्मिक स्तवने आणि कविता यांच्यापुरते मर्यादित झाले. वेद आणि उपनिषदांचे ज्ञान प्राप्त केलेल्या स्त्रियांमध्ये अपाला, घोषा, लोपामुद्रा, गार्गी, मैत्रेयी अशा काही पंडिता विशेष नावाजलेल्या होत्या तत्कालीन समाजामध्ये स्त्रियांची भूमिका समाजोपयोगी आणि अर्थोत्पादक समजली जात होती. त्यांना 'विदथ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सामाजिक सभांमध्ये सहभागी होता येत असे. त्यांना आयुष्याचा जोडीदार स्वतः निवडण्याची मुभा होती. 'विवाह' हा एक पवित्र संस्कार मानला जाई आणि तो मोडण्यास मान्यता नव्हती. मात्र स्त्रीने विवाह केलाच पाहिजे अशी सक्ती नव्हती. एकपत्नीत्वाला प्राधान्य होते. उपनिषदांमध्ये 'अनुलोम विवाह' म्हणजे उच्च वर्णाच्या वराचा कनिष्ठ दर्जाच्या वर्णातील वधूशी विवाह आणि 'प्रतिलोम विवाह' म्हणजे उच्च वर्णातील वधूचा कनिष्ठ वर्णातील वराशी विवाह, या प्रकारांचा उल्लेख आढळतो.

उत्तर वैदिक काळात जातिव्यवस्था आणि पुरोहितवर्गाचे वर्चस्व समाजामध्ये खोलवर रूजले. काळाबरोबर जातीजातींमधील भेद अधिक कडक होत गेले. जातिव्यवस्थेतील विषमता वाढत गेली. या घडामोडींमध्ये स्त्रियांचा दर्जा अधिकच खालावत गेला. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेल्यामुळे त्यांचा उपनयनाचा आणि गुरुकुलात राहून शिकण्याचा अधिकारही संपुष्टात आला. 'विवाह' हा एकमेव संस्कार आणि बालवयातील विवाह हेच स्त्रियांचे वास्तव ठरले.

आतापर्यंत तुम्ही याची नोंद घेतलेली असेल की पूर्व वैदिक काळात सामाजिक आणि कायदेशीर हक्कांच्या दृष्टीने स्त्रियांचे स्थान उत्तर वैदिक काळाशी तुलना केली असता अधिक मानाचे होते परंतु तेव्हाही ते पुरुषांच्या बरोबरीचे नव्हतेच. स्थावर संपत्तीवर त्यांना अधिकार नव्हता. उत्तर वैदिक काळात स्त्रियांचा सामाजिक दर्जा घसरत गेला. स्त्रिया फक्त घरगुती कर्तव्यांशी बांधल्या गेल्या आणि सामाजिक सभांमधून त्यांनी सहभागी होणे वर्ज्य करण्यात आले. स्त्रियांचा कुटुंबातील दर्जा गौण ठरला. कुटुंबपद्धती पितृप्रधान असणे आणि संपत्तीचा आणि वंशावळीचा वारसा हा पित्याकडून पुत्राकडे जाणे ही पूर्वापार प्रथा आणखी खोलवर रूजली. त्यामुळे स्त्रियांनी जन्मापासून विवाहापर्यंत पित्याच्या, विवाहापासून पतीच्या मृत्यूपर्यंत पतीच्या आणि पतीच्या मृत्यूनंतर पुत्राच्या आज्ञेत रहावे, असा दंडक घातला गेला. मुलीचा जन्म ही घटना अवांच्छित मानली जाऊ लागली. तसेच हुंडापद्धती

सुरू झाल्याचे दिसते. 'गौतम धर्मसूत्र' या ग्रंथात मुलीचे कौमार्य आणि पावित्र्य भंग होऊ नये म्हणून तिचा विवाह तिला ऋतुप्राप्ती होण्याअगोदर करावा, असे म्हटलेले आहे.

**कृती २**

आधुनिक भारतीय स्त्रिया आणि उत्तर वैदिक काळातील स्त्रिया यांच्या सामाजिक स्थानामध्ये काही साम्य आहे का याची चर्चा करा. त्या संदर्भातील काही प्रथा-परंपरा २१ व्या शतकात अजूनही टिकून आहेत का?

जैन धर्म हा धार्मिक समतेच्या तत्त्वावर आधारलेला असल्यामुळे त्यामध्ये सर्व जीवांचे हक्क गृहीत धरलेले आहेत. त्यामुळे स्त्रियांनाही निर्वाणप्राप्ती होऊ शकते, हे या धर्मात मान्य केलेले आहे. मात्र दिगंबर आणि श्वेतांबर पंथांमधील मुनी आणि साध्वी यांच्या संदर्भात विचार करता स्त्री-पुरुषांच्या आध्यात्मिक अधिकारात फरक असल्याचे आढळते. श्वेतांबर पंथामध्ये अनेक आदरणीय स्त्रियांच्या कामगिरीची दखल घेतलेली आहे. जैन धर्मातील 'सोळा सती' या सर्व स्त्रियांसाठी आदर्शवत आणि अनुकरणीय मानलेल्या आहेत. मात्र जैन संघातील साध्वींसाठी असलेले आचरणाचे नियम हे मुनींसाठी असलेल्या नियमांपेक्षा निराळे असतात. असे असले तरी तीर्थंकरांच्या मातांना देवतास्वरूप मानून संतती, संपत्ती आणि आरोग्य यांसारख्या इच्छांच्या पूर्तीसाठी त्यांची पूजा केली जाते. अनेक जैन साध्वींनी सतीप्रथा, दासीप्रथा आणि पशुबळीची पद्धत यांसारख्या गोष्टी संपुष्टात आणण्यासाठी योगदान दिले आहे. जैन साहित्य आणि मौखिक परंपरा यांमधून अनेक साध्वी आणि आदर्श स्त्रियांचे गुणगान केलेले आढळते.

दिगंबर जैन वस्त्रविहीनता ही निर्वाणाच्या मार्गावरील मूलभूत गोष्ट आहे, असे मानतात. वर्धमान महावीरांनी स्वतः या गोष्टीचा पुरस्कार केला होता.

गौतम बुद्धांनी स्त्रियांना बौद्ध संघामध्ये प्रवेश देण्यास आणि त्यांना तेथील कार्यात पूर्णपणे सहभागी होण्यास मान्यता दिली. बौद्ध धर्मातील विविध पंथ आणि परंपरा यांच्यामध्ये स्त्रियांच्या आध्यात्मिक उन्नतीच्या बाबतीतील शक्यतांच्या संदर्भात भिन्न भिन्न दृष्टिकोन आहेत. विशेष म्हणजे स्त्रिया आणि पुरुष यांच्यामध्ये आध्यात्मिक उन्नतीची समान क्षमता असते आणि त्यामुळे अनेक स्त्रियांना निर्वाणप्राप्ती झाल्याचे उल्लेख आढळतात. बौद्ध धर्मात स्त्री आणि पुरुष हा भेद नाही कारण वृद्धत्व, आजार आणि मृत्यू या गोष्टी स्त्री-पुरुष, सामाजिक प्रतिष्ठा, वय इत्यादींवर अवलंबून नसतात. अर्थात दुःख आणि अनित्यता या दोन्ही गोष्टी प्रत्येकासच लागू असतात.



**बौद्ध भिक्खुणी**

सुरुवातीच्या बौद्ध ग्रंथांमध्ये जरी स्त्रियांना निर्वाणप्राप्ती होऊ शकते, हे मान्य केलेले असले तरी 'विनय पिटक' या ग्रंथात मात्र भविष्यात स्त्री-बुद्ध होण्याची शक्यता स्पष्टपणे नाकारलेली आहे. स्त्रियांनी दीक्षा घेऊन भिक्खुणी म्हणून बौद्ध धर्मसंघात प्रवेश करण्यास मात्र प्रतिबंध नव्हता. गौतम बुद्धांनी मुलीचा जन्म हा चिंताजनक किंवा निराशाजनक समजू नये, असे म्हटलेले आहे.

गौतम बुद्धांनी स्त्रियांच्या समाजोपयोगी भूमिकेला महत्त्व दिले. पती जर काही कारणाने अकार्यक्षम झाला असेल तर स्त्रिया घरातील कर्त्या व्यक्तीची भूमिका बजावतात. वास्तविक पाहता तिला पतीच्या व्यवसायाविषयीची माहिती असणे आणि त्याच्या अनुपस्थितीत तिला तो सांभाळता येणे अपेक्षित असे. गौतम बुद्धांना स्त्रियांच्या व्यवहारक्षमतेची जाणीव होती आणि म्हणून त्यांनी स्त्रियांना भिक्खुणी संघातील अनेक जबाबदाऱ्या वाटून दिल्या होत्या. अनेक नावाजलेल्या भिक्खुणी होऊन गेल्या. त्यांमध्ये धम्मदिन्ना, खेमा

आणि उप्पलवन्ना ही काही नावे उदाहरणादाखल देता येतील.

मध्ययुगामध्ये भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान अधिक घसरणीला लागले. मध्य आशियातून आलेल्या टोळ्यांची आक्रमणे आणि पुरोहित वर्गाच्या वर्चस्वाखालील समाजव्यवस्थेत काटेकोरपणे राबवले जाणारे कडक नियम हे मुख्यतः या घसरणीला कारणीभूत होते. स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर अनेक निर्बंध लादले गेले, त्यांना धर्मग्रंथांचे शिक्षण मिळणे बंद झाले, लिहायला-वाचायला शिकवणे बंद झाले आणि तिला जन्मभर पुरुषांवर अवलंबून राहणे भाग पडू लागले. राजघराण्यातील आणि क्वचित उच्चवर्णीय स्त्रियांना मात्र खासगीमध्ये लिहिण्यावाचण्याचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली जाई.

वैदिक काळामध्ये विधवा पुनर्विवाहाला मान्यता होती परंतु मध्ययुगामध्ये ते पूर्णतः निषिद्ध मानले गेले. स्त्रियांना कुटुंबाच्या संपत्तीमध्ये वाटा नाकारण्याची परंपरा याही काळात तशीच राहिली. बालविवाह, सती, पडदापद्धत आणि देवदासी परंपरा यांसारख्या गोष्टींमुळे स्त्रियांचे शोषण होत राहिले. पितृप्रधान पद्धतीवर आधारलेली एकत्र कुटुंबपद्धती, बहुपत्नीकत्व आणि बालविवाह- अशा प्रथांमुळे स्त्रियांच्या व्यक्तीविकासाच्या वाटा बंद झाल्या.

**(iii) शिक्षणपद्धती :** हडप्पा संस्कृतीच्या मुद्रांवरील लेखांच्या आधारे हे स्पष्ट होते की या संस्कृतीचे लोक लिपीचा वापर करत होते. घरगुती वापराच्या काही वस्तूंवरही हडप्पा लिपीतील लेख मिळालेले आहेत.

वैदिक काळात वैदिक ग्रंथांचे अध्ययन-अध्यापन केले जाई. वैदिक साहित्य हे संस्कृतमध्ये होते. मात्र संस्कृत ही लोकभाषा नव्हती. यजुर्वेदामध्ये स्त्रियांसह सर्व वर्गातील व्यक्तींचा शिक्षणाचा हक्क मान्य केलेला आहे. अथर्ववेदामध्येही प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा हक्क असल्याचे म्हटले आहे. वैदिक शिक्षणासाठी गुरूकुलात प्रवेश करण्यापूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णातील विद्यार्थ्यांवर उपनयनाचा संस्कार होणे आवश्यक असे. जोपर्यंत त्यांचे वास्तव्य गुरुगृही असे, तोपर्यंत त्यांना ब्रह्मचर्याचे पालन करावे लागे. मौखिक पठणाच्या पद्धतीने विद्यार्थी वेदांमधील ज्ञान मुखोद्गत करत असत. मौखिक पठणाच्या या पद्धतीत शुद्ध आणि स्पष्ट उच्चारणावर पूर्ण भर दिलेला असे. तल्लख बुद्धी आणि व्यक्तिमत्व यांचा विकास, ही या शिक्षणाची दुहेरी उद्दिष्टे होती. बहुतेक अभ्यासकांच्या मते वैदिक काळात लेखनकला माहीत नव्हती. सत्यावर आधारलेले आचरण, विहित कर्तव्याचे पालन (धर्म) गुरू आणि माता-पिता यांच्याप्रती निष्ठा, अतिथीसेवा, श्रद्धा आणि औदार्य या गुणांना महत्त्व होते. क्षत्रिय प्रशासन आणि युद्धनीतीचे शिक्षण घेत. वैश्य उद्योग -व्यवसायास उपयोगी शिक्षण घेत. शूद्र शेती आणि पशुपालनाचे शिक्षण घेत. ब्राह्मण बहुधा चारी वेदांवर प्रभुत्व मिळवेपर्यंत गुरुगृहीच राहत असत. वेदकाळात ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन आणि पुढील पिढ्यांकडे ज्ञानाचे हस्तांतरण करण्याचे काम ऋषी, मुनी आणि द्रष्ट्या व्यक्तींनी केले. ब्रह्मतत्वाचे ज्ञान प्राप्त झालेले म्हणून त्यांना 'ब्राह्मण' म्हणत.

उत्तर वैदिक काळात स्त्रियांनी वेदांचे शिक्षण घेण्यावर निर्बंध घालण्यात आले. यज्ञसंस्थेला अत्यंत महत्त्व प्राप्त झाल्यामुळे त्यासंबंधीचे साहित्य या काळात मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले. साहजिकच यज्ञसंस्था हा या काळातील वैदिक शिक्षणाचा केंद्रबिंदू होता. इसवीसनापूर्वीच्या पहिल्या सहस्रकात भारतातील पहिल्या जनपदांचा उदय झाला आणि नंतरच्या काळात या जनपदांच्या विस्तारवादी धोरणांमुळे जनपदांमध्ये सत्तासंघर्षाचा काळ निर्माण झाला. जनपदांचे विघटन, जनपदांच्या अनेक प्रमुखांना सत्ता गमवावी लागणे यांसारख्या गोष्टींमुळे असुरक्षितता निर्माण झाली. त्यातून निर्माण झालेल्या निराशाजनक वातावरणातून मोक्षप्राप्तीसाठी विरक्तीवर आधारलेला तापसी जीवनाचा मार्ग अनेकांनी अवलंबला असावा. हा मार्ग वेदकाळातही माहीत असला तरी उपनिषदांमध्ये त्याची सखोल चर्चा केलेली आढळते. इथे हे नमूद करायला हवे की उपनिषदांच्या काळापर्यंत (इसवीसनापूर्वी सुमारे ६ वे शतक) तपस्वी व्यक्तींनी केलेल्या उपदेशातून तसेच उपनिषदांवरील चर्चा आणि खंडनमंडनाच्याद्वारे या मार्गाचा प्रसार झाला होता. या चर्चांच्या आधारे तात्त्विक शक्यतांचा विचार सुरू झाला आणि भारताच्या पूर्वेकडील प्रदेशांमधून यज्ञापेक्षा मानवी कल्याणावर भर

देणाऱ्या आणि ईश्वराच्या अस्तित्वाचा विचार करणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या प्रणाली उदयाला आल्या. 'श्रमण' आणि 'परिव्राजक' यांसारखे आध्यात्मिक नेतृत्व करणारे पंथ अस्तित्वात आले. या नव्या पंथांनी वेदप्रामाण्य आणि वैदिक पुरोहितांचे वर्चस्व अमान्य केले. मात्र आत्म्याचे चिरंतन अस्तित्व आणि पुनर्जन्म तसेच कर्मसिद्धान्त त्यांना मान्य होता. यज्ञविधींचा अविभाज्य भाग असलेला पशुबळी त्यांना अमान्य होता. अहिंसा किंवा प्राणीमात्रांना इजा न करणे या गोष्टीला त्यांनी प्राधान्य दिले. तुमच्या लक्षात आले असेलच की इथे प्राचीन भारतातील अनेक ठिकाणी भ्रमण करून जनसामान्यांना उपदेश करणाऱ्या वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांचा निर्देश अभिप्रेत आहे.

वर्धमान महावीरांना 'केवलिन' (सर्वज्ञ) पदाची प्राप्ती झाल्यानंतर ते 'महावीर' आणि 'जिन' म्हणून ओळखले जाऊ लागले. ते 'निर्ग्रंथ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संप्रदायाचा भाग झाले. कालांतराने याच संप्रदायाला 'जैन' या नावाने संबोधण्यात येऊ लागले. जैन म्हणजे 'जिन' म्हणजेच वर्धमान महावीरांचे अनुयायी. त्यांनी जैन धर्माच्या उपदेशासाठी तीन दशके भ्रमण केले. त्यांच्या आणि गौतम बुद्धांच्या उपदेशामध्ये काही फरक होते. गौतम बुद्धांची तत्त्वप्रणाली त्यांच्या प्रदेशातील स्थानिक श्रद्धाप्रणालीतील मूलभूत तत्त्वांशी नाते सांगणारी होती. उदाहरणार्थ, तत्कालीन 'चैत्य' हे पृथ्वीतत्त्व आणि भूतमात्रांची स्थानके असल्याचे मानले जाई. सामान्यजनांसाठी ती विनासायास आणि विनामूल्य प्रवेश असणारी पूजास्थाने होती. सनातनी समाजाबाहेरील साधू या चैत्यांभोवतीच्या प्रदेशात वास्तव्य करत असत. या चैत्यांच्या पूजेसाठी येणाऱ्या लोकांकडून त्यांना भिक्षा मिळत असे. गौतम-बुद्धांनी ही प्रचलित प्रथेला मान देऊन आपल्या जनसामान्यांमधील अनुयायांनाही तसे करण्यास प्रवृत्त केले. कालांतराने भारतात अनेक ठिकाणी बौद्ध संघ स्थापन झाले. सतत भ्रमण करणाऱ्या भिक्खूंना पावसाळ्यात राहण्यासाठी ठिकठिकाणी 'वर्षावास' बांधले गेले. भिक्खूंच्या वास्तव्यासाठी बांधलेल्या या स्थानांना 'विहार' असे म्हणत. या विहारांमधून पुढे बौद्ध भिक्खूंना शिक्षण देणारी केंद्रे उभी राहिली. बौद्ध शिक्षणपद्धती ही बौद्ध संघांच्या व्यवस्थेशी बांधलेली होती. काही काळाने गौतम बुद्धांनी या संघांमध्ये स्त्रियांना प्रवेश देण्यास परवानगी दिली होती. दीक्षा घेऊन संघात प्रवेश करणाऱ्या स्त्रियांना 'भिक्खुणी' म्हटले जाई. संघात प्रवेश घेतल्यानंतर व्यक्तीची जात आणि इतर सामाजिक ओळख पूर्णतः पुसली जात असे आणि ती व्यक्ती समता आणि बंधुता या तत्त्वांवर आधारलेल्या बौद्ध संघाची सदस्य होत असे. विहारामध्ये त्यांना धार्मिक शिक्षण देण्याची व्यवस्था असे.

वैदिक गुरूकुलाप्रमाणेच बौद्ध संघातील गुरू-शिष्यांमध्ये निकटच्या सहवासामुळे एक ऋणानुबंध निर्माण होत असे. शिष्याला गुरूजवळ ('उपाझ्झाय' अथवा 'आचार्य') राहून त्यांची सेवा करावी लागे. भिक्खू आणि भिक्खुणी यांचे संघ स्वतंत्र असत. भिक्खुणी संघांमध्ये गुरूपदी पोचलेल्या अनेक ज्ञानी भिक्खुणी होऊन गेल्या. त्यांचा उल्लेख आदराने 'थेरी' असा केला जाई. भिक्खुणी संघांमध्ये शिक्षण आणि सेवाभाव यांसाठी अनेक संधी उपलब्ध होत्या. गौतम बुद्धांची शिकवण म्हणजे ज्याला आज आपण 'मानवतावाद' म्हणू शकू अशा तत्त्वज्ञानाचा पाया होती. तुम्हाला नालंदा आणि तक्षशिला येथील विद्यापीठासंबंधी माहिती असेलच. तेथील विहारांमधून बौद्ध धर्म आणि साहित्य यांचे अध्ययन-अध्यापन केले जाई. अध्ययन-अध्यापन करण्याची ही परंपरा बौद्ध विहारांमधून आजतागायत जपलेली आहे. बौद्ध शिक्षणपद्धतीचा इतिहास हा पर्यायाने बौद्ध संघ आणि विहार यांचाही इतिहास आहे. ज्याप्रमाणे वैदिक परंपरेतील शिक्षणपद्धती यज्ञसंस्थेभोवती गुंफलेली होती, त्याचप्रमाणे बौद्ध परंपरेतील शिक्षणपद्धती बौद्ध संघ आणि विहार यांच्याभोवती गुंफली गेली होती. ह्युएन त्संग या चिनी भिक्खूच्या प्रवास वर्णनांमध्ये या गोष्टीचा उल्लेख आहे.

'संघम' काळातील शिक्षण व्यापक होते. ते धर्म, जात या गोष्टींवर अवलंबून नव्हते. तसेच ते एखाद्याच समाजाची मिरासदारीही नव्हते. व्याकरण, काव्य, गणित, खगोलशास्त्र आणि ललित कला (संगीत, नृत्य नाट्य, चित्रकला, शिल्प) आणि स्थापत्य हे अभ्यासाचे खास विषय होते.

बौद्ध विहारांचा उतरणीचा काळ हा एक सुव्यवस्थित शिक्षणपद्धतीच्या ऱ्हासाची सुरुवातही दर्शवतो. याच काळात भारतात इस्लामचे आगमन झाले. हा काळ भारतातील मध्ययुगाच्या सुरुवातीचा काळ होता.

मध्ययुगातील शिक्षणपद्धतीमध्ये इस्लामच्या शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले. असे असले तरी समाजात मोठ्या प्रमाणावर असलेल्या निरक्षरतेमुळे कुराण, हदिथ आणि इतर संबंधित शास्त्रांचे अध्ययन-अध्यापन कठीण होते. पैगंबर मुहम्मद यांनी इस्लामच्या सर्व अनुयायांनी ज्ञान मिळवायला हवे, असा आदेश दिला. परंतु त्यासाठी भारतातील पूर्वीच्या शिक्षणपद्धतींमधील कडक शिस्त किंवा सर्वसंगपरित्याग या गोष्टी आवश्यक मानलेल्या नव्हत्या. इस्लामिक शिक्षणपद्धतीमध्ये इस्लामवर श्रद्धा असणाऱ्या सर्व वर्गातील व्यक्तींना प्रवेश होता.

भारतातील मध्ययुगीन इस्लाामिक शिक्षणाशी निगडित असलेल्या तीन मूलभूत संस्था :

(१) **मक्ताब** : मशिदीशी संलग्न असणारी प्राथमिक शिक्षण देणारी संस्था

(२) **मदरसा** : मशिदीशी संलग्न असणारी उच्च शिक्षण देणारी संस्था

(३) **खानक्वा** : 'अल्लाह' विषयीच्या परमोच्च तत्त्वांचे शिक्षण देणारी सुफी केंद्रे

**मक्ताब**मध्ये साधारणपणे वयाच्या चौथ्या वर्षी प्रवेश दिला जाई. त्यासाठी एक धार्मिक विधी करावा लागे. या टप्प्यावर वाचन, पठण, लेखन आणि अंकगणित या विषयांच्या अध्ययनावर भर दिला जाई. लिपी आणि लेखन यांच्या अध्ययनासाठी अनेक तास खर्ची घातले जात. वयाच्या साधारण सातव्या वर्षी कुराणच्या अध्ययनास सुरुवात होत असे.

**मदरसा**मध्ये कुराण आणि त्याचे स्पष्टीकरण करणारे ग्रंथ यांचे वाचन आणि त्यांचा सखोल अर्थ समजावून घेणे यांवर भर असे. त्याखेरीज शेती, हिशोब, ज्योतिष, खगोलशास्त्र, इतिहास, भूगोल, गणित, इस्लाममधील कायदेकानून आणि न्यायव्यवस्था तसेच प्रशासन यांसारखे व्यवहारविषयक विषयही शिकवले जात. त्याचबरोबर अरेबिक आणि पर्शियन भाषाही शिकवल्या जात (तत्कालीन इस्लामी जगतात सर्वत्र या भाषा शिकवल्या जात असत). सुप्रसिद्ध विद्वान अबुल फज्ल याने नमूद केल्यानुसार अकबर बादशाह याने मदरशामध्ये शिकण्यास येणाऱ्या हिंदू विद्यार्थ्यांसाठी संस्कृत भाषा आणि उपनिषदांसारखे ग्रंथ यांच्या अध्ययनाची तजवीज केली होती. यावरून आपल्याला कल्पना येऊ शकते की त्याच्या काळात विद्यार्थ्यांच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक गरजांनुसार शिक्षण देण्याची व्यवस्था होती. विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार आणि आयुष्यातील ध्येयानुसार विषयांची निवड करू शकत होते. मदरशातील शिक्षण संपल्यानंतर खासगी शिक्षकांच्या हाताखाली शिक्षण सुरू ठेवता येत असे (उदाहरणार्थ, अब्दुल कादिर बदायूंनी, अबुल फज्ल, फैझी). मदरशामध्ये शिक्षक आणि विद्यार्थी या दोहोंच्या राहण्याची सोय केलेली असे त्यासाठी लागणारे आर्थिक बळ राज्यसत्ता आणि मुस्लीम अमीर-उमरावांकडून मिळत असे. या दृष्टीने मदरशांची तुलना बौद्ध विहार आणि दक्षिण भारतातील मंदिरांमधील (इ.स.सातवे शतक) विद्याकेंद्रे यांच्याशी करता येईल.

**खानक्वा** नावाने उल्लेख केल्या जाणाऱ्या संस्थांची तुलना मध्ययुगीन युरोपातील ख्रिश्चन मठांशी (मोनॅस्टरी) करता येईल. खानक्वा सहसा लोकांमध्ये पूजनीय समजल्या जाणाऱ्या सुफी संतांच्या दर्ग्याशी निगडित असत.



**भारतीय इस्लामी कला**

**कृती ३**

मध्ययुगीन भारताच्या कलाक्षेत्रांतील पुढील गोष्टींवर मुस्लीम सत्तांचा काय प्रभाव पडला, याचा शोध घ्या

- चित्रकला
- स्थापत्य
- संगीत

तुम्ही घेतलेल्या शोधाचे वर्गामध्ये सादरीकरण करा.


**कला :** गुप्त साम्राज्याचा कालखंड हे भारतीय इतिहासातील सुवर्णयुग होते, असे समजले जाते. त्याचे कारण म्हणजे या काळात संगीत, चित्रकला यांसारख्या कला आणि इतर शास्त्रांमध्ये झालेली भरीव कामगिरी. विविध उद्योग-व्यवसायांमधील कौशल्ये शिकाऊ उमेदवार प्रत्यक्ष काम करता करता आत्मसात करत असत. कला आणि उद्योगव्यवसायांची भरभराट धनिक दानशूरांच्या उदार आश्रयामुळे झाली. मध्ययुगीन भारतात मुस्लीम राज्यकर्त्यांच्या आश्रयाखाली विविध कलांवर त्यांची अभिरुची कल्पना आणि निवड यांचा प्रभाव पडला. मध्ययुगामध्ये बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळे शिक्षणपद्धतीवर मात्र विपरीत परिणाम झाला. दिल्ली आणि आग्रा या राजधानीच्या शहरातील मुस्लीम शासकांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी काही विशेष प्रयत्न केले नाहीत. शहरे आणि खेडी येथील विद्‌वान व्यक्ती व्यक्तीगत पातळीवर अध्यापनाचे कार्य करत असत. हे अध्यापन संस्कृत, अरेबिक आणि पर्शियन भाषांमधून केले जाई. अशा प्रकारे शिक्षण घेणाऱ्यांमध्ये फक्त संपन्न वर्गातील लोक आणि मुस्लीम उलेमा तसेच ब्राह्मण आणि उच्चवर्णीय जातीमधील लोक यांचा समावेश होता. मुलींचे शिक्षण हा पिता किंवा कुटुंबातील वडिलधाऱ्या पुरुषांचा व्यक्तीगत मामला असल्याचे मानले जात होते. मुस्लीम कुटुंबातील स्त्रियांना घरच्या घरी राहून खासगी शिक्षकांकडून शिकण्याची परवानगी दिली जात असे. घरी येऊन शिकवणाऱ्या शिक्षकांना मौल्यवान वस्तू भेटीदाखल दिल्या जात. अर्थातच समाजाच्या या वरच्या थरातील लोकांची संख्या अत्यंत अल्प होती. त्यामुळे मध्ययुगातील समाजात मुलींच्या शिक्षणाची एकूण स्थिती दयनीय होती, असे म्हणण्यास हरकत नाही.

**(iv) समाजजीवन :** हडप्पा संस्कृती तेथील सुनियोजित नगरे, झाकलेली गटारे, अतिरिक्त धान्याच्या साठवणीसाठी कोठारे यासाठी ओळखली जाते. मोहेंजोदडो येथील महास्नानगृह हे तेथील सामूहिक जीवनाचे एक निदर्शक आहे. हडप्पा संस्कृतीच्या स्थळांच्या उत्खननातून पुढे आलेल्या पुराव्याच्या आधारे असे दिसते की तेथील समाजात कौशल्याधारित व्यावसायिकांचे वर्ग होते. मात्र या विभागणीत उच्चनीचतेची उतरंड नव्हती. या वर्गांमध्ये गावकरी, कारागीर, व्यापारी, मासेमारी करणारे, धर्मगुरू, प्रशासक, कलाकार, विणकर इत्यादींचा समावेश होता.

संघम साहित्यामध्ये विविध जमाती आणि जातींचा उल्लेख केलेला आढळतो. त्या आधारे त्यांच्या सहअस्तित्वाची कल्पना करता येते. ब्राह्मणवर्ग हा संख्येने कमी असला तरी तमिळ संस्कृतीच्या घडणीमध्ये त्यांचे स्थान महत्त्वाचे होते. संघम काळातील पुरोहितवर्गाचे समाजावर वर्चस्व नसले तरी ते सल्लागार आणि समाजाच्या हिताचे संरक्षक म्हणून मान्यता पावत होते. पारंपरिक कथांचे गायन करत गावोगाव फिरणाऱ्या कलाकारांचा एक स्वतंत्र वर्ग होता. शिकार आणि वाटमारी करणारी 'वेडर' नावाच्या जमातीबद्‌दल लोकांच्या मनात भय असे. स्वतःच्या स्वतंत्र परंपरा आणि श्रद्‌धा जोपासणारी 'मर्राकुडी' नावाची एक युद्‌धकौशल्यावर निर्वाह करणारी जमात होती. त्याशिवाय मासेमारी करणारे, मिठाचे उत्पादन करणारे, विणकर, शेतकरी, मेंढपाळ, गोपालक यांसारख्या व्यावसायिकांचे स्थान महत्त्वाचे होते.


वैदिक कालखंडातील वर्णव्यवस्था समाजातील व्यावसायाधिष्ठित वर्गवारीवर आधारलेली होती. त्यामध्ये व्यवसायानुसार वर्ण बदलण्याइतकी लवचीकता होती. वैदिक कालखंडाच्या उत्तरार्धात मात्र यात बदल होत गेले आणि अधिक कडक निर्बंध असलेली 'पावित्र्य व विटाळ' या कल्पित गोष्टींवर उभारलेली जातिव्यवस्थेची उतरंड प्रस्थापित होत गेली. अन्न, पाणी यांचे प्राशन करणे, पोशाख, व्यवसाय पूजापद्‌धती, सामाजिक

व्यवहार, प्रवास, इत्यादी सर्व गोष्टींवर या कल्पनांचा पगडा होता.




पहिले तीन वर्ण स्वतःला उच्च म्हणवून घेऊ लागले. फक्त त्यांना उपनयन संस्काराचा अधिकार प्राप्त झाल्यामुळे त्यांना 'द्विज' म्हणजे 'दोनदा जन्म घेतलेले' (पहिला जन्म आईच्या पोटी, दुसरा जन्म उपनयनाच्या संस्कारातून) म्हणू लागले.

**आश्रमव्यवस्था :** 'द्विज' म्हणवणाऱ्या प्रत्येकाने आदर्श जीवन कसे जगावे याचे मार्गदर्शन आश्रमव्यवस्थेमध्ये केले होते. त्यामध्ये व्यक्तीच्या आयुष्याचे चार टप्प्यात म्हणजे चार आश्रमात विभाजन केले होते. ते पुढीलप्रमाणे:




हिंदू तत्वज्ञानामध्ये परमेश्वरप्राप्ती आणि मोक्षप्राप्तीचे चार मार्ग सांगितले आहेत. ते असे : ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग, राजमार्ग आणि कर्ममार्ग.

वर्तमानातील हिंदूंच्या दैनंदिन जीवनात आपापल्या विचारानुसार चारांपैकी एक किंवा अधिक मार्गांचा अवलंब करण्याची मुभा आढळते. उदा., कुंभ मेळ्याबद्दल तुम्ही कदाचित वाचले असेल किंवा यूट्यूबवरील चित्रफितींमध्ये पाहिले असेल. त्यातील साधू हे तापसी जीवन जगणारे असतात.

गुप्त सत्तेचा काळ हा भारतातील अभिजात संस्कृतीचा काळ समजला जातो. या काळात भारतीय समाजाने जीवनाच्या सर्व क्षेत्रातील समृद्धी अनुभवली. ज्या गोष्टींमुळे भारतीय संस्कृतीची स्वतःची खास ओळख निर्माण झाली त्या कला, विज्ञान, राजनीती, धर्म, तत्वज्ञान, अर्थशास्त्र अशा सर्वच क्षेत्रातील विकासाचा मूलभूत पाया या काळात घातला गेला. गुप्त सम्राट पहिला चंद्रगुप्त जेव्हा गादीवर आला तेव्हा त्याने अत्यंत सामर्थ्यशाली सैन्य उभारले आणि आपापसात लढणाऱ्या नगरांना एकछत्री अंमलाखाली आणले. त्यानंतर भारतीय उपखंडामध्ये गुप्त साम्राज्याचा विस्तार झाला. गुप्त साम्राज्यातून दूरवरच्या देशांशी व्यापार चालत असे. तसेच गुप्त साम्राज्य कलानिर्मिती आणि बौद्धिक मंथनाचा केंद्रबिंदू बनले होते. याच काळात आर्यभट्टाने भूमिती, त्रिकोणमिती, विश्वोत्पत्तीशास्त्र या विषयांवर लेखन केले, तसेच एका वर्षामध्ये ३६५-३५८ दिवस असल्याचे गणित मांडले. पृथ्वी गोल असल्याचा सिद्धान्तही त्याने मांडला. वराहमिहिराने खगोलशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र यांविषयी लेखन केले. धन्वंतरीने औषधोपचारांविषयी लेखन केले. गुप्तकालीन समाजात शिक्षण आणि लेखनवाचनाला विशेष महत्व होते. केवळ उच्चवर्गातील व्यक्तींनाच नव्हे तर समाजातील प्रत्येक इच्छुक व्यक्तीला शिक्षण घेणे शक्य होते.

हळूहळू गुप्त साम्राज्याचा विस्तार एवढा वाढला की त्या विस्तीर्ण प्रदेशावर मध्यवर्ती सत्तेला नियंत्रण ठेवणे कठीण झाले आणि छोटी छोटी राज्ये स्वतंत्र होऊन साम्राज्याचे विघटन झाले. त्यामुळे इ.स.५५० च्या सुमाराला मध्य आशियातील हूण टोळ्यांना भारतावर आक्रमण करणे शक्य झाले आणि सुमारे इ.स.६५० पर्यंत गुप्तांची सत्ता उतरणीला लागली.

दुसऱ्या नागरीकरणाच्या काळात (पहा पान नं. १७) सामाजिक-राजकीय नियमांवर प्रकाश टाकणाऱ्या नीतीशास्त्र आणि धर्मशास्त्र या विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले गेले. गुन्ह्यांसाठी दिल्या जाणाऱ्या शिक्षांची तीव्रता गुन्हेगाराच्या जातीनुसार कमीजास्त होत असे. जातिव्यवस्थेमधील विषमता अधिक तीव्र होऊन शूद्रांचा दर्जा केवळ उच्चवर्णीयांना सेवा पुरवण्यापुरता मर्यादित झाला. त्यांमध्ये कारागीर, शेतमजूर, दास इत्यादींचा समावेश होता. कुटुंबातील नातेसंबंधाची वीण पूर्वीप्रमाणेच घट्ट होती परंतु पितृप्रधान कुटुंबातील पुरुषी वर्चस्व अधिकच वाढले आणि त्याबरोबरच स्त्रियांची परिस्थितीही उत्तरोत्तर अधिकाधिक वाईट होत गेली.

भारतातील मध्ययुगीन काळ हा परकीय आक्रमणांचा काळ होता. सुरुवातीचे मुस्लीम आक्रमक हे भारतातील समृद्ध साधनसंपत्तीची लूट करण्यासाठी भारतात आले. पुढे दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळात मूळ भारतीय संस्कृती आणि इस्लामी संस्कृती यांचा मिलाफ घडून आला. इंडो-इस्लामी स्थापत्य, यांत्रिक साधनांचा वापर आणि हिंदु-उर्दू (हिंदुस्थानी) भाषेचा उगम ही या काळाची वैशिष्ट्ये होती. अमीर खुस्रो हा तेराव्या शतकात होऊन गेला. हिंदुस्थानी भाषेच्या तत्कालीन रूपाचा उल्लेख 'हिंदवी' असा केला आहे. दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळात भारतातील अनेक हिंदू, जैन आणि बौद्ध मंदिरांची तोडफोड आणि विटंबना केली गेली.

**हे माहिती हवे!**

प्रमुखपरंपरा आणि उपपरंपरा : मिल्टन सिंगर आणि रॉबर्ट रेडफिल्ड या उत्तर भारतात काम करणाऱ्या दोन सामाजिक मानववंशशास्त्रज्ञांनी संस्कृतीच्या संदर्भातील 'प्रमुख परंपरा' आणि त्याअंतर्गत असलेल्या 'उपपरंपरा' या संकल्पना मांडल्या. त्यांच्या मते एखादी सांस्कृतिक व्यवस्था ही प्रमुख परंपरा आणि उपपरंपरा यांच्या परस्परसहयोग आणि परस्परावलंबन यांनी परिपूर्ण होत असते:

**(१) प्रमुख परंपरा** : ज्यामध्ये विज्ञान, तत्वज्ञान, ललित कला, भल्या-बुऱ्याचे चिंतन-मनन अशा सर्व पैलूंनी युक्त असलेली प्रभावशाली विचारसरणी आहे आणि इतर उपपरंपरांना सामावून घेण्याची क्षमता आहे अशी परंपरा म्हणजे प्रमुख परंपरा होय. (उदा. हिंदुस्थानी आणि कर्नाटिक संगीत)

**(२) उपपरंपरा** : उपपरंपरांमध्ये लोकधर्म, लोकसाहित्य आणि लोककला यांचा समावेश असतो.

(उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील लावणी, पोवाडा, लेझीम यांसारख्या परंपरा किंवा केरळमधील कलरीप्पय्यटु.)

दिल्लीच्या सुलतानशाहीत सरंजामी पद्धतीची अधिकारांची उतरंड होती. त्या उतरंडीचे ढोबळमानाने चार वर्ग सांगता येतील : सत्ताधारी वर्ग आणि अमीर-उमराव (सुलतान आणि त्याचे नातेवाईक, हिंदू राजे आणि मुस्लीम नवाब), धर्मगुरू (उलेमा आणि ब्राह्मण) नागरी प्रजाजन (श्रीमंत व्यापारी आणि कारागीर) आणि गावकरी (सरकारी तिजोरीत सारा जमा करणारे खेड्यातील शेतकरी). या काळातसुद्धा जातिव्यवस्था कठोरपणे पाळली जात होती.

अभ्यासकांच्या मते, बादशाह अकबराच्या पद्धतशीर प्रयत्नांमुळे भारताला एक समर्थ आणि स्थिर राजकीय प्रशासनपद्धती मिळाली. भारतात साम्राज्याचा दूरवर विस्तार करणारे महाराजे होऊन गेले. त्यांच्यापैकी काहींची राजवट कल्याणकारी होती तर काहींची जुलमी होती. काही साम्राज्यांमध्ये शांती नांदत होती तर काही भययुक्त आणि रक्तपाताने कलंकित झालेली होती. भारतातील मध्ययुग हा सर्वाधिक अंधःकाराचा काळ होता, असे अनेकदा म्हटले जाते. युरोपच्या मध्ययुगाच्या बाबतीतही हेच वास्तव होते. असे असले तरी समाजशास्त्राचे अभ्यासक या नात्याने आपल्याला हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, या अंधःकारयुगाचे परिणामस्वरूप असे काही बदल घडून आले, ज्यामुळे भारतीय समाजाचे स्वरूप बदलून गेले.

भारताच्या अंतर्गत आणि दूरवरच्या प्रदेशांशी असलेल्या व्यापाराच्या भरभराटीबरोबरच ललित कला, स्थापत्य आणि शिल्प यांचाही उत्कर्ष झाला. बादशाह अकबरने स्थापन केलेला 'दिन-इ-इलाही' हा नवीन धर्म नैतिक तर्कशुद्धतेवर आधारलेला होता.

एकोणिसाव्या शतकाकडे वाटचाल होत असताना भारतीय समाजातील विविध धर्म आणि पंथातील उदारमतवादी आणि सनातनी समूहांमधील दरी वाढत गेली. असे ध्रुवीकरण झाले यामध्ये आश्चर्य वाटण्याजोगे काहीच नाही. कारण भारतातील धार्मिक गटांमध्ये अशा प्रकारचे ध्रुवीकरण घडण्याचा जणू पायंडाच पडलेला दिसतो तो अगदी एकविसाव्या शतकापर्यंत.

**(v) शहरीकरण** : शहरीकरण हा औद्योगिकीकरणाचा परिणाम आहे, या आधुनिक काळातील लोकप्रिय दृष्टिकोनाला हडप्पा संस्कृतीमध्ये दिसणारे नागरीकरण छेद देणारे आहे. आधुनिक औद्योगिकीकरणाचा मागमूस नसतानाही हडप्पा

संस्कृतीमध्ये पुर्वनियोजित नगरे अस्तित्वात होती आणि तेथील जीवनप्रणालीला '**पहिली नागरी संस्कृती**' म्हणता येते. पुरातत्त्वीय पुराव्यावरून असे दिसते की हडप्पा संस्कृतीच्या लोकांचे नागरी जीवन विकसित स्वरूपाचे होते. काही घरांमधून विहिरी आणि स्नानगृहे होती. नगरामध्ये बंद आणि भूमीगत गटारे होती. सामाजिक परिस्थिती ही मेसोपोटेमिया आणि इजिप्त येथील समकालीन प्रगत नागरी संस्कृतींसारखीच प्रगत होती. सुमेरियन इष्टिकालेखांमध्ये हडप्पा संस्कृतीच्या प्रगत व्यापाराचे उल्लेख केलेले आहेत.

उत्तर वैदिक काळाच्या उत्तरार्धापर्यंत असे दिसते की पशुपालकांचे भटके जीवन जगणारे आर्य लोक पंजाबपासून पूर्वेकडे गंगा नदीच्या खोऱ्यापर्यंत पसरले होते. त्या प्रदेशात त्यांनी जंगलतोड करून तेथील जमीन लागवडीखाली आणली होती. इसवीसनापूर्वी सुमारे ५०० ते २०० वर्षे या कालखंडात या प्रदेशात '**दुसरे नागरीकरण**' झाले. या काळात अनेक शहरे उदयाला आली, जी नागरी संस्कृतीची केंद्रे बनली. हळूहळू मगध महाजनपदाच्या राजांनी या प्रदेशात प्रभुत्व प्रस्थापित केले. त्यातूनच मौर्य साम्राज्याच्या उदयाची पार्श्वभूमी तयार झाली. हा काळ पूर्व वैदिक संस्कृतीपेक्षा भिन्न वैशिष्ट्ये असलेल्या संस्कृतीचा काळ होता.

वैदिक लोकांच्या सुरुवातीच्या 'जनपद' या नावाने उल्लेख केल्या जाणाऱ्या छोट्या राज्यांनी विस्तार करण्यास प्रारंभ केला आणि विविध जनपदांच्या एकत्रीकरणातून 'महाजनपदे' निर्माण झाली. त्यातील काहींमध्ये राजेशाही सत्ता होती तर काहींमध्ये गणराज्य पद्धतीची राज्यव्यवस्था होती. या महाजनपदांनी अफगाणिस्तानपासून ते बंगालपर्यंत आणि महाराष्ट्राचा काही प्रदेश व्यापलेला होता. हडप्पा नागरी संस्कृतीनंतर या कालखंडात पुन्हा एकदा या महाजनपदांमधून नागरी जीवन उदयाला आले. याचा पुरातत्त्वीय पुरावा 'उत्तर भारतातील चकाकीदार काळी भांडी' (NBP – नॉर्दर्न ब्लॅक पॉलिश्ड् वेअर) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संस्कृतीच्या स्थळांच्या उत्खननांमधून मिळालेला आहे. या काळातील नगरांची आणि तेथील जनजीवनाची माहिती जैन, बौद्ध आणि संस्कृत सूत्रवाङ्मयातून मिळते.

याच काळात धातूच्या चलनी नाण्यांची सुरुवात सुरुवात झाली. महाजनपदांमधील राजधानींची नगरे ही सत्तेची आणि व्यापारी केंद्रे बनली. या नगरांमध्ये कारागीर आणि व्यापारी श्रेणी प्रस्थापित झाल्या. अंतर्गत आणि दूरवरच्या व्यापारासाठी पश्चिम आणि पूर्वेकडील प्रदेशांना जोडणाऱ्या हमरस्त्यांचे जाळे निर्माण झाले. 'राजा' या पदाला सर्वाधिक सामर्थ्य आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली. राज्यकारभारमध्ये राजाला साहाय्य करण्यासाठी मंत्री आणि विविध अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाऊ लागली. बहुतांश मंत्री आणि अधिकारी हे क्षत्रिय असत.

भारतातील सामाजिक–ऐतिहासिक वाटचालीचे हे थोडक्यात केलेले कथन तुम्हांला भारतीय समाजाच्या घडणीतील विविध प्रवाह आणि घटक किंवा लोकांची विचारसरणी आणि वर्तनपद्धती यांमध्ये प्रभावी ठरणारे घटक यांची कल्पना आली असेल. आधुनिक भारतातील विद्यार्थी या नात्याने भारतातील विविध श्रद्धाप्रणाली, रीतीरिवाज, परंपरा, रूढी, त्यानुसार आजही अस्तित्वात असलेल्या पूर्वापार वर्तनपद्धती या सर्वांचे चिकित्सक विश्लेषण करणे आवश्यक आहे. निश्चितच या गोष्टी अखंडपणे टिकून राहण्यामध्ये समाजजीवनाच्या पठडीचे पिढी–दरपिढी होणारे संक्रमण महत्त्वाचे आहे. रूढीपरंपरा, रीतीरिवाज यांचे अखंडित्व का आणि कसे टिकून राहते, हे समजून घेणे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. अर्थातच संमिश्र आणि गुंतागुंतीचे स्वरूप असलेल्या संस्कृतीची वैशिष्ट्ये सर्वत्र आणि सर्व काळी एकसूरी असणे शक्य नसते. उलट त्यामध्ये परस्परविरोधी आणि संघर्षमूलक कल्पना प्रचलित असणे हा त्या संस्कृतीचा अंगभूत गुणधर्म असतो. परंतु या गुणधर्मामुळे निर्माण झालेली विविधता आणि गुंतागुंत त्या संस्कृतीचे सौंदर्य वाढवणाऱ्या असतात. अशा संस्कृतींचे वास्तव समजून घेण्यासाठी एकाच सरधोपट मार्गाचा अवलंब करता येत नाही ही गोष्ट थोडी अवघड वाटली तरी ती लक्षात घेणे आवश्यक आहे. ऐतिहासिक घडामोडी आणि त्यामुळे अनेकदा निर्माण झालेली अस्थिर परिस्थिती आणि त्यातील अनेक स्तरांवरील गुंतागुंत यथार्थपणे समजून घेणारा दृष्टिकोन विकसित होणे याला 'समाजशास्त्रीय चिंतन' असे म्हणता येईल.

**तुमची प्रगती तपासून पहा**

(१) पूर्व वैदिक काळातील शिक्षणपद्धती कशी होती?

(२) उत्तर वैदिक कालखंडामध्ये स्त्रियांच्या घसरलेल्य सामाजिक स्थानाची दोन लक्षणे सांगा.

(३) मध्ययुगीन भारतीय समाजाची कोणतीही दोन वैशिष्ट्ये सांगा.

## १.२ वसाहतकालीन भारत

सर्वसाधारण भारतातील वसाहत काल कालखंड या भागात युरोपियन देशांनी सत्ता प्रस्थापित करण्याचा कालखंड समजला जातो.

१६ व्या शतकात व्यापाराच्या उद्देशाने पोर्तुगीज भारतात आले. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात डच आणि ब्रिटिशही भारताच्या किनाऱ्यावर उतरले. फ्रेंचसुद्धा भारतात पोचले, पण त्यांचे अस्तित्व अधिक प्रकर्षाने फक्त दक्षिण भारतात पुदुच्चेरी (पाँडिचेरी) येथे जाणवले. ब्रिटिशांनी विसाव्या शतकापर्यंत भारतावर राज्य केले. त्यांच्या राजवटीच्या काळात भारतात ख्रिश्चन धर्माच्या अँग्लिकन परंपरेचा (चर्च ऑफ इंग्लंड) प्रभाव अधिक होता.

ब्रिटिशांच्या काळात प्रशासनामध्ये अनेक संस्थात्मक सुधारणा होऊन राज्यकारभाराची घडी सुरळीत झाली तसेच अनेक सामाजिक सुधारणा होणे शक्य झाले, या गोष्टी नाकारता येणार नाहीत.

वसाहतींच्या काळातील ब्रिटिश सत्तेच्या भारतीय समाजावरील दृश्य परिणामांचा आपण थोडक्यात आढावा घेऊया.

**(१) शिक्षणपद्धती :** ब्रिटिशांनी भारतात प्रस्थापित केलेल्या शिक्षणपद्धतीचे दूरगामी परिणाम पुढीलप्रमाणे आहेत. उच्च शालेय पातळीवरील शिक्षण इंग्रजी भाषेतून दिले जाई. त्यामुळे आधुनिक शिक्षण घेतलेल्या लोकांमध्ये इंग्रजी ही संपर्क भाषा बनली. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये सर्व वंश, जाती आणि धर्माच्या मुला-मुलींना प्रवेश घेण्याची मुभा होती. १८५७ मध्ये कलकत्ता (कोलकाता), बॉम्बे (मुंबई) आणि मद्रास (चेन्नई) येथे भारतातील विद्यापीठांची स्थापना झाली. आधुनिक शिक्षणपद्धतीमधील विषय आणि अभ्यासक्रम धार्मिक नव्हते ते लौकिक जीवनाशी (सेक्युलर) संबंधित होते. त्यांमध्ये गणित, विज्ञान, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, इतिहास यांसारख्या विषयांचा समावेश होता. या शिक्षणपद्धतीच्या मुशीतून नवीन बुद्धिवादी वर्ग उदयाला आला. या वर्गातील लोक जन्माने भारतीय परंतु पश्चिमी विद्येच्या चौकटीत घडलेले होते. त्यांच्यापैकी काहींनी समाजसुधारणेच्या कार्यात लक्षणीय काम केले. बुद्धिनिष्ठता, समानता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्ष (लौकिक) दृष्टिकोन आणि व्यक्तिवाद यांसारखी सामाजिक मूल्ये बुद्धिवादी वर्गामध्ये खोलवर रुजली.

**(२) संस्कृती :** खाद्यसंस्कृती, पेहराव, सामाजिक रीतीभाती, वर्तणुकीचे संकेत, दृष्टिकोन, विश्वासप्रणाली, भाषा, खेळ आणि मनोरंजन इत्यादी बाबतीत समाजातील सुशिक्षित वर्गातील अभिजनांनी ब्रिटीश जीवनसरणीचे अनुकरण करण्यास सुरुवात केली. प्रख्यात समाजशास्त्रज्ञ डॉ.एम.एन. श्रीनिवास यांनी ब्रिटिशांचे अनुकरण करण्याच्या या प्रक्रियेला 'वेस्टर्नायझेशन' (पाश्चात्यीकरण) असे नाव दिले. अलातास यांनी पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाचे वर्गीकरण चार प्रकारांमध्ये केले आहे – व्ययमूलक (Eliminative) बदल म्हणजे मूळ सांस्कृतिक लक्षणे हळूहळू घटत जाणे, वृद्धिमूलक (Additive) म्हणजे मूळ सांस्कृतिक लक्षणांमध्ये नवीन लक्षणांची भर पडणे, पुष्टिमूलक (Supportive) म्हणजे मूळ सांस्कृतिक लक्षणांचे अधिक समृद्ध बनणे, संमिश्रतामूलक (Synthetic) म्हणजे जुन्या-नव्याच्या एकत्रीकरणातून नवीन लक्षणे विकसित होणे.

**(३) प्रशासन :** ब्रिटिशांनी नवीन प्रशासकीय यंत्रणा उभारली आणि प्रशासनाच्या नवीन पद्धती भारतात रूढ केल्या. त्यांनी भारतीय भूमी आणि लोक यांच्यावर कारभार करण्यासाठी आर्थिक सेवा, शिक्षण सेवा, महसूल सेवा आणि प्रशासकीय सेवा यांसारख्या विविध सेवांचे विभाग स्थापन केले. हे सेवा विभाग ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या साहाय्यासाठी स्थापन केले होते. ब्रिटिशांनी नवीन न्यायपद्धत निर्माण केली. या न्यायपद्धतीमध्ये भारतातील विविध समाजांच्या पारंपरिक न्यायप्रणालींचा विचार करून या नवीन न्यायपद्धतीची

उभारणी केली होती. मात्र तिची अंमलबजावणी धर्मनिरपेक्ष पद्धतीने, व्यक्तीच्या जातीपातीचा विचार न करता केली जाई. वतनदार आणि जमीनदार यांचे वहिवाटीने चालत आलेले विशेष अधिकार रद्द करण्यात आले. त्याचा परिणाम म्हणून भारतीय लोकांच्या आणि समाजाच्या मानसिकतेमध्ये हळूहळू लोकशाही मूल्ये झिरपू लागली. 'इंडियन कौन्सिल्स् ॲक्ट', 'इंडियन हायकोर्ट ॲक्ट', 'इंडियन सिव्हिल सर्व्हिस ॲक्ट १८६१' या सर्व कायद्यांमुळे कार्यकारी, कायदेविषयक आणि न्यायविषयक प्रशासन पद्धतीत महत्त्वाचे बदल घडून आले.



**उच्च-न्यायालय, मुंबई**

**(४) अर्थव्यवस्था :** औद्योगिक वाढ आणि तिच्या हातात हात घालून येणारे शहरीकरण यांमुळे वसाहतींच्या काळात भारतातील अर्थव्यवस्थेत मूलभूत स्वरूपाचे बदल घडून आले. बदलती अर्थव्यवस्था आणि औद्योगिक कारखान्यांच्या संख्येमधील वाढ यांच्यामुळे जातीनुसार कौशल्ये, व्यवसाय आणि त्यावर आधारलेले सामाजिक संबंध यांची चौकट हळूहळू बदलू लागली. शिक्षण आणि उत्पन्न या निकषांवर आधारलेले नवीन सामाजिक वर्ग उदयाला येऊ लागले. जातीजातींमधील पारंपरिक विधीनिषेधांची बंधने हळूहळू गळून पडू लागली. ब्रिटिशांनी लागू केलेल्या नवीन महसूल पद्धतीचा खेड्यांमधून राहणाऱ्या शेतकरी वर्गावर विपरीत परिणाम झाला. या काळात शेतीचे व्यापारीकरणही होऊ लागले होते. निर्वाह अर्थव्यवस्थेची (subsistence economy) जागा नफ्यावर पोसल्या जाणाऱ्या बाजार व्यवस्थेने घेतली. त्यामुळे नगदी पिकांना महत्त्व येऊन त्याचा परिणाम अन्नधान्याच्या उत्पादनावर झाला. बंगाल आणि ओडिशा येथे १८५६ साली पडलेला दुष्काळ या बदलाचा साक्षी आहे.

**(५) दळणवळण आणि संपर्क :** भारतभर रेल्वे आणि रस्ते यांची उभारणी तसेच टपाल आणि तार या सोयी सुरु केल्या गेल्या. त्यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यातील लोकांपर्यंत आणि स्रोतांपर्यंत पोचणे सहज शक्य झाले. १८६९ मध्ये सुएझ कालवा खुला झाल्यामुळे व्यापार वाढला. त्यामुळे पूर्वी भारतातील कच्चा माल इंग्लंडला पोचवण्याचे कठीण असलेले काम सोपे झाले. वाहतूक आणि संपर्क यांच्या साधनांमधील सुधारणांमुळे भारतीय कच्च्या मालासाठी अधिक बाजारपेठा उपलब्ध झाल्या.

**(६) राष्ट्रवादाची चळवळ :** संपर्कासाठी इंग्रजी भाषेचा शिक्षितांच्या गटांमधील वाढता वापर हा राष्ट्रवादाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी फार महत्त्वाचा ठरला. त्यामुळे राष्ट्रवादाच्या चळवळीला चालना मिळाली. भारतीयांमध्ये परकीय ब्रिटिशांच्या सत्तेविरूद्ध निर्माण झालेल्या असंतोषाच्या भावनेमुळे ब्रिटिशांविरूद्ध 'चले जाव'चा पुकारा केला गेला आणि भारतीयांच्या स्वातंत्र्यलढ्याला गती मिळाली. एकोणिसाव्या शतकामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा उदय, महात्मा गांधींनी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व स्वीकारणे या गोष्टी घडून आल्या.

**(७) समाजसुधारणेच्या चळवळी :** समाजातील वरच्या थरातील शिक्षित वर्गातील लोक सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या कामामध्ये अग्रभागी होते. एकोणिसाव्या शतकामध्ये सामाजिक आणि धार्मिक सुधारणेच्या अनेक चळवळी उभ्या राहिल्या (खाली दिलेली चौकट पहावी). यातील बहुतेक गट सामाजिक सुधारणांसाठी आपापल्या स्थानिक पातळीवर काम करत होते. कालबाह्य, दडपणाऱ्या आणि प्रतिगामी प्रथा नष्ट करण्यासाठी त्यांचा संघर्ष चालू होता. अनेकजण सामाजिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या व्यक्तिंना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून काम करत होते. आर्य समाजांसारख्या संघटना वैदिक परंपरांचे पुनरूज्जीवन आणि वैदिक ज्ञान आधुनिक अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट करणे यांसाठी प्रयत्न करत होत्या.

| समाजसुधारणेच्या चळवळी | संस्थापक |
|---|---|
| ब्राह्मो समाज | राजा राममोहन रॉय |
| आर्य समाज | स्वामी दयानंद सरस्वती |
| प्रार्थना समाज | आत्माराम पांडुरंग तर्खडकर |
| सत्यशोधक समाज | महात्मा जोतिबा फुले |
| हरिजन सेवक संघ | महात्मा गांधी |
| सेवा सदन (मुंबई) | बेहरामजी मलबारी |
| धर्म सभा | राधाकांत देब |
| वहाबी चळवळ | सैद वलीउल्लाह |
| सेल्फ रिस्पेक्ट मूव्हमेंट | इरोदे व्ही. रामस्वामी पेरियार |

**(८) सामाजिक कायदे :** या कायद्यांचा संबंध सामाजिक न्याय, समाजकल्याण, अपेक्षित सामाजिक सुधारणा तसेच भारतीय समाजातील दुर्बल घटकांना संरक्षण देणे या गोष्टींशी आहे. समाजसुधारणांचा प्रयत्न करणारे गट आणि संघ यांची संख्या वाढल्यामुळे प्रचलित दुष्ट प्रथांवर बंदी आणणारे कायदे अंमलात आणण्यासाठी ब्रिटिश सरकारवर दडपण आणणे त्यांना शक्य झाले. हे लक्षात घ्यायला हवे की केवळ कायदे करून समाजपरिवर्तन साधता येत नाही. मात्र त्यामुळे अन्याय, दडपशाही, शोषण आणि अपशब्दांचा प्रयोग यांसारख्या गोष्टींना बळी पडलेल्यांसाठी त्यातून आशा निर्माण होते. अशा कायद्यांपैकी काही महत्त्वाचे कायदे पुढे दिलेले आहेत.

| वर्ष | कायद्याचे नाव |
|---|---|
| १८२९ | सती बंदी कायदा |
| १८४३ | इंडियन स्लेव्हरी कायदा |
| १८५० | कास्ट डिसेबिलिटी रिमुव्हल कायदा |
| १८५६ | विधवा पुनर्विवाह कायदा |
| १८७० | स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंध कायदा |
| १८७२ | स्पेशल मॅरेज कायदा |
| १९२९ | बालविवाहविरोधी कायदा |

**प्रगती तपासा**

वसाहतींच्या काळाच्या संदर्भात

१. शैक्षणिक बदलांची दोन नावे लिहा.

२. अर्थव्यवस्थेशी संबंधित दोन बदलांची नावे लिहा.

३. प्रशासन व्यवस्थेतील दोन बदलांची नावे लिहा.

**कृती ४**

**चर्चा करा :**

वर्तमानकालीन भारतात आजही समाजसुधारणेच्या चळवळी सुरू आहेत.


## १.३ स्वातंत्र्योत्तर भारत

स्वातंत्र्योत्तर काळात एक स्वतंत्र देश या नात्याने भारताच्या ध्येयधोरणांमध्ये अनेक बदल झाले. आपली प्राचीन संस्कृती आणि ब्रिटिश काळ यांच्या संमिश्र परिणामातून आपले वर्तमानातील विचार, वागणूक, उद्दिष्टे, ध्येये, गरजा या गोष्टींची विशिष्ट पठडी बनलेली आहे. त्याबरोबर आपल्यापुढे नवीन आव्हाने आणि नवीन संधीसुद्धा उभ्या राहिलेल्या आहेत. आपल्याला पुढे जाण्यासाठी भारताच्या संविधानातील तत्त्वे आणि मूल्ये हे मार्गदर्शक ठरतात. अनुकूल बदल, लोकांचे कल्याण, सर्वांचा समावेश तसेच विकास ही उद्दिष्टे गाठण्यासाठी आखण्यात आलेल्या विविध सरकारी योजना यांचे साहाय्य मिळते. स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजे १९४७ नंतर भारताच्या घडणीत महत्त्वाच्या असलेल्या काही गोष्टींचा आढावा घेऊयात.

**(१) भारताचे संविधान :** ६ डिसेंबर १९४६ रोजी संविधान तयार करण्यासाठी मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. डॉ. बी.आर. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय संविधानाचा मसुदा तयार केला गेला. विविध देशांच्या संविधानांमधील तत्त्वांवरील विचारमंथनातून भारतीय संविधानाचा मसुदा तयार केला. त्यामुळे भारतीय संविधानाचे स्वरूप एका समावेशक दस्तावेजाचे आहे. त्यामध्ये भारतातील वैविध्यतेचा आदर केलेला आहे. भारताचे संविधान उदारता, समानता

आणि बंधुता या मूल्यांची जोपासना करते. भारतीय संविधानामध्ये सर्वधर्मसमभाव किंवा धर्मनिरपेक्षता म्हणजे सर्व धर्मांच्या लोकांचा आदर करणे या मूल्याला अत्यंत महत्त्व आहे. भारतीय संविधानामध्ये वेळोवेळी काही महत्त्वाच्या सुधारणा केल्या गेल्या. नुकतीच केली गेलेली सुधारणा म्हणजे ऑगस्ट २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीर प्रांताला दिलेला विशेष दर्जा देणारे 'कलम ३७०' रद्द केले गेले, ही होय.

**तुम्हांला हे माहीत आहे का?**




भारताच्या संविधानाचा मसुदा तयार करताना मसुदा समितीने अनेक संदर्भ विचारात घेतले. त्यामध्ये 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट - १९३५' तसेच अमेरिका, ऑस्ट्रेलिया, ग्रेट ब्रिटन, कॅनडा, आयर्लंड, दक्षिण आफ्रिका, सोव्हिएत रशिया आणि जर्मनी (वायमर-जर्मनीचे जुने नाव) या देशांच्या संविधानांचा समावेश होता.


**(२) कायदे :** शैक्षणिक संशोधन, शास्त्रीय अभ्यास, प्रसारमाध्यमे, आंदोलक गट आणि विशिष्ट विषय घेऊन त्या संबंधात प्रत्यक्ष काम करणारे गट अशा माध्यमातून मिळालेल्या माहितीद्वारे चिंतेचे विविध विषय आणि लोकांच्या समस्या अधोरेखित केल्या जातात. त्या संबंधातील आवश्यक कायदे संसदेमध्ये पारित केले जातात. नागरी आणि गुन्हेगारी बाबींच्या नियंत्रणासाठी अनेक कायदे केलेले आहेत. कालानुरूप आवश्यकता लक्षात घेऊन वेळोवेळी कायद्यांमध्ये सुधारणा केल्या जातात किंवा कालबाह्य कायदे रद्दही केले जातात. आपल्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले काही सामाजिक कायदे खालील चौकटीत दिले आहेत.

| वर्ष | कायदेविषयक तरतुदी |
|---|---|
| १९५४ | स्पेशल मॅरेज कायदा |
| १९५५ | हिंदू कोड बिल |
| १९५५ | अनटचेबिलिटी (आफेन्सेस) कायदा. १९७६ मध्ये या कायद्याचे नाव बदलून 'प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राइट्स' (PCR Act) असे करण्यात आले. |
| १९५६ | द सप्रेशन ऑफ इम्मॉरल ट्रॅफिक इन वुमेन ॲन्ड गर्ल्स कायदा (SITA) |
| १९६१ | हुंडा प्रतिबंधक कायदा |
| १९७१ | मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी (MTP Act) |
| १९८५ | नार्कोटिक ड्रग्ज ॲन्ड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस कायदा (NDPS Act) |
| १९८६ | चाईल्ड लेबर (प्रोहिबिशन ॲन्ड रेग्युलेशन) कायदा |
| १९९५ | पर्सन्स वुईथ डिसेबिलिटिज (इक्वल अपॉर्च्युनिटिज, प्रोटेक्शन ऑफ राइट्स ॲन्ड फुल पार्टिसिपेशन) कायदा |
| २००५ | प्रोटेक्शन ऑफ वुमेन फ्रॉम डोमेस्टिक व्हॉयलन्स कायदा (DV Act) |
| २०१२ | प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्सेस (POCSO) कायदा. या कायद्यामध्ये २०१९ मध्ये सुधारणा करण्यात आली. |
| २०१३ | प्रोहिबिशन ऑफ एम्प्लॉयमेंट ॲज मॅन्युअल स्कॅव्हेन्जर्स ॲन्ड देयर रिहॅबिलिटेशन कायदा |
| २०१५ | ज्युवेनाइल जस्टिस (केअर ॲन्ड प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन) कायदा (J. J. Act) |
| २०१९ | ट्रान्सजेन्डर पर्सन्स् (प्रोटेक्शन ऑफ राइटस्) कायदा |

**(३) अर्थव्यवस्था :** भारताच्या आर्थिक विकासासाठी १९५१ ते २०१७ या कालावधीत विविध पंचवार्षिक योजना राबवण्यात आल्या. प्रत्येक पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे स्वतंत्र होती. राजकीय यंत्रणा आणि अर्थव्यवस्था या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. त्यांच्यातील अन्योन्य संबंध समजून घेणे आवश्यक असते. अर्थव्यवस्थेच्या संदर्भातील निर्णय सरकारी ध्येयधोरणांशी सुसंगत असतात. ज्या काळात आपल्यावर समाजवादी विचारसरणीचा पगडा होता त्या काळात सरकारने शिक्षण आणि आरोग्य यांबाबतची

जबाबदारी स्वतःच्या अखत्यारीत घेतली होती. १९९१ मध्ये जागतिकीकरणाची (काहींच्या मते जागतिकीकरणाच्या रेट्याची) आणि त्या अनुषंगाने काही बदलांची सुरुवात झाली. जागतिकीकरणाचे काही सकारात्मक पैलू निश्चितच आहेत. परंतु त्याच्या नकारात्मक पैलूंकडे लक्ष वेधणारी टीकाही करण्यात आली आहे. २०१४ सालापासून चलनबंदी, वस्तू आणि सेवा कर (GST) कायद्याद्वारे अंमलात असणारी समान करप्रणाली, विविध जनकल्याण योजना, सीमारहित व्यापार, स्वच्छ भारत मोहीम, उद्योजकांना प्रोत्साहन यांसारख्या गोष्टी अर्थव्यवस्थेच्या नियोजनात कळीच्या ठरल्या आहेत.

**(४) शिक्षण :** अंगणवाडी, शाळा, विद्यापीठे, मानद विद्यापीठे, स्वायत्त संस्था, आय.आय. टी., आय. आय. एम., व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था, मुक्त शिक्षणाच्या संस्था, इत्यादींचा विचार करता शिक्षणाच्या सर्वस्तरांवरील शैक्षणिक संस्थांच्या संख्येत प्रचंड वाढ झालेली दिसते. त्यामध्ये प्रवेश घेणाऱ्यांची संख्याही प्रमाणाबाहेर वाढलेली आहे. वेळोवेळी काही विशिष्ट अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्याची लाट आल्याचे दिसते. शिक्षकांच्या संख्येतही वाढ झालेली आहे. असे असूनही शिक्षणाच्या संदर्भातील आव्हाने आणि समस्या मात्र संपलेल्या दिसत नाहीत. २९ जुलै २०२० रोजी भारतीय केंद्रीय मंत्रिमंडळाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ला मान्यता दिली. या धोरणाचा उद्देश शिक्षणाच्या सर्व पातळयांमध्ये परिवर्तन घडविणे असा आहे.




**(५) राजकीय यंत्रणा :** स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये लोकशाहीच्या तत्त्वांचे अनुसरण करणारी राजकीय यंत्रणा आपण स्वीकारली. भारत हा लोकप्रिय लोकशाही देश आहे. येथील सरकारचा कारभार चालवण्यासाठी कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ आणि न्यायव्यवस्था असे तीन प्रमुख आधार आहेत. आपण लोकशाही पद्धतीवर आधारलेले सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे तत्त्व स्वीकारलेले आहे. भारतीय लोकशाहीमध्ये पूर्वी अस्तित्वात असलेल्या संस्थानांमधील नवाब, राजेरजवाड्यांच्या अधिकारांना मान्यता नाही. कायद्याच्या दृष्टीने सर्व नागरिकांचा दर्जा समान आहे. भारताने मुक्त आणि न्याय्य निवडणुकांचे तंत्र स्वीकारलेले आहे. १८ वर्षांवरील प्रत्येक भारतीय नागरिकास मतदानाचा हक्क देण्यात आलेला आहे. भारतामध्ये बहुपक्षीय पद्धत प्रचलित आहे. राष्ट्रीय राज्य पातळवरील किंवा प्रादेशिक पक्षांना मान्यता मिळू शकते. अपक्ष राहून व्यक्तिगतरित्याही निवडणूक लढवता येते. आपली राज्यव्यवस्था संघराज्य - केंद्र आणि राज्यसंघराज्याच्या अधीन असलेला प्रदेश - स्वरूपाची आहे. केंद्र सरकार किंवा राज्य सरकारची ध्येये, धोरणे आणि राजकीय हेतू हे स्वतंत्र असतात. त्यांचे आपापले मतभेद किंवा भिन्न दृष्टिकोन असू शकतात (उदाहरणार्थ, उजवी, डावी किंवा मध्यम विचारसरणी). विरोधी पक्षांची सत्ताधारी पक्षावर नियंत्रण ठेवणे, ही जबाबदारी असते. सहमती ही लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाचे मूल्य आहे.



भारतातील प्रत्येक सज्ञान व्यक्तीला मतदानाचा हक्क

भारतीय समाजाचा परिचय करून देणाऱ्या या पाठात तुम्हांला आपल्या अत्यंत व्यापक स्वरूपाच्या संस्कृतीची आणि ती घडवण्यास कारणीभूत असणाऱ्या विविध प्रभावी घटक यांची सारांशाने परंतु यथार्थ ओळख झाली आहे असे म्हणता येईल. त्यातून आपल्या सामाजिक संस्थांचे स्वरूप समजावून घेणे शक्य होईल

तसेच भारतातील सामाजिक बदलांचा चिकित्सक अभ्यास करता येईल आणि प्रगती, विकास साधण्याच्या मार्गात आपल्या अनुभवाला येणाऱ्या अडचणी तपासून पाहण्याची क्षमता आपल्याला प्राप्त होईल. त्याचप्रमाणे आपल्यापुढे असणाऱ्या आव्हानांचीही कल्पना येईल.

## सारांश

- अभ्यासक्रमातील या घटकाद्वारे समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या उपविषयांच्या आधारे विविध कालखडांच्या इतिहासाचा परिचय करून दिला आहे. भारताचा ऐतिहासिक काळ प्राचीन, मध्ययुगीन कालखंड आणि वसाहतींचा काळ, स्वातंत्र्योत्तर काळ असा विभागलेला आहे.
- ज्या उपमुद्द्यांचा विचार केलेला आहे ते पुढीलप्रमाणे : धार्मिक प्रणालींचा प्रभाव, रूढी आणि प्रथा, भारतातील स्त्रियांचे सामाजिक स्थान आणि शिक्षणपद्धती.
- भारतीय परंपरेतील या तीनही प्राचीन धर्मांचा प्रभाव उत्तर वैदिक काळाच्या अखेरपर्यंत खूप मोठा होता. – हिंदू, जैन आणि बौद्ध प्रभाव.
- नंतरच्या काळात ज्यू, ख्रिश्चन, इस्लाम, शीख आणि पारशी या धर्मांचा प्रभाव अनेक क्षेत्रांमध्ये, विशेषतः शिक्षण, आरोग्यसेवा आणि सामाजिक देणग्या यांमध्ये दिसतो.
- मध्ययुगीन काळात भारतामध्ये अनेक हिंदू आणि मुस्लीम सत्तांचा उदय आणि ऱ्हास झाला.
- भारतामध्ये पोर्तुगीज, डच, आणि फ्रेंच असे इतर युरोपियन येऊन गेले तरी भारतीय समाजावर ब्रिटिश संस्कृतीचा प्रभाव प्रकर्षाने पडल्याचे दिसते. हा प्रभाव प्रशासन, सामाजिक कायदे, शिक्षण, दळणवळण आणि संपर्क सामाजिक सुधारणांच्या चळवळी राष्ट्रवादाच्या चळवळीचा प्रसार यांमध्ये आढळतो.
- स्वातंत्र्योत्तर काळात संविधान, कायदेव्यवस्था, शिक्षण, आर्थिक आणि राजकीय बदल तसेच सुधारणा यांचा प्रभाव दिसतो.

## स्वाध्याय

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

(१) दीक्षा घेऊन बौद्ध विहारांमध्ये राहणाऱ्या पुरुषांना .... म्हणत असत.

(भिक्खू, भिक्खुणी, ऋषी)

(२) 'स्पेशल मॅरेज ॲक्ट' .... या वर्षी पारित करण्यात आला.

(१९५०, १९५२, १९५४)

**(ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व दुरूस्त करून लिहा.**

(१) i) राजमार्ग – हिंदू धर्म

ii) तीर्थंकर – जैन धर्म

iii) सेंट थॉमस – शीख धर्म

iv) अष्टांग मार्ग – बौद्ध धर्म

(क) **प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| |
|---|
| **ब्राह्मो समाज, डॉ.बी. आर. आंबेडकर, हरिजन सेवक संघ** |

(१) राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेली संघटना

(२) भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष

(ड) **अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

(१) मध्ययुगीन काळात खानक्वा या धार्मिक स्वरूपाच्या संस्थांमध्ये प्राथमिक शिक्षण दिले जाई.

(२) सत्यशोधक समाज स्थापन करण्यात राधाकांत देब यांचा पुढाकार होता.

**प्रश्न २ टीपा लिहा.**

(१) पूर्व वैदिक काळातील शिक्षणव्यवस्था

(२) मध्ययुगीन काळातील भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान

**प्रश्न ३ फरक स्पष्ट करा.**

(१) पूर्व वैदिक काळातील आणि उत्तर वैदिक काळातील स्त्रियांची सामाजिक स्थिती


(२) प्राचीन काळातील आणि वसाहतींच्या काळातील भारतीय शिक्षणपद्धती

**प्रश्न ४ खाली दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

(१) वर्ण

(२) सामाजिक कायदे

**प्रश्न ५ (अ) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




(ब) **खालील विधान चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

(१) वसाहतवाद्यांच्या कायद्यांचा भारतीय समाजावर लक्षणीय प्रभाव पडला.

(२) बौद्धधर्म हा भारत व भारताबाहेरील अनेक भागांमध्ये पसरला गेला.

**प्रश्न ६ आपले मत नोंदवा.**

(१) जैन आणि बौद्ध धर्मांमुळे लोकांमध्ये आशा निर्माण झाली.

(२) समाजसुधारणेच्या चळवळी २१ व्या शतकातही सुरू आहेत.

**प्रश्न ७ पुढील प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा. (कमीत-कमी १५०-२०० शब्द)**

पुढील मुद्द्यांच्या आधारे आजचा भारतीय समाज कसा बदलत गेला आहे याची उदाहरणासहीत चर्चा करा.

(i) इंग्रजी भाषा हे शिक्षणाचे माध्यम

(ii) मतदानासाठी असलेली वयोमर्यादा कमी होणे

(iii) सामाजिक कायदे

(iv) वाहतूक आणि संपर्क (दळणवळण)

◆ ◆ ◆

# २. भारतीय समाजाचे वर्गीकरण

२.१ भारतातील आदिम समुदाय
२.२ भारतातील ग्रामीण समुदाय
२.३ भारतातील शहरी समुदाय

## प्रस्तावना

या प्रकरणात तुम्ही आदिम, ग्रामीण आणि शहरी या भारतीय समाजाच्या तीन विभागांचे महत्त्वपूर्ण पैलू अभ्यासणार आहात. भौगोलिक फरक आणि सामाजिक-सांस्कृतिक वैशिष्ट्यांच्या आधारे भारतीय समाजाचे ढोबळमानाने तीन विभागांत वर्गीकरण केले आहे. आदिवासी, ग्रामीण आणि शहरी असे हे विभाग होत. आदिवासी जमातींची संस्कृती, भाषा, अर्थव्यवस्था आणि धर्म वैशिष्ट्यपूर्ण आहे. आदिवासी लोक तुलनेने अलिप्त राहतात. ग्रामीण आणि शहरी समाजाशी तुलना केली असता, आदिवासी जमाती सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास समजल्या जातात. तर ग्रामीण आणि शहरी समाजामध्ये भौतिक पर्यावरण, जीवनपद्धती, नियम, मूल्ये, लोकसंख्येची घनता, आर्थिक कृती, दारिद्र्य, जातीव्यवस्था, वर्गव्यवस्था, कौटुंबिक रचना आणि धार्मिक श्रद्धा या साऱ्याच बाबतीत भेद आढळतो. शहरी समाजामध्ये उद्योगक्षेत्र आणि सेवाक्षेत्र यांसारख्या बिगर कृषी क्षेत्रांचा समावेश होतो. तथापि, समाजाच्या या तीनही विभागांमध्ये सातत्याने आंतक्रिया होत असतात.

## २.१ भारतातील आदिम समुदाय

'आदिवासी' या संज्ञेचे अनेक अर्थ आहेत. मात्र, या संज्ञेचे अनेक अर्थ असले तरी आदिवासी समुदाय व इतर समुदाय यांच्यातील राहण्याचे ठिकाण, सांस्कृतिक व सामाजिक भेद यांमुळे आदिवासींची ओळख करून घेताना कोणताही गोंधळ निर्माण होत नाही. ऑस्ट्रेलिया, मेलॅनेशिया आणि उत्तर अमेरिकेत देखील मानववंश शास्त्रज्ञांनी आदिवासींचा अभ्यास केला तेव्हा अशीच परिस्थिती होती. भारत आणि आफ्रिकेमध्ये मात्र वेगळी परिस्थिती आहे. याचे कारण असे की, मानववंशशास्त्रज्ञांच्या व्याख्येनुसार जे लोक आदिवासी आहेत त्यांचे वास्तव्य पूर्णतः भिन्न समुदायांसह (ग्रामीण, शहरी) आहे. त्यामुळे विशुद्ध वैशिष्ट्ये आहेत असे गट सापडणे आता अवघड आहे. समाजशास्त्रज्ञ आंद्रे बेताई यांच्या मते, सामाजिक शास्त्रांतील वर्गवारी इतकी बदलली आहे की, या वर्गांची स्पष्ट व्याख्या करणे अर्थहीन आहे. भारताच्या संदर्भात, आदिवासी समुदायाची ओळख पटवून घेण्यासाठी पाश्चात्य व्याख्यांचा फारसा उपयोग होणार नाही. याखेरीज, ऐतिहासिक प्रक्रियेवर भर देणे आवश्यक आहे, म्हणजेच, आदिवासींमध्ये हा बदल कसा झाला ही प्रक्रिया समजून घेणे गरजेचे आहे. विशिष्ट गटाचा पूर्वेतिहास समजून घेतल्यानंतरचा तो गट आदिवासींचा आहे किंवा नाही याबाबत ठाम मत नोंदवता येईल.

भौमिक देशमुख यांच्या मते, 'आदिवासी' ही एक व्यापक संज्ञा आहे, व्यापक अर्थाने, यामध्ये बहुजिनसी वांशिक आणि आदिम गटांचा समावेश होतो. ते भारताचे मुळचे रहिवासी मानले जातात. हा भारतातील महत्त्वपूर्ण अल्पसंख्याक लोकसमूह आहे. डेविड हार्डीमन यांच्यासाख्या अभ्यासकांनी देखील आदिवासी ही संज्ञा वापरली. त्यांच्या मते, ही संज्ञा एकोणिसाव्या शतकातील ऐतिहासिक घडामोडींशी संबंधित आहे. हार्डीमन यांच्या मते, आदिवासी म्हणजे 'वासाहतिक काळात 'समान कर्म' असलेल्या लोकांचा गट होय'. वर्तमानकाळात, आदिवासी हा राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा गट आहे. दलितांसह हा समुदाय भारतातील सीमान्त समुदायाचा मोठा भाग आहे.

अशाप्रकारे, 'आदिवासी' या संज्ञेच्या वापराबाबत साशंकता निर्माण झाली आहे. नेमकेपणाने सांगायचे झाल्यास, समान वंशज असलेला हा समुदाय होय. परंतु, प्रत्यक्षात मात्र ही संज्ञा अनेक सामाजिक, आर्थिक, जैविक आणि वांशिक समुदायांसाठी वापरली जाते.

| प्रदेश | स्थान | आदिम जमातीची नावे |
|---|---|---|
| १. हिमालय | याचे तीन उप-प्रदेश आहेत:<br>(अ) ईशान्येकडील हिमालय प्रदेश<br>(आ) हिमालयाचा मध्यप्रदेश<br>(इ) वायव्येकडील हिमालय प्रदेश | गारो, खासी, जैन्ता, नागा, मिझो, खासा, लेपचा, गाडी. |
| २. मध्य भारत | बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओड़िसा, मध्यप्रदेश आणि छत्तीसगढ. भारतातील ५५% पेक्षा अधिक आदिम लोक याच भागांत राहतात. | गोंड, संथल, मुंडा, हो, ओरओन, बिरहोर. |
| ३. पश्चिम भारत | राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, गोवा, दादरा आणि नगर हवेली. या प्रदेशात जवळपास एक कोटी इतकी आदिम लोकांची संख्या आहे. | भिल्ल, कातकरी, वारली, बैना. |
| ४. दक्षिण भारत | आंध्रप्रदेश, तेलंगण, तामिळनाडू, कर्नाटक आणि केरळ. भारतातील एक षष्ठांश आदिम लोकसंख्या दक्षिण भागात आढळते. | तोडा, कोटा, इरुला, बदागा, चेंचू, कुरुंबा. |
| ५. बेटे | बंगालच्या उपसागरातील अंदमान आणि निकोबार बेटे. अरबी समुद्रातील लक्षद्वीप बेट. | अंदमानी, निकोबारी, ओंगे, जरावा, सेंटीनलीज |

## आदिवासींच्या व्याख्या

***आंद्रे बेताई :*** "ज्या समाजाच्या विशिष्ट भाषिक मर्यादा आणि सुनिश्चित राजकीय मर्यादा आहेत अशा समाजाला आदिम समाज असे म्हणता येईल. राजकीय मर्यादा म्हणजे समाजातील सदस्यांसाठी "वर्तनाच्या सुनिश्चित पद्धती" बंधनकारक करणे असा अर्थ अभिप्रेत आहे. आदिम जमातींचे सांस्कृतिक परिक्षेत्र देखील ठरलेले असते. सांस्कृतिक परिक्षेत्राची नेमकी व्याख्या नसली तरी, त्यामध्ये ढोबळमानाने, चालीरीती, रूढी आणि सदस्यांच्या औपचारिक आणि अनौपचारिक आंतरक्रिया समाविष्ट असतात."

***एल.एम. लेविस :*** "आदिम समाजाचे आकारमान लहान असते. त्यांच्या सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय संबंधांना स्थळ आणि काळाच्या मर्यादा असतात. या समाजाची वैशिष्ट्यपूर्ण नैतिकता आणि धर्मव्यवस्था असते व संबंधित पैलूंबाबत व्यापक दृष्टिकोन असतो."

***राल्फ लिंटन :*** "आदिवासी जमात हा टोळ्यांचा गट असतो. या समुदायातील लोक विशिष्ठ प्रदेशामध्ये परस्परांच्या सान्निध्यात राहतात. त्यांच्यामध्ये ऐक्याची भावना असते. ही ऐक्याची भावना समान संस्कृती, सातत्याने येणारा संपर्क आणि समान गरजांतून निर्माण होते."

### तुम्हांला हे माहीत आहे का?

भारतीय राज्यघटनेतील कलम ३६६(२५) मध्ये 'अनुसूचित जमातीं'चा संदर्भ पुढीलप्रमाणे आला आहे: राज्यघटनेतील कलम ३४२ नुसार अनुसूचित केलेले समुदाय म्हणजे अनुसूचित जमाती होत.

यानुसार, भारताच्या राष्ट्रपतींनी जाहीर केल्यानुसार अनुसूचित जमातींची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:

- आदिम गुणवैशिष्ट्ये
- भौगोलिक अलिप्तता
- वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती
- व्यापक समुदायाशी संपर्क साधताना येणाऱ्या मर्यादा
- आर्थिक मागासलेपण

तथापि, आदिम समाजाच्या विविध व्याख्या भारतीय संदर्भात पडताळून पाहिल्या असता, भारतातील अनेक जमाती त्या व्याख्यांमध्ये बसत नाहीत असे लक्षात येते. "अनुसूचित जमाती" या संज्ञेचा अर्थच असा की हे समुदाय दूरवर टेकड्यांवर राहतात. मैदानी भागांत ज्या ठिकाणी या जमातींचे वास्तव्य आहे तिथेही त्यांचे स्वतंत्र अस्तित्व आहे. तिथे त्यांचे विलगीकरण झाले आहे. म्हणजेच, मैदानी भागातील इतर लोकांसह आदिम जमाती मिळून मिसळून रहात नाहीत. त्यांचा धर्म कोणताही असू शकतो. थोडक्यात, एखाद्या जमातीला अनुसूचित जमात ठरविण्यासाठी पुढील निकष लक्षात घ्यावे लागतात:

- त्या समुदायाची वैशिष्ट्यपूर्ण भाषा, धार्मिक श्रद्धा आणि संस्कृती आदिम स्वरूपाची असणे आवश्यक ठरते.
- त्यांचे अस्तित्व अलिप्त असणे गरजेचे आहे. असा समुदाय इतर जाती अथवा समुदायांच्या सान्निध्यात राहत असेल तरी, अनुसूचित होण्यासाठी तो त्या समुदायांशी मिसळलेला असून चालणार नाही.
- शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या हा समाज अत्यंत मागास असणे हा महत्त्वाचा निकष होय.

'जमात' आणि 'अनुसूचित जमाती' या संज्ञा परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत.

### भारतीय आदिवासींची भौगोलिक विभागणी

एल.पी.विद्यार्थी (१९७७) यांनी भारतातील आदिवासींची पाच प्रकारांत विभागणी केली आहे. यासाठी परिस्थितिकीय, सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय, वांशिक व्यवस्थेशी संबंधित निकषांचा आधार घेण्यात आला आहे. पान क्र. २६ वरील तक्ता पहा.

**कृती १**

प्रत्येकी पाच विद्यार्थ्यांचे गट करा. भारतातील आदिम जमातींच्या भौगोलिक वर्गीकरण तक्त्याचा आधार घ्या. तक्त्यातील कोणतीही आदिम जमात निवडा. त्या जमातीच्या संस्कृतीवर ८-१० स्लाईड्सचे पॉवर पॉईंट सादरीकरण तयार करा.



**गोंड जमाती**

### आदिम जमातींची वैशिष्ट्ये

भारतातील आदिम समुदायांची मूलभूत वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:

**(१) भौगोलिक अलिप्तता :** आदिम जमाती विशिष्ट भौगोलिक प्रदेशामध्ये राहतात. हे लोक साधारणपणे दूरवरच्या जंगलांत किंवा डोंगराळ भागात पाड्यांमध्ये राहतात. आज मात्र अनेक आदिम लोकांनी ग्रामीण व शहरी भागात स्थलांतर केले आहे. हे लोक आता बिगर-आदिवासी लोकांशी मिळून मिसळून राहतात.

**(२) आर्थिक जीवन :** हे लोक अन्न संकलन, शिकार, मासेमारी, टोपल्या तयार करणे, विणकाम, खाणकाम इत्यादी कामे करतात. याखेरीज, ते प्राथमिक आणि स्थलांतरित शेती करतात. त्यांचे आर्थिक जीवन पारंपरिक तंत्रांवर आधारित असते. त्यामुळे शेतीचे उत्पादन कमी असते. आदिम लोक प्रामुख्याने वस्तुविनिमय पद्धतीचा वापर करतात. या समाजामध्ये पायाभूत सोयी-सुविधांची कमतरता असते, विपणनाच्या सोयीदेखील नसतात. या समाजात साक्षरतेचे प्रमाण कमी असते. आदिम लोकांमध्ये अनारोग्याचे प्रमाण अधिक असते. अशा कारणांमुळे आदिम लोक आर्थिकदृष्ट्या मागास असतात.

**(३) अस्मितेची जाणीव :** आदिम लोक स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण ओळख जपतात. या अस्मितेमुळे आदिम समुदायातील लोक परस्परांशी जोडले जातात. विशिष्ट भौगोलिक सीमा हे आदिम समुदायाच्या अस्मितेचे मूळ होय. अस्मितेच्या जाणीवेमुळेच आदिवासी जमातींचे अस्तित्व टिकून राहते. प्रत्येक आदिम समुदायाचे एक

विशिष्ट नाव असते (उदा. वारली, इरुला, गोंड, नागा, खासी). त्यामुळे त्यांची सांघिक आणि ऐक्यभावना दृढ होते.

**(४) अंतर्विवाही समूह :** साधारणपणे आदिम लोक त्यांच्या जमातीबाहेर विवाह करत नाहीत. जमाती अंतर्गत विवाह करणे ही रूढ चाल आहे. आदिम जमातींतील विवाह जमातींच्या अंतर्विवाह नियमांनुसार होतात. विवाह हा एक करार मानला जातो आणि घटस्फोट किंवा पुनर्विवाह निषिद्ध मानला जात नाही. आता मात्र, गतिशीलतेमुळे या परिस्थितीमध्ये बदल झाला आहे. गतिशीलतेमध्ये वाढ झाल्याने जमाती-बाह्य विवाह देखील होतात.

**(५) वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आणि भाषा :** आदिम समाजाच्या सामाजिक रूढी, लोकसाहित्य, परिस्थितीकीय शास्त्र आणि श्रद्धा याबाबत वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहेत. प्रत्येक आदिवासी जमातीची बोलीभाषा भिन्न आहे. तथापि, जमाती व्यतिरिक्त इतरांशी संवाद साधण्यासाठी ते प्रादेशिक भाषेचाही वापर करतात.

**(६) साधा समाज :** आदिम जमातींचे सामाजिक संबंध प्राथमिकपणे कौटुंबिक आणि नातेसंबंधांवर आधारित असल्याने या समाजाचे स्वरूप साधे असते. याखेरीज, आदिम समाजात सामाजिक स्तरीकरण देखील आढळत नाही. त्यांच्या श्रद्धा निसर्ग आणि दुष्टशक्तींवर आधारित असतात. त्यांच्या देव-देवता याच पारंपरिक श्रद्धांवर आधारित आहेत. फार पूर्वीपासून त्यांचा इतर संस्कृती किंवा लोकांशी फारसा संपर्क आलेला नाही.



**आदिवासींचे आर्थिक जीवन**

**(७) साधा धर्म :** 'जीवात्मावाद' (पूर्वजांच्या आत्म्याचे पूजन), 'चेतनावाद' (दगड, लाकूड यांसारख्या कोणत्याही निर्जीव वस्तूंवरील श्रद्धा), 'कुलप्रतिकवाद' (पूर्वज म्हणून वृक्ष किंवा प्राण्याची श्रद्धा), आणि 'निसर्गवाद' (नदी, झरे, सूर्य, चंद्र, जंगल इत्यादी निसर्गशक्तींचे पूजन), मानववाद (एक अमूर्त अलौकिक वेगवान शक्ती) जी जगभर फिरू शकते आणि सजीव व निर्जीव वस्तुंमध्ये प्रवेश करून शक्ती प्रदान करते. हे आदिम जमातींच्या धर्माचे प्रकार होत. पवित्र वने हा आदिम समाजाचा अविभाज्य भाग आहे. काळी आणि पांढरी जादू, पूर्वजांचे पूजन, हितकारक आणि अपायकारक शक्ती यावर आदिम समाजाचा विश्वास आहे.



**"सूर्यदेव मंदिर" (सूर्यदेवतेचे मंदिर) कासटवाडी गाव, जवाहर तालुका, जिल्हा पालघर**



**"शेडोबाचे वन" तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे येथील देवराई**



"वाघोबा मंदिर" (सूर्यदेवतेचे मंदिर) कासटवाडी गाव,
जवाहर तालुका, जिल्हा पालघर

| आदिम जमातींचा धर्म | संज्ञेचे प्रणेते |
|---|---|
| जीवात्मावाद | एडवर्ड टेलर |
| चेतनावाद | रोबर्ट मॅरेट |
| कुलप्रतिकवाद | जेम्स फ्रेझर |
| मानावाद | रोबर्ट मॅरेट |
| निसर्गवाद | मॅक्स म्युलर |

**(८) समुदायाचे प्रशासन :** प्रत्येक आदिम जमातींची प्रशासन व्यवस्था वैशिष्ट्यपूर्ण असते. या प्रशासन व्यवस्थेने व्यक्ती अथवा व्यक्ती समुदायाचे विविध प्रश्न सोडवायचे असतात. जमाती अंतर्गत प्रश्न सोडवण्यासाठी 'जमात पंचायत' असते किंवा ते प्रश्न कौटुंबिक अथवा नातेसंबंधांच्या माध्यमातून सोडवले जातात. आदिम जमात प्रमुख आणि ज्येष्ठांचे मंडळ प्रत्येक जमातीचे प्रशासन चालवते. आता मात्र ज्येष्ठ मंडळाची ही अधिकारिता क्षीण झाली आहे.

**(९) कुल संघटन :** कुल हा आदिम समाजाचा अविभाज्य भाग आहे. कुल म्हणजे रक्ताच्या नात्यांनी बांधली गेलेली कुटुंबे होत. त्यांच्या वंशाची सुरुवात वास्तविक किंवा काल्पनिक व्यक्तीपासून किंवा वस्तूपासून झालेली असते. भारतातील बहुतांश जमाती बहिर्विवाह, कुल आणि वंशपरंपरा यांमध्ये विभागलेल्या आहेत. कुल संघटन असल्यामुळे दृढ नातेसंबंध निर्माण होतात.

**(१०) समतावादी मूल्ये :** आदिम जमातीची सामाजिक संरचना समतावादी तत्त्वांवर आधारित असते. सामाजिक संबंधांची कोणतीही श्रेणीबद्ध रचना नसते. त्यामुळे आदिम समाजात जातीव्यवस्था किंवा लिंग आधारित विषमता आढळून येत नाहीत. तथापि, काही जमातींमध्ये जमात प्रमुखाला वरचे सामाजिक स्थान असते किंवा त्याला अधिक अधिकार असतात.

### आदिम समुदाय आणि पवित्र वने यांबद्दल माहिती

**आदिम समुदाय आणि पवित्र वने/देवराई :** पवित्र वने म्हणजे सृष्टीतील ऊर्जेचे प्रकटीकरण करणाऱ्या स्थानिक देव देवतांना समर्पित वन प्रदेश होय. शिकार आणि अन्न संकलन करण्याच्या टप्प्यापासून भारतातील आदिम आणि ग्रामीण लोक वनांतून प्रकट होणाऱ्या 'पृथ्वी – ऊर्जा' 'सृष्टीतील शक्तींना पूज्य मानतात. या देवता वनप्रदेशाच्या परिघातील खेडे आणि पवित्र वनांच्या संरक्षक देवता आहेत अशी आदिम समाजाची श्रद्धा आहे.

पवित्र वने/देवराई ही एक स्वतंत्र संस्था आहे असे म्हणता येईल. इथे विविध नातेसंबंध निर्माण होतात. त्यातून विशिष्ट संस्कृती निर्माण होते. स्थानिक लोकांच्या मनात त्यांची शेती, वने आणि एकमेकांप्रती आस्था निर्माण होते. पवित्र वनांबाबतचा पूजनीय भाव आदिम जमाती आणि ग्रामीण लोकांच्या जगण्यासाठी आवश्यक असलेल्या शेती आणि वनांशी संबंधित आहे. यासाठी वनांचा विस्तृत प्रदेश सुरक्षित ठेवण्यात आला आहे. त्यामुळे आपोआपच जैवविविधतेचे संरक्षणही झाले आहे. पवित्र वनांचे संरक्षण करणारा कोणताही कायदा नसल्याने आता मात्र अनेक पवित्र वनांचा ऱ्हास होत आहे ही दुर्दैवी बाब आहे.

**सूर्याची उपासना** : आदिम लोक सूर्याला ऊर्जेचा आदिम आणि एकमेव स्रोत मानतात (याला वैज्ञानिक आधार आहे). त्यांना एकच ठाऊक आहे. सूर्यप्रकाशामुळे झाडे वाढतात आणि जनावरांना चारा मिळतो. त्यांचे पशु सुदृढ असतील तर पिक चांगले येईल आणि लोकही सुदृढ राहतील. त्यामुळे आदिवासी समाजासाठी सूर्य, पाऊस, पृथ्वी यांसारख्या नैसर्गिक देवतांना अत्यंत महत्त्व आहे.

**तुम्हांला हे माहीत आहे का?**

**व्याघ्रदेवता उपासना** : महाराष्ट्रातील पवित्र वनांमध्ये व्याघ्रदेवता ही प्रमुख देवता मानली जाते. वाघ हा वनाचा रक्षक मानला जातो. वाघाच्या प्रचंड ताकदीचे प्रदर्शन करणाऱ्या अनेक भारतीय दंतकथा प्रचलित आहेत. ड्रॅगनशी लढणारा वाघ, पावसाची निर्मिती करणारा वाघ, लहान मुलांना वाचवणारा वाघ, जखमा बऱ्या करण्याची शक्ती असलेला वाघ असे वाघाचे वर्णन केले गेले आहे.

व्याघ्रदेवता सर्वोच्च देवता आहे अशी महाराष्ट्रातील अनेक आदिम जमातींची (वारली आणि मल्हार कोळी) श्रद्धा आहे. जीवन आणि पुनर्निर्मितीचे प्रतिक म्हणून सुगीच्या दिवसांत आदिम लोक त्यांच्या उत्पादनातील काही भाग व्याघ्रदेवतेला समर्पित करतात.

**वारलींच्या वर्षानृत्याची दंतकथा (कंबाड नृत्य)** : आदिम जमातींची बहुतांश गाणी आणि नृत्ये निसर्ग पूजनाशी संबंधित आहेत. महाराष्ट्रातील ठाणे, रायगड आणि पालघर भागात वारली जमाती आढळतात. या जमातींतील कंबाड नृत्य हे धान्य देवतेला समर्पित आहे (कंसारी देवी). याबाबत एक दंतकथा सांगितली जाते. आदिम जमातींतील लोक अन्नधान्याची नासाडी करतात म्हणून धान्यदेवता त्यांच्यावर कोपली होती. रागावलेली देवता एके दिवशी अचानक दिसेनाशी झाली. ती कुणाच्याच नजरेस पडेना. मग स्थानिक लोकांनी नरान देव नावाच्या वर्षा देवतेला साकडं घातलं आणि वर्षानृत्य केले. दगडाच्या फटीत दडून बसलेल्या धान्यदेवतेला वर्षादेवतेने शोधून काढले. याचा परिणाम म्हणून कोपलेली धान्यदेवता धरतीवर अवतरली. तिथे पुनर्निर्मिती करू लागली आणि अशाप्रकारे आदिम लोकांना पोटाची खळगी भरण्यास अन्नधान्य मिळू लागले. कासारी देवी पुन्हा कोप पावेल या धास्तीने आदिम लोक धान्याची नासाडी होणार नाही ना याची जाणीवपूर्वक काळजी घेतात असेही या दंतकथेत सांगितले आहे.

वारली जमातीतील केवळ पुरुषच वर्षा ऋतूच्या प्रारंभी हे नृत्य करतात.

**प्रगती तपासा**

(१) दक्षिण भारत, पश्चिम भारत आणि ईशान्य भारतातील एका आदिम जमातीचे नाव सांगा.

(२) आदिम जमातींचे कोणतेही तीन व्यवसाय लिहा.

(३) आदिम समाजाची कोणतीही श्रद्धास्थाने नमूद करा.

आदिम समाजाच्या समस्यांना पुढील बाबी कारणीभूत आहेत:

### आदिवासींच्या शोषणाची कारणे

(१) आदिम समाजाच्या खनिज आणि नैसर्गिक संसाधनांवर ब्रिटिशांना ताबा हवा होता.

(२) काही मिशनरींना आदिम समाजाचे धर्मांतर करावयाचे होते. यामुळे अस्मितेचे संकट निर्माण झाले.

(३) आदिम जमातींच्या प्रदेशात वैद्यक क्षेत्रातील व्यावसायिक, अडते आणि विक्रेत्यांचा प्रवेश झाल्यामुळे आदिम जमाती त्यांच्या पारंपरिक वैद्यक शास्त्राला दुरावल्या.

(४) आदिम प्रदेशात व्यापार आणि दळणवळणाच्या

विकासामुळे या प्रदेशात बाह्य प्रदेशातील लोकांचा प्रवेश झाला.

(५) औद्योगिक उभारणी आणि धरण बांधणीमुळे आदिम जमातींचे त्यांच्या पारंपरिक मूलस्थानातून विस्थापन झाले.

**आदिम समाजाच्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत**

**(१) जंगल व आदिवासी जमिनींपासून अलगता :** वनप्रदेश आणि तेथील संसाधने ही आदिम समाजाच्या उपजीविकेची प्रमुख साधने होत. बहुतांश आदिम जमाती अन्न संकलन, शिकार आणि प्राथमिक शेती करणे यामध्ये व्यस्त असतात. वनांतून होणाऱ्या उत्पादनावर ते मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात. म्हणून, जेव्हा बाह्य प्रदेशातील लोक आदिम समाजाची जमीन आणि तेथील संसाधनांचे शोषण करतात तेव्हा आदिम समाजाचे निसर्गचक्र आणि त्यावर आधारित त्यांचे आयुष्य विस्कळीत होते. आदिम समाज जमिनीपासून अलग होण्याची सुरुवात ब्रिटीश कालखंडापासून झाली. याखेरीज सावकार, जमीनदार आणि व्यापाऱ्यांनीही आदिम समाजाच्या जमिनीवर ताबा घेतला होता. औद्योगिकीकरण आणि धरण बांधकामांमुळे शासनानेही आदिम समाजाच्या जमिनीचे संपादन केले. आदिम समाजाची भूमी बिगर-आदिम समाजाकडे हस्तांतरित करणे किंवा विकणे याविरोधात अनेक राज्य सरकारांनी विविध कायदे पारित केले आहेत. असे असले तरी, आदिम समाजाची जंगल, जमिनीपासून अलगतेची समस्या पूर्णतः सुटलेली नाही.

**जमिनीपासून अलगतेचे खटले :** सन २००७-२००८ ग्रामिण विकास मंत्रालयाच्या (GOI) च्या वार्षिक अहवालानुसार, 'विविध राज्य सरकारांकडून आलेल्या अहवालांनुसार आदिम जमातींच्या जमीन अलगतेच्या ५.०६ लाख खटल्यांची नोंद झाली आहे. यामध्ये एकूण ९.०२ लाख एकर जमिनीचा समावेश आहे. उपरोक्त खटल्यांपैकी २.२५ खटले एकूण ५ लाख एकर जागेतील आदिम जमातींच्या बाजूने निकाली काढण्यात आले आहेत. एकूण ४.११ लाख एकर प्रदेशाशी संबंधित १.९९ लाख खटले वेगवेगळ्या आधारांवर न्यायालयाने नाकारले आहेत.

**(२) दारिद्र्य आणि कर्जबाजारीपणा :** बहुतांश आदिम जमाती दारिद्र्य रेषेखाली आहेत. आदिम जमातींचे व्यवसाय साध्या तंत्रज्ञानावर आधारित आहेत. अन्न संकलन, शिकार आणि शेती हे त्यांचे बहुतांश व्यवसाय सर्वसाधारण पद्धतीचे आहेत. अशा अर्थव्यवस्थेत नफा किंवा अतिरिक्त उत्पादन होत नाही. म्हणून राष्ट्रीय सरासरीशी तुलना करता, त्यांचे दरडोई उत्पन्न अत्यल्प असते. पैकी, बहुतांश आदिम लोकांची दारिद्र्यावस्था तीव्र स्वरूपाची आहे. त्यांच्यावर अनेक कर्जेही आहेत. स्थानिक सावकार आणि जमीनदार या परिस्थितीचा फायदा घेऊन आदिम जमातींचे शोषण करतात. कर्जाची परतफेड करण्यासाठी आदिम समाजाला बहुतेक वेळा त्यांची जमीन तारण ठेवावी लागते किंवा विकावी लागते.

**(३) आरोग्य आणि पोषण :** भारतातील बहुतांश आदिम जमाती पाण्यापासून होणाऱ्या संसर्गजन्य रोगांनी बाधित आहेत. त्यांच्यासाठी असे रोग कायमच जीवघेणे ठरतात. आदिम समाजातील लहान मुले जन्मतःच कुपोषित असतात. कुपोषणामुळे त्यांच्यात अनेक कमतरता असतात. आदिम जमातींमध्ये बालमृत्यूचे प्रमाण अधिक आहे. वैद्यक आणि आरोग्यरक्षणार्थ सुविधांची कमतरता आणि त्यात दारिद्र्य यामुळे आदिम समाजाला आरोग्य आणि पोषणाबाबत खबरदारी घेता येत नाही. कुपोषण ही आदिम समाजातील गंभीर समस्या आहे.

**(४) निरक्षरता :** आदिवासी समाजाच्या विकासामध्ये त्यांच्या निरक्षरतेचा अडथळा आहे. शाळेच्या वेळात आदिवासींची शाळकरी मुले शेतीकाम आणि रोजीरोटी मिळवण्यात गुंतलेली असतात. मुलांकडे मदतीचा हात म्हणून पाहिले जाते. त्यांनी पालकांना अर्थार्जनास मदत करावी अशी अपेक्षा असते. त्यामुळे पालक मुलांना शाळेत पाठवण्याबाबत नाखुश असतात. शिवाय, शाळाही आदिवासींच्या वस्तीपासून दूर असतात. शाळेतील अभ्यासक्रम आदिवासींच्या भाषेत शिकवला जात नाही. त्यामुळे मुलांना शिक्षणाची रुची निर्माण होत नाही. अशा कारणांमुळे आदिवासींची मुले शिक्षणाला मुकतात.

**(५) वेठबिगारी :** भारतीय कायदाव्यवस्थेत वेठबिगारी बंदी आहे. तथापि, काही आदिम प्रदेशांत याप्रकारचे वेठबिगार आढळतात. वेठबिगारी ही गंभीर समस्या मानली जाते. आदिवासींची गंभीर दारिद्र्यावस्था आणि अनियमित उत्पन्न समस्येसाठी कारणीभूत आहे. खरेतर, जमिनीपासून अलगता, कर्जबाजारीपणा, वेठबिगारी मजूर आणि दारिद्र्य या समस्या परस्परांशी संबंधित आहेत. सरकारी व स्वयंसेवी संस्था यांच्या प्रयत्नांमुळे आदिवासींमधील वेठबिगारी पद्धत कमी झाली आहे.

**(६) स्थलांतरित शेती :** आदिम समाजाच्या स्थलांतरित शेतीमुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड व मातीची धूप होत असल्यामुळे ही एक समस्या मानली जाते. स्थलांतरित शेतीची आणखीही काही नावे आहेत: झूम शेती (ईशान्य भारतातील आदिवासींची पद्धत), खाल्लू शेती(बिहारच्या मालेर आदिवासींची पद्धत) आणि पोडू शेती (मध्य भारतातील खोंड आदिवासींची पद्धत).

**कृती २**

तुमच्या आसपासच्या आदिम वस्तीला भेट द्या. त्यांच्या जीवनपद्धतीचे विविध पैलू (उदाहरणार्थ, त्यांचा पोशाख, अस्थिर लागवड पद्धती, पवित्र वने इत्यादी) नोंदवून ठेवा. प्रत्यक्ष भेट देणे शक्य नसल्यास इंटरनेट वरून माहिती घ्या. त्यावरील लघुपट तुमच्या वर्गात दाखवा आणि सर्वांनी मिळून त्यावर चर्चा करा.

### पंडित जवाहरलाल नेहरूंचे 'पंचशील' तत्त्वज्ञान

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आणि विशेषत: पंचवार्षिक योजनांची सुरुवात झाल्यापासून शासनाने आदिम समाजाच्या विकासाला कायमच प्राधान्य दिले आहे. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना आदिवासींचा विकास घडवून आणावयाचा होता. त्यांनी या संदर्भात दीर्घकालीन मार्गदर्शक तत्त्वे देऊ केली. आदिम जमातींच्या राहत्या प्रदेशात कोणताही विकास उपक्रम हाती घेताना, त्यांचा वारसा धोक्यात येणार नाही ना याची काळजी घेण्यात यावी असे नेहरूंचे ठाम मत होते. आदिवासी विकासावरील त्यांच्या दृष्टीकोनातून हे स्पष्ट होते. त्यांचा हा दृष्टीकोन 'पंचशील' नावाने ओळखला जातो.

**'पंचशील' ची संक्षिप्त मांडणी**

(१) लोकांच्या गुणांनुसार त्यांचा विकास व्हावा. त्यांच्यावर कोणतीही बाह्य बाब लादणे आपण टाळूयात.

(२) वनप्रदेशात आदिवासींच्या हक्कांचे संरक्षण व्हावे.

(३) प्रशासन आणि विकासासाठी आदिवासींना प्रशिक्षण देऊन त्यांची गटबांधणी करावी.

(४) आदिवासींच्या प्रदेशात गरजेपुरतेच प्रशासन करावे. त्यांच्यावर विविध योजनांचा भडीमार देखील करू नये. त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांच्या विरोधात नव्हे तर त्याच्या आधारानेच काम करावे.

(५) आदिम समाजावर किती पैसा गुंतवला त्याच्या सांख्यिकी मांडणीवरुन परिणामांची पडताळणी करू नये. तर मानवी जीवनाच्या गुणवत्तेवरून ही परीक्षा व्हावी.

राज्यघटनेतील ही ढोबळ मार्गदर्शक तत्त्वे आणि तरतुदी ध्यानात घेऊन आदिम समाजासाठी अनेक विशेष योजना आणि कार्यक्रम राबवण्यात आले आहेत.

### स्वातंत्र्यप्राप्ती नंतरचे आदिवासी विकासाचे प्रयत्न

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारत सरकारने आदिम समाजाच्या विकासासाठी अनेक पावले उचलली. आदिवासी विकास कार्यक्रमांना शासनाने काही माध्यमांतून निधी पुरवठा केला : राज्य योजना, केंद्रीय विशेष अर्थसाहाय्य, केंद्रीय मंत्रालयांचे/विभागांचे विभागीय कार्यक्रम, संस्थात्मक वित्त इत्यादी.

**कृती ३**

शासन किंवा अशासकीय संस्थेने हाती घेतलेली कोणतीही एक आदिवासी विकास योजना शोधून काढा. तुम्ही शोध घेतलेल्या मुद्द्यांवर वर्गात चर्चा करा.

**शासनाचे आदिम विकास कार्यक्रम –**

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे बांधणे, आदिवासी प्रदेशातील निरक्षर विभागात आदिवासी महिलांसाठी शैक्षणिक संकुल बांधणे. या योजनांअंतर्गत अशासकीय संस्था/शासन स्थापित स्वायत्त संस्था/ शैक्षणिक आणि सहकार संस्थांसारख्या इतर संस्थांना निवडक प्रदेशांमध्ये शैक्षणिक संकुल बांधण्यासाठी संपूर्ण वित्त साहाय्य केले जाते. राज्य आदिवासी विकास सहकारी मंडळ आणि इतर मंडळांना, ग्रामीण धान्य बँकांना मदतनिधीचा पुरवठा करणे. स्वयंचलित संस्था, आदिवासी विकासासाठी संशोधन आणि प्रशिक्षणासाठी अर्थसाहाय्य दिले जाते.

दहावी उत्तीर्ण आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, परदेशी जाण्यासाठी शिष्यवृत्ती आणि ग्रंथ पेढ्या उपलब्ध करून देणे, गुणवत्ता आणि प्रशिक्षणाचा दर्जा सुधारणे, आदिवासी सल्लागार समिती, २० मुद्द्यांच्या कार्यक्रमातील ११(बी) मुद्दा, आदिवासी विकास नीतीचे नवे स्वरूप इत्यादी.

अशा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून शासनाने आदिवासी लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले आहेत. मात्र, यातील सर्व कार्यक्रम यशस्वी झाले असे नाही. त्यामुळे आजही आदिवासींच्या समस्या आणि मागासलेपण कायम आहे.

**आदिम समाजासाठी घटनात्मक तरतुदी**

**समाजातील वंचित घटकांच्या निवारण आणि उद्धारासाठी राज्यघटनेमध्ये २० पेक्षा अधिक कलमे समाविष्ट करण्यात आली आहेत. अनुसूचित जमातींना समान संधी मिळाव्या आणि स्वीकारार्ह वागणूक मिळावी यासाठी विविध धोरणे आखली जातात. या धोरणांमुळे आदिवासींचा विकास आणि शिक्षणासाठी हातभार लागला आहे.**

| कलम | तरतूद |
|---|---|
| १४ | सर्वांसाठी समान हक्क आणि संधी |
| १५ | लिंग, धर्म, वर्ण आणि जाती या आधारावर नागरिकांमध्ये भेदभाव करता येणार नाही. |
| १५ (४) | सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांच्या प्रगतीसाठी विशेष तरतुदींचा उल्लेख. |
| १६ (४) | ज्या वर्गांना पुरेसे प्रतिनिधित्व नाही अशा कोणत्याही मागास वर्गासाठी नियुक्तीच्या वेळी जागा राखीव ठेवण्यासाठी शासन सक्षम आहे. |
| ४६ | समाजातील दुर्बल गटाच्या, विशेषतः अनुसूचित जमातींच्या शैक्षणिक आणि आर्थिक हिताची विशेष काळजी घेण्यास शासनाचा पाठिंबा आहे. अशा घटकांवर सामाजिक अन्याय होऊ नये, त्यांचे शोषण होऊ नये याची काळजी शासन घेते. |
| २४४ (१) | अनुसूचित प्रदेश व अनुसूचित जमाती यांच्या नियंत्रणाकरिता व्यवस्थापनात्मक तरतूदी. |
| २७५ | अनुसूचित जमातींच्या कल्याणास चालना देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात येईल. प्रशासनाची दर्जात्मकता सुधारण्यात येईल. |
| ३३० | लोकसभेमध्ये अनुसूचित जमातींसाठी जागा राखीव असाव्यात. |
| ३३२ | राज्यांतील विधानसभांमध्ये अनुसूचित जाती आणि जमातींसाठी जागा राखीव असाव्यात. |
| ३३५ | केंद्र किंवा राज्य शासनाच्या प्रशासकीय सेवांमध्ये आणि पदांवर नियुक्त्या करताना, प्रशासनाची परिणामकारकता टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने अनुसूचित जाती आणि जमातींच्या सदस्यांचा विचार करण्यात यावा या दाव्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. |

**प्रगती तपासा**

(१) आदिवासींचा विकास धीम्या गतीने का होतो? कोणतीही दोन कारणे लिहा.

(२) आदिवासींच्या धर्माचे तीन प्रकार नमूद करा.

(३) आदिवासींचा बिगर-आदिवासी लोकांशी संपर्क आल्याने निर्माण होणाऱ्या कोणत्याही दोन समस्या सांगा.

## २.२ ग्रामीण समाज

ग्रामीण समाज म्हणजे खेड्यांमध्ये राहणारे लोक होत. हा समाज नैसर्गिक संसाधनांवर अवलंबून असतो. ग्रामीण अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेती, पशुपालन आणि शेतीपूरक व्यवसायावर आधारित असते. हा कृषीप्रधान समाज होय. ग्रामीण प्रदेशात लोकसंख्येची घनता कमी असते. ग्रामीण जीवनामध्ये पारंपरिक मूल्यव्यवस्थेला महत्त्व आहे. भारत हा प्रामुख्याने खेड्यांचा देश आहे.

शतकानुशतके भारतीय खेडी स्वायत्त, स्वतंत्र आणि स्वावलंबी होती. खेड्यांची ही ओळख ब्रिटीश कालखंडात हळूहळू पुसट होऊ लागली. या कालखंडात ग्रामीण लोक विविध जीवनपद्धतींशी संपर्कात येऊ लागले. वासाहतिक आणि स्वातंत्र्योत्तर काळात समाजशास्त्रज्ञ भारतातील खेड्यांमधील सामाजिक संघटनेचा पद्धतशीर अभ्यास करू लागले. भारतीय ग्रामीण समाज, त्याची गतिमानता आणि मर्यादा समजून घेण्यासाठी या अभ्यासाचा आधार घ्यावा लागतो. ग्रामीण ऐक्य, ग्रामीण भागातील निवास पद्धती, ग्रामीण वर्गरचना, भू सुधारणेचा परिणाम, कृषी क्षेत्रातील अस्थिरता इत्यादी बाबी या अभ्यासांतून प्रकाशात येतात.

### ग्रामीण समाजाची व्याख्या

👉 ***ए. डब्ल्यू. ग्रीन :*** “खेडे समुदाय अथवा ग्रामीण समुदाय म्हणजे, मर्यादित भू प्रदेशात निवास करणारा लोकसमूह होय. या प्रदेशातील सर्वांची जीवनपद्धती समान असते.”

👉 ***ब्रिटानिका ज्ञानकोश :*** “ ग्रामीण समाजामध्ये उपलब्ध जागा आणि लोकसंख्येचे गुणोत्तर कमी असते. म्हणजेच, मोठ्या जागेत कमी लोक राहतात. अन्न धान्याचे, तंतूंचे आणि कच्च्या मालाचे उत्पादन या ग्रामीण समाजातील प्रमुख आर्थिक क्रिया आहेत”.

साध्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास, भारतीय ग्रामीण समुदाय म्हणजे जवळपास ५००० लोकांचा समुदाय होय (भारताची सन २०११ची जनगणना). हा समुदाय कृषी आणि पूरक व्यवसायांवर अवलंबून असतो. या समुदायाचे विशिष्ट भौगोलिक प्रदेशात कायमस्वरूपी वास्तव्य असते. समुदायाच्या काही सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक रूढी समान असतात.

ग्रामीण समुदायाला दीर्घ इतिहास आहे. शहरी जीवनपद्धतीपूर्वी लोक ग्रामीण पद्धतीचे आयुष्य जगत असत. आता शहरांची वाढ झाली असली तरी, जगभरातील लोकसंख्या प्रामुख्याने ग्रामीण भागांत राहणारी आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील लोकसंख्येच्या ६८.८४% लोक ग्रामीण भागात राहतात. ६.४ लक्ष खेड्यांमध्ये मोठा जनसमुदाय राहत आहे.

ग्रामीण भागांतील जातिव्यवस्था, वर्ग आणि कुटुंब संस्था यांसारख्या सामाजिक संरचनांनी समाजशास्त्रज्ञांचे लक्ष वेधून घेतले आहे. भारतातील अधिकांश समाजशास्त्रीय संशोधन व लेखन ग्रामीण समाजावरील आहे.

**पंचायत राज**

सन १९५७ मध्ये बलवंतराय मेहता समितीच्या शिफारसीनुसार पंचायतराजची सुरुवात झाली. खेड्यांतील शासन लोकशाही पद्धतीने चालावे म्हणून पंचायत राज ही त्रिस्तरीय व्यवस्था निर्माण करण्यात आली. स्थानिक पातळीपासून वरच्या पातळीपर्यंत अशी या व्यवस्थेची रचना होती. ग्रामीण पंचायतीचे तीन स्तर पुढीलप्रमाणे आहेत:

जिल्हा परिषद

पंचायत समिती

ग्रामपंचायत

पूर्वीच्या काळी ग्रामीण पंचायतीमध्ये खेड्यातील पाच वरिष्ठ सदस्यांचा समावेश होत असे. न्याय प्रदान करणे हे या पंचायतीचे काम असे. आधुनिक पंचायत निर्माण करण्याचा हेतू प्रशासकीय आहे: ग्रामीण पुनर्बांधणी आणि विकास हे त्यामागचे कारण होय.

## ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये

**(१) ग्राम समुदाय :** ग्रामीण भागामध्ये रहिवाशांच्या गरजांची पूर्तता केली जाते. ग्रामीण समुदायामध्ये ऐक्यभावना अस्तित्वात असते. स्थानिक गरजांच्या पूर्ततेवर ग्रामीण भागाचा विकास आधारित असतो.

**(२) आकाराने लहान भूप्रदेश :** आकाराने लहान भूप्रदेश म्हणजे ग्रामीण प्रदेशाचा आकार लहान आणि तेथील लोकसंख्येची घनता कमी असते. भारतीय संदर्भात, सुमारे ५००० लोकसंख्या असलेला समुदाय म्हणजे "ग्राम" अथवा खेडे होय.

**(३) कृषी क्षेत्राचे वर्चस्व :** ग्रामीण प्रदेशात कृषी व्यवसाय प्रमुख आहे. परंतु, हा उपजीविकेचा एकमेव स्रोत नसून ती एक जीवनपद्धती आहे. आपल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील जवळपास ४० टक्के वाटा हा कृषी क्षेत्राचा आहे. येथील ६० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून होती. यामध्ये कुंभारकाम, सुतारकाम, लोहारकाम, टोपल्या विणणे इत्यादी बाबींचा समावेश होतो.

**(४) अनौपचारिकता :** भारतीय खेड्यांमध्ये प्राथमिक संबंधांचा पगडा आहे. ग्रामीण संबंधांमध्ये अनौपचारिकता, व्यक्तिगतता आणि समावेशकता असते. येथे व्यक्तीच्या हितापेक्षा सामुदायिक बांधिलकीला महत्त्व आहे. या 'ऐक्यभावामुळे' सामाजिक बांधिलकी टिकवून ठेवायला मदत होते.

**(५) सामाजिक एकजिनसीपणा :** ग्रामीण प्रदेशात विचार, वर्तन, पोशाख, कृती आणि जगण्यामध्ये एकजिनसीपणा असतो. परंपरा आणि रूढींना अनुसरून वर्तन करण्याची वृत्ती ग्रामीण भागात आढळते. गरजेच्या वेळी ग्रामीण भागातील लोक परस्परांना सहकार्य करतात. अलीकडच्या काळात राजकीय हस्तक्षेपामुळे या ऐक्य भावनेवर विपरीत परिणाम झाले आहेत.

**(६) कुटुंबाला महत्त्व :** कुटुंब व्यवस्था ग्रामीण समुदायाच्या केंद्रस्थानी आहे. एकत्र कुटुंबपद्धती हा एकेकाळी ग्रामीण समुदायाचा आधारस्तंभ होता. आता मात्र एकत्र कुटुंबपद्धतीचे महत्त्व हळूहळू कमी झाले आहे. तरीही निर्णय मात्र सर्व सदस्य एकत्रितपणे घेतात.

> सोरोकीन आणि झिम्मरमन हे ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये सांगताना म्हणतात की, कुटुंब हे सामाजिक जबाबदारीचे एकक/प्रमाण आहे आणि ते सामाजिक नियम आणि संबंधावर आधारित आहे.

**(७) स्त्रियांचे स्थान :** ग्रामीण भागातील स्त्रिया आजही पुरुषप्रधान नियंत्रणाखाली राहतात. येथील स्त्री आणि पुरुषांच्या मनात 'पातिव्रत्य' (स्त्रियांची वैवाहिक निष्ठा) ही आदर्श भावना कोरली गेली आहे. भारतीय परंपरेनुसार स्त्रियांच्या पतिव्रता असण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यामुळे स्त्रियांनीही ते जन्मजात कर्तव्य मानले आहे. स्त्रियांनी त्यांची पारंपरिक कर्तव्ये बजावणे अपेक्षित आहे. स्त्रियांच्या दुय्यम स्थानाला समाजात अलिखित मान्यता आहे.

**(८) धर्मश्रद्धा :** धार्मिक रीती आणि विधींवर अनन्यसाधारण विश्वास हे ग्रामीण समुदायाचे प्रमुख वैशिष्ट्य होय. ग्रामीण भागात समृद्धता राहावी म्हणून धार्मिक विधी केले जातात. धर्म, देव आणि धार्मिक परंपरांवर ग्रामीण समुदायाचा प्रगाढ विश्वास आहे. प्रत्येक गावाची एक देवता आहे. तिला 'ग्रामदेवता' म्हणून ओळखले जाते. प्रत्येक जातीचे लोक ग्रामदेवतेला पूज्य मानतात. किमान वर्षातून एकदा गावामध्ये जत्रा किंवा उत्सव साजरा केला जातो. याखेरीज, लोक त्यांच्या कौटुंबिक देवतेचेही पूजन करतात.

**(९) जातिव्यवस्थेचा पगडा :** ग्रामीण समाजाच्या जीवनापासून जाती व्यवस्था वेगळी करता येणार नाही. जातिव्यवस्था श्रेणीरचनेवर आधारित आहे (या व्यवस्थेमध्ये "शुद्धता आणि अशुद्धतेच्या" कल्पनेनुसार रूढी आणि धार्मिक कृती ठरतात, व्यवसायाचे स्वरूपही यावरूनच ठरते). विविध जातींमधील हे परस्परावलंबित्व बलुतेदारी व्यवस्थेमध्ये पहावयास मिळते. म्हणजेच, परंपरेनुसार, वरिष्ठ जातींना कनिष्ठ जातींकडून सेवा मिळतात.

विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय खेड्यांची वर उल्लेख केलेली वैशिष्ट्ये बदलली आहेत हे नमूद करणे महत्त्वाचे आहे. म्हणून आता या वैशिष्ट्यांकडे बदलाच्या

आणि तुलनात्मक दृष्टिकोनातून पहावे लागते.

### भारतीय ग्रामीण समाजाच्या समस्या

आता भारतीय ग्रामीण भागामध्ये झपाट्याने बदल होत आहे हे खरे आहे. ग्रामीण जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात या बदलांचा सकारात्मक परिणाम झाला असे नाही. बहुतांश खेड्यांसमोर दारिद्र्य, बेरोजगारी, निरक्षरता, कर्जबाजारीपणा, अंधश्रद्धा यांसारख्या समस्या आ वासून उभ्या आहेत.

### ग्रामीण समाजाच्या समस्या पुढीलप्रमाणे:

**(१) दारिद्र्य :** दारिद्र्य ही सामाजिक-आर्थिक बाब आहे. समाजातील काही लोक त्यांच्या मूलभूत गरजाही पूर्ण करू शकत नाहीत तेव्हा ते दारिद्र्यावस्थेत असतात. ग्रामीण भागातील बहुतांश लोक दरिद्री, बेरोजगार अवस्थेत असतात. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असते. ग्रामीण भागातील गरीब लोकांमध्ये लघु आणि अल्प भूधारक शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण कारागीर यांचा समावेश होतो.

**(२) निरक्षरता :** शहरी लोकसंख्येशी तुलना करता, ग्रामीण भागात निरक्षरतेचे प्रमाण अधिक असते. प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क आहे. यासाठी शासनाने काही विशेष तरतुदी (उदाहरणार्थ, सर्व शिक्षा अभियान) केल्या आहेत. मुले आणि प्रौढांमध्ये निरक्षरतेचे मोठे प्रमाण आजही कायम आहे. अर्थसंकल्पात ग्रामीण भागासाठी तुटपुंज्या तरतुदी हे त्यामागचे कारण होय. विविध कार्यक्रम अथवा तरतुदीं व्यतिरिक्त ग्रामीण भागातील शिक्षणाची गुणवत्ता ही चिंताजनक बाब आहे.



ग्रामीण विकास

**(३) पारंपरिकता, पुराणमतवाद आणि अंधश्रद्धा**
भारत आजही पुराणमतवादी समाज आहे. येथील लोकांचे विचार आणि श्रद्धा पारंपरिक आहेत. पारंपरिक रूढी, धर्म, जीवनपद्धतीला आजही महत्त्व आहे. अशी जीवनपद्धती आणि दृष्टिकोन बदलण्यासाठी ग्रामीण लोक प्रतिकार करतात. येथील लोक बदल सहज स्वीकारत नाहीत. अनेकदा ते बदलाचा प्रतिकार करतात. नवीन काही स्वीकारण्याबद्दल त्यांच्यात धास्ती असते, तसेच परंपरावादी व दैववादी दृष्टिकोनामुळे त्यांना फारसा बदल नको असतो.

**(४) जातिव्यवस्थेचा प्रभाव :** जातिव्यवस्थेनुसार पारंपरिक हक्क, अधिकार आणि दंड या बाबी आज फारशा नजरेस पडत नाहीत. परंतु, जातिव्यवस्था लोकांच्या विचारांत इतकी भिनली आहे की, सामाजिक संबंध या व्यवस्थेमुळे आकार घेतात. असे असले तरी, दैनंदिन आयुष्यातील व्यवहारांमध्ये मात्र ग्रामीण लोक एकमेकांना सहकार्य करतात. (प्रत्येक जातीतील लोकांची कामे ठरलेली आहेत.) जातींचे सण, उत्सव समान असतात. त्याला सर्वांची मान्यता असते.

**(५) शेतकऱ्यांच्या आत्महत्या :** शेतकरी आत्महत्या ही समस्या प्रामुख्याने भारतात गंभीर स्वरूपाची आहे. याचे कारण असे की, येथील बहुतांश लोकसंख्या उपजीविकेसाठी कृषी व्यवसायावर आधारित आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांपैकी अधिक शेतकरी कर्जबाजारी होते. भारतातील कृषी क्षेत्रावर आर्थिक सुधारणांचा अंशतः सकारात्मक परिणाम झाला हे मात्र नक्की. या सुधारणांचे नकारात्मक परिणामही पहावयास मिळतात.

**(६) स्त्रियांचे दुय्यम स्थान :** कुटुंब, धर्म, रूढी आणि परंपरांच्या नियंत्रणामुळे समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. समाजाच्या प्रत्येक स्तरावर पितृसत्ताक मूल्ये आणि पद्धतींचा पगडा आहे. यामुळे समाजात दुजाभाव निर्माण होतो आणि लिंगभावाबाबत ठाम मते तयार होतात.

**(७) कौटुंबिक वाद :** जमिनीच्या मालकीवरून ग्रामीण भागांमध्ये कौटुंबिक वाद होणे ही बाब नवीन नाही. अशा तंट्यांमुळे अनेक संयुक्त कुटुंबे उद्‌ध्वस्त झाली आहेत. कुटुंबातील अनेक सदस्यांमध्ये जमिनीची

वाटणी झाल्याने जमिनीच्या तुकड्यांवर पिक घेणे शक्य होत नाही. उदाहरणार्थ, एक एकर इतक्या लहान जमिनीची चार भागांमध्ये विभागणी करण्यात आली तरी अशा जमिनीवर पिकांची लागवड करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. मालमत्तेच्या तंट्यांमुळे ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यामुळे साहजिकच, त्यांच्या पुढील पिढीला वादग्रस्त जमिनीवर शेती व्यवसाय करण्यास प्रोत्साहन मिळत नाही.

### ग्रामीण विकासाचे प्रयत्न

सन १९५० पासून, 'विकसनशील' देशांमध्ये ग्रामीण भागातील सामाजिक बदल हा अभ्यासाचा महत्त्वपूर्ण विषय ठरला आहे. विकसनशील देशांमध्ये राष्ट्रीय पातळीवर आर्थिक विकासासाठी प्रयत्न केले जातात. हे प्रयत्न विशेषतः कृषी क्षेत्रासाठी केले जातात. ग्रामीण समाजातील सामाजिक बदल कोणत्या दिशेने होतो आहे? या संदर्भात, भारतीय समाजशास्त्रज्ञ ए. आर. देसाई यांनी विकास कार्यक्रमांची निष्पत्ती म्हणून ग्रामीण परिवर्तनाच्या काही पद्धती शोधून काढल्या. ग्रामीण सामाजिक बदलाचे चार मुख्य प्रवाह त्यांनी नमूद केले :

(१) कृषी आधारित समाजाचे उदरनिर्वाह अर्थव्यवस्थेपासून बाजारपेठ अर्थव्यवस्थेत जलद गतीने झालेले रूपांतर.
(२) आधुनिक तंत्रज्ञानाचा परिणाम म्हणून जलद रुपांतर.
(३) जमीनदारांसारख्या मध्यस्थांचे निर्मूलन.
(४) शहरी आणि राष्ट्रीय संस्थांशी संपर्क असलेल्या विविध संघटना आणि संस्थांचा उदय.

ए. आर. देसाई यांच्या मतांचा विचार करता, शासनाच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण समुदायात परिवर्तन झाले हे आपल्या ध्यानात येते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सन १९५२ मध्ये 'समुदाय विकास कार्यक्रम' राबवण्यात आले. खेड्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला. ग्रामीण समुदायाच्या कल्याणासाठी ग्रामस्थांनी विकास प्रक्रियेत सहभागी व्हावे हा समुदाय विकास कार्यक्रमांचा उद्देश होता. नंतर सन १९५७ मध्ये पंचायतराज व्यवस्था (स्थानिक स्वराज्य संस्था) सुरू करण्यात आली. सन १९७९ मध्ये समुदाय विकास कार्यक्रमाऐवजी एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रम (आयआरडीपी) राबवण्यात आला.

**तुम्हांला हे माहीत आहे का?**

**भारत सरकारने ग्रामीण विकासासाठी अलीकडे हाती घेतलेल्या काही योजना :**

(१) प्रधान मंत्री ग्राम सडक योजना,
(२) दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना,
(३) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना/ राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मोहीम, (SGSY)
(४) प्रधानमंत्री ग्रामीण विकास शिष्यवृत्ती योजना,
(५) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, (MGNREGS)
(६) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, (SGSY)
(७) सर्व शिक्षा अभियान, (SSA)
(८) संसद आदर्श ग्राम योजना, (SGSY)
(९) राष्ट्रीय सामाजिक साहाय्य कार्यक्रम,
(१०) प्रधान मंत्री आवास योजना/इंदिरा आवास योजना, अंत्योदय अन्न योजना इत्यादी, (AAY)

भारतीय ग्रामीण समाजात प्रामुख्याने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर परिवर्तन झाले. अनेक जमीन सुधारणा कायद्यांचा परिणाम म्हणून ग्रामीण भागातील बदलाला गती आली.

ग्रामीण आणि शहरी समाज परस्परांवर अवलंबून असल्याने या समाजांमध्ये सातत्याने संपर्क येतो. उदाहरणार्थ, शहरातील लोक कृषी उत्पादनासाठी शेतकऱ्यांवर अवलंबून आहेत. त्याचप्रमाणे कृषी उत्पादन वाढवण्याच्या नव्या तंत्रज्ञानासाठी ग्रामीण समाज शहरी समाजावर अवलंबून आहे. हळूहळू ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये बदलली आहेत असे ध्यानात येईल. यावरूनच ग्रामीण-शहरी सातत्य (सतत संपर्क) ही संज्ञा रूढ झाली. रस्तेबांधणी आणि दळणवळण विकासामुळे अनेक सामाजिक, आर्थिक बदल घडून आले. उदाहरणार्थ, जातिव्यवस्था क्षीण झाली. यामुळे आता गतिशीलता वाढली आहे. पूर्वीच्या वस्तूविनिमयाऐवजी चलनावर चालणारी बाजारपेठ निर्माण झाली आहे (पैसा हे विनिमयाचे साधन झाले आहे).

**प्रगती तपासा**

(१) ग्रामीण समुदायाची तीन वैशिष्ट्ये सांगा.

(२) ग्रामीण समुदायातील तीन बदल नमूद करा.

(३) ग्रामीण विकासासाठी भारत सरकारने सुरू केलेल्या कोणत्याही तीन योजना नमूद करा.

**कृती ४**

भारतीय समाजावरील जाती व्यवस्थेचा प्रभाव आजच्या काळामध्ये आपणास कमी झालेला दिसून येतो. या विधानावर वर्गामध्ये चर्चा किंवा वादविवाद करा.

## २.३ भारतातील शहरी समुदाय

शहरी समाजामध्ये वेगवेगळी जीवनपद्धती असलेली गावे, शहरे आणि महानगरांचा समावेश होतो. औद्योगिक विकासामुळे शहरीकरण झाले आणि त्याचा परिणाम म्हणून शहरी समाज उदयास आला. प्रत्येक देशात वैशिष्ट्यपूर्ण शहरी समाज असतो. एखादा समुदाय शहरी आहे हे ठरवण्यासाठी काही निकष वापरले जातात. पैकी, काही निकष पुढीलप्रमाणे आहेत: लोकसंख्येची घनता, व्यवसायाचे प्रकार, सामाजिक संघटन, वैशिष्ट्यपूर्ण परिसर आणि व्यापक समाजाच्या संस्कृतीपेक्षा भिन्न संस्कृती. लुईस वर्थ यांच्या शब्दांत शहर म्हणजे, "सामाजिक वैविध्य जपणाऱ्या व्यक्तींची तुलनेने मोठी, लोकसंख्येची अधिक घनता असलेली आणि कायमस्वरूपी वसाहत होय". युरोप आणि अमेरिकेतील पूर्वीच्या समाजशास्त्रज्ञांनी शहरांच्या उदय आणि वृद्धीचा तपशीलवार अभ्यास केला आहे. यांमध्ये फर्डिनांड टॉनीज, एमिल डुरखीम, मॅक्स वेबर, जॉर्ज सीमेल, रॉबर्ट पार्क आणि लुईस वर्थ यांचा समावेश होतो. शहरी जीवनशैलीवर त्यांनी त्यांची मते मांडली.

शहरी भाग किंवा शहरी भागातील लोकांचे एकत्रीकरण ही एक मानवी वसाहत होय; लोकसंख्येची अधिक घनता आणि पायाभूत सोयीसुविधांची उपलब्धता ही या शहरी मानवी वसाहतीची वैशिष्ट्ये होत. शहरे, नगरे आणि उपनगरे असे शहरी भागाचे वर्गीकरण केले जाते.



शहरी भागातील लोकसंख्येची घनता

### शहरी समाजाची व्याख्या

***मॅक्स वेबर :*** पुढील पाच लक्षणांवरून शहरी समुदायाची व्याख्या स्पष्ट होते: (१) ठराविक भूप्रदेश (२) बाजारपेठ (३) कायदे संहिता आणि न्यायव्यवस्था (४) शहरी नागरिकांच्या संघटनेतून नागरी सहकार्याची जाणीव आणि (५) शहरातील अधिकारी नेमण्यासाठी शहरातील नागरिकांना पुरेशी राजकीय स्वायत्तता.

***हेन्री पेरेन :*** "नागरी संस्कृतीच्या विकासाची दोन मूलभूत वैशिष्ट्ये आहेत: बिगर शहरी सरंजामशाही सत्ताधाऱ्यांकडून संपत्ती आणि राजकीय स्वायत्ततेसाठी व्यापारावर अवलंबून असलेला बुर्झ्वा ('आहे रे' वर्ग) किंवा मध्यम वर्ग आणि शहरी नागरिकांचे सामुदायिक संघटन. अशा संघटनामुळे शहराला स्थानिक सरंजामशहा किंवा धार्मिक अधिकाऱ्यांच्या नियंत्रणातून मुक्त करण्यासाठी आवश्यक तो संघटनभाव निर्माण होतो"

***मेरियम-वेब्सटर शब्दकोष :*** "ज्या समाजामध्ये आधुनिक औद्योगिक स्वरूपाचे नागरीकरण झाले आहे आणि जेथील सांस्कृतिक परंपरा वैविध्यपूर्ण आहे तो समाज शहरी समाज होय. अशा समाजात धर्मनिरपेक्ष मूल्यांवर भर आहे. मात्र, ही मूल्ये समाजकेंद्री नसून व्यक्तीकेंद्री आहेत".

उपरोक्त व्याख्यांवरून शहरी समाजात लोकसंख्येची अधिक घनता आणि इतर प्रदेशांशी तुलना करता मानवी वैविध्य पहावयास मिळते. समाजातील बहुतांश लोकसंख्या असलेली मोठी शहरे ही अगदी अलीकडची घटना आहे. शहरीकरणाच्या प्रक्रियेमुळे शहर निर्माण

होते आणि नंतर त्याचा विकास होतो. शहरीकरण हा विकास प्रक्रियेचाच एक भाग आहे.

### शहरी समाजाची वैशिष्ट्ये

शहरी समाजाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:

**(१) बहुजिनसीपणा :** शहरी समाजात सामाजिक आणि सांस्कृतिक बहुजिनसीपणा हा विविध वर्ग आणि व्यवसाय यांमध्ये पहावयास मिळतो. जाती, भाषा आणि धर्म याबाबींमध्ये शहरी भागांमध्ये संमिश्रता आणि वैविध्य असल्याने शहरांना विश्वव्यापी व सहनशीलता हे गुण प्रदान करते. काही वेळा याच बाबी सामाजिक ताण-तणावासाठी कारणीभूत ठरतात. विविध प्रदेशांतील विविध संस्कृतीचे लोक रोजगार, शिक्षण, वैद्यक आणि आरोग्यसेवेच्या शोधात शहरी भागात स्थलांतरित होतात. शहरी समाज बहुजिनसी आहे. हा समाज वैविध्य आणि संमिश्रतेसाठी ओळखला जातो.

**कृती ५**

शहरी वस्त्यांमधील बहुजिनसीपणाच्या सकारात्मक आणि नकारात्मक परिणामांची चर्चा करा.

**(२) लोकसंख्येची अधिक घनता :** शहरी समाज वैविध्यपूर्ण आणि संमिश्र असल्याने हा बहुजिनसी समाज म्हणून ओळखला जातो. शहरी समुदायांमध्ये अनेक संस्कृती एकवटल्या आहेत. ग्रामीण भागांपेक्षा शहरे आणि नगरांमध्ये लोकसंख्येची घनता अधिक आहे. महानगरे ही इंग्रजी उक्ती 'अर्बन ऑक्टोपस' याप्रमाणे ग्रामीण भागातील लोकांना आपल्या प्रभाव क्षेत्रामध्ये ओढून घेण्याचे काम करतात. शहरी केंद्रांमध्ये सातत्याने येणारा लोकांचा ओघ याला कारणीभूत आहे.

**(३) भिन्न भिन्न व्यवसाय :** शहरातील व्यवसायांचे विशेषीकरण झालेले आहे. व्यवसायासाठी आवश्यक श्रम विभाजन आणि विशेष संधींची उपलब्धता आहे. शहरी भागांतील व्यवसाय प्रामुख्याने बिगर-कृषी पद्धतीचे आहेत. हे व्यवसाय उत्पादन, व्यापार आणि वाणिज्य, व्यावसायिक आणि शासकीय सेवा यांवर आधारित आहेत.

**(४) सामाजिक गतिशीलतेचे अधिक प्रमाण :** शहरी भागातील लोक जेव्हा सामाजिक वर्गव्यवस्था आत्मसात करतात. तेव्हा जातीव्यवस्था क्षीण होऊन त्यांची सामाजिक गतिशीलता वाढते. अर्पित दर्जा (जन्मतः प्राप्त झालेले सामाजिक स्थान) पेक्षा अर्जित दर्जाला (शिक्षण व व्यवसायामुळे प्राप्त झालेले सामाजिक स्थान) मिळालेल्या स्थानामुळे समाजात जास्त महत्त्व प्राप्त होते. त्यामुळे व्यक्तीला स्वबळावर व गुणवत्तेवर आपला सामाजिक दर्जा वाढविता येतो.

**तुम्हाला हे माहित आहे का?**

मुंबई शहराच्या एकूण भूप्रदेशावरील एक षष्टांश भाग एक हजार माणसांनी व्यापलेला आहे. प्रत्यक्षात बृहनमुंबईच्या आराखड्यानुसार, हजार माणसांनी चार एकर भाग व्यापलेला असावा असे सुचवण्यात आले आहे. भारतातील महानगरांमध्ये 'निरपेक्ष' आणि 'सापेक्ष' अशा दोन्ही प्रकारची दाटीवाटी आढळते. शहरांमध्ये लोकसंख्येची घनता प्रचंड आणि म्हणून निरपेक्ष; आणि घनता अधिक नसली तरी शहरातील लोकांना सोयी-सुविधा पुरवण्याची समस्या असल्याने त्याचे स्वरूप सापेक्ष आहे. यामुळे निवास, वीज पुरवठा, पाणी पुरवठा, दळणवळण, रोजगार यांसारख्या पायाभूत सोयी-सुविधांवर प्रचंड ताण येत आहे. दिल्ली शहरातील लोकसंख्येची घनता कमी करण्यासाठी दिल्लीच्या परीघामध्ये गावे विकसित करण्याचा प्रयोग फारसा यशस्वी ठरलेला नाही.

**(५) दुय्यम नातेसंबंध :** शहरी समाजात व्यक्तींतील नातेसंबंध दुय्यम स्वरूपाचे आहेत. येथील नातेसंबंध प्राथमिक स्वरूपाचे नाहीत. म्हणजेच, शहरी भागांमध्ये लोक समोरासमोर येऊन संवाद साधण्याची शक्यता कमी असते. शहरांमध्ये लोकांची शहरी जीवनशैली असते. म्हणजेच येथील लोकांची औपचारिक संवाद, व्यक्ती निरपेक्ष वर्तन, नातलगांव्यतिरिक्त इतरांशी नाते, सांस्कृतिक वैविध्य, क्लब, बगीचे, उपहारगृहे, चित्रपटगृहे, बाजारपेठ इत्यादी ठिकाणी फावला वेळ घालवणे अशी संस्कृती पहावयास मिळते.

**(६) बाजारपेठ-आधारित अर्थव्यवस्था :** शहरांतील आर्थिक संघटन हे बाजारपेठ आणि चलन अर्थव्यवस्थेवर आधारित आहे. बाजारपेठ विकसन हे

आजच्या शहरी केंद्रांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. उदा., ई-मार्केटिंग, ई-बिझनेस इ. आज ऑनलाईन बाजारपेठेचा पर्याय देखील खुला आहे. ही बाजारपेठ नफा-चलित आहे. ज्यामुळे व्यक्तिकेंद्रित वर्तनाला चालना मिळते.

**(७) सुधारित पायाभूत सोयीसुविधा :** गॅस, टेलिफोन, पिण्याचे पाणी, इंटरनेट, रस्ते जाळे, विमानतळे, मेट्रो रेल्वे, खरेदी मॉल, व्यावसायिक केंद्रे शहरांमध्ये पहावयास मिळतात. विविध नागरी सोयी सुविधांचा समावेश करण्यासाठी शहर विकास कार्यक्रमांचे वेळच्या वेळी अद्ययावतीकरण केले जाते. यामध्ये रस्ते, वीज पुरवठा, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन इत्यादींचा समावेश होतो.

**(८) विभक्त कुटुंब पद्धती :** शहरी भागात संयुक्त कुटुंबांची संख्या कमी असून विभक्त कुटुंबांची संख्या वाढते आहे. व्यक्तीकेंद्रिततेमुळे येथील विभक्त कुटुंबांची संख्या वाढते आहे. आजच्या काळात कुटुंब व्यवस्था अस्थिर आहे. कुटुंबापेक्षा व्यक्तीला अधिक महत्त्व दिले जाते.

**(९) वर्गीय जाणीव :** येथील लोकांना वर्गीय जाणीव असून ते पुरोगामी आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील आधुनिक घडामोडींशी येथील लोक संपर्कात येतात. येथील लोकांना त्यांच्या हक्कांची जाणीव आहे. हक्कांचे रक्षण करण्याच्या चळवळीत हे लोक सहभागी होतात.

**(१०) औपचारिक सामाजिक नियंत्रण :** लोकांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणाऱ्या अनौपचारिक साधनांसह कायदे, विधिविधान, पोलीस यंत्रणा आणि न्यायालये ही औपचारिक सामाजिक नियंत्रणाची साधने गरजेची असतात. आता कुटुंबातील वरिष्ठ, धार्मिक नेतृत्व, आणि शिक्षकांच्या पारंपरिक नियंत्रणाचे प्रमाण आता कमी झाले आहे.

**(११) गुंतागुंतीचे श्रम विभाजन :** शहरी भागात स्पष्ट आणि विशेषीकृत श्रम विभाजन आढळते. संस्थेच्या मागण्यांनुसार लोकांना त्यांच्या कामाचे प्रशिक्षण दिले जाते. विविध व्यवसायांचे एकमेकांवरील अवलंबित्व दिसून येते. उदा., वैद्यकीय व्यवसायामध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ, रेडिओलॉजिस्ट, बालरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, वैद्य इ. यामध्ये अवलंबित्व दिसून येते.

**प्रगती तपासा**

(१) शहरी जीवनशैलीची कोणतीही तीन वैशिष्ट्ये नमूद करा.

(२) ग्रामीण समाजापेक्षा शहरी समाजात विभक्त कुटुंब पद्धती का प्रचलित आहे?

(३) दुय्यम नातेसंबंध हे शहरी समुदायाचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य का मानले जाते?

## शहरी समाजाच्या प्रमुख समस्या

नैसर्गिक कारणांमुळे आणि स्थलांतरामुळे शहरांतील लोकसंख्येची झपाट्याने वाढ झाली. यामुळे निवास, आरोग्यरक्षणार्थ सुविधा, दळणवळण, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, आरोग्य, शिक्षण इत्यादी नागरी सुविधांवर प्रचंड ताण आला. भारतामध्ये (२०११ च्या जणगणनेनुसार) ३१.१६% लोक शहरांमध्ये राहतात. जगभरातील इतर देशांपेक्षा भारतामध्ये शहरीकरणाचे प्रमाण कमी असले तरी सध्याच्या काळात भारतासमोर शहर वाढीची गंभीर समस्या आवासून उभी आहे. दारिद्र्य, बेरोजगारी आणि ग्रामीण स्थलांतरितांमधील अल्प रोजगार, भीक मागणे, चोरी, घरफोडी यांसारख्या इतर सामाजिक समस्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे. सन २०३० पर्यंत, भारतीय लोकसंख्येच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोक शहरी भागांत राहतील असा अंदाज आहे.

### प्रमुख शहरी समस्या पुढे नमूद केल्या आहेत

**(१) अस्ताव्यस्त शहरे :** अस्ताव्यस्त शहरे किंवा लोकसंख्या आणि भौगोलिक संदर्भाने शहरांचा वाढता पसारा हे शहरी समस्यांचे मूळ आहे. शहरांच्या अवाढव्य आकारामुळे समस्यांवर तोडगा काढण्यासाठी येथील अर्थव्यवस्था अपुरी पडते. शहरांमध्ये खेड्यांतून आणि लहान गावांतून सातत्याने स्थलांतर झाले आहे. यामुळे शहरांचे आकारमान वाढतेच आहे. शेतजमिनीचा ताबा घेऊन अस्ताव्यस्त शहरे वाढतच आहेत.

**(२) दाटीवाटी :** कमीत कमी जागेत भरपूर लोक राहतात अशी दाटीवाटीची परिस्थिती शहरांमध्ये आढळते. शहरी भागांतील लोकसंख्या वाढल्याने त्याचा परिणाम म्हणून दाटीवाटीची समस्या उद्भवते. लहानग्या जागेत

बहुतांश लोक राहतात अशा शहरासमोर दाटीवाटीची समस्या उद्‌भवणे यात काही अनपेक्षित नाही. भारतातील सर्वच मोठ्या शहरांमध्ये ही समस्या पहावयास मिळते.

**(३) निवास आणि झोपडपट्ट्या :** लोकसंख्येच्या दाटीवाटीमुळे शहरी भागात निवास व्यवस्थेची कमतरता निर्माण होते. त्यातल्या त्यात ज्या शहरी केंद्रांमध्ये बेरोजगार किंवा अल्प रोजगारीत स्थलांतरितांची संख्या मोठी आहे अशा भागांमध्ये ही समस्या अधिक गंभीर आहे. आजूबाजूच्या प्रदेशांतून शहरांमध्ये स्थलांतर केलेल्यांना शहरामध्ये राहण्याची सोय उपलब्ध नाही.

शहरी भागांमध्ये झोपडपट्ट्यांची समस्या गंभीर आहे. मुंबई शहरामध्ये जवळपास ५० टक्के लोकसंख्या झोपडपट्ट्यांमध्ये राहते. महानगरपालिकेने या लोकांचे पुनर्वसन करण्याचे प्रयत्न केले असले तरी ही समस्या अजून सुटलेली नाही. चंदिगढ सारख्या नियोजित शहरामध्येही झोपडपट्ट्यांची समस्या आहे.

**तुम्हाला हे माहिती आहे का?**

**भारतातील विविध शहरांमध्ये झोपडपट्ट्यांसाठी वेगवेगळ्या संज्ञा वापरल्या जातात.**

| शहर | Term used for Slums |
|---|---|
| मुंबई | झोपडपट्टी |
| दिल्ली | झुग्गी – झोंपडी |
| कोलकाता | बस्ती |
| चेन्नई | चेरी |
| बंगळूरू | केरी |
| कानपूर | आहाता |
| जयपूर | कच्ची बस्ती |
| भोपाळ, इंदूर (एम.पी) | गंदी बस्ती |
| चहा मळ्यांच्या भागात | बराक |
| खाणींच्या भागात | घोबारा |

**(४) बेरोजगारी :** भारतातील शहरी बेरोजगारीचे प्रमाण श्रमिकांच्या प्रमाणाच्या १५-२५ टक्के इतके आहे. शिक्षित लोकांमध्ये ही टक्केवारी अजून जास्त आहे. सर्व शिक्षित शहरी बेरोजगारितांपैकी निम्मे लोक चार महानगरांमध्ये (दिल्ली, मुंबई, कोलकाता आणि चेन्नई) आहेत अशी नोंद आढळते. शिवाय, शहरातील रोजगार ग्रामीण भागातील रोजगारापेक्षा अधिक असला तरी, शहरी भागातील जगण्याचा खर्च पाहता हा रोजगार फारच कमी आहे.

**(५) भिक्षावृत्ती :** शिक्षण आणि कौशल्यांची कमतरता असल्यामुळे शहरातील बहुतांश गरीब लोक हे भिक्षा वृत्तीकडे वळताना दिसतात आणि ती त्यांची जीवनशैली बनून जाते. अनेक कारणांमुळे (जसे की अतिदारिद्र्य व सवय) लोक या प्रवृत्तीकडे ढकलले जातात. मोठ्या शहरांमध्ये भिक्षेकऱ्यांच्या संघटित टोळ्या सक्रिय होताना आढळतात. बऱ्याचदा पालकांकडूनच मुलांना भीक मागण्यासाठी विकले जाते किंवा काही प्रकरणांमध्ये मुलांचे अपहरण करून व त्यांना अपंग करून या व्यवसायात त्यांचा गैरवापर केला जातो. 'बॉम्बे प्रिव्हेन्शन ऑफ बेगिंग' ॲक्ट, १९५९ या कायद्यांतर्गत भीक मागणे हा गुन्हा ठरवला आहे.

**(६) दळणवळण :** वाहतुकीचे प्रमाण आणि वाहतूक कोंडीमुळे भारतातील जवळजवळ प्रत्येक शहर आणि गावामध्ये सार्वजनिक वाहतुकीची समस्या गंभीर आहे. गावांचे आकारमान वाढले की ही समस्या अधिकाधिक गंभीर होत जाते. गावाचे आकारमान वाढले की तेथील लोकांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी मोटारगाडी किंवा सार्वजनिक वाहतूक यंत्रणेचा वापर करावा लागतो. सार्वजनिक वाहतूक महत्त्वाची असली तरी व्हॅन किंवा ट्रक यांसारख्या वाहनांमुळे सार्वजनिक वाहतुकीची समस्या अधिकच गंभीर होते.



**शहरातील वाहतूक**

**(७) पाण्याचा तुटवडा :** शहरांचे आकारमान आणि तेथील लोकसंख्या वाढू लागली तसा पाणी पुरवठा कमी पडू लागला. आज व्यावहारिक दृष्टिकोनातून पाहिले असता, भारतातील कोणत्याही शहरामध्ये नागरिकांच्या

गरजा भागवण्यासाठी पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. बहुतांश शहरांमध्ये महानगरपालिकेच्या माध्यमातून होणारा पाणीपुरवठा एक दिवसा आड अर्ध्या तासापेक्षाही कमी वेळ होतो. उन्हाळ्यामध्ये सर्वाधिक गरज असताना बरेच दिवस नळाला पाणी येत नाही. अनेक लहान गावांमध्ये पाणीपुरवठ्याचा मुख्य मार्ग नाही. त्यामुळे कूपनलिका, घराच्या आवारातील विहिरी, खाजगी टँकर किंवा नद्यांवर अवलंबून राहावे लागते. मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये ठाणे आणि पालघर या भागांतून पाणी आणले जाते. त्यामुळे ग्रामीण लोकांचे आयुष्यही खडतर होते.

**(८) सांडपाण्याची समस्या :** अपुऱ्या किंवा अपरिणामकारक सांडपाण्याच्या व्यवस्था ही भारतातील बहुतांश शहरी भागांची समस्या आहे. भारतातील एकाही शहरात सांडपाण्याची सुयोग्य व्यवस्था नाही. नगरपालिकांसमोर असलेला संसाधन तुटवडा आणि शहरांची अनधिकृत वाढ ही या परिस्थितीची प्रमुख कारणे आहेत. बहुतांश शहरांमध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची व्यवस्था उपलब्ध नाही. हे सांडपाणी जवळच्या नदीमध्ये (दिल्लीप्रमाणे) किंवा समुद्रात (मुंबई, कोलकाता आणि चेन्नई इत्यादी) सोडले जाते. यामुळे जलस्रोत प्रदूषित होतात.

**(९) कचऱ्याची विल्हेवाट :** भारतातील शहरांची संख्या आणि आकारमान वाढल्यामुळे कचरा विनियोगाची समस्या गंभीर बनली आहे. शहरांमध्ये निर्माण होणारा प्रचंड कचरा आरोग्यास हानिकारक आहे.



**शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची समस्या**

कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी बहुतांश शहरांमध्ये आवश्यक व्यवस्था नाही. हे आरोग्य आणि पर्यावरणासाठीही हानिकारक आहे. उघड्यावर टाकलेल्या कचऱ्यावर माश्या आणि उंदीर गोळा होतात. कचरा असाच पडून राहिल्यास गलिच्छ विषारी द्रवपदार्थ निर्माण होतो. लिचेट हा विषारी द्रव पदार्थ बाहेर येऊन भूजलासह मिसळला जातो. सडक्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे आमांश, मलेरिया, प्लेग, कावीळ, डायरिया, टायफाईड, डेंग्यू, लेप्टोस्पेरॉसिस यांसारखे रोग पसरतात.

**(१०) शहरी गुन्हेगारी :** वाढत्या शहरीकरणामुळे इतर समस्या निर्माण झाल्या तशी गुन्हेगारीदेखील वाढली. शहरांमध्ये गुन्हेगारांवर राजकारणी, नोकरशाह आणि अभिजन वर्गाचा वरदहस्त असल्याने शहरी हिंसेची समस्या आता अधिकच गुंतागुंतीची होत आहे. पैसा आणि बळाचा वापर करून अनेक गुन्हेगार बड्या राजकीय पदांवर पोहोचतात. वाढत्या शहरी गुन्हेगारीमुळे शहरांतील तणाव वाढतो. त्यामुळे राहण्यासाठी शहरे असुरक्षित बनतात. केवळ दरिद्री, उपेक्षित आणि झोपडपट्टीत राहणारे लोक गुन्हेगार असतात असे नाही. लवकरात लवकर पैसा मिळवण्यासाठी, ऐशोरामी आयुष्य जगण्यासाठी चांगल्या घरांतील लोकही गुन्हेगारीच्या आहारी जातात. आयुष्यात एखाद्या टप्प्यावर आलेल्या अपयशामुळेही तरुण गुन्हेगारीकडे वळतात. छळ, अतिप्रसंग, हत्या, अपहरण, सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, आणि इतर अनेक पांढरपेशी गुन्हे यांसारखे हिंसक शहरी गुन्हे मोठ्या शहरांमध्ये कायमच पाहायला मिळतात.

**कृती ६**

शहरी भागांतील झोपडपट्ट्यांची समस्या समजून घेण्यासाठी प्रश्नावली अथवा मुलाखत पद्धतीचा वापर करून सर्वेक्षण करा. ग्रामीण आणि आदिम भागांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांच्या समस्येवर असेच सर्वेक्षण करावे. सर्वेक्षणावरील तुमचा अहवाल लिहून वर्गासमोर सादर करा.

### शहरी विकासाचे प्रयत्न

शहरे गलिच्छ असतील, शहरी जीवनाचा दर्जा खालावलेला असेल, आणि शहरी पर्यावरणाची समस्या पराकोटीला गेली असेल तर आपण आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या दृढ भारताची कल्पना करू

शकत नाही. खरेतर, अर्थव्यवस्थेच्या वृद्धीसाठी शहरे केंद्रवर्ती आहेत. आर्थिक वृद्धीला चालना देणाऱ्या आणि सामाजिक-राजकीय परिवर्तनाचे माध्यम म्हणून शहरीकरणाकडे सकारात्मकदृष्ट्या पाहिले जाते.

एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये शहरांचा वाटा ६० टक्के इतका राहिला आहे आणि दरडोई उत्पन्न ग्रामीण दरडोई उत्पन्नाच्या तीन पटींनी अधिक आहे. परंतु, शहरातील जीवनावरील खर्च आणि वाढत्या आर्थिक दरीमुळे हे दरडोई उत्पन्न पुरेसे नाही. श्रीमंत अधिकाधिक श्रीमंत आणि गरीब लोक अधिक गरीब होत आहेत. शहरी समस्यांचे आव्हान पेलण्यासाठी अनेक पावले उचलण्यात आली. मात्र, त्याला फारसे यश आले नाही.

शहरीकरणावरील राष्ट्रीय आयोगाने सन १९८८च्या धोरण प्रस्तावामध्ये पुढील आवश्यकतांवर भर दिला: (अ) आर्थिक विकासाच्या अभिक्षेत्रीय पद्धतीचा आणि मानवी वस्त्यांच्या उतरंडीचा विकास, (ब) ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये, वेगवेगळ्या आकाराच्या गाव आणि शहरांमध्ये लोकसंख्येची योग्य विभागणी, (क) लहान आणि मध्यम आकाराच्या शहरी केंद्रांमध्ये आर्थिक कृतींचे वाटप, (ड) परिघातील प्रदेशामध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करून आर्थिक कृतींचे विभाजन करणे, आणि (इ) शहरी आणि ग्रामीण भागांमध्ये उत्तमोत्तम सेवांची तरतूद.

इतर प्रमुख विकास कार्यक्रम पुढीलप्रमाणे : (१) गरिबांसाठी शहरी मूलभूत सेवा कार्यक्रम, (२) शहरी झोपडपट्ट्यांतील पर्यावरणीय सुधारणा कार्यक्रम, (३) लहान आणि मध्यम गावांचा एकत्रित विकास कार्यक्रम, (४) निवास आणि शहरी विकास मंडळाच्या (हुडको) विविध निवास आणि पायाभूत सोयी सुविधांना पतपुरवठा करणाऱ्या योजना, (५) मेगा शहर प्रकल्प, आणि (६) एकत्रिकृत शहरी दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम.

शहरी विकासाच्या जवळपास सर्व प्रमुख कार्यक्रमांसाठी संसाधनांची कमतरता आहे. नियोजनाची सुरुवात झाल्यापासून शहरी विकासाला तितकेसे प्राधान्य देण्यात आले नाही. योजनेच्या नियोजित खर्चापैकी केवळ ३-४% रक्कम शहरी क्षेत्राच्या विकासासाठी ठेवण्यात आली.

**कृती ७**

तुमच्या भागातील वेगवेगळ्या आदिवासी, ग्रामीण आणि शहर विकास योजनांची माहिती मिळवा. तुम्हांला मिळालेली माहिती तुमच्या वर्गात सादर करा. त्यावर वर्गामध्ये चर्चा करा.

**भारतातील अलीकडचे शहर विकास कार्यक्रम**

(१) स्मार्ट सिटी मिशन
(२) अटल मिशन फॉर रेज्यूव्हीनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) प्रोजेक्ट
(३) प्रधान मंत्री आवास योजना किंवा हाऊसिंग फॉर ऑल बाय २०२२ मिशन
(४) हेरीटेज सिटी डेव्हलपमेन्ट अँड ऑगमेंटेशन योजना (हृदय)
(५) जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिनीव्हल मिशन (JNNURM)
(६) अर्बन ट्रान्सपोर्टेशन
(७) स्वच्छ भारत मिशन (SBM)

भारतीय समाजामध्ये सर्व प्रकारचे लोक आणि विविध संस्कृती नांदतात. त्यांचे वर्गीकरण आदिम, ग्रामीण आणि शहरी समाज असे करण्यात आले आहे. याबाबत आपण प्रस्तुत प्रकरणात चर्चा केली. या तीनही समाजांतील फरकांचे आपण परीक्षण केले. शहरी समाजाशी तुलना करता, आदिम आणि ग्रामीण समाजामध्ये साम्य आहे हे तुमच्या लक्षात आले असेल. या तीनही समाजांचा आजही परस्परांवर प्रभाव आहे. याचाच परिणाम म्हणून विकास आणि परिवर्तन घडून येत आहे. यामुळे आव्हानेही निर्माण होतात. भारतीय समाजातील आदिम आणि ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये पारंपरिक समाजाशी मिळतीजुळती आहेत हे आपल्या लक्षात येईल. वर्तमानात बरेच काही बदलले आहे परंतु, बदलाचे स्वरूप सर्वत्र एकसारखे नाही.

## सारांश

- भारतीय लोकसंख्येमधील आदिवासींची संख्या ८.२ टक्के आहे. प्रत्येक आदिवासी जमातीसाठी वेगवेगळे संबोधन वापरले जाते. भारतीय संविधानात त्यांना अनुसूचित जमाती असे संबोधले जाते. प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र ओळख आहे (उदाहरणार्थ, वारली, मिझो, तोडा, गोंड, भिल, जरावा).
- आदिम जमाती भारताच्या विविध भागांत आढळतात. या जमातींची काही खास वैशिष्ट्ये आहेत. वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीमुळे या जमाती इतरांपेक्षा वेगळ्या ठरतात.
- तथापि, ग्रामीण आणि शहरी लोकांशी आलेल्या संपर्कामुळे आता आदिम जमातींमध्ये अनेक बदल झाले आहेत. यामुळे त्यांच्या जीवनपद्धतीवरही परिणाम झाला आहे. त्यांचे सांस्कृतिक विघटन झाले आहे.
- बहुतांश भारत खेड्यांमध्ये राहतो. खेड्यांचा समावेश ग्रामीण समाजामध्ये होतो. शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे.
- संयुक्त कुटुंब, जातिव्यवस्था आणि पंचायत यांसारख्या संस्था म्हणजे ग्रामीण समाजाचे मुख्य आधारस्तंभ आहेत.
- ग्रामीण समाजाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, पिळवणूक, परिवर्तनाला प्रतिकार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या इत्यादी अनेक समस्या आहेत.
- ग्रामीण विकास आणि पुनर्बांधणीसाठी अनेक कार्यक्रम राबवले गेले.
- भारतीय समाजाच्या आदिम आणि ग्रामीण समाजाशी तुलना करता, शहरी समाज भिन्न ठरतो. शहरी समाजात तृतीय क्षेत्रातील व्यवसाय पहावयास मिळतात. उदा. उद्योगधंदे, व्यापार, वाणिज्य, व्यवसाय इत्यादी.
- शहरी भाग बहुजिनसी स्वरूपाचा आहे. या समाजात व्यक्ती निरपेक्षता आणि व्यक्तीकेंद्रितता आहे.
- शहरी भागांमध्येही काही विशिष्ट समस्या आहेत – मागण्या पूर्ण करण्यासाठी अपुऱ्या पायाभूत सोयी सुविधा, गुन्हेगारी, दारिद्र्य, वर्ग भेद, परात्मता, पर्यावरणीय प्रदूषण, रोगराई इत्यादी.
- शहरी विकासासाठी शासनाने अनेक कार्यक्रम हाती घेतले.

## स्वाध्याय

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

(१) --- समाजामध्ये दुय्यम प्रकारचे नातेसंबंध महत्वाचे असतात.
(ग्रामीण, आदिवासी, शहरी)

(२) ५५ % पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या भारताच्या ______ भागात आढळते.
(पश्चिम, मध्य, दक्षिण)

**(ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व दुरूस्त करून लिहा.**

(१) i) जमीन मालक – जमीनदार
ii) ग्रामीण विकासासाठी घेतलेला पुढाकार – समुदाय विकास कार्यक्रम
iii) शासनाची त्रिस्तरीय व्यवस्था – एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम
iv) प्राथमिक व्यवसाय – पारंपरिक समाज

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| **शहरी समाज, देवराई , ग्रामदेवता** |
| --- |

(१) आदिवासी समुदायातील पवित्र वने

(२) पांढरपेशी गुन्हेगारीची उदाहरणे

**(ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

(१) शहरी समाजातील व्यक्तीचे स्थान बहुतांश वेळा अर्पित स्वरूपाचे असते.

(२) निर्जीव वस्तूंचे पूजन करण्याच्या पद्धतीला चेतनावाद असे म्हणतात.

**प्रश्न २ टीपा लिहा.**

(१) आदिम समाजाच्या समस्या

(२) शहरी समाजाची वैशिष्ट्ये

**प्रश्न ३ फरक स्पष्ट करा.**

(१) ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शहरी अर्थव्यवस्था


(२) आदिम समाज आणि शहरी समाज

**प्रश्न ४ खाली दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

(१) शहरी गुन्हेगारी

(२) आदिवासी कुल

**प्रश्न ५ (अ) संकल्पनांची आकृती पूर्ण करा.**




**(ब) खालील विधान चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

(१) शहरी समाजामध्ये गुंतागुंतीचे श्रमविभाजन दिसून येते.

(२) अलीकडील काळामध्ये जातीव्यवस्थेचा पारंपारिक प्रभाव हा बदलत आहे.

**प्रश्न ६ आपले मत नोंदवा.**

(१) शहरांमध्ये समुदाय ऐक्य भावनेचा अभाव का आहे?

(२) शहरी विकासाची गरज स्पष्ट करा.

**प्रश्न ७ पुढील प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा. (कमीत-कमी १५०-२०० शब्द)**

‘पारंपरिक समाज रूढी, परंपरा आणि श्रद्धांना अनुसरून वागणारा असतो.’ वरील विधान कुटुंब अथवा धर्म व्यवस्थेच्या संदर्भाने उदाहरणे देऊन स्पष्ट करा. पारंपरिक समाजात बदल घडवून आणण्याच्या तीन मार्गांवर चर्चा करा.

**उपक्रम**

आदिम, ग्रामीण किंवा शहरी भागातील शासनाच्या प्राथमिक अथवा आश्रम शाळेला भेट द्या. शाळेच्या मुख्याध्यापकांकडून शाळेची पटसंख्या, तिथे घेण्यात येणारे वर्ग, शिक्षकांची संख्या, शिक्षक शिकवत असलेले विषय, त्यांना शिकवताना येणाऱ्या अडचणी, त्यांच्या गरजा यांबाबत माहिती घ्या. तुम्हांला मिळालेल्या माहितीवर अहवाल तयार करा.

**उपक्रम**

ग्रामीण पुनर्बांधणी म्हणजे काय? ग्रामीण भारतातील लोकांसाठी (१) सरकार आणि (२) स्वयंसेवी संस्थांनी सुरू केलेल्या योजनांची माहिती काढा. तुमच्या शाळेत किंवा ग्रंथालयात यावरील भित्तिचित्रांचे प्रदर्शन आयोजित करा.

◆ ◆ ◆

# ३. भारतीय समाजातील विविधता आणि एकता

**३.१ भारतीय समाजातील विविधता**
**३.२ विविधतेतील एकता**
**३.३ राष्ट्रीय एकतेसमोरील आव्हाने**

## प्रस्तावना

"विविधतेत एकता" असलेला देश अशी भारताची ओळख आहे. या विधानाचा आधार घेऊन आपण या प्रकरणामध्ये भारतीय समाजातील वैविध्य आणि ऐक्याचे पैलू आणि निर्देशकांवर चर्चा करणार आहोत. त्याबरोबरच राष्ट्रीय ऐक्यासमोरील आव्हानांवरही चर्चा करू. भारतातील वैविध्याचे स्रोत अनेक आहेत. त्यांपैकी वांशिक मूळ, धर्म, जाती, आदिम संस्कृती, भाषा, सामाजिक रूढी, सांस्कृतिक आणि उप-सांस्कृतिक श्रद्धा, राजकीय तत्वज्ञान आणि विचारधारा, भौगोलिक भेद हे काही ठळक स्रोत आहेत. यांखेरीज, विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य कायमच अधोरेखित होते. ऐक्यभाव म्हणजे एकजूट किंवा 'एकात्मभाव' होय; यामुळे वैविध्यपूर्ण वांशिक समुदाय किंवा संस्था आणि त्यांच्या श्रद्धा परस्परांशी जोडलेल्या राहतात. प्रस्थापित संरचना, नियम आणि मूल्यांच्या माध्यमातून अपेक्षित ऐक्यभाव समाजात रुजवला जातो. "विविधतेत एकता" या संज्ञेतून वैविध्याखेरीज एकात्मभाव असा अर्थ प्रतीत होतो. "विविधतेत एकता" हे सूत्र सामाजिक बांधणी, जात, लिंगभाव, पंथ, संस्कृती आणि धार्मिक पद्धतींतील व्यक्तिगत आणि सामाजिक फरकांतून अधोरेखित होते. विविधतेत एकता या सूत्रानुसार फरक हे संघर्षाचे कारण मानले जात नाही. असे असले तरी या प्रकरणात आपण देशातील एकतेला आव्हान निर्माण करणाऱ्या काही वांशिक, धार्मिक, भाषिक, प्रादेशिक, जातीय, वर्गीय आणि लिंगभावात्मक घटकांचाही विचार करणार आहोत.


## ३.१ भारतीय समाजातील विविधता

भारतीय समाजात अनेक प्रकारचे वैविध्य आढळून येते. शब्दकोषानुसार, 'वैविध्य' म्हणजे विभिन्नता किंवा फरक होय. प्रकरणाच्या या भागामध्ये आपण वैविध्याच्या प्रभावी स्रोतांवर चर्चा करणार आहोत. यामध्ये भारतीय समाजातील वंश, धर्म, भाषा, जात, वर्ग आणि लिंगभाव या स्रोतांचा समावेश होतो.




**समानता**

**वांशिक विविधता :** वैशिष्ट्यपूर्ण शारीरिक बांधणी असलेल्या लोकांचा गट अशी वंशाची साधी व्याख्या करता येईल. ए. डब्ल्यू. ग्रीन यांच्या मते, "वंश हा व्यक्तींचा मोठा जैविक गट होय. अशा गटांची अनेक वैशिष्ट्यपूर्ण आणि अंगभूत वैशिष्ट्ये असतात. अशी वैशिष्ट्ये थोड्याफार फरकाने समान असतात." काही अनुवांशिक वैशिष्ट्यांच्या आधारे वांशिक वर्गीकरण केलेले असते. वंशाचे वर्गीकरण करण्यासाठी ज्यांचा आधार घेतला आहे अशा वैशिष्ट्यांना वंशीय निकष असे संबोधले जाते. भारतातील कोट्यवधी लोकसंख्येचे पद्धतशीर संस्कृती वर्णन करणे हे अवघड काम आहे. तथापि, जे. एच. हटन, डी. एन. मुजुमदार आणि डॉ. बी. एस. गुहा यांसारख्या अनेक मानववंशशास्त्रज्ञांनी भारतीय लोकसंख्येचे वंशावर आधारित वर्गीकरण केले आहे. यापैकी, डॉ. बी. एस. गुहा यांनी केलेले वर्गीकरण पाहूयात. गुहा यांच्या मते भारतीय लोकसंख्येचे *सहा* प्रमुख वंश आधारित गट पडतात.



अभ्यासकांनी अलीकडेच नोंदवलेल्या निरीक्षणानुसार, जगभरात कुठेही 'शुद्ध' वंश गट नाही. पुरातन वंश गट संमिश्र आहेत. स्थळकाळाच्या मर्यादा ओलांडून झालेल्या स्थलांतरामुळे वर नमूद केलेल्या वंशांमध्ये संमिश्रता आली आहे. यामुळे भारतीयांमध्ये वंश आधारित बहुजिनसीपणाचे प्रमाण प्रचंड आहे. अशाप्रकारे, आज मानवजातीचे वंश आधारित वर्गीकरण केलेले असले तरी, त्यांच्यातील भेद जाणून घेण्याचे आधार मात्र मर्यादित नाहीत. म्हणजेच, आता केवळ बाह्य शारीरिक बांधा हा एकमेव निकष वापरला जात नाही. वैज्ञानिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शारीरिक वैशिष्ट्यांचा जैविक आणि डीएनए या पद्धतीने अभ्यास करता येतो. असा अभ्यास वैध आणि विश्वसनीय असतो.

**धार्मिक विविधता :** धर्मसंस्था जगभरात सर्वत्र आढळते. भूतकाळ आणि वर्तमान काळातील सर्व समाजांमध्ये धर्मसंस्थेचे अस्तित्व आहे. धार्मिक मतप्रणालीचा आर्थिक उपक्रम, राजकीय चळवळी, सामाजिक श्रेणी आणि सांस्कृतिक भेद यांवर प्रभाव असतो. धर्म हा भारतीय समाजातील विविधतेचा महत्त्वपूर्ण पैलू आहे. भारत हा बहु-धर्मीय आणि बहु सांस्कृतिक देश असला तरी, संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वामुळे समाजाची **धर्मनिरपेक्ष** वीण जपली जाते. भारत हा असा देश आहे जेथे आदिम समाजाचा आत्मावाद आणि निसर्गवाद, हिंदुधर्म, जैनधर्म आणि बौद्धधर्म या धर्मांचा इथे उगम झाला आणि भरभराटही झाली. नंतरच्या काळात ख्रिस्ती धर्म, इस्लाम, पारशी आणि शीख धर्मांचा प्रभावही आढळतो. यांपैकी, प्रत्येक धर्माच्या मूलभूत कल्पना आणि श्रद्धा भिन्न आहेत. तरीही हे धर्म भारतीय समाजात एकोप्याने नांदतात.

भारतीय संविधानाने धर्मस्वातंत्र्याचा हक्क मूलभूत हक्कांमध्ये नमूद केला आहे. जगभरात भारतीय धर्मांचा विलक्षण प्रभाव पहावयास मिळतो. प्रत्येक प्रमुख धर्माचे तत्त्वप्रणाली, पंथ आणि संप्रदाय यांमध्ये उप-विभाजन झाले आहे. पुढे दिलेल्या तक्त्यामध्ये धार्मिक अस्मितांवर आधारित भारतातील धार्मिक गटांचे वितरण नमूद केले आहे.

| धार्मिक गट | लोकसंख्या कोटींमध्ये | लोकसंख्या % |
|---|---|---|
| हिंदू | ९६.६३ | ७९.८० |
| मुस्लीम | १७.२२ | १४.२० |
| ख्रिश्चन | ०२.७८ | ०२.३० |
| शीख | ०२.०८ | ०१.७० |
| बौद्ध | ०.८४ | ०.७० |
| जैन | ०.४५ | ०.४० |
| इतर धर्म आणि पंथ | ०.७९ | ०.७० |
| धर्म सांगितला नाही | ०.२९ | ०.२० |

एखाद्या धर्माचे सर्व अनुयायी समान श्रद्धा बाळगणारे आणि समान पद्धती पाळणारे आहेत असे आपल्याला गृहीत धरता येणार नाही. धर्म अनुयायींच्या अंतर्गत उप-गटांनी पवित्र साहित्य आणि वांशिक स्थानाचे विविध अर्थ लावले आहेत. धर्माचे अनुयायी एकत्रितपणे धार्मिक उत्सव आणि प्रसंग साजरे करतात. अशा उत्सवांमुळे सर्व धर्मांचे लोक एकत्र येतात. जसे की, गणपती, दिवाळी, रमजान ईद, पतेती, ख्रिसमस, इत्यादी उत्सव नमूद करता येतील. अशा काही महत्त्वाच्या उत्सवांच्या दिवशी भारत सरकारनेही शासकीय सुट्टी जाहीर केली आहे. लोकांना उत्सव साजरे करता यावे हा यामागचा हेतू आहे. उदाहरणार्थ, गुड फ्रायडे, राम नवमी, ईद-उल-फित्र या दिवशी सार्वजनिक सुट्टी असते. उदाहरणार्थ, कोलकात्यामध्ये दिपोत्सव (दिवाळी) हा सण ज्युविश दिपोत्सवासोबत (हन्नूकाह) साजरा केला जातो.



**धार्मिक विविधता**

**कृती १**

पाच ते सात विद्यार्थ्यांचे गट तयार करा. प्रत्येक गटाने एक धर्म निवडा. प्रत्येक धर्माच्या पाच अनुयायींच्या मुलाखती घ्या. त्यांच्या धार्मिक प्रथा परंपरांची माहिती घ्या. तुम्हांला मिळालेल्या माहितीचा अहवाल लिहा. तुमचा अहवाल वर्गासमोर सादर करा.

## भाषिक विविधता

बहुभाषिकता हे भारतीय जीवनपद्धतीचे वैशिष्ट्य आहे. सन १९५६ मध्ये, भाषेच्या आधाराने भारतीय राज्यांची पुनर्रचना करण्यात आली. म्हणून विशिष्ट राज्यातील रहिवासी विशिष्ट भाषा बोलतात. भारत हा विविध भाषांनी नटलेला देश आहे.

भारताच्या संविधानाने २२ भाषांना अधिकृत मान्यता दिली आहे. यांपैकी, संस्कृत, तमिळ आणि कन्नड या तीन भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. भारत सरकारने या तीनही भाषांना विशेष दर्जा आणि मान्यता दिली आहे. या अभिजात भाषांची लिखित आणि मौखिक परंपरा १००० वर्षांपेक्षा जुनी आहे. भारताच्या भाषिक धोरणा अंतर्गत भाषिक अल्पसंख्याकांना संरक्षणाची हमी देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेत प्राथमिक शिक्षण मिळावे ही संकल्पना म्हणजे भारताचे खास वैशिष्ट्य आहे.

संयुक्त राष्ट्रांनी दिनांक २१ फेब्रुवारी हा आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन जाहीर केला. यापूर्वी, भारतीय राज्य घटनेच्या शिल्पकारांनी मातृभाषेतील शिक्षणाला प्राधान्य दिले होते. असे शिक्षण घेतल्याने विद्यार्थ्यांचा पूर्ण क्षमतेने विकास होतो. भारताचे भाषिक धोरण भाषिक बहुविधतेला मान्यता देणारे आहे. प्रशासन, शिक्षण आणि इतर लोकसंपर्काच्या क्षेत्रांमध्ये मातृभाषेच्या वापराला प्रोत्साहन देण्यास हे धोरण मान्यता देते. या धोरणाची अंमलबजावणी आणि अधीक्षण करण्यासाठी भारत सरकारने मानव संसाधन विकास मंत्रालयाअंतर्गत भाषा समितीची स्थापना केली आहे.

आज भाषिक विविधतेचे संवर्धन करण्याची गरज आहे. वैविध्यपूर्ण भाषा बोलणारे लोक दुर्मिळ होत आहेत. मातृभाषा नाकारून इतर प्रमुख भाषांचा स्वीकार करण्यात येत आहे.

भाषिक वैविध्याचे जतन करण्यासाठी लोकांचा सहभाग महत्वाचा आहे. भाषिक विविधता हा भारताचा सांस्कृतिक ठेवा आहे.

### भारतातील भाषा परिवाराचे वर्गीकरण

| इंडो–आर्यन (आर्य) | द्रविडीयन (द्राविडी) | ऑस्ट्रो–एशियाटिक (निषाद) | सिनो–तिबेटन (किराता) | अंदमानी |
|---|---|---|---|---|
| संस्कृत, काश्मिरी, हिंदी, बंगाली, पंजाबी, राजस्थानी, गुजराती, कच्छी, सिंधी, मराठी, ओरिया, आसामी, उर्दू, कोंकणी, बिहारी, अवधी, छत्तीसगढी, बुघेली, अलवारी | तेलुगु, कुरुख, ओराऑन, मालेर, कुई, पारजी, कोलमी, तमिळ, मल्याळम, कन्नडा, तुलू, कोटा, कुर्गी, तोडा | मुंडा (यामध्ये मुंद्री, संथाली, हो यांसारख्या चौदा भाषांचा समावेश होतो), मोन–खमेर (याचे खासी आणि निकोबारी हे दोन उप–गट पडतात) | याचे तीन उप–विभाग आहेत – तिबेटो–हिमालयन, हिमालयी भाषा, भुतिया भाषा | अंदमानचे आदिवासी लोक या भाषांमध्ये बोलतात – आका–जेरु, ओंगन, सेन्तीनेली. |

**सन २०११ची जनगणना : एकूण लोकसंख्येतील भाषिक टक्क्यांमध्ये**

| भाषा | भाषिक (टक्क्यांमध्ये) |
| --- | --- |
| हिंदी | ५७.१ |
| इंग्रजी | १०.६ |
| बंगाली | ८.९ |
| मराठी | ८.२ |
| तेलुगु | ७.८ |
| तमिळ | ६.३ |
| गुजराती | ५.० |
| उर्दू | ५.२ |
| कन्नड | ४.९४ |
| ओडिया | ३.५६ |
| पंजाबी | ३.०२ |
| मल्याळम | २.९ |
| संस्कृत | ०.०१ |

**तुम्हाला हे माहिती आहे का?**


**ऑल इंडिया रेडिओ**

भाषिक विविधतेचा भाग म्हणून ऑल इंडिया रेडिओ, प्रसार भारतीला २३ भाषा आणि १७९ बोलींमध्ये प्रसारण करावे लागते.

**कृती २**

पाच विद्यार्थ्यांचे गट करा. प्रत्येक गटाने भारतातील एक राज्य, भाषा आणि तेथील बोलीभाषा निवडा. शक्य असल्यास काही भाषा किंवा बोलीभाषांचे ध्वनीमुद्रण करा. ते तुमच्या वर्गाला ऐकवा.

**प्रादेशिक विविधता :** एखादा प्रदेश ही स्थळ आणि काळ आधारित बांधणी आहे. अशा प्रदेशामध्ये काही प्रमाणात सांस्कृतिक एकजिनसीपणा आढळतो. या भौगोलिक प्रदेशामध्ये वास्तव्य करणाऱ्या लोकांचा भूतकाळ समान असल्याने ते समान वर्तमानकाळाशी जुळवून घेऊ शकतात. तथापि, संकुचित प्रादेशिक अस्मिता या व्यापक अस्मितांपासून स्वतंत्र नाहीत. उदाहरणार्थ, प्रत्येक प्रादेशिक अस्मिता संदर्भानुसार समजून घेणे गरजेचे आहे.




प्रादेशिक अस्मितांचे स्तर

प्रदेश म्हणजे देशातील भौगोलिक एकक आहे. उदाहरणार्थ, सात राज्ये असलेला ईशान्येकडील प्रदेश. ज्याला 'सेव्हन सिस्टर्स' असेही संबोधतात. तथापि, राज्यांतर्गत देखील काही प्रदेश असतात. उदाहरणार्थ, महाराष्ट्र राज्यातील प्रदेश पुढीलप्रमाणे आहेत – कोकण, विदर्भ, खानदेश, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र.

**तुम्हांला हे माहीत आहे का?**

भारतातील ईशान्येकडील राज्यांमध्ये पुढील राज्यांचा समावेश होतो – अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मिझोरम, मणिपूर आणि त्रिपुरा. या राज्यांना एकत्रितपणे 'सेवन सिस्टर्स' (ईशान्येकडील सात भगिनी राज्ये) असे देखील संबोधतात.

ईशान्येकडील प्रदेश डोंगराळ असून सांस्कृतिकदृष्ट्या श्रीमंत आहे. भारतातील बहुसंख्य आदिम जमाती या राज्यांमध्ये राहतात. उदाहरणार्थ, गारो, खासी, नागा, मिझो, झोमी, लेपचा, कुकी, बोडो.

या जमातींची विशिष्ट शारीरिक गुणवैशिष्ट्ये असतात असेही तुमच्या लक्षात येईल. उदाहरणार्थ, त्वचेचा रंग, केसांचा पोत, चपटे नाक, बदामी डोळे, दुमडलेल्या पापण्या इ.

उपरोक्त प्रत्येक समुदायाला विशिष्ट इतिहास, लोकसाहित्य, नृत्य, परंपरा, आणि संगीताची पार्श्वभूमी आहे. या समुदायांचा इतर संस्कृतींशी संपर्क आल्यानंतर या पार्श्वभूमीवर काही प्रमाणात परिणाम झाला आहे. हिंदुधर्म, बौद्ध धर्म, इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्मांमध्ये धर्मांतर होणे ही बाब काही नवीन नाही. या भागामध्ये भारतीय उपखंड आणि भारताच्या बाहेरील भागातून लोक आले आहेत.

प्रत्येक प्रदेशाचे वैविध्य संपन्न आणि अनोखे असते. नद्या, जलस्रोत, मृदा, वने, खनिजे आणि सामाजिक-आर्थिक आणि राजकीय वातावरण या संदर्भात प्रदेशातील विविधतेचे वर्णन करता येते. एखाद्या प्रदेशातील लोक वंश, वांशिकता, भाषा, बोलीभाषा, खाद्यसंस्कृती, रूढी, बोलण्या-वागण्याच्या पद्धती, श्रद्धा आणि आचरण, कायदे आणि चालीरीती यांसारख्या नियंत्रणव्यवस्था यामुळे तेथील लोकांमध्ये विविधता आढळते. प्रत्येक प्रदेशाचा स्वतःचा आणि अद्वितीय असा इतिहास असतो, इतिहासाचे पडसाद त्या प्रदेशाच्या वर्तमानकाळात पाहायला मिळतात. उदाहरणार्थ, महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रभाव पाहायला मिळतो.

### जाती विविधता

भारतातील जातीव्यवस्था हा येथील वैविध्याचा मोठा स्रोत आहे. इंग्रजीतील कास्ट या शब्दाचा उगम पोर्तुगीज भाषेतील 'कास्टा' या शब्दात सापडतो. त्याचा अर्थ वर्ण असा होतो. भारतातील वेगवेगळ्या वांशिक व जाती समुदायांची व्याख्या करण्यासाठी ब्रिटिशांनी कास्ट (जात) ही संज्ञा वापरली. समाजशास्त्रज्ञ जातीकडे दोन बाजूंनी पाहतात: वर्ण आणि जाती. वर्ण म्हणजे हिंदूंची चार श्रेणींमध्ये केलेली रचना होय – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र. भारतामध्ये जवळपास ३५०० जाती आहेत असे म्हटले जाते. पैकी, ७५१ जातींचा घटनेतील अनुसूचित जातींमध्ये समावेश करण्यात आला आहे.

भारतातील सामाजिक संरचना जाती व्यवस्थेवर आधारित होती. जाती या समुदायांमधील संबंध वस्तूविनिमयावर आधारित असत. हा कृषी अर्थव्यवस्थेचा आधार होता. मात्र, यामुळेच समुदायांमध्ये विषमता आणि वंचितावस्था निर्माण झाली. जाती व्यवस्थेमुळे विविध जातींमध्ये वस्तू आणि सेवांचा विनिमय होतो. विनिमयामध्ये दाते आणि ग्राहकांचा समावेश असतो. यातील दात्याला जजमान म्हणून ओळखले जाते. जजमानास पूर्वी जमीनदार म्हणत. ग्राहकाला कामीन (कारागीर किंवा शुद्र जातीतील) असे संबोधले जाई. कामीन जजमानाला सेवा देत असत. त्याचा मोबदला त्यांना वस्तू रूपात (धान्य, कपडे, राहण्याची जागा, मोफत अन्न, खटल्यांमध्ये साहाय्य, वापर करण्यासाठी पशु आणि साधने इत्यादी) मिळत असे. तथापि, बाजारपेठ आणि चलन आधारित अर्थव्यवस्थेमुळे आता जजमानी व्यवस्थेचे महत्त्व कमी होत आहे.

जातिव्यवस्था केवळ हिंदुंमध्येच आहे असे नाही. मुस्लीम, ख्रिश्चन आणि शीख धर्मांमध्येही जाती सदृश्य विभाजन पाहायला मिळते. मुस्लिमांमधील आमीर, शेख, सय्यद, पठाण या मुस्लिमांमधील श्रेणी रचनेबद्दल आपल्याला माहिती आहे. याशिवाय, मुस्लिमांमध्ये तेली, धोबी, दर्जी (शिवणकाम करणारे) यांसारख्या जातीही आहेत. भारतातील ख्रिश्चनांमधील जाती आधारित अस्मिता आपल्याला नवीन नाही. काही तज्ज्ञांच्या मते भारतातील ख्रिश्चनांचे मोठ्या प्रमाणात हिंदू धर्मातून धर्मांतर झाले होते. त्यामुळे काही धर्मांतरितांनी जाती व्यवस्थाही बरोबर नेली. सन १९५० चा घटनात्मक आदेश सन १९९०मध्ये दुरुस्त करण्यात आला. त्यानुसार, "अनुसूचित जाती" ही संज्ञा सूचीमध्ये नमूद हिंदू, शीख आणि बौध्दांसाठी वापरता येईल. तर, "अनुसूचित जमाती" चा धर्म कोणताही असू शकेल. या माहितीवरून आपण भारतातील जाती विविधतेची कल्पना करू शकतो.

### वर्ग विविधता

"वर्गा" वर आधारित विविधता सर्वाधिक महत्त्वाची आहे. तुम्ही इयत्ता अकरावीमध्ये याचा अभ्यास केला आहे. वर्ग हा प्रामुख्याने (१) आर्थिक स्थान किंवा आर्थिक निकष आणि (२) शिक्षण यावर आधारित असतो.

आपल्या आर्थिक वर्गाचा प्रभाव आपल्या विचारांवर, निवडींवर, पूर्वग्रहांवर, स्वप्न आणि आशा-आकांक्षांवर दिसून येतो. आपण कोणत्या आर्थिक वर्गाचा भाग आहोत याबाबतच्या जाणीवेनुसार आपण वास्तवात जगत असतो. उदाहरणार्थ, आपण सार्वजनिक वाहतूक साधनांनी प्रवास करायचा की स्वतःची गाडी वापरायची, जवळच्या दुकानातून धान्य घ्यायचे की मॉलमधून, शिक्षण कुठे घ्यायचे, लग्न कसे करायचे असे सगळे निर्णय आपण आर्थिक वर्गानुसारच घेतो. भारतामध्ये "उच्च वर्गामध्ये" गणना होणारे लोक खूपच कमी आहेत. बहुतांश लोक मध्यम आणि निम्न वर्गाचा भाग आहेत.

### लिंगभाव आधारित विविधता



लिंगभाव आधारित विविधता

लैंगिक विविधता समजून घेण्यासाठी सर्वप्रथम लिंग (sex) आणि लिंगभाव (gender) यातील फरक समजून घ्यावा लागतो. इयत्ता ११वी च्या समाजशास्त्रातील अभ्यासक्रमातही समाजाच्या वर्ग स्तरीकरणाचा पाया म्हणूनही लिंगभावाचा उल्लेख आलेला दिसतो.

लैंगिक विविधता ही 'लिंगभाव' या संकल्पनेशी (सामाजिक संकल्पना) जोडलेली आपणास दिसून येते. जे दुहेरी लैंगिकता, लैंगिक अभिव्यक्ती, लैंगिकता आणि लैंगिक अभिमुखता याच्याशी निगडित आहे.

लिंगभाव या संकल्पनेमध्ये स्त्री-पुरुष, स्त्रीत्व-पुरुषत्व, ती-तो इत्यादी सीमारेषांपलीकडील लिंगभावाचा समावेश होतो. आज आपल्या लैंगिक विविधतेच्या जाणीवेमध्ये व्यक्तींच्या लैंगिक अभिमुखतेचा देखील अंतर्भाव होतो. याच संदर्भात तुम्हाला 'LGBT' ही आद्याक्षरेही परिचित असतील.

**लेस्बियन** : स्त्री आणि स्त्रीमधील शारीरिक संबंध

**गे** : पुरुष आणि पुरुषांमधील **(समलैंगिकता)** शारीरिक संबंध.

**बाय सेक्शुअल** : जी व्यक्ती कोणत्याही दोन लिंगांशी (उदा., स्त्री आणि पुरुष) आकर्षित असते अशी

**तृतीयपंथी** : एखाद्या व्यक्तीची शारीरिक लैंगिकता आणि मानसिक लैंगिक भावना यांच्याशी सुसंगतता आढळून न येणे.

मुलांचे आणि मुलींचे सुयोग्य वर्तन कसे असावे हे सामाजिक संस्कारांतून, बळजबरीने किंवा सांस्कृतिक व्याख्यांतून ठरवले जाते. यामुळेच दोन समाजांमध्ये फरक जाणवतो. किंवा एखाद्या समाजातील दोन गट देखील वेगवेगळे असतात. यातूनच समाजातील 'बहुसामान्यते'चा (या नियमानुसार लिंगभावातील फरकाचे सामान्यीकरण केले जाते) प्रभाव लक्षात येतो. हा नियम समाजामध्ये आणि समाजातील कुटुंब, लग्न, राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था, धर्म यांसारख्या संस्थांमध्ये लागू होतो. काही व्यक्ती, गट आणि समाजांनी द्वयी (binary) या संकल्पनेलाच आव्हान दिले आहे आणि त्यामुळे लैंगिकता व लिंगभावात्मक बहुलता ही अधिक समावेशक झालेली दिसून येते.

लिंगभाव विविधतेबाबत चर्चा करत असताना, विविधतेला कारणीभूत आणखी एक संज्ञा आपल्याला ठाऊक असणे आवश्यक आहे – लिंगभावाचे प्रकटीकरण. ही संज्ञा लिंगभाव सामाजिकीकरणाशी संबंधित आहे. आपल्या लिंगानुसार असलेल्या लिंगभावसंबंधी अपेक्षा बऱ्याच वेळा आपण बळजबरीने पूर्ण करतो. आज मात्र समाज लिंगभाव तरलता हळूहळू स्वीकारत आहे (म्हणजेच जे द्वय लिंग व्यवस्थेत बसत नाहीत असेही लोक आहेत). लिंगभाव तरलता ही पाश्चिमात्य बाब नाही. हा आपल्या भारतीय परंपरेचाच भाग आहे. द्वय लिंग व्यवस्थेत न बसणाऱ्या भारतीय देवतांचीही उदाहरणे आहेत.

**लैंगिकता** : एखाद्या व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीशी शारीरिक, भावनिक आणि/किंवा लैंगिक संबंध असू शकतो. यावरून व्यक्तीची लैंगिक अभिमुखता ओळखता येते. लैंगिक अभिमुखता हे प्राधान्य किंवा निवड नव्हे.


तुम्ही एलजीबीटी (lesbian, gay, bisexual and transgender) चळवळीबद्दल ऐकले असेल. दिनांक ६ सप्टेंबर २०१८ रोजी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने बहुलैंगिकता हा गुन्हा नाही असा ऐतिहासिक निवडा केला तो तुम्हांला ठाऊक असेल. भारत सरकारने तृतीयपंथीयांना आणि त्यांच्या हक्कांनाही मान्यता दिली आहे.

लिंगभावाधारित भिन्नतेविषयी जागृकता आणि संवेदनशीलतेमुळे : (१) लिंगभावसंबंधी अज्ञान आणि गैरसमजुती दूर करता येतील. (२) विविध लिंगभावसंबंधी अस्मिता असलेल्या लोकांना प्रतिष्ठा मिळवून देता येईल. (३) ज्या व्यक्तीचा लिंगभाव समानुरूप नाही तिच्याबाबत द्वेष, हिंसा, पूर्वग्रह आणि शोषण होणार नाही. (४) भारतीय संविधानात नमूद केल्याप्रमाणे समानता आणि न्यायाला प्रोत्साहन देता येईल.

**कृती ३**

अलीकडे पारित झालेल्या तृतीयपंथी विधेयकाला (Protection of Rights Act, 2019) विरोध होत आहे. या विधेयकाबाबत माहिती मिळवा आणि वर्गात चर्चा करा.

## ३.२ विविधतेत एकता



विविधतेमधील एकता

भारतामध्ये विविध सामाजिक स्थानांतील लोक समाज म्हणून एकत्र राहतात. इथे संघर्ष होत नाहीत असे नाही. विविध परंपरा आणि संस्कृतींचे एकत्रीकरण हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे. यातूनच एकता निर्माण होते. विविध परंपरांच्या या संमिश्रतेला भारतीय संविधानानेही दुजोरा दिला आहे. भारत धर्मनिरपेक्ष समाज आहे असे संविधानाने नमूद केले आहे. काही टप्प्यांवर भारतीय समाजाच्या धर्मनिरपेक्ष स्वरूपाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. असे असले तरी भारतीय समाजाने समावेशकता आणि लवचिकताही दर्शविली आहे.

डी. पी. सिंघल यांच्या 'India and World Civilisations' या पुस्तकात विविधतेतून एकता हे सूत्र भारताच्या संपूर्ण इतिहासात दिसून येते. भारतामध्ये प्रादेशिक, भाषिक, धार्मिक, जातीय या धर्तीवर प्रचंड विविधता आहे. त्यामुळे एकतेचे चित्र मात्र गुंतागुंतीचे होते. तथापि, अशी विविधता असली तरी त्यामध्ये छेदात्मक एकता देखील आहे. राष्ट्र म्हणून पुनःपुन्हा एकजूट होण्यासाठी अशा एकतेचा उपयोग होतो. याचा नेमका अर्थ काय?

भारतामध्ये संपर्कात आलेल्या विविध संस्कृतींना सामावून घेण्यात आले. त्या बरोबरीने भारताची खास भारतीय संस्कृती देखील जपली गेली. या बाबीने अनेक अभ्यासक आश्चर्यचकित झाले आहेत. भारतावर असंख्य आक्रमणे झाली तरी, भूतकाळातील विचारांना आणि गोष्टींना मात्र जतन केले आहे. जवळपास २००० वर्षांपूर्वीपासून भारतामध्ये राजकीय एकता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अशोक, हर्षवर्धन, विक्रमादित्य, अकबर या राजांचे प्रयत्न हे याचे उदाहरण आहे. इतक्या विविधतेखेरीज आज भारताने राजकीय लोकशाही पद्धतीचा स्वीकार केला आहे. यातूनच विविधतेत एकता हे सूत्र अधोरेखित होते. आणखी एक महत्त्वाची बाब अशी की, भारतीयांनी विविधतेकडे कधीही समस्या म्हणून पाहिले नाही. उलट त्याकडे एक अमूल्य ठेवा म्हणून पाहिले.

एकतेमध्ये विविधता आणि बहुलता सामावून घेण्याची क्षमता ही भारताची खरी ताकद आहे. एकत्रीकरण आणि विविधतेची प्रक्रिया समांतर आहे हे सुदृढतेचे लक्षण आहे. हे सर्व साम्यतावादी ऐक्याचे निर्देशक आहेत.

डी. पी. सिंघल यांच्या शब्दांत, "समाजातील एकतेची शक्ती रक्तातील लाल पेशींसारखी आहे. त्याचे प्रमाण एका ठराविक पातळीपेक्षा वाढून किंवा कमी होऊनही चालत नाही. हे संतुलन राखून ठेवण्याचे काम सोपे नाही".

### भारतातील एकतेची प्रक्रिया

भारतात अस्तित्वात असणाऱ्या विविधतांचे उगमस्थान एकतेमध्ये आहे. यामुळे संयुक्त संस्कृती निर्माण झाली आहे. त्याचे स्वरूप अखिल भारतीय आहे.

एकता म्हणजे एकात्मभाव किंवा एकात्मभावाची जाणीव किंवा एकत्रीकरण होय. परंतु, एकता म्हणजे एकसमानता नव्हे. भारतीयांच्या काहीशा एकसमान जीवनपद्धतीचा परिणाम म्हणून निर्माण झालेली एकता अनेक निरीक्षकांनी नोंदवली आहे. विविधतेतील एकता भू-राजकीय क्षेत्रात, तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी, निवासाच्या परंपरेत, परस्परावलंबित्वाच्या परंपरेत, भावनिक एकोप्यामध्ये दिसून येते.

भारतातील धार्मिक विविधता ध्यानात घेता, धर्मनिरपेक्षतेची संकल्पना भारतीय संदर्भात महत्त्वाची ठरते. भारतामध्ये धर्मनिरपेक्षता म्हणजे सर्व धर्मातील लोकांच्या श्रद्धांप्रती आदर आणि सहिष्णूता बाळगणे होय. 'सर्वधर्मसमभाव' या शब्दातून हा अर्थ उत्कृष्ट पद्धतीने उमगतो. भारतात कायमच विविध श्रद्धांच्या व्यवस्था एकत्रित राहिल्या आहेत. यामध्ये कोणतीही धार्मिक ओळख नसलेल्या लोकांचा स्वीकार, विविध

प्रथा अथवा पद्धतींचा स्वीकार अंतर्भूत आहे. म्हणजेच, वैज्ञानिक उपक्रम, मानवतावाद, माणुसकी यांसारख्या धर्मनिरपेक्ष मूल्यांना बांधील असलेल्यांचा समावेश होतो.

**एकतेची आवश्यकता का आहे?**

- सांस्कृतिक वारसा दृढ आणि संपन्न करण्याकरिता.
- भारतीय समाजातील बहुविध विविधतांचे जतन करण्याकरिता.
- सर्व नागरिकांचे मानवी हक्क जपण्याकरिता.
- कामाच्या स्थानी, संघटनेचे किंवा समुदायाचे मनोधैर्य उंचावण्याकरिता.
- परिणामकारक आणि समावेशक संवादाकरिता.
- संघर्ष निवारणाकरिता.
- शांततापूर्ण सहनिवासाकरिता.
- जाती, पंथ, लिंग, लिंगभाव, वर्ण, आर्थिक वर्ग, संस्कृतीच्या अपरोक्ष सर्वांचे कल्याण करण्याकरिता.
- आपली भूमी आणि येथील रहिवाशांच्या समृद्धतेकरिता.

### भौगोलिक एकता

इतर सर्व देशांप्रमाणे भारताच्याही नैसर्गिक सीमा आहेत. उत्तरेकडे हिमालय रांगा आणि दक्षिणेकडे समुद्र या नैसर्गिक सीमा आहेत. भारताच्या विविध भागांतील हवामान वेगवेगळे आहे. मान्सूनचा ऋतू मात्र संपूर्ण भारतात आहे.

**तुम्हांला हे माहीत आहे का?**

मान्सून या शब्दाचे मूळ मौसम या अरबी शब्दात सापडते. त्या प्रदेशातील वेगवेगळ्या राज्यांशी व्यापार करणाऱ्या अरबी व्यापाऱ्यांनी हा शब्द शोधून काढला.

शेती करण्याच्या पद्धतीमध्येही एकप्रकारची समानता आढळून येते. पेरणी आणि कापणी करण्याचा काळ समान असतो. नद्या, खनिजे आणि वने यांसारखी नैसर्गिक संसाधने भारतात सर्वत्र आढळतात. या नैसर्गिक संसाधनांवर समान अधिकार असल्याने सर्व लोकांमध्ये एकतेची भावना निर्माण होते. केरळमधील ओणम, पश्चिम आणि दक्षिण भारतातील मकरसंक्रांत, तामिळनाडूमधील पोंगल, पंजाबमधील बैसाखी, आसाममधील बिहू यांसारखे सण कापणीच्या हंगामाशी संबंधित आहेत.

### धार्मिक एकता

भारतातील विविध धार्मिक गटांमध्ये वरकरणी फरक दिसत असले तरी त्या गटांमधील काही समान मूलघटक शोधून काढणे अवघड नाही. प्रत्येक धर्म आपापल्या धर्म श्रद्धेचा उपदेश करतो. मानवी मूल्यांवर प्रत्येक धर्माची श्रद्धा आहे. परोपकार, पवित्रता, प्रामाणिकपणा, साधेपणा, चांगुलपणा, भूतदया यांसारखी जीवनमूल्ये सर्व धर्मांमध्ये आहेत. भारत हा विविध धार्मिक श्रद्धांचा देश आहे.

देशभरातील श्रद्धास्थानांवरून भारतातील धार्मिक एकता ध्यानात येते. भारत आणि परदेशातील लोक भारतातील हिंदूंच्या धार्मिक स्थळी गर्दी करतात. उत्तरेकडील बद्रीनारायण, पश्चिमेकडील द्वारका, दक्षिणेकडील रामेश्वरम आणि पूर्वेकडील पुरी; शिखांचे अमृतसरमधील सुवर्ण मंदिर, वेलाकन्नी येथील ख्रिश्चन चर्च, कोची किल्ल्यावरील ज्यूंचे उपासना स्थळ, मुस्लीम फकिरांच्या समाधी आणि अजमेर दर्गा अशा भारतातील आणि जगातील स्थळांना पर्यटक भेटी देतात. कुंभमेळा, मदर मेरीची मेजवानी, कुरुक्षेत्र उत्सव, गणपती, दुर्गा पूजा, त्रिसूरपूरम या स्थळांना जगभरातील सर्व श्रद्धांचे अनुयायी दरवर्षी भेटी देतात. व्यक्तींच्या धार्मिक पद्धती, धार्मिक उत्सव आणि सण वेगवेगळे असले तरी त्यातून भारतासारख्या अवाढव्य देशाची धार्मिक एकता प्रकट होते.



त्रिसूरपूरम उत्सव (केरळ)

**सामाजिक एकतेमध्ये धर्माची भूमिका**

एम. एन. श्रीनिवास यांनी सामाजिक एकत्रीकरणामध्ये व्यक्ती आणि समुदायांना जोडणारा एक दुवा म्हणून धर्माच्या भूमिकेचे परीक्षण केले आहे. त्यांनी यासंदर्भात तीन मुद्दे मांडले आहेत: (१) ग्रामीण आणि इतर स्थानिक पातळ्यांवर भिन्न भिन्न जाती आणि धार्मिक गटांमधील नातेसंबंध (२) देशाच्या आर्थिक विकासातील धर्माची सर्वसाधारण भूमिका (३) धार्मिक आणि आर्थिक-सामाजिक लाभ.

विविध समुदायांचे एकमेकांशी आर्थिक आणि धार्मिक कामांमध्ये संबंध आहेत. देशभर पसरलेले विविध समुदाय आणि त्यांच्या बहुविध आर्थिक कार्यांमुळे समाजाच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया अधिक सशक्त केली आहे.

**कृती ४**

लहान गटांमधून वर्गात चर्चा करा. विषय: धर्म हा एक जोडणारा दुवा आणि तोडणारा घटक आहे. चर्चेवर आधारित स्वाध्याय तयार करा.

### राजकीय एकता

भारतीय समाज हा सर्वार्थाने एक बहूल समाज आहे. भारतीय समाजाची एकता आणि बहुविधता हे त्याचे एक मोठे वैशिष्ट्य आहे. आर्थिक आणि सामाजिक असमानतेमुळे भारतीय समाजाला एक समतावादी समाज म्हणून निर्माण होण्यास अडचणी निर्माण झाल्या तरीही भारताची एकता आणि एकात्मता अबाधित राहिली आहे. समाजातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी पंचवार्षिक योजना आणि अनेक योजनांची आखणी करण्यात आली.

भारतीय राज्यघटनेने देशात कायद्याचे राज्य निर्माण केले. सर्व नागरिक कायद्यापुढे समान आहेत. व्यक्तीचा सामाजिक दर्जा धर्म, भाषा, जात, लिंग, प्रदेश अथवा समुदाय यांपैकी कुठल्याही घटकावर अवलंबून नाही. अनुसूचित जाती आणि जमाती, विमुक्त जन जाती, इतर मागास वर्ग, धार्मिक, भाषिक आणि लैंगिक अल्पसंख्याक या गटांच्या विकासासाठी त्यांना विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. वासाहतिक शोषणाची जागा आता विकास प्रक्रिया आणि समतावादी विचारांनी घेतली.

**कृती ५**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, स्त्रीया, दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी शासनाने हाती घेतलेल्या विविध योजनांचा शोध घ्या. वर्गामध्ये माहिती द्या.

### भाषिक एकता

भाषिक एकता म्हणजे देशातील प्रादेशिक अथवा राष्ट्रीय अशा प्रत्येक भाषेला समान मानणे होय. भारत सरकारने भाषिक विविधतेला मान्यता दिली आहे. काही भाषा आणि विलोपनाच्या मार्गावर असलेल्या बोलीभाषांचे जतन करण्यासाठी शासनाने विशेष तरतुदीही केल्या आहेत.

राज्य शिक्षण मंडळाच्या त्रिसूत्रीमुळे केंद्राशी जोडून राहण्यासाठी हिंदी आणि इंग्रजी भाषा, बाह्य जगाशी जोडून घेण्यासाठी इंग्रजी भाषा आणि राज्यांची संपर्क करण्यासाठी प्रादेशिक किंवा स्थानिक भाषा अशी ही त्रिसूत्री आहे. अभिजात भाषा आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या भाषांचाही अभ्यासक्रमात समावेश झाला आहे. विविध शैक्षणिक मंडळांमध्ये विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची भाषा निवडण्याची मुभा आहे (उदा., मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती, कन्नड, इंग्रजी). दूरदर्शन आणि आकाशवाणीवर वेगवेगळ्या भारतीय भाषांमधील कार्यक्रमांचे प्रसारण होते. हे कार्यक्रम करोडो लोकांपर्यंत पोहोचावेत हा त्यामागचा उद्देश असतो. देशातील बहुभाषिक लोकांमध्ये भाषिक एकतेची भावना निर्माण व्हावी यासाठीही पावले उचलण्यात आली.

तथापि, भाषा हे दुधारी शस्त्र आहे: अनेकांसाठी हा अडथळा ठरू शकतो तर काहींसाठी जगाशी जोडणारा दुवा ठरू शकतो.

### तुम्हाला हे माहिती आहे का?

**भाषा त्रिसूत्री**

सन १९६१मध्ये मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत भाषा त्रिसूत्री तयार करण्यात आली. कोठारी समितीने (१९६४-६६) या त्रिसूत्रीचे परीक्षण करून शिफारसी केल्या. या योजनेनुसार शिफारस करण्यात आलेल्या तीन भाषा पुढीलप्रमाणे:

(१) **पहिली भाषा :** प्रादेशिक किंवा मातृभाषा

(२) **दुसरी भाषा :** इंग्रजी किंवा आधुनिक भारतीय भाषा (हिंदी भाषिक राज्यांमध्ये) हिंदी किंवा इंग्रजी (हिंदी भाषिक नसलेली राज्ये)

(३) **तिसरी भाषा :** इंग्रजी किंवा आधुनिक भारतीय भाषा (हिंदी भाषिक राज्यांमध्ये)

हिंदी भाषिक राज्यांमध्ये इंग्रजी किंवा आधुनिक भारतीय भाषा ही दुसरी भाषा म्हणून अभ्यासली जात नाही (गैर-हिंदी भाषिक राज्यांमध्ये).

भारतातील बहुतांश राज्यांमध्ये त्रिसूत्री लागू करण्यात आली आहे. त्रिसूत्रीच्या अर्थपूर्ण अंमलबजावणीसमोरील आव्हाने कायम आहेत.

त्रिसूत्री लागू केली आहेत अशी राज्ये कोणती ते शोधा.

**नोंद :** आज तुम्ही "मातृभाषा" ऐवजी "**गृहभाषा**" ही संज्ञा वापरू शकता. गृह भाषा ही संज्ञा विशेषतः वैवाहिक जोडीदार विविध भाषिक पार्श्वभूमीचे असतील तेव्हा वापरली जाते.

### सांस्कृतिक एकता

प्रथा आणि परंपरांमध्ये फरक असला तरी, भारतीय संस्कृतीतील एकता साहित्य आणि विविध समुदायांच्या वैचारिक व्यष्टीकरणामध्ये दिसते. दिवाळी, ओणम, रक्षाबंधन, ईद, नववर्ष, ख्रिसमस यांसारखे सण देशभर साजरे केले जातात. हे भारतातील सांस्कृतिक एकतेमुळेच शक्य आहे. विविध संत, लेखक आणि कलाकारांनी (उदाहरणार्थ, अरबिंदो, मदर टेरेसा, बाबा आमटे, रवींद्रनाथ टागोर, भीमसेन जोशी, आरा, निझ्झीम इझाकिल) त्यांच्या आजीवन कार्यातून एकतेचा संदेश दिला आहे. याबरोबरच हेतू आणि भावनांच्या अस्मितेची जाणीव निर्माण केली.

सांस्कृतिक एकतेच्या तत्वावर आधारित राष्ट्रगीत किंवा चित्रपटांचे सादरीकरण झालेले तुम्हांला आढळून येईल. या सादरीकरणांमध्ये अभिजात संगीतकार, गायक, लोक कलाकार, कारागीर, कलाकार, क्रीडापटू, नृत्य प्रकार, संरक्षण सेवा, परोपकारी कार्यकर्ते, सुधारक इत्यादींचा सहभाग या सादरीकरणात आहे. अशा सादरीकरणांतून देशाप्रती प्रेम, आस्था आणि अभिमानाची भावना निर्माण होते.

## ३.३ राष्ट्रीय एकतेपुढील आव्हाने

भारतात भाषिक, धार्मिक, प्रादेशिक आणि वांशिक विविधता आहे. यामुळे भारतात विविध सामाजिक गट निर्माण झाले आहेत. असे असून देखील विविधतेत एकतेचे जगावेगळे उदाहरण म्हणून अभ्यासक भारताकडे पाहतात. भारतातील समुदाय, वंश, वर्ग, भाषा आणि उप-संस्कृती यांवर आधारित विविधतेमुळे राष्ट्रीय एकता साध्य करणे आव्हानात्मक ठरते. पुढील घटक राष्ट्राभिमानाच्या आड येणारे आहेत. जातीयवाद, संप्रदायवाद, प्रदेशवाद, भाषावाद आणि आर्थिक विषमता या घटकांवर पुढे चर्चा केली आहे.

### जातीयवाद

जातीयवाद म्हणजे देशाऐवजी जातीप्रती निष्ठा बाळगणे होय. जातीसंबंधांची मुळे घट्ट रोवलेली असल्याने लोक देशाऐवजी जातीच्या संदर्भात प्रथमतः विचार करतात. यामुळे लोकांना समाजसेवा, शिक्षण, वैद्यक आणि कल्याण योजनांच्या माध्यमातून त्यांच्या जातीच्या सदस्यांचे संरक्षण करणे शक्य आहे. यामुळे अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. समाजातील सुसंवाद खंडित होऊ शकतो. अशा जातीय निष्ठेला राजकारणाची जोड मिळाली तर परीस्थिती अधिकच गंभीर होऊन बसते. याचे कारण असे की, राजकारणात जाताना जातीप्रती निष्ठावान असलेले लोक त्यांचा कल आणि पूर्वग्रह सोबत घेऊन जातात. मग वेगवेगळ्या पद्धतींनी त्यांच्या विभागीय हितसंबंधांचे प्रदर्शन होऊ शकते. अशा नेतृत्वाने प्रभावित होऊन लोक त्यांच्या जातीतील उमेदवारालाच मत देतात. जो जातीसमुदाय संख्येने मोठा आहे त्याचा राजकारणातील प्रभाव वाढतो. जे निवडणूक जिंकून येतात ते पुढे या ना त्या प्रकारे

त्यांच्या जातीला अधिक महत्त्व देतात. अशा परिस्थितीत राष्ट्रीय एकतेची समस्या गंभीर रूप धारण करते.

कायदे, शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि शिक्षण असे बदल होऊनही जातीव्यवस्था लोकांच्या मानसिकतेत घर करून आहे. आधुनिक भारतात संसाधने आणि सत्ता संपादनासाठी जातीचा साधन म्हणून वापर केला जातो. जाती आधारित भेदभाव हा राष्ट्रीय एकतेपुढील अडथळा आहे. देशाची एकता कमजोर करण्यासाठी प्रयत्नशील असलेले लोक जाती, पंथ आणि संस्कृतीच्या आधारे देशात फुट पाडण्याचा प्रयत्न करतात. लोकांच्या मनात अविश्वास निर्माण करण्यात त्यांना यश येते. उच्च जातीयांनी दडपशाही केल्यामुळे अनुसूचित जातींच्या मनात परकेपणाची भावना निर्माण होणे हे याचेच उदाहरण आहे. यामुळे देशाची 'ऐक्य भावना' आणि 'एकता' धोक्यात येते.

जातींतील अत्याचार ही वारंवार घडणारी घटना आहे. जातीबाबत पूर्वग्रह या आणखी एका घटकामुळे लोकांचे वर्तन आणि परस्परांशी जुळवून घेण्याची पद्धत आकारीत होते. निवडणुकांच्या वेळी जातीय निष्ठेचे सर्वाधिक तीव्र प्रकटीकरण होते. राजकीय पक्षाचे उमेदवार त्यांच्या जातींतील लोकांची मते मिळवण्यासाठी प्रयत्न करतात.

**जाती आणि आरक्षण** : भारतीय संविधान शिक्षण आणि रोजगार क्षेत्रात संरक्षणात्मक भेदभावाला मान्यता देते. हा संरक्षणात्मक भेदभाव जात आणि अनुसूचित जाती व जमातींच्या सामाजिक-आर्थिक मागासलेपणाशी संबंधित आहे. नंतर इतर मागास वर्गांनाही संरक्षणात्मक भेदभावाचा भाग करून घेण्यात आले. अलीकडेच भारत सरकारने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १०% राखीव जागा जाहीर केल्या. असे आरक्षण शासन-चलित किंवा शासनाचे अर्थसाहाय्य असलेल्या संस्थांपुरते मर्यादित असते. खाजगी क्षेत्राला ते लागू होत नाही. भारत सरकारने अनुसूचित जातींसाठी १५ टक्के, अनुसूचित जमातींसाठी ७.५ टक्के, आणि इतर मागास वर्गांसाठी २७टक्के आरक्षण जाहीर केले आहे. उल्लेखनीय प्रमाण असलेल्या अनुसूचित जातींमध्ये बौद्ध आणि ख्रिश्चन लोकही समाविष्ट आहेत. ते देखील अशा आरक्षणास पात्र आहेत.

### संप्रदायवाद

संप्रदायवाद म्हणजे धर्म आधारित राष्ट्रप्रेम होय. म्हणजेच, राष्ट्रापेक्षा धर्माप्रती आत्यंतिक निष्ठा बाळगणे. इतके धर्म जिथे एकत्र नांदतात असा भारत हा जगातील एकमेव देश आहे. यामुळे आपला सांस्कृतिक वारसा समृद्ध होतो हे खरे असले तरी, यामुळे आपण विभक्त होणार नाही ना याची काळजी घ्यावयास हवी.

सांप्रदायिक संघर्ष राष्ट्रीय प्रतिष्ठेसाठी लांच्छनास्पद बाब आहे. देशाची एकता धोक्यात आणणारी ही बाब स्वागतार्ह नाही. संघर्षाचे कारण कोणतेही असो त्यामुळे दीर्घकालीन नुकसान मात्र देशाचेच होते.

समाजशास्त्राच्या भाषेत बोलायचे झाल्यास, सांप्रदायिक संघर्षामुळे समाजात तीव्र शत्रुत्व निर्माण होते, विविध धार्मिक समुदायातील सदस्यांमध्ये कटुता आणि द्वेष निर्माण होतो. अशा संघर्षामुळे असुरक्षिततेची भावनाही निर्माण होते. त्यामुळे एकात्मतेला धक्का बसतो.

आर्थिकदृष्ट्या बोलायचे झाल्यास, सांप्रदायिक संघर्षामुळे आर्थिक वृद्धी आणि विकासाची गती मंदावते. सांप्रदायिक संघर्षामुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी संसाधने वळवावी लागतात. यामुळे देशाचे गंभीर आर्थिक नुकसान होत असल्याने उत्पादनावरही विपरीत परिणाम होतो.

राजकीयदृष्ट्या बोलायचे झाल्यास, सांप्रदायिक संघर्षामुळे लोकशाही क्षीण होते. अशा संघर्षांमुळे राजकारणी आपापल्या पदाचा किंवा हितसंबंधांचा गैरवापर करतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर सांप्रदायिक दंगलींमुळे भारताच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम होतो. इतर देशांच्या नजरेत भारताची प्रतिमा मलीन होते.

धार्मिक द्वेष हे भारताच्या राष्ट्रीय एकतेसमोरील गंभीर आव्हान आहे. भारताच्या इतिहासात धार्मिक भेदांमुळे होणाऱ्या संघर्षाची असंख्य उदाहरणे सापडतात. प्रत्येक धर्माच्या अनुयायांना केवळ आपलाच धर्म श्रेष्ठ वाटतो; ही समस्या वाढत्या वांशिक केंद्रीततेशी संबंधित आहे. धार्मिक मूलतत्त्ववादाच्या माध्यमातून एखाद्या धर्माच्या श्रद्धा इतरांवर लादल्या जातात. यामुळे संघर्षाची परिस्थिती निर्माण होते.

राजकीय समीकरणांतून एखादा धर्म इतर धर्माच्या

विरुद्ध असल्याचे चित्र निर्माण केले जाते. यामुळे सांप्रदायिक दंगली, परस्परांबाबत अविश्वास आणि विघटनाची परिस्थिती निर्माण होते. देशातील सांप्रदायिक हिंसा आणि फुट पाडणाऱ्या शक्तींच्या वाढीसाठी इतर कारणांसह मोठ्या प्रमाणात निरक्षरता आणि अंधश्रद्धादेखील जबाबदार आहेत.

धार्मिक मूलतत्त्ववादामुळे देशात दहशतवादी कृत्ये घडू शकतात. यामुळे लोकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होते.

## प्रादेशिकतावाद

प्रादेशिकतावाद म्हणजे देशाऐवजी प्रदेशाप्रती असलेली आत्यंतिक निष्ठा होय. प्रादेशिक अस्मिता कायमच राष्ट्रीय एकतेच्या आड येतो. एखाद्या प्रदेशाच्या इतिहासाचे गौरवगान केले जाते. याचा गैरवापर होऊन फुट पाडणाऱ्या शक्ती पेटवल्या जातात. असे करताना समान सांस्कृतिक वारसा दुर्लक्षिला जातो.

समान भाषा बोलणारे लोक समान प्रदेशाची मागणी करतात. अशा मागणीमुळे प्रादेशिकतावाद निर्माण होतो. आपल्याच राहत्या प्रदेशाचा (राज्याचा) आर्थिक विकास व्हावा अशीही तीव्र इच्छा लोकांच्या मनात असते. यामुळे राज्यांतर्गत शत्रुत्व निर्माण होते.

हे राज्यांतर्गत शत्रुत्व केवळ आर्थिक किंवा सामाजिक (उदाहरणार्थ, निधी किंवा कल्याणकारी योजना इत्यादीसाठी) असेल तर त्यामुळे कोणतेही नुकसान होत नाही. मात्र, या शत्रुत्वाला राजकीय रंग आला तर मात्र ते घातक ठरते. राजकीय पक्ष राष्ट्रीय प्रश्नांपेक्षा स्थानिक किंवा प्रादेशिक विषयांमध्ये लक्ष घालताना दिसतात. एखाद्या विभागाप्रती राजकीय पक्षाचे झुकते माप असल्यामुळे प्रादेशिकतावाद अधिक दृढ होतो. आर्थिक किंवा राजकीय प्रश्नांपेक्षा प्रदेशांतर्गत प्रश्न महत्त्वाचे वाटू लागतात. यातूनच राज्याच्या हक्कांसाठी प्रादेशिक चळवळी विभक्त होण्यासाठी निर्माण होतात. लढाऊ विभक्ततावादी चळवळीदेखील निर्माण होतात. उदाहरणार्थ, जम्मू काश्मीरचा प्रश्न, पंजाबची समस्या, आसामचा प्रश्न इत्यादी. अशा प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यास, या समस्या लोकशाहीच्या मुळावर घाव घालणाऱ्या ठरतात.

## भाषावाद

राज्यांची भाषावार निर्मिती आणि राज्यातील भाषिक अल्पसंख्याक यामध्ये भाषावादाचे मूळ सापडते. प्रत्येक राज्यात एक प्रमुख प्रादेशिक भाषा आहे. त्याशिवाय, इतर प्रादेशिक भाषा आणि बोलीभाषा बोलणारेही बरेच लोक आहेत. हे गट भाषिक अल्पसंख्याक म्हणून ओळखले जातात. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात मराठी ही प्रमुख प्रादेशिक भाषा आहे. याखेरीज, इथे अनेक लोक गुजराती, कोंकणी, सिंधी, पंजाबी, तमिळ, कन्नड इत्यादी भाषा बोलतात. याचबरोबर मराठीतही बऱ्याच बोलीभाषा दिसून येतात. आपल्या हिताला बाधा निर्माण होत आहे किंवा आपल्या कल्याणाकडे दुर्लक्ष होत आहे अशी भावना भाषिक अल्पसंख्याकांच्या मनात निर्माण झाल्यास ती देशाच्या एकतेसाठी धोक्याची ठरते.

आज भाषावादाने गंभीर आणि तीव्र रूप धारण केले आहे. यामुळे एक विशिष्ट प्रकारचा भाषिक राष्ट्रवाद निर्माण झाला आहे. ही भारतातील विभक्ततावादासाठी निर्माण झालेली आयती संधीच आहे.

कोणत्याही संघटनेमध्ये संवादाचे माध्यम म्हणून भाषेचे महत्त्व अधोरेखित होते. आपली मते मांडण्यासाठी, भावना व्यक्त करण्यासाठी, संदेश देण्यासाठी आणि ज्ञान निर्मितीसाठी भाषेची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. जेव्हा भाषेवरून लोकांमध्ये संघर्ष निर्माण होतो तेव्हा त्याला भाषावाद असे संबोधले जाते. म्हणजेच, आपल्या भाषेप्रती आत्यंतिक निष्ठा बाळगणे होय. भाषेबद्दल असणाऱ्या आत्यंतिक निष्ठेमुळे राष्ट्रीय एकतेला धोका निर्माण होतो.

भारतातील राज्यांचे भाषावार विभाजन झाले आहे. एखादी भाषा बोलणारे लोक इतरांपेक्षा आपली भाषा वरचढ मानतात. भाषिक संघर्ष आजही कायम आहे. हिंदी ही राष्ट्रभाषा आहे याला आजही देशभरातून मान्यता नाही. भारतातील अनेक ठिकाणी हिंदी भाषा मोठ्या प्रमाणावर बोलली जात नाही – उदाहरणार्थ दक्षिण भारत आणि ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये हिंदी भाषा बोलली जात नाही.

जे लोक प्रादेशिक भाषेव्यतिरिक्त इतर भाषा बोलतात त्यांना घाबरवण्याचे किंवा त्यांच्यात दहशतीचे

वातावरण निर्माण करण्याचे प्रसंग आपणास माहित आहेत. भाषिक अल्पसंख्याकांवर होणारे अत्याचार दुर्लक्षित करून चालणार नाहीत. आदिवासी बोलीभाषांना देण्यात येणारे कमी महत्त्व आणि वेगवेगळ्या भाषा साहित्याचा कमी होत जाणारा अभ्यास ही देखील चिंतेची बाब आहे.

### आर्थिक विषमता

राज्यातील लोकांचा आर्थिक दर्जा विविध घटकांवर अवलंबून असतो. उदाहरणार्थ, संसाधनांची उपलब्धता, व्यवस्थापन आणि नियोजन, जमिनीची सुपीकता, संपत्तीचे वितरण इत्यादी. याबाबत सर्व राज्यांची परिस्थिती समान नसल्याने आर्थिक असंतुलन निर्माण होते. राज्यातील संपत्तीच्या असमान वितरणामुळे ताण आणि संघर्षाची परिस्थिती निर्माण होते. अनेकदा ही संपत्ती थोडक्या लोकांच्या हाती एकवटलेली असते. खाजगी क्षेत्रातून निर्माण होणारा नफा सधन वर्गाच्या हाती एकवटतो आणि सर्वसामान्य त्यापासून वंचित राहतात. अशाप्रकारे, एकाधिकार निर्माण झाल्याने खुल्या स्पर्धेत बाधा येते. समाजातील आर्थिक विषमतेला अनेक घटक कारणीभूत आहेत. हे घटक पुढीलप्रमाणे:

**(१) कौटुंबिक प्रभाव :** आपली निवडप्रक्रिया आणि संधींच्या उपलब्धतेवर आपल्या कुटुंबाचा प्रभाव असतो. उदाहरणार्थ, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील पालकांना आपल्या पाल्यास पोषक आहार देणे शक्य होईलच असे नाही. कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूच्या घटना आपण ऐकल्या असतीलच.

**(२) खाजगी मालमत्ता :** एकीकडे स्थावर मालमत्तेची मालकी नसलेले असंख्य लोक आहेत तर दुसरीकडे, काही थोडक्या लोकांकडे गडगंज संपत्ती आहे. ज्या थोडक्या लोकांकडे साधनांची उपलब्धता आहे ते लोक बहुतांश संपत्तीचा उपभोग घेतात ही वस्तुस्थिती आहे.

**(३) शैक्षणिक तफावत :** एखादी व्यक्ती कोणत्या आर्थिक स्तराचा भाग आहे त्यावर तिची शैक्षणिक कामगिरी अवलंबून असते. तुम्हांला असे प्रश्न पडतात का – 'व्यावसायिक अर्हता कोणते लोक संपादन करू शकतात? खाजगी शालेय शिक्षण कोणास परवडते? परदेशी जाऊन शिक्षण घेणे कोणाला परवडते?'

**(४) संधींची उपलब्धता आणि प्रवेश :** व्यक्ती आणि गटांच्या खरेदी क्षमतेवर उपभोगाची प्रवृत्ती आणि स्वरूप अवलंबून असते. उदाहरणार्थ, अनेक अंगणवाड्या आणि खाजगी आरोग्यकेंद्रांना पायाभूत सोयीसुविधांचा विकास करण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुद पुरेशी नसते. मानसिक रोगांची बळी असलेली किती मुले मानसिक आरोग्य सेवा किंवा समुपदेशनाचा लाभ घेऊ शकतात? किती मुले मानसशास्त्रज्ञांकडे जाऊ शकतात?

**(५) व्यक्तिगत भेद :** आपणा सर्वांची क्षमता आणि कार्यक्षमता भिन्न आहे. हा फरक आपली व्यक्तिगत क्षमता आणि सामाजिक अनुभवांवर अवलंबून असतो. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीच्या अंगी कला, संगीत आणि अभिनयाचे गुण असू शकतात. तथापि, या क्षमता विकसित करण्याची संधी जोपर्यंत उपलब्ध होत नाही तोपर्यंत या गुणांचा समाजहितासाठी विनियोग करता येणार नाही.

**(६) सामाजिक पर्यावरण :** ज्या सामाजिक पर्यावरणात व्यक्तीची वाढ होते त्यावर व्यक्ती आणि समाजाचा विकास अवलंबून असतो (उदाहरणार्थ, कुटुंब, शेजारी, मित्रपरिवार, कामाच्या जागा).

जागतिकीकरणाचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम दिसून येतात. यामुळे, गरीब आणि श्रीमंतांमधील दरी वाढली हा एक नकारात्मक परिणाम होय. उदाहरणार्थ, मोठ्या शहरांत विकसित झालेली मॉल संस्कृती 'आहे रे' वर्गाला अनुकूल असून 'नाही रे' वर्गाला प्रतिकूल आहे. आरोग्यसेवा, विमा, व्यवसाय आणि शिक्षणाचे खाजगीकरण समाजाच्या उच्चभ्रू वर्गास अधिक फायदेशीर ठरत आहे.

आर्थिक विषमता सर्व सामाजिक व्यवस्थांमध्ये दिसून येते. समान नागरिकत्व या तत्वावर उभ्या असलेल्या उदारमतवादी लोकशाही व्यवस्थादेखील याला अपवाद नाहीत तर, मुक्त बाजार व्यवस्थेमध्ये आर्थिक विषमता अपरिहार्य आहे. व्यक्तिगत अथवा गटांच्या वैशिष्ट्यांमुळे लोकांच्या मोबदल्यामध्येही (पैसा, प्रभाव, अधिकार इत्यादी) फरक आहे. जगभरात सर्व समाजांमध्ये अशी परिस्थिती पाहायला मिळते. म्हणून समाजातील

प्रतिष्ठित आणि निम्न दर्जाच्या लोकांना मिळणाऱ्या मोबदल्यामध्ये फरक असतो. अशाप्रकारे, समाजामध्ये असमानता रुजते आणि पिढीदरपिढी ही असमानता झिरपत जाते.

आर्थिक विषमतांची दरी कमी करण्यासाठी कल्याणकारी राज्य आणि कर संरचनेच्या टप्प्यांची पुनर्रचना असे प्रयत्न करण्यात आले. दारिद्र्य निर्मूलनासाठी संपत्ती समाजातील प्रतिष्ठित लोकांकडून गरजुंकडे वळविणे हा उपाय असू शकतो असे मानले गेले. मात्र, हा उपाय कायमच लागू पडेल असे नाही. कारण जे खरे गरजू आहेत त्यांच्यापर्यंत मदत पोहोचेलच याची शाश्वती नसते. अशाप्रकारे, समानता हे कायमच एक मृगजळ राहणार आहे.

तथापि, समानता आणि असमानता या संकल्पनांची आपली समज आता अधिकाधिक विकसित होत आहे. आज स्त्रिया, अल्पसंख्याक आणि वंचित गटांच्या दर्जामध्ये महत्वपूर्ण बदल होत आहेत. या बरोबरीने, पर्यावरणात होणारे बदल गरीब श्रीमंत असा भेद करत नाहीत. उदाहरणार्थ, प्रदूषण, जागतिक तापमानवाढ, दहशतवाद, अस्वच्छता या समस्या मानवनिर्मित असून त्यांच्या निराकरणासाठी सामुदायिक प्रयत्न आवश्यक आहेत. या समस्यांशी भिडताना, कल्याण म्हणजे केवळ ऐहिक उत्कर्ष नव्हे तर, लोकांचे सर्वांगीण कल्याण असा अर्थ घ्यावा लागतो. काही योजनांद्वारे सामाजिक संयोग आणि परस्पर अवलंबित्व या बाबींना प्रोत्साहन द्यावयास हवे. तसेच, समाजाच्या सर्व स्तरांतील लोकांनी हक्क आणि जबाबदारीचे रक्षण करायला हवे.

**प्रगती तपासा**

(१) भारतीय समाजातील दुर्बल घटकांसाठी असलेल्या कोणत्याही दोन घटनात्मक तरतुदी नमूद करा.

(२) भाषेची त्रिसूत्री म्हणजे काय?

(३) राष्ट्रीय एकतेसमोर आव्हान निर्माण करणारे तीन घटक नमूद करा.

**कृती ६**

पुढील मुद्द्यांवर वादविवाद करा.

(१) अल्पसंख्याक गटाचे संरक्षण करणाऱ्या कायद्यांमुळे त्यांना समाजात सामावून घेण्यास मदत होते.

(२) जातिव्यवस्थेचे निर्मूलन व्हावयास हवे.

(३) भारतीय समाजात संरक्षणात्मक भेदभाव आवश्यक आहे.

**कृती ७**

वर्गामध्ये गटाने चर्चा करा : 'राष्ट्रीय एकतेला चालना देणाऱ्या उपाययोजना.'

## सारांश

- भारत ही वैविध्यपूर्ण भूमी आहे. तरीही आपल्याला एकजूट ठेवणारी ऐक्यभावना इथे अस्तित्वात आहे.
- विविधतांचे काही प्रकार आहेत: वांशिक, धार्मिक, भाषिक, प्रादेशिक, जातीय, वर्गीय आणि लिंगभाव आधारित विविधता.
- पुढील घटकांमुळे ऐक्यभावाला खतपाणी मिळते: भौगोलिक घटक, धार्मिक घटक, राजकीय घटक, भाषिक घटक आणि सांस्कृतिक घटक.
- राष्ट्रीय ऐक्यभाव आणि एकात्मतेला आव्हान देणाऱ्या काही शक्ती अस्तित्वात आहेत: ते घटक म्हणजे जातीयवाद, समुदायवाद, प्रादेशिकतावाद, भाषावाद आणि आर्थिक विषमता.
- आपल्या देशातील बहुविध विविधतांची जाण विकसित करणे ही काळाची गरज आहे. शिवाय, राष्ट्रीय ऐक्य आणि भावनिक एकात्मतेच्या दिशेने प्रयत्न करायचे आहेत.

## स्वाध्याय

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

(१) लिंगभाव हा .... असतो.
(अंगभूत, जनुकीय, आत्मसात केलेला).

(२) सामाजिक असमानतेमुळे .... वाढीस लागते.
(एकता, फुटीरता, एकजिनसीपणा)

**(ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व दुरूस्त करून लिहा.**

(१) i) भाषेवर आधारित संघर्ष – भाषावाद
ii) धर्मावर आधारित संघर्ष – दहशतवाद
iii) जातीवर आधारित संघर्ष – जातीयवाद
iv) प्रदेशावर आधारित संघर्ष – प्रदेशवाद

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| निरंकुशतावाद, वर्ग, समानतावाद |
|---|

(१) अर्जित दर्जा

(२) सौहार्दपूर्ण संबंधांचे संवर्धन

**(ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

(१) जातीवर आधारित संघर्षाला संप्रदायवाद म्हणतात.

(२) सर्वधर्मसमभाव भारताची एकतेची संकल्पना दर्शवतो.

**प्रश्न २ टीपा लिहा.**

(१) लिंगभावाधारित विविधता

(२) विविधतेतील एकतेचे महत्त्व

**प्रश्न ३ फरक स्पष्ट करा.**

(१) प्रादेशिकतावाद आणि भाषावाद


(२) जातीयवाद आणि संप्रदायवाद

**प्रश्न ४ खाली दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

(१) भिन्न लैंगिकता

(२) संप्रदायवाद

**प्रश्न ५ (अ) संकल्पनांची आकृती पूर्ण करा.**




**(ब) खालील विधान चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

(१) आर्थिक विषमतेचा समाजावर परिणाम होत नाही.

(२) भारतीय समाजातील दुर्बल घटकांसाठी संविधानिक आणि कायदेशीर तरतुदी या आशादायी ठरतात.

**प्रश्न ६ आपले मत नोंदवा.**

(१) खेळामधील सहभाग राष्ट्रीय एकात्मतेला कशाप्रकारे उपयोगी ठरेल?

(२) एकता मूल्याच्या दृष्टीने शालेय गणवेशाचे महत्त्व काय ?

**प्रश्न ७ पुढील प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा. (कमीत-कमी १५०-२०० शब्द)**

तुमच्या मते एकता म्हणजे काय ? एकतेला बाधक अशा कोणत्याही तीन घटकांची चर्चा करा. एकता वाढविण्यासाठी नागरी आणि आदिवासी लोक एकमेकांना सहकार्य करू शकतील अशा कुठल्याही दोन उपायांचे वर्णन करा. तुमचे मुद्दे सोदाहरण स्पष्ट करा.

**उपक्रम**

संपूर्ण वर्गाने एका संघटनेच्या अथवा क्लबच्या सहकार्याने अभ्यासक्रमांतर्गत उपक्रमाचे आयोजन करावे. हा उपक्रम कर्मचारीवर्ग, पालक-शिक्षक आणि विद्यार्थी अशा सर्वांना खुला असावा.

**उद्दिष्ट :** एकता संवर्धन

**उदाहरणार्थ :** खाद्य महोत्सव, सांस्कृतिक दिन, पोशाख-कल्पना स्पर्धा, काव्यवाचन, नाटिका, समूह नृत्य.

# ४. भारतातील समाज परिवर्तनाच्या प्रक्रिया

४.१ औद्योगिकीकरण
४.२ शहरीकरण
४.३ आधुनिकीकरण
४.४ जागतिकीकरण
४.५ अंकीकृतकरण
४.६ समाज बदलाच्या प्रक्रियेचा परिणाम

## प्रस्तावना

गेल्या वर्षी तुम्ही 'समाज बदल' ही संकल्पना, तिची वैशिष्ट्ये आणि तो बदल घडवून आणणारे घटक या गोष्टी समजून घेतल्यात. लोकसांख्यिकीय, नैसर्गिक, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक घटकांचा प्रभाव सामाजिक बदलासाठी कसा कारणीभूत होतो, हे तुम्हांला आठवत असेल. भूतकाळामध्ये आणि वर्तमानात भारतात 'समाज बदल' घडवून आणण्यास जबाबदार असणाऱ्या प्रक्रियांची चर्चा करत असताना, या घटकांची पार्श्वभूमी आपल्याला ध्यानात घ्यायला हवी.

**कृती १**

कोणतीही चार शहरे निवडून तेथील औद्योगिक वाढीच्या संदर्भात प्रकाशित झालेली माहिती आणि आकडेवारी मिळवा. वर्गामध्ये तुम्हांला मिळालेली माहिती आणि आकडेवारी याचे सादरीकरण करा व त्यावर चर्चा करा.



औद्योगिकीकरण

## ४.१ औद्योगिकीकरण

जेव्हा आपण औद्योगिकीकरणाचा उल्लेख समाज बदलाची एक प्रक्रिया म्हणून करतो तेव्हा १७ व्या आणि १८ व्या शतकात युरोपमध्ये झालेली औद्योगिक क्रांती आठवते. औद्योगिक क्रांतीच्या दरम्यान मोठ्या यंत्रांच्याद्वारे उत्पादन प्रक्रियेत वाढ झाली त्यामुळे एका बाजूस संघ पद्धतीचा ऱ्हास झाला. दुसऱ्या बाजूस कारखान्यांच्या संख्येत वाढ झाली आणि त्यांचा विस्तार झाला. या प्रक्रियेची साखळी युरोपमधून जगातील इतर प्रदेशांमध्ये पोचली.

### औद्योगिकीकरणाची व्याख्या

- ***बी. कुप्पुस्वामी यांच्या मते,*** "औद्योगिकीकरण म्हणजे मोठ्या प्रमाणावर वस्तूंचे उत्पादन, तसेच उत्पादित वस्तूंची वाहतूक वेगवान रीतीने करण्यासाठी आणि संपर्काची पद्धत सुधारण्यासाठी वीज व वाफ यांसारख्या अजैविक शक्तींचा वापर करणे."
- ***फेअरचाईल्ड यांच्या मते,*** "औद्योगिकीकरण ही अशी प्रक्रिया आहे, ज्यात उपयोजित विज्ञानाच्या आधारे तंत्रज्ञानाची प्रगती, त्याद्वारे यांत्रिक शक्तींच्या बळावर मोठ्या प्रमाणावर होणारे वस्तूंचे उत्पादन, यंत्रे आणि वस्तू या दोन्हींसाठी मोठ्या बाजारपेठा या गोष्टींचा समावेश आहे."
- "औद्योगिकीकरण ही एक समाज आणि अर्थव्यवस्था यांमधील बदलाची प्रक्रिया आहे, ज्याद्वारे औद्योगिकीकरणापूर्वीच्या मानवी समाजाचे रूपांतर औद्योगिक समाजामध्ये होते."

### औद्योगीकीकरणाची वैशिष्ट्ये

**(१) औद्योगिक वाढ :** औद्योगिकीकरणाचे हे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. औद्योगिकीकरणामध्ये कारखाने आणि उद्योग यांच्या संख्येमध्ये झपाट्याने वाढ होते. इयत्ता अकरावीमध्ये तुम्ही इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचा सरंजामशाही आणि संघपद्धती यांवर झालेला परिणाम, या गोष्टींबद्दल माहिती घेतली

होती, हे तुम्हांला आठवत असेल. हस्तकौशल्याच्या आधारे वस्तूंचे उत्पादन करणारी घरगुती उत्पादन पद्धती बदलून यांत्रिक उत्पादनाची पद्धत अस्तित्वात येणे ही औद्योगिक क्रांतीची आवश्यकता आहे.

**(२) यांत्रिकीकरण :** उद्योगांमध्ये झालेल्या वाढीमुळे कामाच्या ठिकाणी यंत्रांचा उपयोग अधिकाधिक प्रमाणात होऊ लागला म्हणजेच कामाच्या ठिकाणी यांत्रिकीकरण झाले. यांत्रिकीकरणामध्ये तंत्रज्ञानातील अचूकता आणि उत्पादनातील काटेकोरपणा अभिप्रेत असतो. यामुळे मोठ्या प्रमाणावर झालेल्या उत्पादनामुळे यंत्रांनी बनलेल्या वस्तू या हस्तकलेच्या वस्तूंपेक्षा स्वस्त दरात उपलब्ध होतात. कामगारांची जागा यंत्रांनी घेतली. याचबरोबर यांत्रिकीकरणामुळे कामगारांमध्ये उत्पादनापासून परात्मतेची भावना वाढीस लागली.

**(३) भांडवलकेंद्री उत्पादन :** आजच्या उद्योगक्षेत्रात अधिकाधिक यांत्रिकीकरण आणि स्वयंचलन होत असल्याचे दिसते. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रांमधील प्रगतीमुळे औद्योगिक प्रक्रियांमध्ये बहुतांशी स्वयंचलनाचा वापर केला जातो. मात्र स्वयंचलनाचे प्रमाण भांडवलाच्या उपलब्धतेवर अवलंबून असते.

**(४) श्रमकेंद्री उत्पादन :** पूर्वीच्या उद्योगांमध्ये उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर कुशल आणि अकुशल कामगारांची आवश्यकता असे. कुशल कामगार मिळवण्यासाठी त्यांना कामाच्या ठिकाणी प्रशिक्षण देणे आवश्यक असे. काही काळाने तांत्रिक आणि व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था अस्तित्वात आल्या. उदाहरणार्थ, व्यवस्थापनाचे शिक्षण देणाऱ्या संस्था, अभियांत्रिकी, विज्ञान, संस्थात्मक आणि औद्योगिक मानसशास्त्र यांच्या अभ्यासक्रमांचे पदवी शिक्षण देणारी महाविद्यालये आणि विद्यापीठे इत्यादी.

**(५) श्रमविभाजन :** औद्योगिकीकरणाद्वारे उत्पादन प्रक्रियांमध्ये झालेल्या बदलांमुळे कामगाराने प्राप्त केलेल्या कौशल्याचा प्रकार, त्यासाठी घेतलेल्या प्रशिक्षणाचा स्तर, कौशल्याचे विशेषीकरण आणि कौशल्यपातळी यांचा विचार करून कामाचे वाटप केले जाऊ लागले. त्याचा परिणाम भिन्न भिन्न कौशल्यांसाठी भिन्न भिन्न वेतनश्रेणी निर्माण होण्यात झाला. त्यातून आर्थिक स्तरावर आधारलेले भिन्न वर्ग, कामगार संघटना आणि कामगार चळवळी अस्तित्वात आल्या.

**कृती २**

एखाद्या गावातील किंवा शहरातील अनुभव आणि निरिक्षणे (भौतिक वातावरण, आर्थिक जीवन, प्रथा, खान-पानाचे प्रकार, धार्मिक श्रद्धा इत्यादी) वर्गापुढे सादर करण्यासाठी तुमच्या वर्गातील चार स्वयंसेवक निवडा. सादरीकरणासाठी प्रत्येकाला ५ ते ७ मिनिटांचा अवधी द्या. सादरीकरणासाठी ते संगणकाचा वापर करू शकतील. त्यानंतर वर्गामध्ये केल्या गेलेल्या सादरीकरणांच्या आधारे चर्चा करा.

## ४.२ शहरीकरण



शहरीकरण

छोट्या-मोठ्या शहरांचा उदय आणि विस्तार होत होत त्यांचे रूपांतर महानगरांमध्ये होणे हा औद्योगिक वाढीचा अपरिहार्य परिणाम आहे. आधुनिक शहरीकरण हा औद्योगिकीकरणाचा परिणाम आहे. शहरात उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या आणि नोकरीच्या संधींमुळे खेड्यांकडून शहरांकडे येणाऱ्या लोकांचा ओघ सतत सुरू राहतो. त्यातून शहरीवादाचे (urbanism) वैशिष्ट्यपूर्ण जीवनमान उदयाला येते.

### शहरीकरणाची व्याख्या

*अँडरसन* यांच्या मते, "शहरीकरणाची प्रक्रिया दुतर्फी असते. त्यामध्ये एका बाजूस खेड्यातील लोकांचे शहराकडे होणारे स्थलांतर कारणीभूत असते, तर कृषिजीवनाशी निगडित असणाऱ्या व्यवसायांमधून अर्थाजनासाठी उद्योगधंदे, व्यापार, सेवाक्षेत्र आणि व्यावसायिक क्षेत्रांमध्ये काम करणे, त्यामुळे स्थलांतरितांचा

जीवनविषयक असणारा दृष्टिकोन, श्रद्धाप्रणाली, मूल्ये आणि वर्तनपद्धती यांमध्ये होणारा बदल हा दुसऱ्या बाजूस असतो."

👉 ***थॉमस वॉरेन,*** यांनी सामाजिक शास्त्राच्या ज्ञानकोशामध्ये शहरीकरणाची व्याख्या मांडली आहे. त्यांच्या मते शहरीकरण, "ही मुख्यतः किंवा संपूर्णतः शेतीशी संबंधित असलेल्या लोकांचे निर्वाहासाठी अधिक विस्तारित अशा सरकारी, व्यापारी, उत्पादन किंवा उत्पादनाशी निगडित असलेल्या क्षेत्रांकडे झालेले निर्गमन होय."

👉 ***मार्विन ओल्सेन*** यांच्या मते "शहरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये भौगोलिकदृष्ट्या विखुरलेल्या ग्रामीण भागातून लोकांनी शहरांकडे आकृष्ट होणे आणि शहरी समाजात मिसळून जाणे या गोष्टीचा अंतर्भाव असतो."

### शहरीकरणाची वैशिष्ट्ये

**(१) शहरी केंद्रांकडे होणारे स्थलांतर :** कारखान्यांच्या संख्येत झालेल्या वाढीमुळे खेड्यापाड्यांमध्ये राहणाऱ्या लोकांनी हळूहळू कारखान्यांच्या आसपासच्या भागात स्थलांतर केले. त्यामुळे अशा ठिकाणी राहणाऱ्या कुटुंबांची संख्या वाढत गेली. अशा रीतीने थोड्याच अवधीत कारखान्यांच्या भोवतालच्या जागांमध्ये लोकसंख्या आणि घरांची संख्या यांमध्ये वाढ झाली. आजही देशभरातून कामाच्या शोधात असणाऱ्या स्थलांतरितांचा ओघ शहरांकडे सतत वाहत आहे. अशा रीतीने रोजगाराच्या शोधात असणाऱ्या लोकांची शहरातील लोकसंख्येत सतत भर पडल्यामुळे शहरांमधील लोकसंख्या प्रमाणाबाहेर वाढली. अशा प्रकारे सतत विस्तारणाऱ्या शहरांचे रूपांतर महानगरांमध्ये झाले. उदाहरणार्थ, मुंबई, पुणे, नागपूर इत्यादी.

**(२) औद्योगिक विस्तार आणि प्रवास :** औद्योगिक विस्तार हे आजच्या शहरांचे अनिवार्य वैशिष्ट्य आहे. औद्योगिक विस्तारामुळे झालेल्या स्थलांतरामुळे राहती जागा आणि कामाची जागा यांमधील अंतर वाढत गेले. मोठ्या शहरांमधील लोकांना घर ते कामाचे स्थळ यांमधील प्रवासासाठी दिवसाकाठी तीन ते चार तास घालवावे लागणे, ही नित्याचीच बाब झालेली आहे.

**(३) समाजाची अनेकविधता :** शहरीकरणामुळे अनेकविध प्रकारचे लोक एकत्रित झाले. शहरी समूहांमध्ये लिंगभेद, लैंगिकता, जात, धर्म, वर्ग, भाषा अशा अनेक दृष्टिंनी भिन्नत्व असलेले लोक एकमेकांच्या संपर्कात आले. अशा प्रकारच्या अनेकविधतेने युक्त असलेल्या समूहात मिळून मिसळून राहण्यामुळे आणि तिथे व्यक्तीगत कर्तृत्वाला महत्त्व आल्यामुळे सामाजिक जीवनातील पूर्वापार चालत आलेले अनेक निर्बंध विरत गेले.

**(४) शहरी जीवनशैली :** शहरीकरणाच्या प्रक्रियेचा शहर आणि शहराच्या आसपासच्या भागात राहणाऱ्या लोकांच्या जीवनावर काय परिणाम होतो याचे वर्णन करताना लुईस वर्थ यांनी "शहरीवाद – एक जीवनपद्धती" (urbanism as a way of life) अशा अर्थाच्या शब्दरचनेचा प्रयोग केला होता. या जीवनपद्धतीमध्ये दूरस्थ स्वरूपाचे, दुय्यम नातेसंबंध, त्यामधील हिशोबीपणा, व्यक्तिस्वातंत्र्याला अधिक महत्त्व, भावनेपेक्षा तर्काधिष्ठतेला प्राधान्य, रूढी, परंपरा, कुटुंब, धर्म इत्यादी गोष्टींचा पगडा कमी होणे अशा प्रकारच्या शहरी मानसिकतेवर आधारलेल्या विशिष्ट लक्षणांचा समावेश असतो.

**(५) शहरी प्रशासन :** शहरीकरणामध्ये नागरी नियंत्रण आणि जबाबदाऱ्या यांच्या संबंधातील कारभार परंपरागत पंचायतींऐवजी नगरपालिका किंवा महानगरपालिका या संस्थांकडे असतो. शहरी क्षेत्राचा विकास आणि पुनर्विकास यांचे नियोजन यांची जबाबदारी त्यांच्याकडे असते. शहराच्या सुरक्षाव्यवस्थेच्या नियंत्रणासाठी दुय्यम स्तरावरील कार्यप्रणाली उपयोगात आणल्या जातात. उदाहरणार्थ, वाहतुकीच्या कायद्यांचे पालन व्हावे म्हणून वाहतूक पोलीसांची नियुक्ती आणि रस्त्यांवरील वाहतूक यंत्रणा.

**(६) कौशल्याधिष्ठित श्रमविभागणी :** कौशल्ये, प्रशिक्षण, कौशल्याचे विशेषीकरण आणि अतिविशेषीकरण यांना शहरी वातावरणात खास महत्त्व प्राप्त होते. व्यक्तीची कौशल्ये आणि प्राविण्य यांनुसार श्रमविभागणी होते. उदाहरणार्थ, एखाद्या कारखान्यामध्ये वेगवेगळ्या कामांसाठी वेगवेगळ्या व्यवस्थापकांची नियुक्ती करण्यात येते. जसे की, – उत्पादन, वित्तव्यवस्थापन, विपणन, विक्री विभाग, जाहिरात इत्यादी. याशिवाय या विशिष्ट

विभागांमध्येही ते काम कौशल्ये आणि प्राविण्यावर विभागलेले असते.

## ४.३ आधुनिकीकरण




'आधुनिकीकरण' या संज्ञेचा वापर पहिल्यांदा डॅनियल लर्नर यांनी केला. 'आधुनिकीकरण' ही संकल्पना एखादी व्यक्ती किंवा एखादा गट किंवा एखादा समाज यांच्या संदर्भात लागू केली जाऊ शकते. बऱ्याचदा आधुनिकीकरणाचा विचार आर्थिक बाबतीत करण्याकडे कल दिसतो. परंतु आर्थिक जीवनाच्या संदर्भाबरोबरच आधुनिकीकरणाचा विचार सामाजिक जीवन, तंत्रज्ञान, राजकीय यंत्रणा, संस्कृती, शिक्षण अशा अनेक क्षेत्रांच्या संदर्भातही करावा लागतो. आधुनिकीकरणामुळे मूल्यपद्धती, श्रद्धाप्रणाली आणि वर्तणुकीसंबंधीचे संकेत यांमध्ये बदल घडून आला आहे. आधुनिकीकरणाच्या काही व्याख्या पुढे दिल्या आहेत.

### आधुनिकीकरणाच्या व्याख्या

**डेनियल लर्नर** : "सामाजिक बदल ही जुनीच प्रक्रिया आहे. त्याचीच सद्य संज्ञा म्हणजे आधुनिकीकरण या प्रक्रियेतून कमी विकसित समाज विकसित समाजांची वैशिष्ट्ये स्वीकारतात."

**रूस्टो आणि वॉर्ड** : "आधुनिक विज्ञानाचे मानवी व्यवहारातील उपयोजन म्हणजे आधुनिकीकरण".

**अलातास** : "आधुनिकीकरण ही अशी प्रक्रिया आहे, ज्यामुळे संबंधित समाजात मान्य होईल, अशा पद्धतीने उत्तम आणि समाधानकारक जीवनपद्धती विकसित करण्याचा अंतिम हेतू बाळगून, आधुनिक विज्ञानाचा स्वीकार करणे."

### आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये

**(१) विज्ञाननिष्ठता** : विज्ञाननिष्ठता म्हणजे कोणत्याही गोष्टीचे आकलन आणि स्पष्टीकरण करण्याची वैज्ञानिक पद्धती होय. वैज्ञानिक पद्धतींवर आधारलेल्या शिक्षणाद्वारे आणि कोणत्याही युक्तीवादाचे समर्थन करण्यासाठी प्रात्यक्षिकांच्या आधारे मिळालेल्या पुराव्यावर भर देण्याने विज्ञाननिष्ठता विकसित होते.

**(२) तर्कनिष्ठ दृष्टिकोन** : याचा संबंध तर्कवादाशी आहे. तर्कवाद संकल्पनेत कोणत्याही गोष्टीचे तर्कशुद्ध स्पष्टीकरण देण्याचा दृष्टिकोन आणि क्षमता यांचा समावेश आहे. तर्कनिष्ठ विचारात व्यक्तिगत धारणा आणि पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनाला जागा नसते. तर्कनिष्ठतेमध्ये आध्यात्मिक-धार्मिक मूल्यांवर आधारलेल्या स्पष्टीकरणाकडून इहवाद आणि तर्कवाद यांवर आधारलेल्या स्पष्टीकरणाकडे झुकलेला कल स्पष्टपणे दिसतो.

**(३) तंत्रज्ञानातील सुधारणा** : आधुनिकीकरणाच्या अनेक व्याख्यांमध्ये तंत्रज्ञानाच्या उपयोजनातील प्रगतीवर भर दिलेला दिसतो. पर्यायाने ते औद्योगिक समाजाचे एक मुख्य वैशिष्ट्य समजले जाते. त्यासाठी अचूकता मिळवण्याची तंत्रे, कौशल्यांचे विशेषीकरण आणि अचूकता या गोष्टींची आवश्यकता असते.

**(४) नवीन कल्पनांचे स्वागत करण्याचे स्वातंत्र्य** : समस्यांच्या निराकरणासाठी नवीन कल्पनांचे स्वागत करणे, उपलब्ध पर्यायांची पडताळणी करणे, नवीन मार्ग चोखाळणे, नवनिर्मितीच्या मार्गांचा शोध घेणे अशा गोष्टी स्वेच्छेने स्वीकारणे आवश्यक असते. आधुनिकीकरणाचा अर्थ आधुनिक यंत्रे आणि उपकरणांचा उपयोग करणे इतक्यापुरताच मर्यादित असू शकत नाही.

**(५) चिकित्सक विचारपद्धती** : संबंधित गोष्टीचे बारकावे समजून घेऊन त्यातील बऱ्या-वाईट पैलूंचे परीक्षण करता येणे म्हणजे चिकित्सक विचारपद्धती. ज्या व्यक्ती आधुनिक आहेत असे म्हणता येईल त्यांची रोजच्या घटना, साहित्य, संस्कृती, कला, रूढी, श्रद्धा इत्यादी सर्वच गोष्टींकडे चिकित्सक वृत्तीने पाहून त्यांचे सकारात्मक आणि नकारात्मक पैलू समजून घेण्याची तयारी असते. आत्मपरीक्षण करणे म्हणजे अंतर्मुख होऊन


स्वतःच्या व्यक्तित्वातील बऱ्या-वाईटाचा शोध घेणे. हा गुणसुद्‌धा चिकित्सक वृत्तीचाच एक भाग आहे.

**कृती ३**

वर्गामध्ये २ मिनिटांच्या कालावधीत उत्स्फूर्त भाषण देण्याची स्पर्धा आयोजित करा. स्पर्धेसाठी भाषणाचा विषय असेल : पारंपारिक समाजाअंतर्गत आधुनिकीकरणाची प्रक्रिया एक आव्हान या दृष्टिकोनातून पाहणे.

## ४.४ जागतिकीकरण

डॉ. मनमोहनसिंग भारताचे अर्थमंत्री असताना त्यांनी अंमलात आणलेल्या नवीन आर्थिक धोरणांमुळे, १९९१ मध्ये भारतातील जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. त्यांच्या धोरणांना LPG असे म्हटले गेलेः 'एल' म्हणजे लिबरलायझेशन म्हणजेच 'उदारीकरण'. 'पी' म्हणजे प्रायव्हेटायझेशन म्हणजेच 'खासगीकरण' आणि 'जी' म्हणजे ग्लोबलायझेशन म्हणजेच 'जागतिकीकरण'. या तीन नवीन धोरणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला जणू मोकळे आकाशच मिळाले. भारत हा जिथे खुला व्यापार, परकीय भांडवल आणि स्रोत आकृष्ट करण्यासाठी खुले वातावरण, आणि उद्‌योग सुरु करण्याची सुलभता या सोयी उपलब्ध आहेत, अशा अर्थव्यवस्थेच्या व्यापक जागतिक व्यापारी विश्वाचा भाग झाला. सुरुवातीला या नव्या आर्थिक धोरणाचा उपहास केला गेला, त्यावर टीका झाली. जागतिकीकरणाचे सकारात्मक आणि नकारात्मक असे दोन्ही परिणाम आहेत. आपण जागतिकीकरणाचे स्वरूप समजावून घेऊया.



**जागतिकीकरण**

### जागतिकीकरणाच्या व्याख्या

***मार्टिन आलब्रो आणि एलिझाबेथ किंग :*** "ज्यामुळे जगातील लोक एकाच वैश्विक समाजाचे सदस्य बनतात अशा सर्व प्रक्रियांचा संदर्भ जागतिकीकरणाशी जोडलेला आहे."

***ॲन्थनी गिडेन्स :*** "ज्यामुळे दूरवरच्या प्रदेशांशी असलेले नाते अशा पद्‌धतीने जोडले जाते, की अनेक मैल दूर असलेल्या प्रदेशात घडणाऱ्या घटनांचे पडसाद स्थानिक घटनांवर होतात आणि त्याच न्यायाने स्थानिक घटनांचा परिणाम जागतिक पातळीवरील घटनांवर होतो ती प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण."

***रोलंड रॉबर्टसन :*** "जागतिकीकरण म्हणजे, जग अधिकाधिक जवळ येणे आणि आपण सर्व एकच आहोत (समग्रतेची) अशी तीव्रतेने जाणीव होणे होय."

### जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये

**(१) तत्त्वांची उदारता :** जागतिकीकरण ही बदलाची एक प्रक्रिया म्हणून त्याकडे पाहिले तर 'हस्तक्षेप न करणे' (laissez faire) हे तत्त्व जागतिकीकरणाचा अविभाज्य हिस्सा आहे. अर्थव्यवस्थेच्या संदर्भात ती खासगी उद्‌योजकांसाठी खुली असण्याशी जागतिकीकरणाचा संबंध आहे. याला उदारीकरणाची प्रक्रिया म्हणतात. या प्रक्रियेने जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील लोकांना एकत्र आणले.

अनिर्बंध (Laissez-faire) : ही संज्ञा मुळतः फ्रेंच संज्ञा आहे. ज्याचा अर्थ, "करू द्या" (Let do) असा होतो. अर्थशास्त्राच्या संदर्भात पाहिले असता या संज्ञेचा अर्थ व्यापार स्वातंत्र्य आणि स्पर्धा स्वातंत्र्य असा होतो. ही अशी तत्त्वप्रणाली आहे जी अर्थविश्वातील सरकारी हस्तक्षेपास विरोध करते किंवा अमान्य करते.

**(२) खासगी उद्‌योग :** खासगीकरणाची प्रक्रिया ही जागतिकीकरणाशी निकट असलेली प्रक्रिया आहे. खासगीकरणाद्‌वारे पूर्वी सरकारी नियंत्रणाखाली असलेली आरोग्यसेवा, विमा, आकाशवाणी, दूरदर्शन, शिक्षण यांसारखी सेवा-उद्‌योग क्षेत्रे खासगी उद्‌योजकांसाठी खुली करण्यात आली.

**(३) नफा मिळवणे :** नफा मिळवणे हे खासगीकरणामागील प्रमुख उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट आहे. जागतिकीकरणामुळे प्रत्येक क्षेत्रातील स्पर्धा तीव्र स्वरूपाची झाली. होतकरू व्यक्तिंसाठी अधिक संधी आणि पर्याय यांच्या उपलब्धतेत वाढ झाली. त्याचा फायदा घेत अनेक सेवा पुरवठादारांनी प्रमाणाबाहेर नफा मिळवला. उदाहरणार्थ, व्यापारी तत्त्वावर काम करणाऱ्या अनेक खासगी शिक्षणसंस्था.

**(४) बाजारीकरण :** जागतिकीकरणामुळे औद्योगिक उत्पादन वाढले. त्याचा परिणाम बाजारीकरणास मोठ्या प्रमाणावर चालना मिळण्यात झाला. उदाहरणार्थ, तुम्ही एखाद्या भव्य बाजारसदृश्य दुकानात गेलात तर तुम्हांला विविध प्रकारच्या उत्पादनांच्या रांगाच रांगा लावलेल्या दिसतील. या भव्य बाजारांमध्ये ग्राहकांना निवडीसाठी अनेक पर्याय उपलब्ध करून दिले. त्यामुळे चंगळवाद वाढला आणि एक समाज म्हणून आपण अधिक भौतिकवादी झालो, हे निश्चित.

**(५) परस्परावलंबित्व :** 'जागतिक अर्थव्यवस्था' या संज्ञेचा परिचय तुम्हांला झालेला आहे. जागतिक अर्थव्यवस्थेचा आपल्यावर काय परिणाम झाला आहे? आपण सर्व परस्परावलंबी आणि परावलंबी झालो आहोत. आपल्यासमोर अशा अनेक उत्पादनांची उदाहरणे आहेत ज्यातील सुटे भाग एके ठिकाणी उत्पादित केले जातात तर, त्यांची जुळणी मात्र खूप दूरवर असणाऱ्या ठिकाणी केली जाते.

**(६) ज्ञानाचे सामायिकीकरण :** विविध स्रोतांचा सामायिक उपयोग हे जागतिकीकरणाचे वैशिष्ट्य आहे. त्यामध्ये उत्पादन प्रक्रियेच्या तांत्रिक ज्ञानाच्या (know-how) आदान-प्रदानाचे सुलभीकरण संगणकीय प्रणालींमुळे झाले आणि या आदान-प्रदानातील भौगोलिक, राजकीय सीमांचा अडसर दूर झाला. 'बाह्यस्रोतांचा वापर' (outsourcing) ही संकल्पना आपल्याला परिचित आहे. सीमापार देशांमध्ये असलेल्या प्रशिक्षित लोकांना त्यांच्याजवळच्या विशिष्ट कौशल्यांच्या आधारे दुसऱ्या देशातील लोकांना स्थलांतर न करता सेवा देणे आणि अर्थार्जन करणे, यांच्या संधी प्राप्त करून घेण्याचा मार्ग म्हणजे बाह्यस्रोतांचा वापर करणे हा होय. उदाहरणार्थ, अमेरिका, इंग्लंड, कॅनडा यांसारख्या देशांमधील कंपन्यांसाठी काम करणारी भारतातील बीपीओ (Business Processing Outsourceing) आहेत.

**कृती ४**

लोकांच्या आयुष्याबद्दल माहिती मिळवण्याची एक पद्धती पुढे सांगितली आहे. त्याला 'निवेदनात्मक संशोधन पद्धती' असे म्हणतात. त्यामध्ये लोकांच्या जीवनकहाण्यांच्या आधारे माहिती गोळा केली जाते.

तुमच्या वर्गातील काही स्वयंसेवक निवडा. जवळच्या एक ते दोन दुकानांना भेट देऊन तेथील दुकानदारांना त्यांच्या व्यवसायासंदर्भात त्यांच्याशी संवाद साधा. संबंधित व्यवसायाची सुरुवात केव्हा झाली? ती कोणी केली? त्यांच्या विक्रीत काही बदल झाले का? त्यांच्या ग्राहकांच्या वर्तणुकीत काही बदल झाले का? विक्रेत्यांना काही समस्या आहेत का? असले तर ते कोणते आहेत? अशा प्रकारचे प्रश्न विचारा.

या संवादातून पुढे आलेल्या माहितीच्या आधारे २०० ते ३०० शब्दांमध्ये त्यांच्या जीवनकहाण्या लिहा आणि त्या वर्गामध्ये वाचून दाखवा. सर्वांच्या कथनामध्ये एक विशिष्ट स्वरूप दिसते का ते पहा.

## ४.५ अंकीकृतकरण




अंकीकृत रूपांतर

अंकीकृत प्रणालींचा वापर म्हणजे विविध स्रोतांमधून एकत्रित केलेल्या माहितीचा उपयोग भिन्न भिन्न उद्दिष्टांसाठी करता यावा म्हणून त्या माहितीचे संगणकीय प्रणालींमध्ये रूपांतर करणे. त्यासाठी त्या

माहितीचे संगणकीय अंकीकरण करावे लागते. त्यामुळे अपेक्षित "कामगिरीमध्ये मूलगामी सुधारणा होऊन उद्योगधंद्यांचा परिघ विस्तारतो". 'अंकीकृत रूपांतर' (digital transformation) ही संज्ञा प्रथम 'कॅपजेमिनी' ही फ्रेंच कंपनी आणि 'सेंटर फॉर डिजिटल बिझिनेस ऑफ मॅसॅच्यसूट्स इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (MIT) ही अमेरिकन कंपनी यांनी प्रचारात आणली. अंकीकृत रूपांतरामध्ये उद्योगधंद्यांतील प्रक्रिया, कार्यप्रणाली आणि ग्राहकांशी असलेले नाते जपण्यासाठी प्रस्थापित केलेल्या प्रणालींचे नूतनीकरण करणे या कार्याचा समावेश आहे.

### अंकीकृतकरणाची व्याख्या

👉 "अंकीकृतकरण म्हणजे, एकीकृत केलेल्या संगणकीय तंत्रज्ञानाचा दैनंदिन व्यवहारातील वापर आणि ज्या गोष्टींचे अंकीकरण करणे शक्य आहे अशा सर्व गोष्टींचे अंकीकरण करणे."

👉 ***ब्रेनेन आणि क्राइस*** : "अंकीकृतकरण ही अशी प्रक्रिया आहे, ज्यामध्ये अंकीकरणाच्या आधारे प्रस्थापित केलेल्या संपर्क प्रणाली आणि माध्यमांचे जाळे यांच्या परिघात राहून समाजजीवनातील अनेक कार्यक्षेत्रांची पुनर्रचना केली जाते."

👉 ***गार्टनर*** : "अंकीकृतकरण म्हणजे उद्योगधंद्याच्या आकृतिबंधामध्ये प्रागतिक बदल घडवून आणणे आणि त्यायोगे उत्पन्न आणि मूल्य यांना वर्धित करणे, यांसाठी अंकीकरणाच्या तंत्रज्ञानाचा उपयोग करणे".

### अंकीकृतकरणाची वैशिष्ट्ये

**(१) संगणकीकरण :** दैनंदिन जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संगणकाच्या उपयोगाचा प्रसार झाला आहे. पूर्वी प्रत्यक्ष श्रमांच्या आधारे ज्या प्रक्रिया पूर्ण केल्या जायच्या किंवा ज्या प्रक्रिया क्लिष्ट होत्या, त्या आता केवळ संगणक प्रणाली, माहिती तंत्रज्ञान आणि संगणकशास्त्र यांच्या मदतीने सहजसुलभ झाल्या आहेत. त्यामुळे संगणकीकरणाच्या प्रक्रियेला मदत होते. पर्यायाने अनेक क्षेत्रांतर्गत प्रक्रियांचे अंकीकरण झाले आहे. उदाहरणार्थ, शिक्षण, बँकिंग, महसूल, करसंकलन, विपणन यांसारखी क्षेत्रे.

**(२) सातत्याने बदल होणे :** अंकीकृतकरणामुळे उद्योगधंद्यांच्या आकृतिबंधांमध्ये सातत्याने बदल होतात कारण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सतत बदल घडून त्याचा विकास होत असतो. तुम्ही उत्पादन, वस्तुनिर्माण, शल्यचिकित्सा, यंत्रमानव, डिझाइनिंग अशा विविध क्षेत्रात केल्या जाणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबद्दल काही ऐकले आहे का?

**(३) वेग आणि अचूकता :** अंकीकृतकरणामुळे प्रक्रियांची गती आणि अचूकतेचे प्रमाण यांचा वेग लक्षणीयरीत्या वाढतो. उदाहरणार्थ, नवीन माहिती शोधणे (data mining), माहितीच्या उपयोजनांच्या प्रक्रिया, माहितीचे विश्लेषण, माहितीचे व्यवस्थापन या सर्व प्रक्रियांमागे असलेल्या तंत्रज्ञानामुळे वेग, अचूकतेचे प्रमाण वाढते, त्यामुळे शासकीय व्यवस्था, औषधोपचार, व्यापार, बँकिंग, विमा, गृहनिर्माण, शेअरबाजार, संपर्क आणि दळणवळण यांसारख्या अनेक क्षेत्रांतील कार्यक्षमता वाढते.

**(४) तंत्रज्ञानकेंद्रित प्रक्रिया :** अंकीकरण आणि संगणक प्रणालींचे दैनंदिन जीवनातील उपयोजन हे तंत्रज्ञान, नावीन्य, संशोधन आणि प्रगती यांवर आधारलेले असते, हे आता वेगळेपणाने सांगायला नको. १९८० च्या दशकात ३८६ मायक्रोप्रोसेसर किंवा ४८६ मायक्रोप्रोसेसर वापरणारे तंत्रज्ञान विकसित होत होत आपण आता मायक्रोप्रोसेसच्या पाचव्या पिढीपर्यंत पोचलेलो आहोत. भ्रमणध्वनी क्षेत्रातही आपण आता 5G कडे जात आहोत.

**(५) निर्मितीशीलतेला चालना :** त्वरित माहिती मिळवण्याची गरज, समस्यांवरील त्वरित उपाय शोधणे या गोष्टींमुळे मानवी बुद्धिला नवीन शोध लावणे, नावीन्याची निर्मिती करणे, स्वामित्व हक्क (patent) मिळवणे यांसाठी प्रोत्साहन मिळते. उदाहरणार्थ, एकविसाव्या शतकात शिक्षणक्षेत्रात तंत्रज्ञानाचा संपूर्ण अंतर्भाव करण्याच्या दिशेने पावले उचलली जात आहेत. वैमानिकाने खरोखरीचे विमान उडवण्याचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात करण्यापूर्वी त्यांना कॉकपिटचा अनुभव मिळावा म्हणून कॉकपिटच्या जमिनीवरील प्रतिकृती/अनुकृती (simulato) च्या आधारे प्रशिक्षण दिले जाते. कॉकपिटची प्रतिकृती/अनुकृती तयार करणाऱ्याची बुद्धी अत्यंत निर्मितीशील असली पाहिजे.

**(६) ग्राहकांना महत्त्व :** अंकीकृत रूपांतराचा अंतिम लाभार्थी ग्राहक असतो. त्याच्यासाठी अंकीकृत रूपांतरातील विविध प्रक्रियांना उपयुक्तता मूल्य आहे. उदाहरणार्थ, उत्पन्नावरील कर भरणे किंवा भरलेल्या करावरील परतीसाठी अर्ज भरणे, महानगरपालिकेतून जन्ममृत्यू इत्यादींचे दाखले मिळवणे, ऑनलाईन प्रवेश मिळणे, निवडणुकांचे निकाल जाहीर होणे यांसारखी अनेक कामे अंकीकृत रूपांतरामुळे सहजतेने करून घेणे शक्य झाले. काही दशकांपूर्वीपर्यंत या सर्वांसाठी उपयोगात असणाऱ्या प्रक्रिया आता पूर्णपणे बदलल्या.

**कृती ५**

तुमच्या परिसरात वास्तव्यास असणाऱ्या उच्च माध्यमिक स्तरावर अध्यापन करणारे शिक्षक शोधून त्यांना भेटा. त्यांच्याकडून १. ते कोणता विषय शिकवतात, २. त्यांची शैक्षणिक पात्रता, ३. त्यांचा शिकवण्याचा अनुभव किती वर्षांचा आहे, ४. त्यांच्या शाळेत/महाविद्यालयात संगणक आहेत काय, ५. असल्यास शिक्षक संगणकांचा वापर करतात का, ६. वापरत असतील तर कशासाठी या गोष्टींची माहिती घ्या. तुम्हांला मिळालेल्या माहितीचा वृत्तांत तयार करून तो वर्गामध्ये सादर करा.

## ४.६ समाज बदलाच्या प्रक्रियेचा भारतीय समाजावरील परिणाम

आतापर्यंत औद्योगिकीकरण, शहरीकरण, आधुनिकीकरण, जागतिकीकरण आणि अंकीकृत रूपांतर या प्रक्रियांची माहिती आपण घेतली. वर उल्लेख केलेल्या प्रक्रियांपैकी पहिल्या तीन प्रक्रिया ब्रिटिश काळात प्रत्यक्षात येण्यास सुरुवात झाली होती, परंतु शेवटच्या दोन प्रक्रियांची सुरुवात अलीकडच्या काळात झाली. त्यामुळे या प्रक्रियांचा प्रसार देशामध्ये सर्वत्र सारख्या प्रमाणात झालेला नाही. या प्रक्रियांचे काही पैलू समजून घेऊया.

**(१) औद्योगिकीकरणाचा परिणाम :** औद्योगिक वाढीमुळे कारखान्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली. त्यामुळे कारखान्याच्या आसपासच्या परिसरात येणाऱ्या स्थलांतरितांच्या संख्येत भर पडत गेली, शहरांचा विस्तार झाला आणि थोड्याच अवधीत तिथे महानगरे उभी राहिली. त्यातून एकत्र कुटुंबांची विभागणी झाली आणि कुटुंबांचे आकार लहान झाले. विभक्त कुटुंबांमध्ये एकत्र कुटुंबाचे फायदे मिळत नाहीत. त्याचप्रमाणे आकाराने मोठे असलेल्या एकत्र कुटुंबाचे तोटेही छोट्या कुटुंबाला सहन करावे लागत नाहीत.

**(२) नागरीकरणाचा परिणाम :** लोकांच्या वर्तणुकीवरील रूढी, परंपरा, धर्म यांचा पगडा कमी झाला. शहरी वातावरण आणि जीवनपद्धती ही अधिक भौतिकतावादी, पुरोगामी, व्यावहारिक, व्यक्तिवादी आणि अभिसंगत असते. शहरीकरणामुळे 'गर्दीतही एकटा' अशी स्थिती असते. शहरी जीवनातील आव्हानांचे स्वरूप हे खेड्यापाड्यांमधील रहिवाशांच्या जीवनापेक्षा खूप भिन्न असते.

**(३) आधुनिकीकरणाचा परिणाम :** शिक्षणामुळे कालबाह्य कल्पना, समज आणि अंधश्रद्धा यांचा प्रभाव कमी होऊन वैज्ञानिक विचारसरणीचा विकास होण्याचा मार्ग मोकळा झाला. परंपरा विरुद्ध आधुनिकता हा वाद अजूनही मिटलेला नाही.

**(४) जागतिकीकरणाचा परिणाम :** १९९१ नंतरच्या भारतात जागतिक अर्थव्यवस्थेच्या भारतीय समाजावर झालेल्या परिणामांमुळे अनेक बदल झाले. भारत हा आता जागतिक अर्थव्यवस्थेचा एक अविभाज्य भाग आहे. जागतिकीकरणामुळे देशादेशांमध्ये ज्ञान, तंत्रज्ञानात्मक तज्ज्ञता, तांत्रिक उत्पादनाच्या प्रक्रियांचे ज्ञान, मानवी संसाधन यांचे आदान-प्रदान सुरू झाले. जागतिकीकरणाच्या सकारात्मक आणि नकारात्मक परिणामांनी आपल्याला वेढले आहे.

**कृती ६**

"जागतिकीकरणाचा भारतावर सकारात्मक प्रभाव पडला". चार चार जणांचे दोन गट तयार करून या विषयावर चर्चा करा. चर्चा सुरू असताना निष्पन्न झालेले मुद्दे शिक्षक फळ्यावर सारांशरूपाने लिहितील. त्यानंतर वर्गातील इतर विद्यार्थ्यांनी केलेल्या निरीक्षणाच्या आधारे खुली चर्चा घेता येईल.

**(५) अंकीकृतकरणाचा परिणाम :** वर्तमान काळ हा संगणकीकरण आणि अंकीकृत रूपांतराचा आहे. दोन्ही प्रक्रियांच्या आधारे घडून आलेल्या बदलांचे भारतीय समाजावर दूरगामी परिणाम झाले. हे बदल ज्ञानाची उपलब्धता, कृत्रिम बुद्धीचा विकास, ई-शासकीय व्यवस्था, ई-व्यापार, ई-शिक्षण, ई-विपणन, ई-शॉपिंग इत्यादी क्षेत्रात दिसतात. ही यादी न संपणारी आहे. एका साध्या पद्धतीच्या आधारे केवळ एक कळ दाबली की उपभोक्त्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध होतात. अंकीकृतकरणामुळे नवीन माहिती मिळवणे, माहितीचे व्यवस्थापन करणे या गोष्टी सुलभ झाल्या हे खरे असले तरी त्यामधून अनेक आव्हानेही पुढे आली. त्यांमध्ये मोठ्या उद्योगांचा छोट्या उद्योगांवर झालेला विपरित परिणाम, विपणनक्षेत्रावर झालेला परिणाम, ग्राहकांची वर्तणूक, शैक्षणिक आणि नोकरीच्या संधी, उत्तरदायित्वाची वाढलेली जबाबदारी आणि त्याचे परिणाम, आभासी जगात व्यक्तिच्या खासगी जीवनाला निर्माण झालेला धोका अशा अनेक आव्हानांचा समावेश आहे.

अंकीकृत रूपांतरणाच्या प्रक्रियेमुळे सामाजिक नेटवर्किंग (संपर्काचे जाळे) मध्ये वाढ होताना दिसून येत आहे.

## सारांश

- भारतीय समाजात अनेक बदल घडलेले आहेत. समाजशास्त्रज्ञांनी या बदलांचा अभ्यास करून त्यांच्या स्पष्टीकरणासाठी त्यामागील संकल्पनांचा वेध घेतला आहे.
- औद्योगिकीकरण ही एक प्रक्रिया आहे ज्यायोगे मानवी श्रमांची जागा यंत्रे आणि यांत्रिकी प्रक्रिया घेतात. त्यामुळे उत्पादनाचे प्रमाण वाढवणे शक्य होते.
- शहरीकरण म्हणजे ग्रामीण भागातून लोकांचे शहरांकडे स्थलांतर होण्याची प्रक्रिया होय. लुईस वर्थ याकडे 'शहरीकरण एक जीवनपद्धती' या दृष्टिकोनातून पाहतात.
- आधुनिकीकरण ही एक प्रक्रिया आहे. ज्याची बैठक शास्त्रीय आणि तर्कसंगत विचारसरणी यांवर आधारलेली असते.
- जागतिकीकरण ही मूलतः आर्थिक प्रक्रिया आहे ज्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेसाठी अनेक देशांमधील बाजारपेठा खुल्या झाल्या.
- अंकीकरणाची प्रक्रिया ही मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांवरील संगणकीय प्रणालींच्या प्रभावाची निर्दशक आहे.
- या सर्व प्रक्रियांचे कुटुंब, धर्म, परंपरा, प्रथा, जीवनपद्धती, व्यवसाय, लिंगभावाबद्दल असलेला दृष्टिकोन, आर्थिक विषमतेवर आधारित वर्गांचा उदय इत्यादी अनेक पैलूंवर दूरगामी परिणाम होतात.

## स्वाध्याय

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

(१) कामांच्या पद्धती सुरळीत बनवण्यासाठी संगणकीय प्रणालींचा उपयोग करण्यास .... म्हणतात.
(औद्योगिकीकरण, जागतिकीकरण, अंकीकृत रूपांतर).

(२) शहरी जीवनशैलीचे .... हे वैशिष्ट्य आहे.
(एकरूपता, एकजीव, व्यक्तिनिरपेक्षता)

**(ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व दुरूस्त करून लिहा.**

(१) i) स्पर्धात्मक बाजारपेठ – संगणकीकरण
ii) शहरांची वाढ – शहरीकरण
iii) उत्पादनात वाढ – औद्योगिकीकरण

iv) तंत्रज्ञानाचा संपूर्ण रूपांतरासाठी केलेला उपयोग - अंकीकृत रूपांतर

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| |
|---|
| **शहरीकरण, औद्योगिकीकरण, अंकीकृत रूपांतर** |

(१) FYJC च्या प्रवेशांसाठी महानगरांमधील संगणकीय प्रणालींद्वारे होणाऱ्या प्रक्रिया

(२) उत्पादन प्रक्रियेतील यांत्रिकीकरण

**(ड) अधोरेखित शब्द बदलून वाक्य पूर्ण करा.**

(१) औद्योगिक क्रांती <u>सोळाव्या</u> शतकात घडून आली.

(२) LPG धोरण श्रीमती <u>इंदिरा गांधी</u> यांनी अंमलात आणले.

**प्रश्न २ टीपा लिहा.**

(१) अंकीकृत रूपांतराचे नकारात्मक परिणाम

(२) औद्योगिकीकरणाचे परिणाम

**प्रश्न ३ फरक स्पष्ट करा.**

(१) औद्योगिकीकरण आणि शहरीकरण


(२) आधुनिकीकरण आणि जागतिकीकरण

**प्रश्न ४ खाली दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

(१) बाजारीकरण

(२) शहरीकरण

**प्रश्न ५ (अ) संकल्पनांची आकृती पूर्ण करा.**




**(ब) खालील विधान चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

(१) एखाद्या व्यक्तीची वेशभूषेची पद्धत त्याच्या आधुनिकतेची उंची ठरवते.

(२) शहरीकरणाचे आपल्या सामाजिक संबंधावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात.

**प्रश्न ६ आपले मत नोंदवा.**

(१) शगुफ्ता रानावत आणि तिचे एकत्र कुटुंब नागपूर शहरामध्ये तीन पिढ्यांपासून राहत आहेत. त्यांची नातवंडे कायमस्वरूपी आपल्या आजी-आजोबांच्या गावामध्ये राहण्यास तयार नाहीत. त्यांच्या या दृष्टिकोनामागील दोन संभाव्य कारणे द्या.

(२) काही लोकांना अंकीकृत रूपांतराच्या प्रक्रियेमुळे असुरक्षित वाटते, उदाहरणार्थ, आंतरजालाच्या मदतीने केलेले बँकिंगचे व्यवहार किंवा खरेदी, यामागे कोणती कारणे असावीत, असे तुम्हांला वाटते?

**प्रश्न ७ पुढील प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा. (कमीत-कमी १५०-२०० शब्द)**

'जागतिक आंतरजाल हा माहितीचा आणि चुकीच्या माहितीचाही स्रोत आहे.' या विधानाची आंतरजालाच्या प्रभावासंबंधी पुढे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चर्चा करा.

(i) पालक

(ii) मुले

(iii) शाळा

**उपक्रम**

वर्गामध्ये समाज बदलाची एक प्रक्रिया शिकून झाल्यानंतर तिच्या सकारात्मक आणि नकारात्मक परिणामांची वर्गात चर्चा करा. असे प्रत्येक प्रक्रियेच्या बाबतीत करा. समाज बदलाच्या प्रत्येक प्रक्रियेचा एखादा फ्लो चार्ट किंवा संकल्पना चित्र तयार करा.

# ५. भारतातील सामाजिक चळवळी

५.१ सामाजिक चळवळींचा अर्थ आणि स्वरूप
५.२ भारतातील स्त्री-चळवळ
५.३ भारतातील कामगार चळवळ
५.४ भारतातील शेतकरी चळवळ
५.५ भारतातील पर्यावरण चळवळ

## ५.१ सामाजिक चळवळीचा अर्थ आणि स्वरूप

**अर्थ आणि व्याख्या :** 'सामाजिक चळवळ' ही संज्ञा सर्वप्रथम लॉरेन्झ वॉन स्टीन या जर्मन समाजशास्त्रज्ञाने वापरली. १८५० मध्ये त्यांच्या 'हिस्ट्री ऑफ दी फ्रेंच सोशल मूव्हमेंट फ्रॉम १७८९ टू द प्रेझेंट' या पुस्तकात या संज्ञेचा संदर्भ मिळतो. ही संज्ञा एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात युरोपमध्ये लोकप्रिय झाली. सामाजिक चळवळीची विशिष्ट अशी एक व्याख्या करता येत नाही. विभिन्न समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक चळवळीतील वेगवेगळ्या घटकांना वेगवेगळ्या संदर्भाने अधोरेखित केले आहे.

**(१) टर्नर आणि किलियन :** समाजात किंवा त्यातील एखाद्या समुदायामधील बदलाला चालना देण्यासाठी किंवा प्रतिकार करण्यासाठी त्याच समाजातील सातत्यपूर्ण कार्यरत सामूहिक घटक.

**(२) हर्बर्ट ब्लूमर :** सामाजिक नवनिर्मितीसाठी कार्यरत सामूहिक गट.

**(३) सिडनी टॅरो :** सत्ता, अधिकार तसेच प्रस्थापित सांस्कृतिक संकेतांना सामायिक हेतूने व सामूहिक पातळीवरील पूर्ण ऐक्यासह आव्हान देण्यासाठी समाजातील अभिजन, विरोधक व पदाधिकाऱ्यांमधील सातत्यपूर्ण संवाद.

### सामाजिक चळवळींची वैशिष्ट्ये

सामाजिक चळवळींचे स्वरूप, वैशिष्ट्ये, गती आणि कार्यप्रणाली विभिन्न असते. सामाजिक चळवळींची पुढील काही महत्त्वपूर्ण गुणवैशिष्ट्ये म्हणता येतील.

**(१) मूलतः सामूहिक स्वरूप :** सामाजिक चळवळ ही एक व्यक्तिविशिष्ट कृती नसून यात सामूहिक कृती समाविष्ट असते. सामाजिक चळवळीत संपूर्ण समूह सहभागी असावा लागतो.

**(२) नियोजित आणि हेतूपुरस्सर कृती :** सामाजिक चळवळी प्रभावीपणे अंमलात येण्यासाठी पूर्वनियोजित असणे आवश्यक आहे. चळवळ ही उत्स्फूर्त नसून तिला एखादा विशिष्ट हेतू असतो.

**(३) विचारप्रणाली आणि उद्दिष्टे :** सामाजिक चळवळीला विचारसरणीचे पाठबळ असते. विचारसरणी चळवळीचे उद्दिष्ट सफल करण्यासाठी मार्गदर्शन करते. उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठीचा तो एक संच असतो.

**(४) सामाजिक बदल :** सामाजिक चळवळींचा उद्देश बदल घडवून आणणे हा असतो. चळवळ सामान्यतः प्रस्थापित अधिक्रमात बदल करण्याची मागणी करते किंवा सत्ताधिकाऱ्याने सुरू केलेल्या बदलास प्रतिरोध करते.

### सामाजिक चळवळींचे प्रकार

निषेध, आंदोलने, बंडखोरी, प्रतिकार आणि अगदी दंगलीसुद्धा सामूहिक निदर्शनात्मक कृती आहेत. तथापि, या सामाजिक चळवळींपेक्षा भिन्न आहेत.

वेगवेगळ्या निकषांचा वापर करून सामाजिक चळवळींचे वेगवेगळ्या प्रकारे वर्गीकरण केले जाऊ शकते. ही भिन्न वर्गीकरणे व्याप्ती, उद्दिष्टे आणि प्रचलनावर आधारित आहेत.

(अ) सांस्कृतिक मानववंशशास्त्रज्ञ डेव्हिड ॲबरले यांनी परिवर्तनाचे लक्ष्यगट आणि व्याप्ती या दोन निकषांवर आधारित चार प्रकारच्या सामाजिक चळवळी सांगितल्या आहेत. त्या म्हणजे – पर्यायी सामाजिक चळवळी, सुधारात्मक सामाजिक चळवळी, मुक्तिदायी सामाजिक चळवळी आणि क्रांतिकारक सामाजिक चळवळी.

(ब) हर्बर्ट ब्लूमर याने सामाजिक चळवळींचे सर्वसाधारण सामाजिक चळवळी, विशिष्ट सामाजिक चळवळी आणि अभिव्यक्तीत्मक सामाजिक चळवळी अशा तीन प्रमुख श्रेणींमध्ये वर्गीकरण केले आहे.

**भारतातील सामाजिक सुधारणा चळवळ :**

सामाजिक सुधारणांचे सातत्य हे भारतीय इतिहासामध्ये पूर्वीपासून चालत आले असले तरी संघटित सामाजिक चळवळी या मात्र एकोणिसाव्या शतकापासून आहेत. या चळवळींचे नेतृत्व विशेषकरून समाजातील बुद्धिजीवी वर्गाने केले. जसे, राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी. इ.

या चळवळींमुळे विविध सामाजिक सुधारणांना चालना मिळाली. या चळवळींमध्ये धर्म, जात, स्त्रीयांचे सबलीकरण, अस्पृश्यता, गरीबांचे शोषण, शेतकऱ्यांचे प्रश्न यांसारख्या विविध विषयांचा अंतर्भाव होता. या समाजसुधारकांच्या महत्त्वाच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेऊ.

- **राजा राममोहन रॉय** यांनी १८२८ मध्ये ब्राम्हो समाजाद्वारे धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणा केल्या. त्यांनी सती प्रथेविरूद्ध आवाज उठवला. त्याची परिणती म्हणून १८२९ साली सती प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला.

- **स्वामी दयानंद सरस्वती** यांनी आर्य समाजाद्वारे (१८७५) जातिव्यवस्था, मूर्तीपूजा आणि अंधश्रद्धा या प्रथा नाकारल्या. त्यांनी महिलांची प्रगती व निरक्षरता निर्मूलन यासाठी काम केले.

- **महात्मा ज्योतिबा फुले** यांनी १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. स्त्रियांचे प्रश्न जसे, शिक्षण, विधवा पुनर्विवाह, बालविवाह प्रतिबंधन यासाठी काम केले. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी त्यांच्याबरोबर स्त्री मुक्तीसाठी काम केले.

- **राजर्षी शाहू महाराज,** कोल्हापूरचे छत्रपती (१८७४-१९२२) हे सामाजिक कार्याला वाहून घेतलेले प्रगतिशील समाजसुधारक होते. त्यांनी जाती व्यवस्थेला कडवा विरोध करून अस्पृश्यता निर्मूलनासाठी अविरत काम केले.

- **महर्षि कर्वे** यांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. १९०७ साली त्यांनी महिला विद्यालय तसेच १९१६ मध्ये त्यांनी कर्वे महिला विद्यापीठाची (आताचे एस.एन.डी.टी) स्थापना केली.

- **डॉ.बी.आर. आंबेडकर** हे कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ आणि सुधारक म्हणून ओळखले जातात. त्यांनी वंचित गटांच्या भेदभावाविरूद्ध लढा दिला. त्यांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या घोषणेने लाखो लोकांना प्रेरित केले. त्यांनी १९२८ साली 'डिप्रेस्ड क्लासेस् एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना केली.

- **महात्मा गांधी** हे वकील, राजकीय नेते व समाजसुधारक होते. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी अहिंसा या तत्वाचा यशस्वीपणे प्रसार केला. त्यांनी दारिद्र्य निर्मूलन, स्त्री हक्क आणि धार्मिक सहिष्णुता यांसाठी देशव्यापी लढा दिला. त्यांना राष्ट्रपिता म्हणून संबोधले जाते आणि त्यांना प्रेमाने बापू म्हणतात.

## सामाजिक चळवळींची कारणे

सामाजिक चळवळींचा उदय विविध कारणांमुळे होऊ शकतो. समाज सतत वृद्धिंगत होत असतो हे लक्षात घेता सामाजिक चळवळींच्या उदयासाठी खालील प्रकारच्या परिस्थिती जबाबदार असू शकतात.

**(१) सांस्कृतिक दरी :** सांस्कृतिक दरी म्हणजे समाजातील मूल्ये, संकल्पना आणि अपेक्षांमध्ये होणारे वेगवान बदल. जे अपेक्षित आहे आणि जे स्वीकृत आहे त्यामधील अंतर जेव्हा मर्यादेपेक्षा अधिक रुंदावते, तेव्हा परिणामी संघर्षाची परिस्थिती निर्माण होऊन त्याची परिणती सामाजिक चळवळीत होऊ शकते.

**(२) सामाजिक विघटन :** औद्योगिकीकरण, शहरीकरण यांसारख्या बदलांच्या वेगवेगळ्या प्रक्रियांमुळे समाजात असमान व असंतुलित वाढ होऊ शकते. पूर्वप्रस्थापित निकषांशी नवीन मानकांचा संघर्ष होऊ शकतो. एकाच वेळी समाजात जुन्या तसेच नव्या मानकांच्या अस्तित्वामुळे संभ्रमाची भावना निर्माण होऊ शकते.

**(३) संवेदित सामाजिक अन्याय :** जेव्हा लोकांच्या एखाद्या समुदायात अधिकाऱ्यांनी/सत्ताधाऱ्यांनी घेतलेल्या काही निर्णयांबद्‌दल असमाधान आणि असंतोष असतो त्यावेळी सामूहिक नाराजी व्यक्त होऊन लोकांमध्ये सामाजिक अन्यायाची भावना निर्माण होते. त्याची परिणती सामाजिक चळवळीमध्ये होते.

**(४) नियमनव्यवस्थेतील ताठरता :** योग्य अनुशासनासाठी सुयोग्य असे मानदंड व नियमने समाज सुनिश्चित करत असतो. सामाजिक आचरण पद्‌धती समाजातील नियमन व्यवस्थेशी जुळणे आवश्यक असते. तथापि काही परिस्थितीत नियमनांची लवचीकता कमी होऊन सर्वसामान्यांच्या अपेक्षांशी जुळत नाही.

**कृती १**

लघु गट चर्चा : पाच ते सात विद्यार्थ्यांचा एक असे गट करावे. आपण आपले गाव, नगर किंवा परिसरातील विविध प्रकारचे सामाजिक अन्याय अधोरेखित करून त्यांची यादी तयार करा. अन्याय दूर करण्यासाठी कार्य करणाऱ्या तसेच अन्यायाबद्‌दल जागरूकता निर्माण करणाऱ्या विविध संस्थांची नावे शोधा. (उदा., दिव्यांग किंवा स्थलांतरितांच्या समस्या)

### सामाजिक चळवळी आणि सामाजिक परिवर्तन

सामाजिक चळवळी आणि सामाजिक परिवर्तन यांचा परस्परसंबंध आहे. अशा अर्थी आहे की, प्रत्येक सामाजिक चळवळीचे लक्ष्य सामाजिक बदल घडवून आणणे असे असते आणि या बदलाला सामाजिक चळवळीचा हातभार लागतो, तथापि याचा अर्थ असा होत नाही की प्रत्येक सामाजिक परिवर्तन ही सामाजिक चळवळीची परिणती असते. दोन्ही प्रक्रियांचा घनिष्ठ संबंध असला तरी सामाजिक चळवळ आणि सामाजिक परिवर्तन यांच्यात फरक करणे महत्त्वाचे आहे. प्रथम म्हणजे सामाजिक चळवळीचे स्वतःचे एक जीवनचक्र असते. ती उदयास येते, निर्देशित कारणासाठी कार्य करते आणि लयास (ऱ्हास) जाते. सामाजिक परिवर्तनात असे अनुक्रमण नसते. दुसरे म्हणजे, सामाजिक चळवळ ही एक सुसंघटित आणि जाणीवपूर्वक नियोजित केलेली क्रिया आहे, तर सामाजिक परिवर्तन ही समाजातील अंतर्गत प्रक्रिया आहे. बऱ्याचदा परिवर्तन हा सहेतूक अथवा जाणीवपूर्वक केलेला संघर्ष असत नाही. तिसरे म्हणजे, सामाजिक चळवळी सर्व समाजात आढळत असल्या तरी, समाजात सर्व कालखंडात चळवळी घडून येतात असे नाही. मात्र सामाजिक परिवर्तन हे सार्वत्रिक आणि अपरिहार्य आहे.

## ५.२ भारतातील स्त्री-चळवळी

भारतातील सामाजिक चळवळींच्या विस्तृत स्वरूपाच्या संदर्भात स्त्री चळवळीचे महत्त्व आजही टिकून आहे. व्याप्ती आणि विस्तार लक्षात घेता ही चळवळ दीर्घकालीन आहे आणि जगभर तिचा प्रभाव आहे. पुढील टप्प्यांच्या मदतीने स्त्री-चळवळींचा अभ्यास केला जाऊ शकतो.




स्त्री-चळवळ

**(१) सामाजिक सुधारणांचा परिणाम :** महिला चळवळीची सुरुवात साधारणपणे १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात झाली, जेव्हा स्त्रियांच्या छोट्या गटांनी आणि काही पुरोगामी पुरुषांनी भारतातील स्त्रियांच्या असमान स्थितीचा मुद्दा अधोरेखित केला. तत्कालीन स्त्री-चळवळ अनेक प्रकारे समाजसुधारणेच्या चळवळीच्या अनुषंगाने गेली. ब्राह्मो समाज आणि आर्य समाज यांनी **महिला मंडळे** तयार केली. ज्यामुळे स्त्रियांना विचारांची देवाणघेवाण करून प्रगती करण्यास व्यासपीठ मिळाले. राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, न्या. महादेव गोविंद रानडे, बेहरामजी मलबारी या समाजसुधारकांनी भेदभाव करणाऱ्या प्रथा व रुढींना आव्हान दिले. सुधारकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे ब्रिटिश सरकारने या

प्रकरणात हस्तक्षेप केला. द प्रिव्हेन्शन ऑफ सती ॲक्ट (१८२९), विधवा पुनर्विवाह कायदा (१८५६), स्त्री-भ्रूणहत्या (निवारण) कायदा (१८७०), द एज ऑफ कन्सेण्ट ॲट मॅरेज ॲक्ट (१८९१) सारखे कायदे सरकारने केले.

भारतीय स्त्रियांना पुरुषांच्या समान पातळीवर आणण्याच्या हेतूने शिक्षित करण्यासाठी जागरूक प्रयत्न केले गेले. जन्माने आयरिश स्त्री-वादी सामाजिक कार्यकर्त्या मार्गारेट कजिन यांनी मद्रासमध्ये (आताची चेन्नई) **इंडियन वुमन असोसिएशनची** स्थापना करून भारतीय स्त्री-संघटनेची मुहूर्तमेढ रोवली. भारतातील हा पहिला स्त्री-वादी गट होता आणि म्हणूनच ही भारतीय परिप्रेक्ष्यात महत्वाची घडामोड म्हणून पाहिली जाते. त्यांनी पुण्यामध्ये एक परिषद आयोजित केली ज्यामध्ये विविध गटांतील प्रतिनिधींनी महिलांच्या शिक्षणाविषयीच्या आपापल्या कल्पना मांडल्या. या परिषदेत भारतातील महिलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याविषयी कल्पनांना व मुद्द्यांना मूर्त स्वरूप देण्यात आले. १९२६ साली **अखिल भारतीय महिला कॉन्फरन्सची** स्थापना झाली. भारतीय स्त्री-चळवळीच्या सर्वसाधारण उद्देश व तत्त्वांवर ब्रिटिशांचा असलेला प्रभाव नाकारता येणार नाही. विचार आणि दृष्टिकोनातील उदारमतवादामुळे महिलांना स्वतःला शिक्षित करण्यास उद्युक्त केले गेले. जरी बहुतेक महिला लाभार्थी या उच्च जातीच्या किंवा उच्चभ्रू पार्श्वभूमीच्या होत्या तरी ब्रिटिश कालखंडात मानव कल्याणकारी उद्देशाने या चळवळीला पाठबळ मिळाले. त्या कालखंडात भारतीय महिलांना त्यांच्या आत्मप्रतिष्ठा व आत्मभानाची जाणीव झाली.

**(२) राष्ट्रीय चळवळीचा परिणाम :** राष्ट्रीय चळवळीत महिलांचा सहभाग वाढला. महात्मा गांधींच्या तत्त्वांचा चळवळीतल्या स्त्रियांच्या विचारांवर आणि सहभागावर परिणाम होऊ लागला. स्वातंत्र्याच्या लढ्यात महिलांच्या वाढत्या सहभागाने त्यांना त्यांच्या हक्काबद्दल जागरूक केले. स्वातंत्र्यलढ्यातील आंदोलनात महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. जेव्हा पुरुष स्वातंत्र्यसैनिकांना तुरुंगात टाकले गेले; तेव्हा स्त्री-स्वातंत्र्यसैनिकांनी कठीण आणि आव्हानात्मक परिस्थिती हाताळल्या. यासंदर्भात कस्तुरबा गांधी, विजयालक्ष्मी पंडित, ॲनी बेझंट आणि सरोजिनी नायडू या महिला नेत्यांचा उल्लेख आवश्यक आहे. ॲनी बेझंट यांनी प्रसिद्ध होमरूल चळवळीचे नेतृत्व केले, ज्यामध्ये महिलांनी भाग घेतला. सरोजिनी नायडू यांनी महिलांच्या मताधिकारांसाठी काम केले आणि कायदेभंग चळवळीत काँग्रेस पक्षाचे नेतृत्व केले. याशिवाय मुथुलक्ष्मी रेड्डी, राजकुमारी अमृत कौर, सरला देवी, सुचेता कृपलानी, अरुणा असफ अली यांनी अहिंसा चळवळीत भाग घेतला. १९४२ मध्ये पारित झालेल्या 'भारत छोडो' ठरावामध्ये महिलांना 'भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील शिस्तबद्ध सैनिक' म्हणून संबोधित केले गेले.

**(३) स्वातंत्र्योत्तर कालखंड :** स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या चळवळीची तीव्रता कमी होत गेली कारण राजकीय स्वातंत्र्याने महिलांच्या चळवळीचे मूळ लक्ष्य आणि हेतू झाकोळले गेले. भारतीय राज्यघटनेत भारतीय पुरुष आणि स्त्रियांना समानता आणि न्याय बहाल करणारी अनेक कलमे समाविष्ट केली गेली. आदिवासींचा असंतोष, आर्थिक पेचप्रसंग, विद्यार्थ्यांचे आंदोलन यांसारख्या अनेक मुद्द्यांवर सामूहिक संघर्ष आणि निदर्शने झाली. यामुळेच स्त्री-चळवळीच्या मूळ उद्देशाकडे दुर्लक्ष झाले.

१९७५ ते १९८५ हे दशक **आंतरराष्ट्रीय महिला दशक** म्हणून जाहीर करण्यात आले आणि संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले. भारतातील महिलांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी समितीची स्थापना केली गेली. समितीने आपला अहवाल सन १९७४ मध्ये प्रकाशित केला. **'टूवर्डस इक्वालिटी'** (समानतेच्या दिशेने) या अहवालात महिला दखलपात्र नसल्याचे, पुरुषप्रधानतेचे आणि महिलांवरील हिंसाचाराचे मुद्दे मांडण्यात आले. स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजातील महिलांविरुद्धचे भेदभाव आणि शोषण अधोरेखित केल्यामुळे हा अहवाल महत्त्वाचा गणला जातो. या अहवालाने स्त्रियांच्या समस्यांशी संबंधित अनेक मुद्द्यांचे सर्वेक्षण व आढावा यशस्वीपणे घेतला. स्त्रियांशी संबंधित अनेक समस्या व मुद्दे अस्पर्शितच असल्याची वस्तुस्थिती या अहवालाने मांडली.

स्त्री-चळवळीच्या या टप्प्यात महिलांवरील हिंसा, लैंगिक साचेबद्ध प्रतिमा तसेच, महिला समानतेसाठीच्या वैधानिक मागण्यांवर अधिक लक्ष केंद्रित केले गेले. १९८० च्या दरम्यान महिलांच्या संघटना मुंबई, पुणे आणि दिल्लीमध्ये सक्रिय झाल्या. बायजा, द फेमिनिस्ट नेटवर्क, मानुषी यांसारखी नियतकालिके स्त्रियांचे प्रश्न पुढे आणण्यासाठी प्रकाशित केली गेली. आंतरराष्ट्रीय महिलांच्या दशकाच्या शेवटी, १९८५ मध्ये चळवळीचा केंद्रबिंदू बदलत गेला. महिलांच्या आधुनिक चळवळीचा मार्ग ठरविण्यात ही प्रकरणे निर्णायक ठरली - मथुरा बलात्कार प्रकरण (१९७२), रूप कंवर सती प्रकरण (१९८७), निर्भया बलात्कार प्रकरण (२०१२). तसेच हुंडा मृत्यू, छेडछाड आणि घरगुती हिंसा यांसारख्या महिलांवरील गुन्हेगारीच्या वाढत्या घटना चळवळीचे संदर्भबिंदू होत्या. अलिकडील काळामध्ये, दलित स्त्रीवादी चळवळ उदयास आलेली दिसते. ज्याचा उद्देश या विशिष्ट गटाच्या समस्यांशी निगडित आहे.

**(४) महिला सबलीकीकरणाकडे वाटचाल :** भारताच्या ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये झिरपत या चळवळीने वेग घेतला आहे. लाभार्थी ते सहभागी अशा वेगवेगळ्या रूपात चळवळीशी संलग्न महिला कार्यरत आहेत. महिला सबलीकरणाच्या मोहिमेमध्ये पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ, डॉक्टर्स आणि उद्योजक अशा विविध व्यवसायांतील महिला उत्साहाने सामील झाल्या आहेत.

स्त्री-चळवळ ही अनेकार्थाने समाजाभिमुख आणि बहुपेडी चळवळ म्हणता येईल. या चळवळीची उत्क्रांती आणि व्याप्तीचे वर्णन केवळ कालक्रमानुसार किंवा विचारधारेनुसार किंवा भौगोलिक परिस्थितीच्या एकल मापदंडांने करता येणार नाही. ही चळवळ अनेक टप्प्यांतून गेली आहे. चळवळीच्या मूलभूत उद्दिष्टांचा सारांश तीन महत्त्वाच्या मुद्द्यांमध्ये दिला जाऊ शकतो. - समान हक्कांसाठी संघर्ष, भेदभावाच्या प्रथा नष्ट करणे, स्त्रियांना सबल व सक्षम बनवणे. या चळवळीत महिला, पुरोगामी पुरुष, स्वयंसेवी संस्था आणि सरकार यांचा सकारात्मक सहभाग आहे. ही चळवळ वेगवेगळ्या दृष्टीकोनाद्वारे आणि बदलत्या प्रतिमानाद्वारे जोरदारपणे कार्यरत आहे.

**हे माहिती आहे का?**

विशाखा मार्गदर्शिकेमध्ये स्त्रियांच्या कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषणाच्या समस्येसंबंधी मार्गदर्शन केले आहे. ही मार्गदर्शिका भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने प्रथम १९९७ मध्ये त्यानंतर २०१३ मध्ये सुधारणा करून बनवली आहे. या कायदेशीर तरतुदीमुळे स्त्रियांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि निरोगी वातावरणाची हमी दिली आहे.

**कृती २**

आपल्या परिसरातील महिलांचे गट / स्वयंसेवी संस्था (उदा., अंगणवाडी महिला शिक्षक, समलिंगी महिला, दलित महिलांचे गट, मुस्लिम महिला संघटना) यांची माहिती घ्या. त्यांच्या कार्याबद्दल जाणून घेऊन त्यांच्या संस्थेस भेट द्या. आपण त्यांच्या सदस्यांची किंवा स्वयंसेवकांची मुलाखत घेऊन त्यांच्या कार्याचे स्वरूप, त्यांचा लोकाभिमुख कार्यक्रम, त्यांना येणाऱ्या अडचणी याबद्दल माहिती घेऊन आपले निष्कर्ष वर्गात सादर करून त्यावर चर्चा करा.

## ५.३ भारतातील कामगार चळवळ

भारतातील कामगार चळवळ समजून घेण्यासाठी योग्य प्रारंभिक बिंदू म्हणजे भारतातील औद्योगिकीकरणाची प्रक्रिया. कारखानदारी आणि आधुनिक उद्योगधंद्यांमुळे भारतीय समाजाची वैशिष्ट्ये आणि स्वरूप बदलले. यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेचा कायापालट झाला आणि नवीन उत्पादन यंत्रणेच्या अनुषंगाने श्रमविभाजनाची पद्धत बदलली. भांडवलदार (कारखाना मालक) आणि कामगार असे दोन वर्ग उदयास आले.

आधुनिक उद्योग हे नफ्याच्या तत्त्वावर कार्य करत असल्यामुळे कामगारांकडून वाढीव काम करून घेणे, कमीत कमी पगार देणे, कामकाजाचे तास वाढवणे, पदोन्नतीस उशीर करणे, रोजगारात कपात करणे, कामाच्या ठिकाणावरील सुविधांचा अभाव असे प्रकार

अस्तित्वात येऊ लागले. या परिस्थितीमुळे कामगारांनी एकत्र येऊन भारतातील व्यवस्थेचा निषेध करण्यास सुरुवात केली.

औद्योगिक कामगार वर्गाची चळवळ मुख्यत्वे चार टप्प्यांत विभागली जाऊ शकते : –




**कामगार चळवळ**

**(१) पहिला टप्पा : कामगार चळवळीचा उदय (१८५० ते १९१८ चा कालावधी) :** पहिला टप्पा प्राथमिक स्वरूपाचा होता. पूर्वनियोजन आणि पूर्वसंघटन न करता कामगारांच्या गटांनी केलेला निषेध स्वयंस्फूर्त असला तरी स्वतंत्र घटनांपुरता मर्यादित होता.

मार्च, १८७५ मध्ये शापूरजी बेंगाली यांनी कामगारांच्या असमाधानकारक परिस्थितीविरुद्ध बंड केले. त्यांच्या प्रयत्नांचा परिणाम म्हणून १८८१ मध्ये पहिला कारखाना कायदा लागू झाला. नारायण मेघाजी लोखंडे यांचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. देशातील पहिली कामगार संघटना 'बॉम्बे मिल हँडस् असोसिएशन' ही २३ सप्टेंबर १८८४ रोजी लोखंड्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाली. त्यांनी कामगारांच्या मागण्या व समस्या समजून घेण्यासाठी मुंबई प्रांतामध्ये गिरणी कामगारांची परिषद आयोजित केली आणि कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी ठराव संमत केले. नारायण मेघाजी लोखंडे यांना *भारतीय कामगार चळवळीचे जनक* मानले जाते.

दुसऱ्या टप्प्यात कामगारांना भेडसावणाऱ्या अडचणी व समस्यांबद्दल जाणीवपूर्वक आकलन केले गेले. कामगार संघटनांची स्थापना ही या टप्प्यातील महत्त्वाची उपलब्धी होती. अनेक समाजधुरिणांनी कामगारांमधील असंतोषाची जाणीवपूर्वक दखल घेतली आणि परिस्थितीवर उपाय म्हणून कल्याणकारी उपाययोजना अमलात आणण्याचा प्रयत्न केला. अनेक विद्वानांच्या मतानुसार ही कामगारांची चळवळ म्हणून असण्याऐवजी कामगारांसाठीची चळवळ म्हणून दृगोचर झाली. तसेच ही चळवळ सौम्य स्वरूपाची होती.

**(२) दुसरा टप्पा : दबाव गटांचा उदय (१९१८ ते १९४७ पर्यंतचा कालावधी) :** पहिल्या महायुद्धानंतर अर्थव्यवस्था व उद्योगात अनेक बदल घडून आले. वस्तूंच्या किमती व नफा वाढला परंतु कामगारांच्या रोजगाराची आणि कामाची परिस्थिती सुधारली नाही. यामुळे कामगारांमध्ये असंतोष व अशांतता निर्माण झाली. संप हे कामगारांच्या हातातील एक प्रमुख अस्त्र असते. कामगारांच्या असंतोषाचे प्रतिबिंब १९१८ ते १९२० या कालावधीतील अनेक संपांच्या रूपाने दिसून आले. मुंबई, अहमदाबाद, सोलापूर, मद्रास (चेन्नई) येथील कापड गिरणी कामगार, कानपूरची लोकर गिरणी, कलकत्त्याच्या ज्यूट गिरण्या, जमशेदपूरची स्टील कंपनी, मुंबई व जबलपूरमधील रेल्वे कामगार आणि मुंबईचे गोदी कामगार यांची निदर्शनेही झाली. यांपैकी बहुतेक संप उत्स्फूर्तपणे केले गेले आणि बहुतांश संप हे रोजगार आणि वेतन अशा कारणांशी संबंधित होते.

कामगार संघटनांचा दबावगट म्हणून उदय ही या चळवळीतील प्रगतीदर्शक घटना म्हटली जाऊ शकते. वाढत्या असमाधानकारक औद्योगिक वातावरणामुळे भारतात कामगार संघटनेची चळवळ अधिक संघटितपणे उभी राहिली. ऑक्टोबर १९२० मध्ये ६४ कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची परिषद आयोजित केली गेली. याचा परिणाम म्हणून लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली **अखिल भारतीय कामगार संघटना काँग्रेस**ची (AITUC) स्थापना झाली. १९२६ मध्ये सरकारने इंडियन ट्रेड युनियन ॲक्ट संमत केला ज्यायोगे सर्व नोंदणीकृत संघटनांना घटनात्मक मान्यता देण्यात आली. या अधिनियमांतर्गत १९२६ साली मान्यता प्राप्त करणारी पहिली संघटना म्हणजे ना. म. जोशी यांच्या नेतृत्वाखालील बॉम्बे टेक्सटाइल लेबर युनियन.

कामगार चळवळीतील मार्क्सवादी विचारांचा प्रमुख प्रभाव असलेल्या डाव्या विचारसरणीचा उदयदेखील या

काळात झाला. त्यातून शोषणात्मक व्यवस्थेला रोखण्याच्या हेतूने कामगार वर्गाला भांडवलशाही रचनेच्या विरोधात संघटित होण्याची पार्श्वभूमी निर्माण झाली.

'महामंदी' या जागतिक आर्थिक संकटाचा भारतातील कामगार चळवळीवर विपरित परिणाम झाला. संपांची वारंवारिता वाढली आणि कामगार संघर्ष अधिक तीव्र करण्यात मुझफ्फर अहमद, श्रीपाद अमृत डांगे या नेत्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. वेगवेगळ्या वैचारिक पार्श्वभूमी असलेल्या कामगार संघटनांची संख्या वाढली. यांच्यात समन्वय साधण्यासाठी **नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन** (एनटीयूएफ) ची स्थापना केली गेली. एआयटीयूसी आणि एनटीयूएफच्या एकत्रित प्रयत्नांमुळे परिस्थितीत फारसा बदल झाला नाही आणि वेगवेगळ्या संघटनांमध्ये तणाव व वैर कायम राहिले.

**(३) तिसरा टप्पा : इंटक (INTUC) ची भूमिका (१९४८ ते १९६० चा कालावधी) :** सन १९४७ मध्ये **इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस** (इंटक) ची स्थापना झाली. १९४८ मध्ये कामगारांच्या हक्कांच्या रक्षणासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राजकीयरीत्या असंलग्न अशी स्वतंत्र संस्था स्थापन केली गेली. ही **हिंद मजदूर सभा** (एचएमएस) होय. जे एचएमएसच्या तत्वांशी सहमत नव्हते त्यांनी १९४९ मध्ये **युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेस** (यूटीयूसी) नावाची एक समांतर संस्था स्थापन केली. १९५५ मध्ये **भारतीय मजदूर संघ** (बीएमएस) ची स्थापना झाली. १९४७ मध्ये काँग्रेसची सत्ता आल्यावर कामगार संघटनांच्या उपक्रमांचे परीक्षण सुरू झाले. वेळप्रसंगी टीकाही झाली. सर्वात महत्त्वाची टीका म्हणजे सरकारचा कामगार संघटनांच्या कामातील हस्तक्षेप ही होय.

या चार प्रमुख कामगार संघटनांच्या व्यतिरिक्त इतर अनेक कामगार संघटना कामगार चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावत होत्या. त्यानंतरच्या काही वर्षांत कामगारांनी उद्योगपतींच्या विरोधात अनेकवेळा संपाचे हत्यार उपसले. साठच्या दशकात कामगारांच्या तक्रारी वेतन, बोनस आणि ओव्हरटाइमशी संबंधित होत्या. परंतु, त्यानंतर त्यामध्ये कामावरून निलंबन, अन्यायकारक बडतर्फी, कामगारांचे हक्क असा बदल झाला. त्यानंतरच्या औद्योगिक काळात, त्यात कामगारांची बढती, संधींचा अभाव, कामगारांचा सन्मान इत्यादी बाबी महत्त्वाच्या ठरू लागल्या. प्रत्येक प्रस्थापित राजकीय पक्षाने कामगारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व आपली मतपेढी वाढविण्याच्या उद्देशाने स्वतःची कामगार संघटना विकसित केली. याचा परिणाम असा झाला की राजकीय पक्ष जितका मोठा तितकाच त्यांचा कामगारांचा गट विस्तृत व सामर्थ्यवान ठरू लागला. त्याचप्रमाणे जर पक्षात फूट पडली तर संघटनांचे विभाजन होऊ लागले. उदाहरणार्थ, जेव्हा कम्युनिस्ट शाखा सीपीआय आणि सीपीएममध्ये विभागली गेली, तेव्हा कम्युनिस्ट शाखेने सीपीआय हाती घेतली आणि सीपीएमने **केंद्रीय भारतीय कामगार संघटना** (सीआयटीयू) नावाची स्वतंत्र संस्था स्थापन केली.

**(४) चौथा टप्पा : चळवळींचे एकत्रीकरण आणि विविधीकरण (१९६० आणि त्यानंतरचा कालावधी) :** पन्नासच्या दशकाच्या सुरुवातीच्या काळापर्यंत कामगार चळवळ, कामगारांना कामाचा मोबदला, कामाची परिस्थिती इत्यादीबाबत लढा देण्यात यशस्वी ठरली. साठच्या दशकात आर्थिक वाढ व विस्ताराची गती कमी झाली होती. आर्थिक मंदीमुळे व्यवस्थापनांनी कामगारांच्या मागण्या नाकारण्यास सुरुवात केली होती. **औद्योगिक कलह कायदा १९४७** हा औद्योगिक कलहांची तपासणी तसेच त्यावर तोडगा काढण्यासाठी यंत्रणा व प्रक्रिया करून औद्योगिक शांतता व सुसंवाद सुनिश्चित करण्यासाठी पारित केला गेला. या कायद्याद्वारे कामगार व व्यवस्थापनातील संघर्ष कमी करण्यासाठी समेट, लवाद आणि न्यायालयीन निवाडा यांच्या यंत्रणा वापरण्यास अनुमती दिली गेली.

अगदी प्रतिकूल परिस्थितीतही, १९७० च्या दशकापर्यंत चळवळीने कामगारांच्या हितसंबंधाचे आणि समस्यांचे प्रतिनिधित्व करण्याचे आश्वासक काम केले. १९७० नंतर मात्र चळवळीची गती मंदावली. साधारणपणे आठ वर्षे चाललेला गिरणी कामगार संप हा शेवटचा मोठा संप होता. या ऐतिहासिक **बॉम्बे टेक्सटाइल** संपाची सुरुवात जानेवारी, १९८२ मध्ये मुंबईतील गिरणी कामगारांचे केंद्रीय नेते दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली झाली. एकूण ६५ कापड गिरण्यांमधील २,५०,००० कामगारांनी काम थांबवले. वेतन आणि बोनस संबंधित बाबींमध्ये वाढ करण्याची मागणी हे या संपाचे मुख्य

उद्दिष्ट होते. वेतनवाढीच्या मागणीबरोबरच दत्ता सामंत यांनी १९४७ चा **बॉम्बे इंडस्ट्रियल ॲक्ट** रद्द करण्याची मागणी केली. तत्कालीन सरकारने कामगार संघटनांच्या मागणीला ठामपणे नकार दिला. हा संप वर्षानुवर्षे सुरू राहिला. संपामुळे उद्योगाचे मोठे नुकसान झाले आणि कामगार दारिद्र्याच्या खाईत ढकलले गेले. बऱ्याच कामगारांना त्यांचे घरदार, अल्प मालमत्ता विकून मुंबईच्या उपनगरी भागात स्थलांतरित व्हावे लागले. या संपाचा कामगार, उद्योग आणि सरकार यांच्यातील औद्योगिक संबंधांवर नकारात्मक परिणाम झाला.

भारत सरकारच्या कामगार मंत्रालयाच्या लेबर ब्युरोच्या २०१२ च्या अहवालानुसार भारतात अंदाजे १६,१५४ कामगार संघटना अस्तित्वात आहेत. भारतीय मजदूर संघ ही भारतातील सर्वांत मोठी कामगार संघटना आहे. आजच्या घडीला चळवळ मुख्यत्वे राजकीय निकषांवर विभागली गेली आहे. औद्योगिक क्षेत्राची सध्याची परिस्थिती पाहता सरकारच्या भूमिकेत लक्षणीय बदल करण्यात आले आहेत. कामगार मंत्रालय, भारत सरकारने मान्यता दिलेल्या राष्ट्रीय स्तरावरील काही संघटना म्हणजे एआयटीयूसी (ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस), आयएनटीयूसी (इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस), सेवा (स्वयंरोजगार महिला संघटना) या होय. कामगार संघटना बऱ्याचदा मोठ्या फेडरेशनशी संलग्न असतात. ऑल इंडियन बँक एम्प्लॉईज असोसिएशन, रेल्वे कामगार संघटना यांसारख्या ट्रेड युनियन फेडरेशन अजूनही कार्यरत आहे. राष्ट्रीय स्तरावर कामगारांचे प्रतिनिधित्व करणारी देशातील एक प्रमुख फेडरेशन म्हणजे **सेंट्रल ट्रेड युनियन ऑर्गनायझेशन** (सीटीयूओ)

कामगारांच्या चळवळीने मोठा पल्ला गाठला आहे. या चळवळीतील महत्त्वाच्या बदलांचा इथे उल्लेख करणे आवश्यक आहे. (i) कामगारांचे मुद्दे ज्यासाठी ही चळवळ उभी राहिली. (ii) कामगार चळवळीला आकार देणारं नेतृत्व. (iii) समाजधुरीण कामगारहितासाठी उभे ठाकले आणि कालौघात कामगारांनी या लढ्याची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली. त्यातूनच युनियन नेत्यांचा वर्ग उदयाला आला. (iv) जागतिकीकरणाबरोबरच सरकारची या चळवळीतील भूमिकादेखील बदलत गेली. आणि (v) कामगार संघटनांचे राजकियीकरण.

**कृती ३**

सहा विद्यार्थ्यांचा एक असे गट तयार करा. आपल्या परिसर किंवा प्रदेशातील कामगारांच्या चळवळींची माहिती जमवा. १२ स्लाइडचे पॉवरपॉइण्ट सादरीकरण करा. चळवळीची सुरुवात कशी झाली, चळवळींशी संबंधित महत्त्वपूर्ण व्यक्ती, त्यांचे मोठे योगदान किंवा यश, त्यांच्या समोरील आव्हाने याबद्दल माहिती एकत्र करा. वर्गात आपली पॉवरपॉइण्ट सादरीकरण सादर करा; सर्व गट सदस्यांनी किमान दोन स्लाइड्सवर चर्चा करावी. सादरीकरणानंतर प्रश्नोत्तर सत्र होऊ शकते.

## ५.४ भारतातील शेतकरी चळवळ




**शेतकरी चळवळ**

भारत हा प्रामुख्याने कृषिप्रधान देश आहे. भारतीय समाजातील बहुसंख्य लोक शेतीशी संबंधित व्यवसायांशी संलग्न आहेत. या प्रवर्गातील सर्वांत प्रमुख गट हा शेतकऱ्यांचा असू शकतो. शेतकरी हा भौगोलिकदृष्ट्या विखुरलेला वर्ग आहे. तरीही असंतोषाला प्रतिसाद म्हणून त्यांनी एकत्र येण्याची उदाहरणे भारतीय इतिहासात सापडतात. भारतातील शेतकरी संघर्ष खालील टप्प्यांच्या आधारे समजून घेता येईल.

**(१) प्राथमिक काळातील असंतोष १८५७ ते १९२१ पर्यंतचा कालावधी :** कॅथलिन गफ यांनी ब्रिटिश काळाचे वर्णन करताना त्याचा भारताच्या ग्रामीण भागांवर झालेला परिणाम अधोरेखित केला आहे. ब्रिटीश राजवटीच्या सुरुवातीच्या काळातील महसूल प्रणाली शोषणकारी स्वरूपाची होती. शेतकरी, शेतमजूर यांना

ब्रिटिश अधिकाऱ्यांना कर देण्यासाठी सावकारांकडून पैसे घ्यावे लागत होते. या टप्प्यात जमिनदारी व्यवस्था प्रचलित झाली, ज्यायोगे गरीब शेतकऱ्यांकडून पैसे वसूल झाले नाहीत तर जमीन मालक त्यांची जमीन हिसकावून घेऊ शकत होते. बऱ्याच गरीब शेतकऱ्यांनी त्यांच्या वंशपरंपरागत जमीन व संसाधनांवरील आपला हक्क गमावला. याच काळात दुष्काळ आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली. शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपण वाढत गेले. यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला.

या काळात बंडस्वरूपात अनेक उठाव झाले. ए. आर. देसाई, डी. एन. धनागरे यांसारख्या अनेक समाजशास्त्रज्ञांनी ब्रिटिश सरकारविरूद्ध शेतकरी व शेतमजुरांच्या संघर्षाच्या मालिकेचे दस्तऐवजीकरण केले आहे. काही उदाहरणे द्यायची तर सावकारांविरुद्ध डेक्कन उठाव, बंगाली कुळांचा जमिनदारीविरुद्ध उठाव, पंजाबमधील शेतकऱ्यांचा सावकारांविरुद्धचा संघर्ष. १९१७-१८ मध्ये नॅशनल काँग्रेसच्या नेतृत्वात दोन मोठे शेतकरी संघर्ष महत्त्वाचे आहेत. बिहारमधील नीळ बागायतदारांच्या विरोधातील **चंपारण्य** सत्याग्रह आणि पीक नासाडीच्या पार्श्वभूमीवर कैरा येथे शेतमजुरांनी जमीन महसूल जमा करण्याच्या विरोधातला संघर्ष. शेतकऱ्यांच्या तक्रारी व त्यांच्या मागण्यांची दखल घेण्यासाठी काँग्रेसने शेतकरी समित्या स्थापन केल्या.

**(२) किसान सभांचा उदय १९२२ ते १९४६ पर्यंतचा कालावधी :** जमिनदारांना आणि भांडवलदारांना पाठिंबा देण्यासाठी काँग्रेसने घेतलेल्या पुढाकाराने संघर्ष करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली. १९२६-२७ दरम्यान बंगाल, पंजाब आणि उत्तर प्रदेशात अनेक **किसान सभा** क्रांतिकारी संकल्पनांसह आयोजित केल्या गेल्या. स्वामी सहजानंद सरस्वती यांच्या नेतृत्वात बिहारमध्ये जमिनदारी विरुद्ध आवाज उठवण्याच्या उद्देशाने किसान सभेच्या चळवळीस प्रारंभ झाला. बिहार आणि उत्तर प्रदेशमधील किसान सभेच्या प्रतिनिधींनी आपल्या सर्व मागण्यांसंदर्भात सर्वपक्षीय परिषदेत निवेदन सादर केले. बारडोली जिल्ह्यातील शेतकरी वर्गाचे दोन संघर्ष एका पाठोपाठ एक सुरू झाले. पहिला संघर्ष १९२८-२९ मध्ये आणि दुसरा १९३०-३१ मध्ये.

१९३० च्या दशकात या चळवळीला वेग आला. १९३५ मध्ये पहिली किसान काँग्रेस आयोजित करण्यात आली होती. ज्यामध्ये शेतकऱ्यांचा संताप आणि असंतोष यांची दखल घेतली गेली. याची परिणती म्हणून एप्रिल १९३६ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या लखनऊ अधिवेशनात **अखिल भारतीय किसान सभा** (एआयकेएस) ची स्थापना झाली. हा संघर्ष भारताच्या इतर भागांतही पसरला. पंजाबमध्ये राजा महेंद्र प्रताप यांच्या नेतृत्वात शेतकरी चळवळ उफाळून आली. पंजाबमधील शेतकरी आणि शेतमजूर एकत्रित आणण्यासाठी 'गदर पक्षाने' महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. गुजरातमध्ये महात्मा गांधींनी खेडा या गावी ब्रिटिश सरकारच्या विरोधात गरीब शेतकऱ्यांच्या संघर्षाचे नेतृत्व केले. दक्षिणेकडील पट्ट्यात (उदा., आंध्र प्रदेश) वन कायद्याविरूद्ध संघर्ष सुरू झाला. याच टप्प्यात शेतकऱ्यांची स्थिती अधिक बिघडत गेली. ज्याचा परिणाम म्हणजे अनेक बंडस्वरूप व निषेधात्मक आंदोलनांची मालिका तयार झाली.

**(३) स्वातंत्र्योत्तर कालावधी :** राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही शेतकरी आणि शेतमजुरांच्या परिस्थितीत फारशी सुधारणा झाली नाही. स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळीचा उदय हा १९७० च्या दशकातला म्हटला जाऊ शकतो.

कृषी-औद्योगिक तसेच व्यावसायिकदृष्ट्या वित्तकारणात आघाडीवर असलेल्या पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि तमिळनाडू या राज्यांमध्ये साहजिकच सर्वप्रथम शेतकऱ्यांमधील असंतोष व्यक्त होऊ लागला. स्वातंत्र्योत्तर काळातील नव्या वैचारिक परिप्रेक्ष्यांचा चळवळीवर प्रभाव पडला.

१९६० आणि ७० च्या दशकात या चळवळीचे स्वरूप अधिक संघटित झाले. चरणसिंग हे शेतकरी संघर्षातील एक महत्त्वाचे नाव बनले. त्यांनी टोकाचे यांत्रिकीकरण आणि औद्योगिकीकरणाला विरोध केला आणि शेतीत कमी भांडवलाच्या गुंतवणुकीच्या संकल्पनेचा पुरस्कार केला. १९७४ मध्ये त्यांनी **भारतीय क्रांती दल** (बीकेडी) आणि **भारतीय लोक दल**

(बीएलडी) या संघटनांची स्थापना केली.

१९७० पासून कोणत्याही राजकीय संघटनेचा पाठिंबा न घेता शेतकऱ्यांनी आपले गट तयार करण्यास सुरुवात केली. १९७३ मध्ये नवी दिल्ली येथे शेतकऱ्यांचे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते, त्यानंतर १९७८ मध्ये आणखी एक अधिवेशन झाले. त्यात सरकारला २० कलमी मागण्यांची सनद सादर केली गेली. निर्णय प्रक्रियेतील महत्वाच्या संस्थांवर शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व, शेती आणि उद्योग यांच्यातील असमतोल दूर करणे यांसारख्या मागण्यांचा समावेश होता. याच सुमारास तमिळनाडू आणि पंजाबमध्ये सशक्त अशा शेतकरी संघटनांचा उदय झाला. महाराष्ट्रामध्ये १९८० मध्ये शरद जोशी यांच्या नेतृत्वात **शेतकरी संघटना** आणि एम. डी. ननजुंडास्वामी यांच्या नेतृत्वात **कर्नाटक राज्य रयत संघ** यांची स्थापना झाली. या संघटना म्हणजे भारतातील शेतकरी चळवळीतील मैलाचे दगड म्हणावे लागतील.

औद्योगिकीकरणाच्या आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियांमुळे शेतकऱ्यांच्या परिस्थितीत वेगाने बदल झाला आहे. हंगामी चढ-उतार, सरकारची उदासीनता आणि नागरी समूहाकडून उपेक्षा यामुळे शेतकरी पीडित राहिला. शेतीशी निगडित विपन्नावस्थेमुळे शेतकरी नैराश्याच्या खाईत ढकलला जात आहे. शेतकऱ्यांची आत्महत्या ही एक सामान्य बाब बनली आहे. मार्च २०१८ मध्ये, महाराष्ट्रातील विविध भागांतील हजारो शेतकऱ्यांनी एकत्र येत आपल्या तक्रारींचा पाढा सरकारसमोर वाचण्यासाठी व आपली निराशा व्यक्त करण्यासाठी लॉन्ग मार्च करत मुंबई येथील मंत्रालयाकडे कूच केले. शेतकऱ्यांनी बाजारपेठेशी असहकार पुकारत कृषिउत्पादन रस्त्यावर फेकून दिले आणि शेतकऱ्यांचा संप ही संज्ञा प्रथमच माध्यमांमध्ये वापरली गेली. शेतकऱ्यांच्या संघर्षाचा हा पूर्णपणे नवा अध्याय म्हणता येईल.

**कृती ४**

मागील वर्षातील शेतकरी आत्महत्यांशी संबंधीत वृत्तपत्रातील तसेच नियतकालिकातील लेख संकलित करा. आपल्या वर्गाच्या बुलेटिन बोर्डवर ही माहिती सादर करा.

## ५.५ भारतातील पर्यावरण चळवळ

गाडगीळ आणि गुहा यांनी 'पर्यावरण चळवळ' याची व्याख्या अशी केली आहे की, "नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत उपयोग, पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे किंवा पर्यावरणाचे जतन करणे या दिशेने जाणीवपूर्वक निर्देशित केलेली एक संघटित सामाजिक प्रक्रिया म्हणजे पर्यावरण चळवळ होय." **हरित चळवळ, संवर्धन चळवळ** या संज्ञा वैकल्पिकरीत्या पर्यावरण चळवळीसाठी वापरल्या जातात.

पर्यावरणवाद हे एक व्यापक तत्वज्ञान आहे. हे तत्वज्ञान आपल्या सभोवतालाच्या परिसराच्या संवर्धन आणि विकासाला केंद्रीभूत मानून पर्यावरण आणि संस्कृतीच्या सुधारणेसाठी कळकळीचे प्रयत्न करते. आधुनिकीकरण आणि औद्योगिकीकरणाच्या अपरिहार्य परिणामांमुळे मानवी जीवनासमोर अनेक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष आव्हाने आहेत. जीवनशैलीतील, लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक आणि सांस्कृतिक अनियमित विसंगती पर्यावरणीय संतुलनाला घातक आहेत.

**(१) भारतातील पर्यावरण चळवळीचा उदय :** आधुनिक पर्यावरणवादाची सुरुवात १९६० च्या दशकात झाली. पर्यावरणाच्या ऱ्हासाविषयी वाढती जागरूकता आणि जनजागृतीमुळे बरेचसे उपक्रम, कार्यक्रम आयोजित केले गेले आणि माहिती प्रकाशित झाली. अमेरिकेचे अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी सन १९७० मध्ये अमेरिकन पर्यावरणविषयक धोरण कायदा साक्षांकित केला. तेव्हापासून २२ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगात 'वसुंधरा दिन' म्हणून साजरा केला जातो. १९७२ मध्ये, स्टॉकहोम येथे संयुक्त राष्ट्रांच्या वतीने **मानव पर्यावरणाविषयी परिषद** आयोजित केली गेली. या परिषदेमुळे पर्यावरणीय समस्यांबद्दल अनेकांच्या मनात स्वारस्य निर्माण झाले. १९८० च्या दशकाच्या सुरूवातीस जर्मनी आणि उत्तर अमेरिकेच्या हरित चळवळीने वसुंधरेचे संरक्षण, जतन आणि संवर्धनाचे महत्व यांबद्दल जनजागृती करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यामुळे पर्यावरण चळवळ जगाच्या इतर भागातही पसरली.

बहुतेक विकसनशील देशांप्रमाणेच भारतीय

समाजातही संसाधनांबाबत असंवेदनशील व अनियंत्रित शोषणाची वृत्ती दिसून येते. भारतातील पर्यावरण चळवळ पुढील कारणांमुळे इतर सामाजिक चळवळींपेक्षा आपल्या अभिमुखता आणि उद्दिष्टांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे म्हटले जाऊ शकते.

- इतर चळवळींचे लक्ष्य विशिष्ट वा मर्यादित स्वरूपाचे असते, तथापि संपूर्ण मानवतेचे कल्याण हेच पर्यावरण चळवळीचे लक्ष्य आहे.

- या चळवळीचे उद्दिष्ट व्यापक व सर्वसमावेशक आहे. आदिवासी, शेतकरी आणि स्त्रिया अशा वेगवेगळ्या कारणांसाठी दुर्लक्षित गटांना पर्यावरण चळवळीने आपल्या कक्षेत सामावून घेतले आहे.

- या चळवळीने पर्यावरण जतनाचा विषय मांडण्यासाठी अहिंसक परंतु दृढनिश्चित मार्ग अवलंबिला आहे.

- पर्यावरणविषयक धोरणे तयार करताना आणि कायदे अमलात आणताना सामूहिक हिताचा आधार घेण्यास सरकारला या चळवळीने भाग पाडले आहे.

**(२) कारणांचा उहापोह :** पर्यावरणीय समतोलाला निर्माण झालेल्या धोक्याची प्रतिक्रिया म्हणून पर्यावरण चळवळ उदयाला आली. याची कारणे परस्परसंबंधित व अपरिहार्य आहेत. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि तंत्रज्ञानाचा अत्याधिक वापर यामुळे वेगाने होणारा पर्यावरण ऱ्हास हे चिंतेचे प्रमुख कारण आहे. लोकसंख्येच्या वेगवान वाढीमुळे नैसर्गिक स्रोतांचा अनिर्बंधित वापर होत आहे. जमीन, पाणी आणि जैव विविधतेशी संबंधित प्रमुख समस्या समाजाच्या पर्यावरणीय संतुलनावर विपरीत परिणाम करत आहेत. जंगलतोड, वायू प्रदूषण, सागरी आणि किनारी प्रश्न, मृदा प्रदूषण यांसारख्या समस्या ही पर्यावरणीय असमतोलपणाचे दृश्य परिणाम आहेत.

या क्षेत्रातील अभ्यासकांचे असे मत आहे की भारतीय पर्यावरण चळवळ ही विविध वैचारिक भूमिकांमधील वादांची परिणती आहे. मनुष्य आणि निसर्गाच्या दरम्यानच्या परस्परक्रिया ही या चळवळीची मध्यवर्ती संकल्पना आहे. गांधीजींची ग्रामस्वराज्य ही संकल्पना विवेकवाद आणि स्वयंपूर्णता या इथल्या मातीतील मूळ धारणांशी निगडित असून आपल्या परिसरातील संसाधनांचा विनियोग करण्याचे उद्दिष्ट त्यामागे आहे. याविरुद्ध जहाल मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या प्रतिमानात प्रकर्षाने आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानावरची निर्भरता आहे व पर्यावरणीय ऱ्हास हा सामाजिक विषमतेची परिणती असल्याची दृढ धारणा आहे. अशा प्रकारे पर्यावरणीय चळवळीची कारणे केवळ पर्यावरणाशी संबंधित नसून ती आर्थिक व सामाजिक आहेत.

**(३) भारतातील महत्त्वपूर्ण पर्यावरणीय चळवळी :** पर्यावरणीय चळवळ ही एकल स्वरूपाची नाही. ही चळवळ व्यापक आहे. यामध्ये पर्यावरणीय आरोग्य, मानवाधिकार, आदिवासींचे हक्क आणि पर्यावरणीय स्त्री-वाद इत्यादी मुद्द्यांचा समावेश आहे. चळवळीच्या व्यापक कक्षेमध्ये ही चळवळ म्हणजे स्वतंत्रपणे झालेल्या पण एकमेकांशी संलग्न अशा आंदोलने व बंडखोरीची मालिका म्हणून समजून घेतली पाहिजे. हर्ष सेठी यांनी पर्यावरणीय चळवळीशी निगडित पाच प्रमुख प्रकार सादर केले आहेत. ते पुढीलप्रमाणे : जंगल आणि वनसंपदा, जमीन वापर, पाणी आणि धरणविरोधी, विविध प्रकारचे प्रदूषणविरोधी आणि सागरी स्रोतांसाठी संघर्ष. पर्यावरणातील काही महत्त्वपूर्ण चळवळी खाली नमूद केल्या आहेत.

**चिपको चळवळ**



चिपको आंदोलन

**चिपको आंदोलन** ही एक अनोखी चळवळ आहे. चिपको आंदोलनाची सुरूवात **अमृतादेवी** यांनी केली. हे आंदोलन सुरुवातीपासून शेवटपर्यंत गांधीवादी अहिंसेच्या तत्वानुसार लढले गेले. तसेच ते महिलांच्या सक्रिय सहभागासाठी ओळखले जाते. चिपको म्हणजे 'झाडाला आलिंगन देणे'. हिमालयीन प्रदेशातील चमोली जिल्ह्यात मार्च १९७३ मध्ये **सुंदरलाल बहुगुणा** यांच्या नेतृत्वाखाली या चळवळीला सुरुवात झाली. चमोली जिल्ह्याचा बराचसा भाग जंगलांनी व्यापलेला आहे. तेथील रहिवाशांचे राहणीमान जंगलांशी निगडित आहे. उपजीविकेचे साधन प्रामुख्याने शेती आणि वन उत्पादनांवर आधारित आहे. शेती, जंगलातील अन्न गोळा करणे आणि पशुपालन अर्थव्यवस्थेचे वर्चस्व असल्यामुळे तेथील लोक जंगल उत्पादनांवर अवलंबून होते.

तथापि, लोकसांख्यिकीय आणि आर्थिक कारणांमुळे जंगलांचा असंयुक्तिक वापर होऊन जंगलतोड झाली. औद्योगिकीकरण आणि विकासाच्या प्रक्रियांमुळे वाहतूक व दळणवळणाच्या साधनांमध्ये सुधारणा झाली. विकासकामांमुळे जंगलांवरील मूळ रहिवाशांच्या हक्कावर गदा आली. उपजीविकेचे साधन नष्ट होत असलेले पाहून मूळ रहिवाशी संतप्त झाले आणि या चळवळीला सुरुवात झाली. एप्रिल १९७३ मध्ये जेव्हा कंत्राटदार कामगारांसह मंडल या गावी त्यांना राज्य सरकारने दिलेली जंगलाची जागा मोकळी करण्यासाठी आणि झाडे तोडण्यासाठी पोहचले, तेव्हा त्यांचा प्रतिकार करण्यासाठी आणि निषेध करण्यासाठी रहिवाशांनी झाडांना मिठी मारली. हा निषेध इतक्या मोठ्या प्रमाणावर घडला की परिणामी कंत्राटदार व सरकारी अधिकाऱ्यांना माघार घ्यावी लागली. या निषेधात गावातील महिलाही सहभागी झाल्या. या घटनेमुळे जंगलतोडविरोधात निषेध करणाऱ्या अशाच प्रकारच्या इतर अनेक गटांचे मनोबल वाढले.




**पर्यावरणवादी सुंदरलाल बहुगुणा**

### नर्मदा बचाओ आंदोलन

जवाहरलाल नेहरू धरणांना 'आधुनिक भारताची मंदिरे' म्हणून संबोधत. स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणात अनेक धरणांचे प्रकल्प मंजूर झाले. धरण बांधण्यामागील चांगला हेतू कधीही नाकारला जाऊ शकत नाही. परंतु, बहुतांश घटनांमध्ये धरणे बांधण्याचा अपरिहार्य परिणाम म्हणजे विस्थापन होय. विस्थापनामुळे आदिवासींचे जीवनमान नष्ट होते.



**मेधा पाटकर आणि निदर्शक**




**सरदार सरोवर धरण**

नर्मदा ही पश्चिमेकडील सर्वांत मोठी नदी आहे. या नदीतिरींच्या लगत आदिवासी आणि ग्रामीण लोक राहतात. नर्मदा नदीवर सरदार सरोवर प्रकल्प उभारल्यास महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेश या तीन राज्यांना फायदा होईल, बहुचर्चित आश्वासक बहु-कोटी प्रकल्पांमुळे सरकारला मोठा महसूल मिळेल, शेजारील वस्ती, खेडी व शहरे यांना या धरणामुळे वीज व पिण्याचे पाणी मिळेल असा समर्थकांचा दावा होता.

धरणामुळे मूळ निवासींची उदरनिर्वाहाची व्यवस्था

नष्ट होऊन ते विस्थापित होण्याचा धोका निर्माण झाला तेव्हा त्यांना अशा मोठ्या स्वरूपाच्या प्रकल्पाला एकत्र येऊन विरोध करण्याची गरज वाटली. १९८५ मध्ये **मेधा पाटकर** यांच्या नेतृत्वाखाली **नर्मदा बचाओ आंदोलन** (एनबीए) ही एक महत्त्वाची संघर्ष चळवळ उभी राहिली. लवकरच ही आंतरराष्ट्रीय चळवळ बनली आणि धरण बांधण्याविरुद्ध भारतातील तसेच परदेशातील हजारो कार्यकर्ते एकत्र आले. ऑक्टोबर १९९४ मध्ये मेधा पाटकर यांनी तीन राज्य सरकारांवर दबाव आणण्यासाठी बेमुदत धरणे आंदोलन केले. या चळवळीने वीज निर्मितीसाठी पर्यायी पद्धतींचा वापर तसेच विस्थापितांचे योग्य पुनर्वसन व उदरनिर्वाहासाठी उपलब्ध साधने या मागण्या पुढे केल्या होत्या.

नर्मदा बचाओ आंदोलनाद्वारे शाश्वत विकासाचा विषय ऐरणीवर आला. या आंदोलनाने विकासाबद्दलच्या धोरणात्मक निर्णयाच्या वैधतेबद्दल आणि तिच्या उपयोगितेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

मानवजातीचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठी आधुनिकतावादी समाज आपल्या मागण्या आणि आवश्यकतांमध्ये जशाप्रकारे बदल करत आहे त्याला अनुसरून पर्यावरणीय चळवळींनादेखील नवे आयाम मिळत आहे.

या पाठांतर्गत आपण सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळ यांतील फरक समजून घेतला. सामाजिक चळवळींमुळे सामाजिक परिवर्तन होते. महिला चळवळ, शेतकऱ्यांच्या चळवळी, कामगारांच्या चळवळी आणि पर्यावरणीय चळवळी यावर लक्ष केंद्रित केले गेले आहे. या सर्व चळवळी सध्याच्या काळातही सुसंगत आहेत.

**कृती ५**

(अ) तुम्ही ग्रेटा थनबर्ग विषयी ऐकले आहे का? तिच्या आंदोलनाच्या प्रभावाविषयी चर्चा करा.

(ब) शिल्पा बल्लाळ यांची 'लकीर के इस तरफ' ही फिल्म पहा. त्यावर वर्गामध्ये चर्चा करा.

## सारांश

- सामाजिक चळवळ म्हणजे एखाद्या बदलाला चालना देण्यासाठी किंवा प्रतिरोध करण्यासाठी मानवाने केलेला प्रयत्न.
- सामाजिक चळवळींचे विविध प्रकार आहेत – सुधारणात्मक, क्रांतिकारक, अभिव्यक्तित्मक, सामान्य, वैकल्पिक सामाजिक चळवळी.
- सर्व सामाजिक चळवळींची वैशिष्ट्ये अशी आहेत – त्या सामूहिक स्वरूपाच्या आहेत, त्या नियोजित आणि हेतुपुरस्सर असून विचारप्रणाली आणि उद्दिष्टांसह या सामाजिक चळवळी बदल घडवून आणतात. अर्थात सामाजिक चळवळी बदलाभिमुख असल्या तरी सर्व बदल हे सामाजिक चळवळींमुळेच होतात असे नाही.
- सामाजिक चळवळीचे वेगवेगळे प्रकार : स्त्री-चळवळ, कामगार चळवळ, शेतकरी चळवळ आणि पर्यावरणीय चळवळी.
- ब्रिटिश काळात स्त्री-चळवळीची सुरुवात स्त्रियांशी निगडित सामाजिक सुधारणांमुळे झाली. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या संबंधातील अनेक प्रकारचे प्रश्न आणि सबलीकरणाचे मुद्दे चर्चेत आले.
- कामगार चळवळी या औद्योगिक समाजातील कामगारांच्या हक्कांवर प्रकाश टाकतात. या चळवळींमध्ये वेगवेगळ्या ट्रेड युनियन आणि विविध नेतृत्व उदयास येते.
- शेतकऱ्यांची चळवळ ही शेतकऱ्यांशी संबंधित प्रश्नांवर जसे की, त्यांची उपजीविका, जमिनीवरील हक्क आणि समस्या यांवर प्रकाश टाकते.
- पर्यावरणीय चळवळ ही पर्यावरणाशी संबंधित विविध मुद्द्यांना स्पर्श करते. जसे की, जंगलांचे संरक्षण, जलसंपत्ती, हवामान बदलाचे परिणाम आणि जगातील तापमान वाढ, शाश्वत विकासाची संकल्पना आणि यासारख्या गोष्टींवर लक्ष केंद्रित केले आहे.

# स्वाध्याय

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

(१) चिपको आंदोलनाचे उद्दिष्ट म्हणजे ....
(महिला सबलीकरण, कामगार हक्क, पर्यावरण वाचवणे)

(२) भारतीय लोकदलाची स्थापना .... या वर्षी झाली.
(१९५४, १९६४, १९७४)

**(ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व दुरूस्त करून लिहा.**

(१) i) स्त्री-चळवळ - लैंगिक समानता
ii) आंतरराष्ट्रीय स्त्री-दशक - १९९१ ते २००१
iii) टुवर्ड्स इक्वालिटी - भारतीय स्त्री-दर्जा विषयक अहवाल
iv) स्त्री-वादी चळवळ - स्वातंत्र्योत्तर भारत

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| **एस. ए. डांगे, सरला देवी, मेधा पाटकर** |
|---|

(१) नर्मदा बचाओ आंदोलनाचे नेतृत्व

(२) कामगार संघटना चळवळीतील योगदान

**(ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

(१) १९३५ मध्ये झालेल्या पहिल्या किसान काँग्रेसमुळे <u>युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेसची</u> स्थापना झाली.

(२) वुमेन्स इंडियन असोसिएशनची स्थापना तत्कालीन <u>बॉम्बेत</u> झाली.

**प्रश्न २ टीपा लिहा.**

(१) शेतकरी आंदोलन

(२) सामाजिक चळवळीची वैशिष्ट्ये

**प्रश्न ३ फरक स्पष्ट करा.**


(१) भारतातील महिला चळवळीचा स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर टप्पा.

**प्रश्न ४ खाली दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

(१) सामाजिक चळवळ

(२) पर्यावरणीय चळवळ

**प्रश्न ५ संकल्पनांची आकृती पूर्ण करा.**




**प्रश्न ६ आपले मत नोंदवा.**

(१) पर्यावरणीय अभ्यासक्रमामुळे तुमच्या वर्तनावर काही परिणाम झाला आहे का?

(२) सामाजिक चळवळींद्वारे सामाजिक वास्तवाचे भान आणण्याचे महत्त्व स्पष्ट करा.

**प्रश्न ७ पुढील प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा. (कमीत-कमी १५०-२०० शब्द)**

'समाजात बदल घडवून आणण्यासाठी सामाजिक चळवळी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात' या विधानाच्या संदर्भात, आपण अभ्यासलेल्या कोणत्याही दोन भिन्न सामाजिक चळवळी निवडा आणि त्यावर टिप्पणी द्या:

(i) चळवळींशी संबंधित महत्त्वाचे मुद्दे

(ii) चळवळींमुळे भारतीय समाजात कसे बदल घडून आले?

**उपक्रम**

- कोणतेही ५ संवर्धन उपक्रम निवडा. (उदा., गो ग्रीन, जंगल वाचवा, आरे वाचवा, पर्यावरणस्नेही गणेशोत्सव इ.)
- त्यांचे लक्ष्य, उद्दिष्ट आणि कार्यक्रमाची रूपरेषा यांबद्दल वर्गात गट सादरीकरण करा.
- त्यानंतर वर्ग चर्चा किंवा गृहपाठ दिला जावा.

◆ ◆ ◆

# ६. भारतातील सामाजिक समस्या

६.१ 'सामाजिक समस्या' : अर्थ आणि स्वरूप
६.२ वृद्धांच्या समस्या
६.३ बेरोजगारी
६.४ शेतकऱ्यांच्या आत्महत्या
६.५ घरगुती हिंसाचार
६.६ व्यसन (मद्य, आंतरजाल, भ्रमणध्वनी)

## ६.१ सामाजिक समस्या : अर्थ आणि स्वरूप

या आधीच्या अभ्यासक्रमातील घटकात तुम्ही भारतातील सामाजिक चळवळींची माहिती घेतलीत. त्यावरून तुम्हांला समजले असेल की अनेकांना जाणवलेल्या सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी सामाजिक चळवळी उदयाला आल्या.

'सामाजिक समस्या' म्हणजे काय? याचा विचार करण्याआधी आपण 'वैयक्तिक समस्या' म्हणजे काय? याचा विचार करूया. अर्थातच ते करत असताना एक गोष्ट आपण लक्षात ठेवायला हवी की व्यक्ती केव्हाही एकटी नसते, ती कायमच कोणत्या ना कोणत्या समूहाचा भाग असते. त्यामुळे हे समजून घेणे आवश्यक आहे की 'समस्या' ही एक दुपदरी प्रक्रिया आहे. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीला एकटेपणाची समस्या भासत असेल. या समस्येचे मूळ मात्र आसपासच्या माणसांनी काही कारणांमुळे त्या व्यक्तीशी असलेले संबंध तोडल्यामुळे ती व्यक्ती एकटी पडणे या घटनेत असू शकेल. कदाचित त्या व्यक्तीच्या स्वभावातील काही गोष्टी इतरांना आवडत नसल्यामुळेही त्या व्यक्तीला एकटेपणा जाणवू शकेल. उदाहरणार्थ, त्या व्यक्तीच्या स्वभावातील अहंमन्यता.

वैयक्तिक समस्यांची लक्षणे काय असतात?

(१) वैयक्तिक समस्या फक्त संबंधित व्यक्तीला जाणवत असते, इतरांना नाही.

(२) समस्येचे कारण त्या व्यक्तीशी निगडित असू शकते. उदाहरणार्थ, त्या व्यक्तीच्या विशिष्ट सवयी, आळस, निरुत्साह आणि व्यक्तिमत्त्वाची घडण. समस्येचे कारण त्या व्यक्तीचा वावर असलेल्या समूहामध्ये किंवा समाजामध्येही असू शकते. उदाहरणार्थ, त्या व्यक्तीच्या शैक्षणिक गुणवत्ता, क्षमता यांनुसार योग्य नोकरीची संधी उपलब्ध नसणे, समाजातील लोकांची मानसिकता जुनाट पद्धतीची असणे, राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे समाजात विधायक गोष्टी न घडणे, वगैरे.

(३) स्वतःच्या वैयक्तिक समस्या सोडवण्यासाठी स्वतःच प्रयत्न करणे आवश्यक असते. उदाहरणार्थ, एक विद्यार्थी म्हणून केवळ प्रयत्न कमी पडत असल्यामुळे किंवा प्रयत्नच न केल्यामुळे तुम्हांला कमी गुण मिळत असतील, तर ही समस्या जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यानेच सुटू शकेल. त्यासाठी तुम्हांला स्वयंप्रेरणा आणि इच्छाशक्ती गरजेची आहे.

(४) वैयक्तिक समस्यांना सामोरे जाणे आणि त्या सोडवणे हे वाटते तितके सोपे नाही. काही व्यक्तींजवळ समस्या सोडवण्याची अंतःप्रेरणा असेल, तर काहींना त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी बाह्य मदतीची आवश्यकता भासेल. जसे की, कुटुंबातील सदस्य, मित्र, शिक्षक, आध्यात्मिक, धार्मिक गुरू, समुपदेशक अशा लोकांकडून समस्याग्रस्त व्यक्तीला प्रोत्साहन आणि आधार मिळू शकतो. काही वेळा तज्ञ समुपदेशकाचे मार्गदर्शन घेणे आवश्यक असते.

'सामाजिक समस्या' म्हणजे नेमके काय? येथे आपण काही व्याख्यांचा विचार करूया.

👉 ***फुलर आणि मायर्स*** : "सामाजिक समस्या ही अशी स्थिती आहे की, ज्यामध्ये काही सामाजिक संकेतांच्या विपरीत वर्तन करणाऱ्या आणि त्यात आनंद मानणाऱ्या व्यक्तिंची संख्या लक्षणीयदृष्ट्या मोठी असते".

👉 ***ब्रूम आणि सेल्झनिक*** : सामाजिक समस्या ही "मानवी नातेसंबंधामधील अशी परिस्थिती असते की ज्यामुळे समाज किंवा समाजातील अनेकांच्या महत्त्वाच्या आशाआकांक्षांना धोका उत्पन्न होतो".

👉 ***हॉर्टन आणि लेस्ली :*** सामाजिक समस्या ही "अशी स्थिती असते की ज्याचा मोठ्या संख्येने लोकांवर होणारा परिणाम अनुचित पद्धतीने होत असतो आणि एकत्रित होऊन त्यावर काही उपाय शोधता येईल असे काहींना वाटत असते."

सामाजिक समस्येच्या वर दिलेल्या व्याख्यांमध्ये काही साम्यस्थळे आहेत :

- विशिष्ट प्रकारची वर्तणूक ही समाजातील बहुतांश लोकांना अमान्य असते.
- अशा प्रकारची वर्तणूक समस्याजनक असते कारण ती प्रचलित सामाजिक नियमांच्या विरोधी किंवा लोकांच्या आशाआकांक्षांच्या विरोधी असते.
- अशा परिस्थितीमध्ये समस्येच्या निराकरणासाठी सामूहिकरीत्या काम करण्याची आवश्यकता आहे, अशी भावना निर्माण होते.

२१व्या शतकात भारताला भेडसावणाऱ्या महत्त्वाच्या सामाजिक समस्यांचा विचार या पाठात केला आहे.

## ६.२ वृद्धांच्या समस्या

आपणा सर्वांच्याच कुटुंबामध्ये काही वृद्ध सदस्य असतात. कदाचित आपल्यापैकी काहींना त्यांची शुश्रुषा करताना येणाऱ्या समस्यांचा अनुभवही असेल. त्यांच्या गरजा वेगळ्या असतात आणि त्या गरजांकडे पुरेसे लक्ष देणे आवश्यक असते. तुम्ही बातम्यांमध्ये वृद्ध पालकांना टाकून देणारे किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष करणारे अशा लोकांबद्दल ऐकले असेलच. वृद्धांची संपत्ती आपल्याला मिळावी या हव्यासापायी त्यांच्याबाबतीत घडणाऱ्या गुन्हेगारी कृत्यांबद्दलही तुम्ही वाचले असेलच. वृद्धत्व येणे म्हणजे काय? वृद्धत्व येणे ही एक नैसर्गिक आणि अपरिहार्य घटना आहे. थोडक्यात सांगायचे तर वृद्धत्व म्हणजे व्यक्तीमध्ये होत जाणारे शारीरिक आणि मानसिक बदल. या बदलांचा परिणाम व्यक्तीचे सामाजिक जीवन आणि वैयक्तिक जीवनपद्धती यांवर होत असतो.

### व्याख्या

👉 ***हेस :*** "जीवनातील एक अपरिहार्य आणि अपरिवर्तनीय अवस्था".

👉 ***बायरेन आणि रेनर :*** "वृद्धत्वाचा संबंध समान वातावरणीय परिस्थितीमधील, समान जनुकीय घडण असणाऱ्या उत्क्रांत सजीवांमध्ये त्यांच्या शारीरिक वयानुसार घडून येणाऱ्या बदलांशी आहे".

### वृद्धत्वाची वैशिष्ट्ये

स्ट्रेहलर याने वृद्धत्वाची चार वैशिष्ट्ये सांगितली आहेत. ती पुढीलप्रमाणे :

(१) वृद्धत्व हे वैश्विक आहे. रोग काहींना होतात, मात्र वृद्धत्व प्रत्येकाला येते.

(२) वृद्धत्व हळूहळू आणि अखंडपणे चालणारी प्रक्रिया आहे.

(३) वृद्धत्व हा सजीवांच्या जीवनप्रवासाचा अंगभूत भाग आहे.

(४) वृद्धत्व झीज होण्याच्या प्रक्रियेचा परिणाम आहे.

एखाद्या व्यक्तीच्या वृद्धत्वाचे निर्देश त्याच्या शारीरिक वयाच्या आधारे करणे, ही सर्वसामान्य पद्धती आहे. ती व्यक्ती जन्माच्या दिवसापासून वर्तमान दिवसापर्यंत किती वर्षे जगली हा शारीरिक वय ठरवण्याचा निकष असतो. हा एक निश्चित आणि मोजता येण्याजोगा निकष आहे. भारतामध्ये वयोमानाची ६० वर्षे ही किमान मर्यादा व्यक्तीचा जनगणनेच्या वेळी 'वृद्ध' या श्रेणीत समावेश होण्यासाठी मान्य केलेली आहे.

भारतामध्ये वृद्धांची लोकसंख्या वाढते आहे. वाढलेले आयुष्यमान आणि घटलेला मृत्यूदर ही वृद्धांची लोकसंख्या वाढण्यामागील कारणे आहेत.

**कृती १**

वृद्ध व्यक्तींच्या समस्यांविषयी वर्गामध्ये चर्चा करा. त्यासाठी कुटुंबातील इतर सदस्यांशी बोला आणि त्यातून मिळालेली माहिती वर्गात सांगा. तुम्हांला जर तुमच्या परिसरातील आसपासच्या व्यक्तींशी प्रत्यक्ष संवाद साधता येणे शक्य असेल तर त्यातून तुम्हांला जाणवलेल्या विशेष गोष्टीही वर्गातील चर्चेमध्ये मांडा.

### वृद्धत्वाच्या समस्या

**(१) आरोग्यविषयक :** शारीरिक, मानसिक आणि

भावनिक स्वास्थ्य म्हणजे आरोग्य. वाढत्या वृद्धत्वाबरोबर शरीराच्या विविध अवयवांची झीज होण्यास सुरुवात होते. त्यामुळे निर्माण होणाऱ्या शारीरिक अशक्तपणाच्या आणि आरोग्याच्या समस्यांचा संबंध दात, हाडे, पोट, हृदय, ऐकू येणे, दृष्टी इत्यादींसंबंधीच्या तक्रारींशी असतो. या शारीरिक तक्रारींच्या बरोबरीने मानसिक समस्याही उद्भवू शकतात. त्यामध्ये कुटुंबातील इतरांपासून तुटल्याची जाणीव, त्यांच्याबरोबर संघर्ष, असमाधानाची जाणीव, वैफल्याच्या भावनेतून आलेले नैराश्य, अस्वस्थता, एकटेपणा इत्यादींचा समावेश असतो. आरोग्यासाठी भावनिक स्वास्थ्यही महत्त्वाचे असते.

**(२) एकटेपणा :** ही समस्या मानसिक आहे असे वाटले तरी तिचा उगम वृद्धांच्या जीवनातील प्रत्यक्ष अनुभवांमध्ये असतो. विशेषतः कोणाचीही सोबत नसणे, मुलेबाळे नसणे, एकट्यानेच वृद्धाश्रमामध्ये किंवा दुर्गम भागात राहणे यांसारख्या गोष्टींमुळे एकटे पडल्याची भावना बळावत जाते. पती किंवा पत्नीचा मृत्यू, पूर्वी करत असलेली कामे वयामुळे करता न येणे यांमुळे एकटेपणाच्या भावनेत भर पडते. काही वृद्धांना त्यांच्या स्वतःच्या किंवा मुलांच्या घरातून हाकलून दिल्याच्या घटनाही घडतात. काहींना कुटुंबातील किंवा शेजारपाजाऱ्यांमधील आपले महत्त्व कमी झाल्यासारखे वाटत राहते.

**(३) छळ :** अनेकदा ज्येष्ठ आणि वयोवृद्ध व्यक्तींना सक्तीने काम करायला लावणे, क्रूरपणे वागवणे, छळ करणे, कुचेष्टचा विषय बनवणे, त्रास देणे यांसारख्या गोष्टींच्या बातम्या आपण अनेकदा वाचत असतो. त्यांना अशा गोष्टींना कुटुंबामध्ये तसेच बाहेरील जगात सामोरे जावे लागते. त्यांच्या बाबतीत शारीरिक छळ आणि घरगुती हिंसेचे अनेक प्रसंग घडत असतात. आपल्याला अनेकदा पैसे, अन्न किंवा कपड्यांसाठी भीक मागणारे वयोवृद्ध पहायला मिळतात.

**(४) आर्थिक असुरक्षितता :** अनेक वृद्ध व्यक्ती त्यांच्या कुटुंबांवर आर्थिक आधारासाठी अंशतः किंवा पूर्णतः अवलंबून असतात. पितृप्रधान संस्कृतीमध्ये सर्वसाधारणपणे त्यांची जबाबदारी मुलावर किंवा मुलांवर पडते. दैनंदिन आणि वैद्यकीय गरजा भागवण्यासाठी सर्वच वृद्ध व्यक्तींना निवृत्तीवेतनासारखा स्रोत उपलब्ध असतोच असे नाही. त्यामुळे काही वृद्ध व्यक्ती आर्थिक आधार आणि मदत यांसाठी कुटुंबातील इतर व्यक्तींवर अवलंबून असतात.

**(५) सहानुभूतीचा अभाव :** व्यस्त वेळापत्रके, जीवनपद्धतीमधील यांत्रिकता, भौतिक सुखांची हाव यामध्ये अडकलेल्या जगात जगणारे लोक बहुतेक वेळा वृद्धांच्या गरजांकडे लक्ष देण्यास उत्सुक नसतात. कुटुंबातील सदस्य किंवा नातेवाईकही सहसा वृद्धांच्या समस्यांवर घरच्या घरीच आपापल्या सोयीने तुजबी उपाय शोधण्याच्या मागे असतात. घरातील तरुण मुले, प्रौढ किंवा काळजी घेणाऱ्या इतर व्यक्तींना वृद्धांच्या समस्या नीटपणे समजून घेता येत नाहीत. वृद्धांना वागवताना त्यांच्याकडून जबरदस्ती केली जाण्याची शक्यता असते.

**(६) मानसिक आरोग्याच्या समस्या :** यामध्ये अस्वस्थता आणि नैराश्य या समस्यांचे प्रमाण वृद्धांमध्ये अधिक असल्याचे दिसते. या समस्यांच्या बरोबरीने आपण कुटुंब, मित्र आणि नातेवाईकांना भार झालो आहोत, अशी अपराधी भावनाही अनेकांमध्ये बळावलेली दिसते. मात्र आता या समस्यांमधून बाहेर पडण्यासाठी मानसोपचार घेण्याबद्दलचे गैरसमज कमी होत असून त्याबद्दलचा नकारात्मक दृष्टिकोन बदलत आहे.

**(७) आरोग्यसेवांच्या उपलब्धतेचा अभाव :** अनेकदा शारीरिक किंवा मानसिक आजारांच्या उपचारासाठी उपलब्ध असलेल्या आरोग्यसेवांचा लाभ घेणे वयोवृद्ध व्यक्तींना शक्य होत नाही. विशेषत्वाने वृद्धांमध्ये आढळणाऱ्या कंपवात (Parkinson's) स्मृतीभ्रंश (Alzheimer's), अनियमित मलत्याग (Irritable Bowel Syndrome), मूत्राशयाच्या स्नायूंची शिथिलता (Incontinence) अकार्यक्षमता यांसारख्या शारीरिक आणि मनोविदलता (Schizophrenia), द्विध्रुवीय मनोविकार (Bipolarity), पराकोटीच्या वैफल्यातून आलेले नैराश्य (Depression), कंटाळा, आदरास पात्र नसल्याची भावना यांसारख्या मानसिक आरोग्याच्या समस्यांच्या उपचारासाठी पुरेशा सुविधांचा अभाव असतो. तसेच जिथे या सुविधा उपलब्ध आहेत तिथे जाऊन त्यांचा लाभ घेणे अनेक वृद्धांना शक्य होत नाही.

**(८) वृद्धाश्रमांची अपुरी संख्या :** देशातील वृद्धाश्रमांची संख्या खेदजनक वाटावी इतकी अपुरी आहे. जे थोडेफार वृद्धाश्रम आहेत ते समाजातील अनेक गरीबांना परवडण्याजोगे नाहीत. जे वृद्धाश्रम चालवले जातात त्यांमध्ये आवश्यक सोयीसुविधांचा अभाव असल्याचे आढळते, तसेच वृद्धांची काळजी घेताना त्यामध्ये आपुलकीचा अभाव असतो. या गोष्टींमागे असलेली व्यापारी वृत्ती आणि हाव दृष्टिआड करता येणार नाही.

**(९) दुर्बल घटक :** भारतीय समाजातील दुर्बल घटकांमधील वयोवृद्ध व्यक्तींची परिस्थिती तर अधिकच वाईट आहे. यांमध्ये स्त्रिया, समलैंगिक, उभयलैंगिक, तृतीयपंथी आणि अपंग व्यक्तींचा समावेश होतो. एकटी राहणारी स्त्री, शारीरिक, मानसिक आणि भावनिक दृष्ट्या सक्षम नसलेल्या व्यक्तींच्या बाबतीत अनेकदा सेवाशुश्रुषा करण्यास मनुष्यबळ उपलब्ध नसते.

**(१०) शोषण :** व्यक्तिगत स्वच्छता राखणे, बँक आणि कायदेशीर व्यवहार यांच्या दस्तावेजांवर सही करणे यांसारख्या गोष्टींसाठी दुसऱ्यांवर अवलंबून असणाऱ्या वयोवृद्ध व्यक्ती अनेकदा शोषणाला बळी पडण्याची शक्यता असते.

### ज्येष्ठ नागरिक/वयोवृद्ध यांच्या समस्यांवरील उपाययोजना

**(१) सरकारची भूमिका :** वृद्धांच्या देखभालीसाठी धोरण आखणे आणि त्याची अंमलबजावणी करणे ही केंद्र सरकारच्या अखत्यारीतील 'सामाजिक न्याय आणि अधिकारिता विकास' खात्याची जबाबदारी असते. ही जबाबदारी राज्य सरकारे, सेवाभावी संस्था आणि नागरी समाज यांच्या साहाय्याने पार पाडली जाते.

**(२) सरकारी धोरणे :** जानेवारी १९९९ मध्ये वृद्ध व्यक्तींच्या स्वास्थाची काळजी घेण्यासाठी राष्ट्रीय धोरण जाहीर करण्यात आले. वृद्ध व्यक्तींना आश्रय देणाऱ्या वृद्धाश्रमांची निर्मिती करणे, वृद्धांना आधार देणे, वृद्धांच्या समस्यांबाबत समाजामध्ये जागृती करणे, आरोग्यकेंद्रांमधून वृद्धांसाठी आवश्यक असणाऱ्या सेवा-सुविधा पुरवणे, असुरक्षित घटकांच्या सुरक्षिततेची व्यवस्था करणे वगैरे गोष्टींसाठी राज्यसरकारांकडून मिळणारे सहकार्य या धोरणामध्ये गृहीत धरलेले आहे.

**(३) अंमलबजावणीची योजना :** वृद्धांसाठी जाहीर केलेल्या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी असलेली यंत्रणा मंत्रिमंडळातील विविध मंत्र्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या खात्यांच्या एका समन्वयित समितीद्वारे राबवली जाते.

**(४) सेवाभावी संस्थांची भूमिका :** भारतातील बिगरसरकारी सेवाभावी संस्थांनी वृद्धांच्या साहाय्यासाठी मोलाची कामगिरी बजावली आहे. उदाहरणार्थ, 'हेल्पएज इंडिया', 'हार्मनी इंडिया', 'दादा दादी', 'डिग्निटी फाउंडेशन', 'नाईटिंगेल्स मेडिकल ट्रस्ट', 'सीनेजरर्स' इत्यादी. आता या कामाला बळ देण्यासाठी आंतरजालाद्वारे काम करणारे गट स्थापन झालेले आहेत.

**(५) शिक्षणव्यवस्थेची भूमिका :** सामूहिक सेवाप्रकल्पांच्या माध्यमातून (कम्युनिटी सर्व्हिस प्रोजेक्ट्स) किंवा संपर्कयोजनांद्वारे (आऊटरिच प्रोग्रॅम्स्) किंवा सामाजिकदृष्ट्या उपयुक्त उत्पादनाच्या कार्यातून (सोशली युजफुल प्रॉडक्टिव्ह वर्क) आणि एन.एस्.एस्. द्वारे शाळांना ज्येष्ठ नागरिक, वयोवृद्ध यांच्या समस्यांच्या बाबतीत प्रबोधनाचे कार्य करता येणे शक्य आहे. असे कार्यक्रम राबवल्यामुळे वृद्धांच्या शारीरिक, भावनिक, आर्थिक, मानसिक आणि वैद्यकीय गरजांबद्दल समाजात जागृती निर्माण होईल आणि समाजामध्ये त्याबद्दलची योग्य मूल्ये रुजू शकतील.

**(६) कुटुंबाची भूमिका :** कुटुंबातील सर्वच सदस्य नातेवाईकांनी कुटुंबात पोषक वातावरण ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींकडे असणाऱ्या अनुभवाचा व जाणतेपणाचा आदर केला पाहिजे. त्यांना घर, शेजारपाजार आणि समाजामध्ये घडणाऱ्या गोष्टींमध्ये सामावून घेतले जावे असे वातावरण निर्माण करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे.

**तुमची प्रगती तपासून पहा.**

१. वृद्धांच्या संदर्भातील कोणत्याही तीन समस्यांचे वर्णन करा.

२. वृद्धांच्या समस्यांवरील तीन उपाययोजना सांगा.

**कृती २**

१० विद्यार्थ्यांचा एक असे गट तयार करा. प्रत्येक गटाने आसपासच्या परिसरातील १० व्यक्तींची निवड करा. त्यांच्या मुलाखती घेण्यासाठी प्रश्नावली तयार करा. त्याचा उपयोग करून घेतलेल्या मुलाखतींमधून कुटुंब, कुटुंबातील सदस्यांची संख्या, प्रत्येकाची शैक्षणिक पात्रता, प्रत्येकाचा व्यवसाय-धंदा इत्यादी गोष्टींची माहिती मिळवा. साधारणपणे १० ते १५ पृष्ठांचा वृत्तांत तयार करा आणि वर्गात त्याचे सादरीकरण करा.

## ६.३ बेरोजगारी

**खाली दिलेली आकडेवारी पहा.**

| विभाग | उपलब्ध नोकऱ्या | अर्जदारांची संख्या |
|---|---|---|
| पशुपालन | ७२९ | ३.३ लाख |
| अर्थखाते | ९३२ | १.७ लाख |
| वनविभाग | ९५१ | ४.०२ लाख |
| महसूल विभाग | १,८०२ | ५.६४ लाख |
| एकूण | ४.४१४ | १४.६६ लाख |

(Source: Times of India, Mumbai Edition, 21/08/2019 P-1)

वरील आकडेवारीतून हे स्पष्ट दिसते की उपलब्ध नोकऱ्यांपेक्षा अर्जदारांची संख्या कितीतरी पटींनी अधिक आहे. ज्या अर्जदारांची निवड होणार नाही त्यांचे काय होईल, याची तुम्ही कल्पना करू शकता का? त्यातील काहींना नोकरी मिळेल, परंतु कदाचित ती त्यांच्या पात्रतेशी जुळणारी नसेल, काहीजण स्वतःचा व्यवसाय सुरू करतील, परंतु त्यातील बहुसंख्य रोजगाराच्या संधीपासून वंचित राहतील. यावरून बेरोजगारीच्या समस्येची गंभीरता लक्षात येईल.

### बेरोजगारीचा अर्थ

जेव्हा जेव्हा बेरोजगारीची चर्चा होते तेव्हा मुख्यतः ज्यांना नोकरी किंवा व्यवसायाची संधी मिळालेली नाही अशा लोकांचा संदर्भ दिला जातो. तसेच त्यामध्ये फक्त १५-५९ या वयोगटातील लोकांनाच विचारात घेतलेले असते. 'बेरोजगार' या संज्ञेची व्याख्या "ज्या व्यक्ती रोजगार शोधण्याच्या प्रयत्नात आहेत आणि सेवा देण्यासाठी उपलब्ध आहेत, परंतु तशा प्रकारच्या कोणत्याही संधीपासून वंचित राहिलेल्या आहेत, अशा व्यक्ती", अशी केली जाते. नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑफिस (NSSO) या संस्थेने केलेल्या 'द पिरिऑडिक लेबर फोर्स सर्व्हे (PLFS)' या पाहणीच्या अहवालानुसार ग्रामीण भारतातील बेरोजगारीचे प्रमाण ५.३% इतके तर शहरी भागात ७.८% इतके आहे. आर्थिक वर्ष २०१८ मध्ये संपूर्ण भारतातील रोजगारीचे प्रमाण ६.१% इतके होते. NSSO च्या अहवालानुसार ज्या व्यक्तीला एका आठवड्यात १४ तासांहून अधिक, वेतन मिळवून देणारे काम मिळत नाही अशी व्यक्ती 'बेरोजगार' असते. औद्योगिक क्षेत्रातील मंदी हे बेरोजगारीचे एक कारण असू शकते. पर्यटन, सागरी वाहतूक, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, बांधकाम, कापड उद्योग यांसारख्या क्षेत्रांमध्ये जागतिक अर्थव्यवस्थेत असमतोल निर्माण झाल्यास थोड्या काळासाठी मंदीची लाट येते.

### बेरोजगारीची कारणे

बेरोजगारीची कारणे अनेक गोष्टीतून उद्‌भवलेली असू शकतात.

**(१) आवश्यक कौशल्यांचा अभाव :** बऱ्याचदा अशी परिस्थिती असू शकते की औद्योगिक किंवा संयुक्त व्यापारी क्षेत्रामध्ये उपलब्ध असणाऱ्या नोकऱ्यांसाठी आवश्यक असलेली कौशल्ये आणि अर्जदाराने प्राप्त केलेली कौशल्ये यांचा मेळ बसत नाही. अशा व्यक्ती बेरोजगार राहतात किंवा त्यांच्या पात्रतेपेक्षा कमी पात्रतेची आवश्यकता असलेल्या जागांवर नोकरी करत राहतात. तसेच तंत्रज्ञानात वेगाने होणाऱ्या प्रगतीमुळे अनेक कामगारांची कौशल्ये अनावश्यक ठरतात आणि त्यामुळे ते बेरोजगार होतात. उदाहरणार्थ, टंकलेखनाची सरकारी परीक्षा आता आंतरजालस्थळाचा वापर करून घेतली जाते. पूर्वीप्रमाणे टंकलेखनाचे यंत्र वापरून टंकलेखन करण्याचे कौशल्य आता कालबाह्य आणि अनावश्यक ठरले आहे.


**(२) नोकऱ्या बदलणे :** जेव्हा एखाद्या व्यक्तीची नोकरी काही कारणाने सुटते किंवा व्यक्ती एक नोकरी सोडून दुसऱ्या नोकरीच्या शोधात असते, तेव्हा मधल्या

काळात ती बेरोजगार असते. उदाहरणार्थ, पावसाळ्यात शेतीच्या कामात गुंतलेला शेतकरी कापणीनंतर रिकामा असतो. त्या काळात तो बेरोजगार असतो आणि अनेक शेतकऱ्यांना तात्पुरत्या मजुरीच्या शोधावर शहरांकडे जावे लागते. त्या काळात खेड्यांमधून शहरांकडे येणाऱ्यांचा ओघ वाढतो.

**(३) अर्थव्यवस्थेतील चढउतार :** जागतिक अर्थव्यवस्थेत चढ-उतार होत असतात. उदाहरणार्थ, बांधकाम आणि गृहनिर्माण क्षेत्रात प्रचंड मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या उलाढालींचा काळ आणि त्यानंतर मंदीचा काळ असे चक्र अपरिचित नाही. मंदीच्या काळात कामगारांच्या हातात काम नसण्याची शक्यता मोठी असते. ज्या वेळेस अर्थव्यवस्था चढतीवर असते तेव्हा नोकऱ्यांची उपलब्धता वाढते.

**(४) हंगामानुसार बदलणारी स्थिती :** काही उद्योगक्षेत्रांमध्ये ठराविक काळातच कामगारांची आवश्यकता असते. त्यानुसार त्या क्षेत्रातील नोकऱ्यांचा हंगाम ठरतो. उदाहरणार्थ, कृषीक्षेत्र, बँकिंग आणि सागरी वाहतूक. अशा काळात होणाऱ्या स्थलांतरांचा शहरांतील बेरोजगारीच्या स्थितीवर प्रभाव पडतो. भारतातील कृषीक्षेत्र मोसमी पावसावर अवलंबून असल्यामुळे त्या क्षेत्रातील रोजगार हंगामी असतो.

**(५) मागणी आणि पुरवठा यांतील तफावत :** अनेक उद्योगांमध्ये नोकरी मिळवण्यासाठी इच्छुक असणाऱ्या पात्र उमेदवारांची संख्या आणि नोकरीच्या उपलब्ध असणाऱ्या संधी यांमध्ये मोठी तफावत असते. अनेक सुशिक्षित बेरोजगारांना पांढरपेशा नोकरी मिळावी अशी इच्छा असते आणि ते साहजिकच इतर प्रकारची नोकरी करण्यास उत्सुक नसतात.



बेरोजगारीचे संकट

## बेरोजगारीचे परिणाम

सर्वसाधारणपणे उत्पन्नाचा एक स्थिर स्रोत ज्यायोगे खर्चासाठी निधी उपलब्ध होईल आणि भविष्यातील तरतुदीसाठी बचत करता येईल या दृष्टीने बहुतेकांना नोकरी करण्याची इच्छा असते. परंतु वास्तव मात्र असे आहे की 'उत्पादनक्षम वयोगटांतील' अनेकजणांना नोकरी नसते. भारत सरकारच्या जनगणना खात्याने केलेल्या व्याख्येनुसार १५-५९ हा वयोगट उत्पादनक्षम असतो. भारतीय समाजाच्या संदर्भात विचार केला तर १२ वीत शिक्षण घेणारे तुमच्यापैकी बहुतेकजण १६-१७ या वयोगटातील आहात. ते नोकरी करत नाहीत किंवा त्यांच्याजवळ उत्पन्नाचा दुसरा स्थिर स्रोतही नाही. ते आर्थिक गरजांसाठी त्यांच्या कुटुंबावर अवलंबून आहेत. पुढील काही वर्षे स्वतंत्रपणे अर्थार्जन करू लागेपर्यंत त्यांचे आर्थिक परावलंबित्व तसेच राहणार आहे. मुलींच्या बाबतीत असे दिसते की, बहुसंख्य कुटुंबांमध्ये त्यांना शिक्षण देण्याच्या गरजेची जाणीव निर्माण होत आहे, परंतु ती जाणीव म्हणावी इतकी तीव्र नाही. अनेक कुटुंबांमध्ये स्त्रियांनी घराबाहेर पडून अर्थार्जन करावे याला विरोध असतो. अशा तऱ्हेने १५-५९ वयोगटांतील उत्पादनक्षम व्यक्ती मोठ्या संख्येने बेरोजगार असण्याचे परिणाम काय असू शकतात, ते पाहूया.

**(१) उपयोगात न आणलेले मनुष्यबळ :** प्रत्येक कुशल-अकुशल उत्पादनक्षम व्यक्ती समाजात उपलब्ध असलेल्या मौल्यवान मनुष्यबळाचा हिस्सा असते. बेरोजगार प्रौढ व्यक्ती समाजात बहुसंख्येने असणे हे समाजहिताच्या दृष्टीने योग्य नव्हे कारण त्या समाजाच्या अर्थव्यवस्थेत काही भर घालू शकत नाहीत. उलट आर्थिकदृष्ट्या ते इतरांवर अवलंबून असतात.

**(२) शैक्षणिक संधीचा अपव्यय :** सुशिक्षित, प्रशिक्षित असूनही बेरोजगार असणाऱ्या अनेक व्यक्ती असतात. असेही असू शकते की त्यांना मिळालेले शिक्षण किंवा प्रशिक्षण नोकरी मिळवून देण्यास उपयोगी नसते. हे खरे आहे की अनेक शैक्षणिक अभ्यासक्रम औद्योगिक क्षेत्राच्या गरजा पाहता कालबाह्य झालेले आहेत. भारत सरकार शिक्षणक्षेत्रासाठी करोडो रुपये खर्च करते आणि तरीही शिकून बाहेर पडणाऱ्या तरुणांजवळ आवश्यक कौशल्याचा अभाव असतो किंवा ते

रोजगारक्षम झालेले नसतात, असे दिसते.

**(३) शैक्षणिक पात्रता सुसंगत नसणे :** ज्या क्षेत्रातले उच्च शिक्षण किंवा प्रशिक्षण घेतले आहे त्या क्षेत्रात नोकरी न मिळाल्यामुळे उच्च शिक्षणाची आवश्यकता नसलेल्या प्रशिक्षित क्षेत्रापेक्षा वेगळ्या क्षेत्रांमध्ये नोकरी करणाऱ्या तरुणांची अनेक उदाहरणे आहेत. उदाहरणार्थ, विद्यावाचस्पती पदवी (Ph.D) प्राप्त केलेली असताना कारकून म्हणून काम करणे.

**(४) समाजविरोधी कारवाया :** मनुष्याच्या सहनशीलतेला काही मर्यादा असतात. संधीच्या अभावामुळे कधीकधी माणसाची सहनशक्ती संपुष्टात येऊ शकते आणि योग्य संधीच्या अभावामुळे लोक नकळत समाजविरोधी कारवायांकडे वळू शकतात. शालेय शिक्षण अपुरे सोडलेली किंवा सोडावे लागलेली मुले अर्थार्जनासाठी गुन्हेगारी जगताकडे ओढली जातात.

**(५) मानसिक आरोग्यावर परिणाम :** बेरोजगारीला कंटाळल्यामुळे काहीजण पराकोटीच्या वैफल्याने ग्रासले जातात. वैफल्यामुळे आयुष्याकडे नकारात्मक दृष्टीने पाहू लागतात. त्यांतील काही एकटेपणाला सामोरे जातात किंवा आत्महत्येस प्रवृत्त होतात.

**(६) राष्ट्राच्या विकासावर प्रतिकूल परिणाम :** राष्ट्राच्या विकासाचा विचार करता वाढत्या बेरोजगारीचा दीर्घकालीन परिणाम काय होऊ शकतो, याचा विचार तुम्ही कधी केला आहे का? समाजाचे भवितव्य घडवण्यात तरुण पिढीचा वाटा महत्त्वाचा असतो. अनेक तरुण मंडळी बेरोजगारीमुळे त्रस्त असणे, ही गोष्ट राष्ट्राच्या विकासावर प्रतिकूल परिणाम करणारी असते.

### बेरोजगारीवर उपाय

**(१) शिक्षणपद्धतीमध्ये बदल :** शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये आणि शिक्षणपद्धतीत बदल करण्याची आवश्यकता आता निर्माण झाली आहे. ही जबाबदारी ज्यांच्या खांद्यावर आहे अशा तज्ज्ञांनी अधिक खुल्या दृष्टीने या प्रश्नाकडे पाहण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांच्या निवडीसाठी त्यांची आवड, गरज यांप्रमाणे अधिक पर्याय उपलब्ध करून द्यायला हवेत, ते विद्यार्थिकेंद्रित असायला हवेत. शैक्षणिक कार्यक्रम आखताना जर समाजाच्या गरजा, स्थानिक गरजा, उद्योगक्षेत्राच्या गरजा विचारात घेतल्या गेल्या तर बदलत्या काळाला समर्थपणे सामोरे जाऊ शकणारे मनुष्यबळ विकसित होईल.

### हे माहिती हवे

**स्टार्टअपस् :**

स्टार्टअपस् म्हणजे नेमके काय? स्टार्टअपस् ही एक किंवा अधिक उद्योजकांनी सुरू केलेली एक प्रथमावस्थेतील कंपनी असते. एखादे आगळ्यावेगळ्या उत्पादनाच्या किंवा सेवेच्या कल्पनेचे बीज घेऊन हे उद्योजक बाजारात उतरतात. अशा उद्योजकांना निधी उपलब्ध करून देणाऱ्या भांडवलदारांना 'इनक्युबेटर्स' असे म्हटले जाते. (ते स्टार्टअपस् उद्योग सुरू करण्यासाठी आणि बाजारात यशस्वी होण्यासाठी मदत करतात.)

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील उद्योजकांनी स्टार्टअप उद्योगांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले आहे.

तुम्हांला माहीत असू शकेल अशा काही स्टार्टअपस्‌ची नावे पुढे दिली आहेत :

ओएलए (ओला OLA), फ्लिपकार्ट, मेक माय ट्रिप, शॉपक्लूज, ट्राझू, झोमॅटो.

**(२) कौशल्यांचा विकास :** आताच्या शिक्षणपद्धतीत विद्यार्थी जे शिकतो ते ज्ञानाभिमुख असते. ज्ञानाचे शिक्षणपद्धतीमधील स्थान अत्यंत मोलाचे असले तरी व्यवसायाभिमुख कौशल्यांच्या प्रशिक्षणाची गरजही अत्यंत निकडीची आहे. त्यामुळे उत्तम रोजगाराच्या संधींचा लाभ घेणे स्वयंरोजगार निर्माण करणे किंवा उद्योजक बनून इतरांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे या गोष्टी कौशल्याभिमुख अभ्यासामुळे शक्य होतील. उदाहरणार्थ, 'राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान' (RUSA) हा कार्यक्रम. उच्च शिक्षणाच्या संस्थांना रोजगाराच्या विविध क्षेत्रांमधील 'क्षमता बांधणी' विकसित करण्यासाठी समर्थ बनवणे हे या कार्यक्रमाचे ठळक वैशिष्ट्य आहे.

**(३) व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम :** शिक्षणपद्धतीमध्ये व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांना

प्राधान्य देणे ही अनेक वर्षांची गरज आहे. तसे झाल्यास विद्यार्थ्यांना तांत्रिक व्यवसायांच्या शिक्षणाचा पर्याय निवडणे शक्य होईल. २०२० च्या शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक स्तरापासूनच व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांना असे प्राधान्य देण्यात आले आहे.

**(४) औद्योगिक क्षेत्र आणि शिक्षण क्षेत्र यांचा सहयोग :** औद्योगिक संस्था आणि शैक्षणिक संस्था यांच्या सहयोगातून काही शैक्षणिक कार्यक्रम हाती घेणे याबद्दल चर्चा होत आहेत. काही संस्थामधून असे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्यामध्ये विज्ञान, अभियांत्रिकी, औषध निर्मिती, वैद्यकीय, तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे, फॅशन डिझायनिंग आणि व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रांचा समावेश आहे.

**(५) उद्योजकता आणि स्वयंरोजगार निर्मिती :** भारत सरकार तरुणांना वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये स्वतंत्र उद्योग सुरू करण्यासाठी उत्तेजन देत आहे. ज्या तरूणांची आव्हानांना तोंड देण्याची आणि धोके पत्करण्याची तयारी असते त्यांच्यासाठी ही सुवर्णसंधी आहे. स्वयंरोजगार हासुद्धा बेरोजगारीवरील एक उपाय आहे.

**तुमची प्रगती तपासून पहा.**

१. तुमच्या मते बेरोजगारीची समस्या आटोक्यात आणण्यासाठी आपल्या शिक्षणपद्धतीद्वारे काय उपाययोजना करता येईल.

२. लोकशाही समाजासाठी बेरोजगारी अहितकारी का आहे? दोन कारणे द्या.

३. "लोकसंख्येची वाढ आणि बेरोजगारी यांच्यामध्ये जवळचे नाते आहे". चर्चा करा.

**हे माहिती हवे**

**खालील सरकारी योजनांची माहिती शोधा.**

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS) - २००९
- प्रधानमंत्री कुशल विकास योजना (PMKVY) - २०१५
- स्टार्टअप इंडिया इनिशिएटिव्ह - २०१६

**उपक्रम ३**

तुमच्या परिसरातील २२-३० या वयोगटांतील पाच नोकरदार व्यक्तींच्या मुलाखती घ्या. त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी, त्यांचे कामाच्या जागेतील अनुभव आणि त्यांच्या आशाआकांक्षा या गोष्टींची माहिती घ्या. तुम्हांला त्यात काही साम्य दिसते का? वर्गात चर्चा करा.

## ६.४ शेतकऱ्यांच्या आत्महत्या

भारताचे वर्णन कृषिप्रधान देश असे केले जाते. भारतातील ७०% लोक कृषी आणि कृषी क्षेत्राशी संबंधित व्यवसायात काम करतात. त्यामध्ये शेतकऱ्यांची संख्या अधिक आहे. गेल्या दशकात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही अत्यंत गंभीर सामाजिक समस्या आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची समस्या निर्माण होण्यास जबाबदार असणारी कारणे पाहूया.

### शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागील कारणे

**(१) पर्यावरणाच्या ऱ्हासाचा परिणाम :** गेल्या काही वर्षांमध्ये नैसर्गिक पर्यावरणाच्या सुरक्षिततेसंदर्भात खूप चिंता व्यक्त केली जात आहे. मानवप्राणी निसर्गाकडून अधिकाधिक लाभ मिळवण्याच्या प्रयत्नात असतात. बेसुमार जंगलतोड, नैसर्गिक स्रोतांचा प्रमाणाबाहेर उपयोग, 'विकासासाठी' वैशिष्ट्यपूर्ण नैसर्गिक स्थळांचा विनाश, वाढते प्रदूषण आणि ओझोन वायूचा थर पातळ होण्यास कारणीभूत असणारे हरितगृह वायूंचे उत्सर्जन, याच्या परिणामामुळे वितळू लागलेले बर्फाचे ध्रुवीय आवरण, तसेच हवामानातील अनपेक्षित बदल या सर्व गोष्टींचा अंतिम परिणाम नैसर्गिक पर्यावरणाचा ऱ्हास होण्यात होतो. देश आणि महाराष्ट्रामध्ये एका भागात महापूर आणि त्याच वेळी दुसऱ्या भागात अवर्षण या घटना पर्यावरणाच्या ऱ्हासाची निदर्शके आहेत. अशा परिस्थितीत पिकांचे अतोनात नुकसान होते. शेतकऱ्यांचे अर्थार्जनाचे मार्ग बंद होऊन प्रतिकूल परिस्थिती निर्माण होते.

**(२) जागतिकीकरणाचा परिणाम :** हे खरे आहे की आपले दैनंदिन जीवन आता जागतिकीकरणाच्या

प्रभावाखाली आलेले आहे. जागतिकीकरणामुळे बाजारीकरण आणि चंगळवाद यांमध्ये वाढ झाली आहे. एकंदरीत भौतिकवादी व्यवस्थेत नफेखोरी वृत्तीला चालना मिळाली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत परदेशी मालाचा शिरकाव झाल्यामुळे स्थानिक मालाच्या खपावर परिणाम झाला आहे. खुल्या बाजारपेठांमुळे परदेशी कृषीमाल भारतात मोठ्या प्रमाणावर आयात केला जातो. त्यामुळे भारतातील कृषीमालाच्या खपावर प्रतिकूल परिणाम होतो.

**(३) कर्जबाजारीपणा :** शेतकरी प्रतिकूल परिस्थितीमधून बाहेर पडण्यासाठी बहुतेक वेळेला सरकारी संस्था, बँका किंवा सावकार यांच्याकडून कर्ज घेतात; परंतु जर पीक नीट आले नाही तर घेतलेले कर्ज फेडणे त्यांना अनेकदा शक्य होत नाही. नापिकीमुळे आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी अखंड कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले आयुष्य जगत राहतो. शेतकऱ्यावर या परिस्थितीचे असह्य ओझे होते. यातील बरेचजण कुटुंबाचे एकमेव कमावते पुरुष सदस्य असतात. कर्त्या पुरुषाच्या मनावर असलेल्या या ओझ्यामुळे कळत नकळत घरातील पुढच्या पिढीवरही दडपण येऊ लागते. अशा निराशाजनक परिस्थितीत काही शेतकरी आत्महत्येचा निर्णय घेतात. याशिवाय महागडे बियाणे विकत घेण्यासाठी शेतकऱ्याला पुन्हा पुन्हा कर्ज घ्यावे लागते. त्यातून शेतकरी अधिकाधिक कर्जबाजारी होत जातो.

**हे माहिती हवे**

महाराष्ट्राच्या विदर्भ प्रदेशामधील शेतकऱ्यांनी कापसाचे उत्पादन वाढावे म्हणून बीटी (Bacillus thuringiensis) या नावाने ओळखले जाणारे सुधारित वाणाचे महागडे बियाणे वापरायला सुरुवात केली.

मात्र बीटी बियाणासाठी सिंचनाची उत्तम सोय असणे आवश्यक असते. ते नेहमीच, विशेषतः मोसमी पाऊस अपुरा झाला तर, शक्य होतेच असे नाही. अशा परिस्थितीत पिकाचे नुकसान होते. एवढेच नव्हे तर प्रत्येक लागवडीसाठी बीटी बियाणे नव्याने विकत घ्यावे लागते.

**(४) अज्ञान :** कृषी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान आणि लागवडीच्या पद्धती यांची माहिती शेतकऱ्यांना असतेच असे नाही. हे अज्ञान शेतकऱ्यांच्या प्रगतीमधील एक मोठा अडथळा आहे.

**(५) जमिनमालकीची विषमता :** भारतातील शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनीचा निकष लावला तर असे दिसून येते की, ते वेगवेगळ्या भागात विभागले गेले आहेत. जसे की, मोठ्या जमिनीची मालकी असणारे शेतकरी, मध्यम भूधारक शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी आणि भूमिहीन शेतमजूर. जमीनदारांकडे मोठ्या प्रमाणावर शेतजमिनीची मालकी असते. तसेच मध्यम ते छोटे भूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. त्यांच्या तुलनेत मोठ्या जमीनदारांची आर्थिक परिस्थिती सुरक्षित असते. भूमिहीन शेतमजूरांचा एक मोठा गट रोजंदारीसाठी इतरांच्या शेतजमिनीवर अवलंबून असतो.

**(६) हुंडापद्धती :** ग्रामीण भारतातील शेतकरी हुंडापद्धतीच्या प्रथेमुळे खचून गेलेला आहे. अनेकदा ते शेतकामाच्या निमित्ताने ते बँका, पतपेढ्या यांसारख्या संस्था किंवा सावकाराकडून कर्ज काढतात. परंतु कर्जाची रक्कम हुंडा देण्यासाठी आणि खासगी कामासाठी खर्च करून बसतात. हुंडा देणे हा कायद्याने गुन्हा असूनही ही दुष्ट प्रथा थांबलेली नाही. महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा या भागांमध्ये झालेल्या शेतकरी आत्महत्येच्या घटनांमध्ये हे कारण प्रामुख्याने पुढे आलेले आहे.



### शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे परिणाम

**(१) कुटुंबावर होणारा परिणाम :** आत्महत्या करणारा शेतकरी जर कुटुंबाचा एकमेव मिळवता सदस्य असेल तर तो अर्थातच कुटुंबातील इतरांसाठी, विशेषतः त्याच्या बायकामुलांसाठी, एक जन्मभराचा भावनिक

धक्का असतो. त्यांचा आर्थिक आणि भावनिक आधारच गळून पडतो.

**(२) पत्नीवरील परिणाम :** कदाचित शेतकऱ्याच्या पत्नीला अर्थार्जनाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारावी लागते. बहुतेकदा तिच्याजवळ काही विशेष कौशल्य नसते. पुरेसा अनुभव नसतो. अशा परिस्थितीत शारीरिक कष्टांची कामे करणे हा एकच पर्याय तिच्यापुढे शिल्लक राहतो.

**(३) मुलांवरील परिणाम :** मुलांनाही, अपरिपक्व वयात नवीन जबाबदाऱ्या उचलण्याची वेळ येते. काहींना शिक्षण अर्धवट सोडणे भाग पडते. पर्यायाने शाळेतील विद्यार्थी गळतीची संख्या वाढत जाते. एक पालक गमावण्याचे मुलांच्या मनावर उमटणारे वण अनेक प्रकारचे असतात.

**(४) अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम :** गावातील एखाद्याच शेतकऱ्याने आत्महत्या केली, तरी गावातील इतरांचे धैर्य कमी करण्यास ती घटना पुरेशी असते, हे उघड आहे. त्यामुळे तयार झालेले नैराश्याचे वातावरण गावातील तरुण मुलांना एक व्यवसाय म्हणून शेतीचा स्वीकार करण्यापासून परावृत्त करणारे असते. त्यातील अनेकजण कामाच्या शोधासाठी शहराकडे जाण्याचे ठरवतात. जर शेतीव्यवसाय हा तरुणांना आकर्षित करू शकला नाही तर त्याचा दीर्घकालीन परिणाम काय असू शकतो याची कल्पनाच न केलेली बरी.

**(५) सामाजिक वातावरणावर होणारा परिणाम :** एका शेतकऱ्याच्या आत्महत्येचा किंवा आत्महत्येच्या प्रयत्नाचा गावातील इतर रहिवाशांच्या मनावर होणारा परिणाम असहाय्यता, भावना, भय, लाज आणि न्यूनगंड या भावनांचे मळभ सर्व गावावर पसरून गावातील वातावरण दूषित होते. त्यामुळे गावातील लोकांचे मनोधैर्य खचु शकते. राज्यातील विशिष्ट भागातील किंवा एकंदरीतच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या वाढत्या संख्येमागील हे वास्तव आहे. एखाद्या राज्याची राज्याबाहेरील प्रतिमाही अशा घटनांमुळे डागाळते.

### शेतकरी आत्महत्या थांबवण्याचे उपाय

**(१) संकटग्रस्त शेतकऱ्यांना आधार देण्याची व्यवस्था :** अवर्षण, नापिकी, कर्जबाजारी स्थिती यांसारख्या आपत्ती शेतकऱ्यांवर कोसळतात तेव्हा त्यांना आर्थिक आणि मानसिक आधार देण्यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था असणे आवश्यक आहे.

**(२) विमा :** नैराश्यजनक परिस्थितीत असलेल्या शेतकऱ्याला आणि त्याच्या कुटुंबातील सदस्यांना दिलासा मिळावा यासाठी आयुर्विमा तर नापिकीच्या आणि किडीच्या नुकसानीसाठी शेतीचा पीक विमा मिळायला हवा.

**(३) शेतकरी ते ग्राहक थेट विक्री योजना :** ग्रामीण भागात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा माल विक्रीसाठी भारताच्या अनेक भागांमध्ये पाठवला जाऊ शकतो. त्यासाठी दूरवरच्या बाजारपेठा आणि शेतकरी यांच्यामध्ये मध्यस्थांची, दलालांची साखळी उभी राहते. विक्रीतील नफ्याचा सर्वाधिक हिस्सा या मध्यस्थ आणि दलालांच्या खिशात जातो. शेतकऱ्याच्या, विशेषतः अल्पभूधारक शेतकऱ्याच्या वाट्याला नफ्यातील फारच कमी हिस्सा येतो. मध्यस्थ आणि दलाल यांचे महत्त्व कमी करणाऱ्या 'शेतकरी ते ग्राहक थेट विक्री योजना' शेतकऱ्यांचे शोषण थांबवू शकतील.

**(४) पाण्याचा संचय (पाणीसाठा) :** सिंचन ही शेतीची मूलभूत गरज आहे. मात्र भारतात पूर, अवर्षण हे नेहमीचेच आहे. त्या पार्श्वभूमीवर पावसाच्या पाण्याचा संचय आणि पाण्याचे व्यवस्थापन काळजीपूर्वक होणे आवश्यक आहे. पाण्याचा संचय करण्याची जबाबदारी फक्त सरकारची आहे अशी मनोधारणा चुकीची आहे. त्यासाठी विविध संस्था आणि व्यक्तीगत पातळीवर लोकांनीही पुढे येणे गरजेचे आहे.

**(५) बँकांची भूमिका :** बँका तसेच सहकारी पतपेढ्या यांनी कर्जवितरणाचे त्यांचे नियम आणि अटी शेतकऱ्याला जाचक ठरू नयेत हे पाहणे जरूरीचे आहे. तसेच शेतकऱ्यांना बचतीची सवय व्हावी म्हणून प्रयत्न करणेही गरजेचे आहे. बँका आणि आर्थिक निधीचा पुरवठा करणाऱ्या इतर संस्थांकडून कर्ज मिळवण्यातील कायदेशीर अडचणींमुळे शेतकऱ्यांना नाईलाजाने सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते. अशा परिस्थितीत सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनांचा त्यांना फारसा उपयोग होत नाही. ते कायमच कर्जाच्या

ओझ्याखाली दबलेले आणि सावकाराच्या पाशात अडकलेले राहतात.

**(६) आंतरपीकपद्धती :** वर्षातून एकदाच एक पीक घेण्याऐवजी दोनदा किंवा शक्य असल्यास तीनदा पीक घेणे तसेच आंतरपिके घेणे हे अधिक लाभदायक ठरेल. त्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे आणि उत्तम बियाणे, खते, कीटनाशके सवलतीच्या दरात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**हे माहिती हवे**

'आंतरपीक घेणे किंवा मिश्र पीकपद्धती' म्हणजे एकाच शेतात शेतीच्या एका हंगामात दोन किंवा अधिक पिके घेणे. हा बहुविध लागवडीचा प्रकार आहे.

**प्रगती तपासा**

(१) "आंतरपीकपद्धती शेतकऱ्याला लाभदायक ठरते". चर्चा करा.

(२) शेतकऱ्यापुढे सिंचनाची समस्या असते, असे तुम्हांला का वाटते? दोन कारणे द्या.

(३) शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी त्यांना समुपदेशनाची आवश्यकता आहे याचे समर्थन करा.

## ६.५ घरगुती हिंसा

कुटुंबातील व्यक्तींकडून केल्या जाणाऱ्या अत्याचाराला कौटुंबिक हिंसा असे म्हटले जाते. हिंसा ही मानसिक, भावनिक, वाचिक आणि शारीरिक प्रकारच्या छळाच्या स्वरूपाची असते. कौटुंबिक हिंसेमध्ये छळ करणारी आणि त्या छळाला बळी पडणारी अशा दोन व्यक्ती असतात. बहुतेक वेळी कौटुंबिक हिंसेच्या प्रसंगांची नोंद होत नाही कारण ही बाब वैयक्तिक आहे असे समजले जाते आणि पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये असे प्रसंग घडण्यामध्ये काही विपरीत आहे, असे मानले जात नाही. हे लक्षात घ्यायला हवे की कौटुंबिक हिंसेला बळी पडणारी व्यक्ती कुटुंबातील कोणीही असू शकते कौटुंबिक हिंसेमध्ये लहान, मोठे, स्त्री, पुरुष, तृतीयपंथी असे कसलेच भेद उरत नाहीत.

### कौटुंबिक हिंसेची कारणे

**(१) पितृसत्ताक पद्धत :** भारतीय समाज हा मुख्यतः पितृसत्ताक आहे. याचा अर्थ आपल्या समाजात पुरुष आणि इतर यांच्यामध्ये सत्तेचा असमतोल आहे. समाजातील स्त्रियांना हळूहळू प्रतिष्ठा मिळत आहे परंतु तृतीयपंथी व्यक्ती आणि लहान वयाची मुले यांचा दर्जा मात्र अजूनही दुय्यम आहे. पितृसत्ताक पद्धतीमध्ये पुरुषांचा अधिकार गृहीत धरलेला असतो.

**(२) असुरक्षितता :** एका जोडीदाराच्या, विशेषतः पुरुषाच्या मनातील असुरक्षितता दुसऱ्या जोडीदाराविषयीचा संशय बळावणे, अहंकार दुखावला जाणे, अधिकाराला आव्हान दिल्याची भावना निर्माण होणे, दुसऱ्याच्या निष्ठेविषयी शंका वाटणे, अशी विविध रूपे धारण करते. कौटुंबिक हिंसेला जन्म देण्यासाठी अशी कारणे पुरेशी असतात.

**(३) नातेसंबंधातील दुरावा :** जोडप्याचे वैवाहिक नाते किंवा घरातील इतरांचे परस्परांशी असलेले नाते यांच्यात बिघाड निर्माण होण्यासाठी अनेक गोष्टी कारणीभूत असतात. त्यामध्ये एकमेकांविषयी असुरक्षिततेची भावना, संशय, वयातील/पिढीतील अंतर, सांस्कृतिक अंतर आणि एकमेकांशी न पटणे, अशा गोष्टींचा समावेश असतो. त्यातून तिरकस बोलणे, परस्परांविषयीच्या तक्रारी, नावे ठेवणे, अपमानकारक शब्दांचा वापर आणि शारीरिक इजा करणे यांसारख्या गोष्टींची सुरुवात होते.

**(४) परंपरा आणि धार्मिक दृष्टिकोन :** कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, धर्म यांबाबतीत असलेल्या परंपरावादी धारणांमुळे आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांना स्त्रियांपेक्षा प्राधान्य दिले जाते. अशा परिस्थितीत लिंगभेदावर आधारलेल्या सामाजिक व्यवस्थेत व्यक्तीवर लहानपणापासूनच लिंग, वय, अनुभव, अधिकार यांनुसार असलेल्या अपेक्षांची पूर्ती करण्याचे संस्कार केले जातात. त्यामुळे कुटुंबातील हिंसा बिनविरोध स्वीकारली जाते.

**(५) लैंगिक वर्तणुकीसंबंधीचे पारंपरिक संकेत :** लैंगिक वर्तणूक आणि स्त्रीपुरुषांच्या पठडीबद्ध कौटुंबिक

भूमिकांच्या बाबतीतील संकेतांच्या विरोधी वर्तनाचा पारंपरिक पितृप्रधान कुटुंबामध्ये विरोध केला जातो. घरातील तरुण पिढीतील मुलामुलींवर त्यांच्या वयात येण्यापासून ते प्रौढ होण्यापर्यंतच्या वर्षांमध्ये त्यांच्यावर घरातील वडिलधाऱ्यांकडून कडक निर्बंध लादले जातात. केवळ मुलींच्याच बाबतीत नव्हे तर कुटुंबात कोणी किन्नर (उभयलिंगी) किंवा तृतीयपंथी व्यक्ती किंवा लैंगिक वर्तणुकीच्या संकेताच्या विरोधी वर्तन करणारे कोणी असेल तर त्या व्यक्तींच्या बाबतीतही भेदभाव केला जातो, असे दिसते.

मानवी वर्तनाला दोन भिन्न आणि विरोधी लिंगभाव साचामध्ये सामाजिकीकरणाद्वारे बसवण्याच्या प्रयत्नाला भिन्नलिंगी वर्तनमानक (heteronormativity) असे म्हटले जाते. या भिन्न विरोधी वर्गांमधून अपेक्षित सामाजिक वर्तन म्हणजे पुरुषार्थ व स्त्रीत्व. भिन्न लैंगिकता ही एक सामाजिक बांधणी आहे आणि बऱ्याचदा याचा संबंध विषम लैंगिकतेशी जोडला जातो.

**(६) दुर्बलता :** कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडणाऱ्या व्यक्ती सहसा दुर्बल असतात. त्यांमध्ये तरुण, मुले, स्त्रिया, दिव्यांग व्यक्ती, वृद्ध, व्यक्ती आणि आश्रित यांचा समावेश असतो. आर्थिक परावलंबित्व, सत्तेचा अभाव यांमुळे या व्यक्ती सततच्या शोषणाच्या जाळ्यात अडकतात. लहान मुलांवर आणि वृद्ध व्यक्तींवर अत्याचार होण्याची उदाहरणे अनेकदा पहायला मिळतात.

### कौटुंबिक हिंसेचे परिणाम

**(१) मानसिक आघात :** कौटुंबिक हिंसेचे मानसिक आणि भावनिक हिंसेमुळे होणारे आघात प्रत्यक्ष हिंसेच्या प्रसंगानंतरही दीर्घकाळ टिकतात. कौटुंबिक हिंसेला बळी पडलेल्या व्यक्तींना समुपदेशानाची तीव्र गरज असते. प्रसंगी त्यांना मानसोपचारही घ्यावे लागतात. कौटुंबिक हिंसेचा गंभीर परिणाम पीडित व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर होतो.

**(२) अपूर्णतेची भावना :** कौटुंबिक हिंसेने पीडित असलेल्या व्यक्तींमधली स्वतःची ध्येये आणि आकांक्षा पूर्ण करण्याची क्षमता हरवून जाते. त्यांच्या ठायी नैराश्य निराशावाद, नकारात्मकता आणि इतरांबद्दल विश्वासाचा अभाव निर्माण होतो. त्यातून अपुरेपणाची भावना घेऊन जगणाऱ्या व्यक्ती तयार होतात.

**(३) आरोग्यावर प्रतिकूल परिणाम :** मनोशारीरिक अस्वस्थता म्हणजे मानसिक ताणतणाव किंवा मानसिक आघाताचा शरीरावर व मनावर परिणाम होणे. उदाहरणार्थ, नकळत अंथरूण ओले करण्याची सवय, अनपेक्षित भावनातिरेक, महिलांमधील मासिक पाळीची अनियमितता, ज्येष्ठांमधील नैराश्य इत्यादी.

**(४) हिंसक प्रवृत्ती :** हिंसक वातावरणात मोठ्या झालेल्या मुलांना हिंसा स्वाभाविक वाटते. उदाहरणार्थ, अशी मुले वयात येतात तेव्हा जोडीदाराला किंवा पत्नीला शारीरिक इजा करणे त्यांना गैर वाटत नाही किंवा काही स्त्रियांना पतिची हिंसक कृत्ये गैर वाटत नाहीत किंबहुना पतीचा अत्याचार निमूटपणे सहन केला पाहिजे असे त्यांना वाटत असते.

**(५) व्यक्तीगत उत्पादकता कमी होणे :** शारीरिक आणि मानसिकरीत्या दुर्बल असलेली अनेक लहान मुले असतात. अशा मुलांना प्रौढपणी त्यांच्या क्षमतांचा पूर्ण विकास साधता येत नाही. पर्यायाने त्यांच्यातील उत्पादनक्षमता कमी होते.

### कौटुंबिक हिंसेवरील उपाय

कौटुंबिक हिंसेवर कोणताही झटपट उपाय नाही. तरीही काही उपाय योजता येऊ शकतात. जसे की,

**(१) जागृती निर्माण करणे :** जोपर्यंत कौटुंबिक हिंसेच्या प्रसंगांची माहिती बाहेरच्यांना होता कामा नये अशी धारणा समाजात आहे, तोपर्यंत तिला स्वाभाविकतेचे स्वरूप दिले जाईल. त्यामुळे एकविसाव्या शतकातील सुसंस्कृत समाजात कौटुंबिक हिंसेला मान्यता मिळणार नाही यासंबंधीची जागृती निर्माण करायला हवी. इतरांसाठी विघातक अशी विचारधारा किंवा पुरुषी सामर्थ्याच्या साचेबद्ध प्रतिमा बदलायला हव्यात. हे समानता आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वांवर विश्वास ठेवणाऱ्या मनोवृत्तीला आणि वास्तववादी विचारांना प्रोत्साहन दिल्याने होऊ शकेल.

**(२) व्यक्तिमत्त्व विकास :** दुर्बल समजल्या

जाणाऱ्या व्यक्तींनी स्वतःमधील शक्ती आणि क्षमतांचा अधिकाधिक विकास साधून स्वतःच स्वतःच्या व्यक्तित्त्वाचा विकास घडवणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांना स्वमदत गट, स्वयंसेवी संस्था, समवयस्क मित्र, समाजसेवक अशा विविध ठिकाणांहून मदत मिळवता येते.

**(३) प्रसारमाध्यमांची भूमिका :** प्रसारमाध्यमे कौटुंबिक हिंसेच्या संदर्भात जनजागृती आणि लोकांमध्ये या समस्येबद्दल संवेदनशीलता निर्माण करण्याचे काम करू शकतात. लोकांमधील या समस्येबद्दलचे अज्ञान ज्यांनी या समस्येवर मात करण्यात यश मिळवले आहे. अशांच्या जीवनकहाणीवर आधारित कार्यक्रमांमधून या विषयासंबंधीचे अज्ञान दूर करता येणे शक्य आहे.

**(४) बिगर सरकारी सेवाभावी संस्थाचे कार्य :** बिगर सरकारी संस्था कौटुंबिक हिंसेच्या संदर्भात महत्त्वाचे काम करू शकतात. मदतीची गरज असणाऱ्या स्त्रिया, मुले, अपंग व्यक्ती, तृतीयपंथी पुरुष, मुले आणि वृद्ध व्यक्ती यांच्यासाठी काम करणाऱ्या अनेक बिगर सरकारी सेवाभावी संस्था आहेत. अशा संस्थांना कायदेशीर सल्ला देणाऱ्या संस्था आणि पोलीस विभागाचे पाठबळ मिळते. या दोन्हींच्या सहकार्याने कौटुंबिक हिंसेला बळी पडलेल्या पीडित व्यक्तीला न्याय मिळवून देण्यास मदत होते.

**(५) कायद्याची भूमिका :** कायदा स्वबळावर समाजामध्ये बदल घडवून आणू शकत नाही. परंतु कायदेशीर आणि घटनात्मक तरतुदींमुळे गरजूंना व्यासपीठ मिळते. उदाहरणार्थ, भारतीय पिनल कोडमधील कलम ३७७ रद्द केल्यामुळे एलजीबीटी या सदराखाली येणाऱ्या व्यक्तींना कायदेशीर संरक्षण मिळाले. या कायद्यामुळे कुटुंबातील इतर लैंगिकता असणाऱ्या सदस्यांचे सबलीकरण होताना दिसते.

**(६) पोलिसांची भूमिका :** कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या पोलिसांमध्ये कौटुंबिक हिंसेविषयी संवेदनशीलता असण्याची आवश्यकता आहे. बऱ्याचदा पोलिसांमध्ये याविषयी जागरूकता नसते. अशा प्रकारचे प्रसंग हाताळताना पोलिसांकडून सांगितले जाते की, हा घरगुती विषय आहे व तो कुटुंबातच सोडवावा. अशा प्रकारची मानसिकता बदलण्याची गरज आहे. ही पोलिसांची अनास्था बदलण्याची गरज आहे. आज स्त्रियांबाबतीत घडणाऱ्या अशा प्रकारच्या हिंसाचाराचे प्रसंग हाताळण्यासाठी महिला पोलिसांची नियुक्ती विशेषकरून करण्यात आलेली आहे.

**कृती ४**

'बेल बजाओ आंदोलना' संदर्भात माहिती शोधा. या माहितीवर आधारित छोटी नाटिका वर्गामध्ये सादर करा.

**प्रगती तपासा**

'बेल बजाओ आंदोलन' या सामाजिक मोहिमे संदर्भात :

(१) अशा सामाजिक मोहिमांची उपयोगिता स्पष्ट करा.

(२) अशा मोहिमांचा प्रसार होण्यासाठी व त्या वृद्धींगत होण्यासाठी काय आवश्यक आहे?

(३) अशा मोहिमा महानगरांमध्ये यशस्वी ठरतील का? याबद्दल तुमचे मत स्पष्ट करा.

## ६.६ व्यसन
## (मादक/अमली पदार्थ, आंतरजाल, भ्रमणध्वनी)



व्यसनाधीनता

**व्यसनाधीनतेचा अर्थ :** सामान्यपणे शारीरिक आणि/ किंवा मानसिकरित्या व्यक्तीचे मद्य, अमली पदार्थ, आंतरजाल (Internet) किंवा भ्रमणध्वनी (मोबाईल) यांवरील अवलंबित्व जेव्हा वाढते त्या अवस्थेला 'व्यसनाधीनता' असे म्हणतात. विशेषतः व्यसनाधीन व्यक्तींना अशा गोष्टींची तीव्र इच्छा होत असते; त्यांचे अशा पदार्थांवरील अवलंबित्व हळूहळू वाढत जाते. व्यसनाधीन व्यक्ती असे पदार्थ मिळवण्याकरिता कोणत्याही थरास जावू शकते. असे पदार्थ मिळाले नाहीत तर पराकोटीचा राग, हिंसा आणि मानसिक अस्वस्थता अशा भावना व्यक्तीस अनावर होतात. अशा मानसिक आणि शारीरिक अवलंबित्वाचा त्या व्यक्ती आणि समाजावर मोठ्या प्रमाणात घातक परिणाम होत असतो.

व्यसन अनेक प्रकारचे असते. या पाठ्यपुस्तकात पुढे वर्णन केलेल्या व्यसन प्रकारांवर लक्ष केंद्रित केलेले आहे.

**(अ) मादक/अमली पदार्थांचे व्यसन :** याचा संबंध रासायनिक पदार्थांच्या सेवनावर असणाऱ्या मानसिक आणि शारीरिक अवलंबित्वाशी आहे. अशा व्यसनाच्या अधीन असणाऱ्या व्यक्तीला संबंधित रासायनिक पदार्थाचे सेवन थांबवल्यास टोकाच्या अस्वस्थतेची लक्षणे दिसू लागतात. या लक्षणांना 'वियोग (विड्रॉवल) लक्षणे' असे म्हणतात.

मद्य, चरस, कोकेन, तंबाखू, गुटखा यांसारख्या पदार्थांच्या सेवनामुळे शरीरस्वास्थ्य तर बिघडतेच, शिवाय कुटुंब, मित्र, कामाची जागा आणि कायदा यांच्याबाबतीत अनेक समस्या निर्माण होतात. एका प्रकारचे व्यसन करणारी व्यक्ती इतर प्रकारच्या व्यसनांना सहज बळी पडतात.

बहुतेक वेळा मद्य, तंबाखू, इतर अधिकृत औषधे आणि अनधिकृत रासायानिक पदार्थ किंवा मानसिक स्थिती बदलणारे अमली पदार्थ यांचे व्यसन केले जाते. अशा पदार्थांच्या सेवनामुळे व्यसनाधीन व्यक्तिंचा तसेच त्या व्यक्तीशी संबंधित इतरांच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यावर विपरित परिणाम होतो. व्यसनाधीन व्यक्तीकडून समाजविरोधी कृत्ये घडण्याची किंवा ती व्यक्ती कमालीच्या नैराश्याला बळी पडण्याची शक्यता निर्माण होते.

तंबाखूचे व्यसन 'तंबाखू खाणे' किंवा 'धूम्रपान' अशा प्रकारचे असते. तंबाखूमध्ये 'निकोटिन' नावाचे मेंदूवर परिणाम करणारे द्रव्य असते. तंबाखूचे व्यसन शारीरिक-मानसिक स्वरूपाचे असते आणि ते सोडणे सहज शक्य होत नाही. या व्यसनाचा अत्यंत भयकारक परिणाम म्हणजे तोंड, घसा आणि फुप्फुसांचा कर्करोग होणे, हा होय. तंबाखूच्या व्यसनाचा प्रादुर्भाव समाजाच्या आदिवासी, ग्रामीण आणि शहरी अशा सर्वच थरांमध्ये दिसून येतो. विडी किंवा सिगारेट यांद्वारे आणि हुक्का, चिलीम, हुकली, छुट्टा किंवा धुम्ती अशा साधनांद्वारे धूम्रपान केले जाते.

भारत सरकारच्या नॅशनल सॅम्पल सर्व्हे या खात्याच्या अहवालानुसार १०-१४ वर्षांच्या वयोगटांतील २ कोटी मुले तंबाखूच्या व्यसनाच्या आहारी गेल्याचा अंदाज आहे. तसेच असेही म्हटले आहे की प्रतिदिनी अंदाजे ५५०० लोक नव्याने तंबाखूचे सेवन करणाऱ्यांमध्ये सामील होतात. परिणामी प्रतिवर्षी या संख्येमध्ये २० लाखाची भर पडत आहे.

- **'मद्य'** प्रकारात समाविष्ट असणाऱ्या पेयांमध्ये 'इथेनॉल' हे द्रव्य असते. ते धान्ये, फळे किंवा इतर शर्करायुक्त पदार्थ कुजवण्याच्या प्रक्रियेद्‌वारे निर्माण केले जाते. मद्य हे उदासीनता निर्माण करणारे द्रव्य आहे. त्याच्या सेवनामुळे मेंदू आणि मज्जासंस्था यांचे कार्य मंदावते.
- भारतातील किशोरवयीन मुलांमध्ये **'व्हाइटनर'** सेवन करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. व्हाइटनरमध्ये 'ट्रायक्लोरोइथेन' हे द्रव्य असते. हे द्रव्य रंगविरहित, गोड गंध असलेले अस्थिर द्रावणाच्या स्वरूपात असते. त्याचे व्यसन चटकन लागते.
- **गुटखा** हा तंबाखूचा अंश असलेली सुपारी तोंडात ठेवून चघळली जाते. त्याचे व्यसन लागते. या पदार्थात कर्करोगजनक द्रव्ये असल्याचे सिद्ध झालेले आहे.
- **अमली पदार्थ** यामध्ये रासायनिक द्रव्ये असतात आणि त्यांचे व्यसन चटकन लागते. अशा प्रकारची द्रव्ये असलेली औषधे वैद्यकीय सल्ल्यानुसारच वापरायला हवीत. त्यांचा अनियंत्रित वापर अहितकारक असतो.

भारतातील तरुण पिढीमध्ये मादक पदार्थांच्या अनियंत्रित सेवनाचे वाढते प्रमाण हे धोक्याची घंटा वाजवणारे आहे. बदलणारी नैतिक-सामाजिक मूल्यव्यवस्था, वाढता आर्थिक ताण आणि ढासळणारे नातेबंध यांसारखे घटक त्यासाठी कारणीभूत आहेत. जागतिक आरोग्य संस्थेच्या (WHO - वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन) एका अहवालानुसार नशाजनक रासायनिक द्रव्ये असलेल्या औषधांचा केलेला गैरवापर किंवा अधूनमधून केलेले सेवन या गोष्टी नित्याच्या होऊ लागलेल्या आहेत आणि त्याचा मान्यताप्राप्त वैद्यकीय प्रणालीशी काही संबंध नसतो.

संयुक्त राष्ट्रे (युनायटेड नेशन्स) या संघटनेच्या एका अहवालानुसार भारतातील 'हेरॉइन' या अफूच्या अर्कापासून बनवलेल्या अमली द्रव्याचे सेवन करणाऱ्या नोंदणी केलेल्या लोकांची अधिकृत संख्या १ कोटी आहे तर नोंदणी न केलेल्या लोकांची अनधिकृत संख्या ५ कोटी इतकी आहे.

भांग, अफू आणि ज्यांमुळे नशा येऊ शकते अशी भारतीय बनावटीची औषधे यांचे अतिरिक्त सेवन भारतात केले जाते. चरस, भांग आणि गांजा यांचे सेवन तर भारतभरातील अनेकजण करतात. कोडेन हे द्रव्य ज्यांमध्ये वापरलेले असते अशा खोकल्याच्या औषधांचा वापर व्यसनासाठी सर्रास केला जातो.

अशा तऱ्हेने मादक किंवा अमली पदार्थांचे व्यसन ही एक गुंतागुंतीची समस्या असून त्याचे सामाजिक, सांस्कृतिक, शारीरिक, भौगोलिक, ऐतिहासिक आणि आर्थिक असे अनेक पैलू आहेत.

**हे माहिती हवे**

सध्या अस्तित्वात असलेल्या 'धूम्रपान निषिद्ध' कायद्याद्वारे (२००८) सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

तंबाखूचा अंश असलेली उत्पादने खरेदी करण्यावर वयाच्या १८ वर्षांपर्यंत बंदी आहे.

१८ वर्षांखालील व्यक्तीला तंबाखूशी संबंधित असलेल्या कोणत्याही उद्योगधंद्यांमध्ये नोकरीवर ठेवण्यास बंदी आहे.

**(ब) आंतरजालाचे व्यसन :** आपण आज अशा युगात आहोत जिथे ज्ञानाचा स्फोट होत आहे. माहितीची उपलब्धता भूतकाळात कधी नव्हती एवढी वाढलेली आहे. तुमच्यापैकी बहुतेकांना शाळेत, भ्रमणध्वनीवर किंवा घरामध्ये आंतरजाल जोडणीची सोय उपलब्ध आहे. माहितीची उपलब्धता ही चांगलीच गोष्ट आहे कारण त्यामुळे कोणत्याही विषयासंबंधी सहज जाणून घेता येते. ही माहिती आशय कलात्मक दृश्ये, चित्रे, आलेख, सांख्यीकिय इत्यादी प्रकारची असते. आंतरजाल हे संपूर्ण आभासी जग आणि सामाजिक माध्यमांच्या जगामध्ये प्रवेश मिळवून देते. मग ते समस्या निर्माण करणारे असू शकते, असे म्हटले तर तुम्हांला निश्चितच आश्चर्य वाटेल.

आंतरजाल हा एक चिंतेचा विषय का असू शकतो, याचा उलगडा करणाऱ्या काही निवडक मुद्द्यांचा विचार करूया.

सर्वसाधारण परिस्थितीत आंतरजालाचा उपयोग करणे ही काही समस्या असू शकत नाही त्याला 'व्यसन' म्हणता येणार नाही. एखाद्या व्यक्तीला कामासाठी किंवा व्यावसायिक कारणांसाठी नव्हे तर इतर हेतूंसाठी वारंवार आंतरजालाशी जोडलेले राहण्याची अनावर उर्मी असणे हे 'व्यसन' ठरते. उदाहरणार्थ, आंतरजालावरील जुगाराशी संबंधित संकेतस्थळे, प्रौढांसाठी असलेली संकेतस्थळे, अश्लील चित्रे किंवा चित्रपट दाखवणारी संकेतस्थळे, समाजमाध्यमे, मनोरंजन इत्यादींशी संबंधित असलेली संकेतस्थळे यांच्याशी सतत जोडलेली असण्याची एखाद्याला गरज भासत असेल तर त्याला आंतरजालाचे वेड किंवा व्यसन लागलेले असते.

आंतरजालाचे व्यसन फक्त लहानांपुरतेच मर्यादित नाही. ते विविध वयोगटांच्या व्यक्तींमध्ये आढळते. आंतरजालासंबंधीच्या वेडाने पछाडलेले असण्यामागील प्रेरणा वयोगटाप्रमाणे वेगळ्या प्रकारची असूही शकते किंवा नसूही शकते. एखादी किशोरवयीन किंवा तरुण व्यक्ती कदाचित जुगाराच्या संकेतस्थळांना सतत भेट देईल किंवा एखादी प्रौढ व्यक्ती सतत अश्लील संकेतस्थळांच्या कल्पनेने पछाडलेली असेल.

आंतरजालाचे व्यसन समस्यामूलक केव्हा ठरते? ते समस्यामूलक ठरते जेव्हा...

- व्यक्तीवरील तणाव किंवा त्याची अस्वस्थता या गोष्टी वाढतात.
- व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्य मित्र, सहकारी यांच्यासाठी क्लेशदायक परिस्थिती निर्माण होते.
- व्यक्तीचे शारीरिक स्वास्थ्य बिघडते.
- व्यक्तीच्या नातेसंबंधांना किंमत राहत नाही.
- व्यक्तीचे स्वतःकडे दुर्लक्ष होऊ लागते.
- चुकीची, पूर्वग्रहदूषित, दिशाभूल करून मोहात पाडणारी अविश्वसनीय आणि गैरव्यवहाराकडे झुकणारी माहिती व्यक्तीच्या पदरात पडते.




**आंतरजालाचे व्यसन**

**(क) भ्रमणध्वनीचे व्यसन :** हे खरे आहे की भ्रमणध्वनीचा वापर दिवसेंदिवस वाढतोच आहे. हेही खरे आहे की बाजारामध्ये नवनवीन प्रकारच्या आणि प्रगत तंत्रज्ञान असलेल्या सर्व प्रकारांच्या भ्रमणध्वनीच्या उपकरणांची गर्दी आहे. अधिकाधिक अत्याधुनिक नमुन्यांचे, अधिकात अधिक माहिती साठवण्याची सोय आणि टिकाऊ बॅटरी, कॅमेरा अशी आणखी कितीतरी वैशिष्ट्ये असलेल्या उपकरणांच्या जाहिराती आपल्याला अशी उपकरणे खरेदी करण्यासाठी प्रवृत्त करण्याच्या कामात फार मोठी कामगिरी बजावत आहेत. त्याला बळी पडण्यापासूनच भ्रमणध्वनीच्या सतत वरच्या श्रेणीचा भ्रमणध्वनी जवळ ठेवण्याच्या व्यसनाची सुरुवात होते. त्या वेडाने पछाडले जाण्याची अनेक कारणे आहेत. ही कारणे दरवेळी व्यावसायिक स्वरूपाचीच असतात असे नाही. भ्रमणध्वनी ही एक प्रतिष्ठेची बाब बनलेली आहे.

भ्रमणध्वनीचे उपकरण हे फक्त संदेश देण्या-घेण्याचे साधन न राहता त्यापलीकडे गेलेले आहे. त्यामुळे अगणित शक्यतांचा जणू भलामोठा पेटाराच उघडला गेला आहे. संपर्क क्षेत्र समाजमाध्यमांचे जाळे, चित्रफिती बनवणे, त्यांचे संपादन करणे, सर्जनशील उद्योग यांच्यासाठी आणि इतर अनेक गरजांच्या पूर्तीसाठी तयार केलेले अनुप्रयोग (ॲपस्) हे त्यांपैकीच होत.

भ्रमणध्वनीच्या व्यसनात ही आंतरजालाच्या व्यसनाप्रमाणेच वर्तणुकीच्या काही समस्या निर्माण होतात. त्या पुढीलप्रमाणे

- सतत भ्रमणध्वनीवर बोलत राहण्याची गरज भासणे.
- सतत सेल्फीज किंवा कोणत्याही बारीकसारीक गोष्टींचे छायाचित्र घेण्याची गरज भासणे.
- घेतलेली स्वतःची छायाचित्रे ताबडतोब समाजमाध्यमांवर टाकण्याची गरज भासणे.
- समाजमाध्यमांवरील संदेश (आणि अफवाही) खऱ्या-खोट्याची शहानिशा न करता समाजमाध्यमांवर पुढे पाठवण्याची गरज भासणे.
- समाजमाध्यमांवर आपल्या छायाचित्रांना किंवा संदेशांना मिळणारा प्रतिसाद सतत तपासून पाहण्याची गरज भासणे आणि त्यानुसार मनस्थिती आणि वर्तन अवलंबून असणे.
- भ्रमणध्वनीचा उपयोग विनाशक, नकारात्मक आणि स्वार्थी हेतूंसाठी करणे.

भ्रमणध्वनीच्या व्यसनाच्या दुष्परिणामांचे स्वरूप वर वर्णन केल्याप्रमाणे आंतरजालांच्या दुष्परिणामांप्रमाणेच आहेत, हे दिसून येते. आपण सगळे या संदर्भातील अपघातांच्या आणि मृत्यूंच्या बातम्या वाचत आणि पाहतच असतो. त्यामागे गाडी चालवत असताना भ्रमणध्वनीवर बोलत राहणे, सेल्फीसाठी धोकादायक स्थितीमध्ये उभे राहणे किंवा बसणे, सार्वजनिक ठिकाणी

आवश्यकतेपेक्षा अधिक भावुक होणे, झोपेतही भ्रमणध्वनीवर येणारे संदेश सतत पाहत राहणे, भ्रमणध्वनी आणि त्यावरील संपर्कयादी हरवल्यास अत्यंत अस्वस्थ होणे यांसारखी कारणे असतात. या गोष्टींमुळे व्यक्तीच्या मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होतो.

**कृती ५**

**वर्गामध्ये चर्चा घडवून आणा :** 'आंतरजालाचे' आणि 'भ्रमणध्वनीचे' मानवी आयुष्यावरील दुष्परिणाम'.

### व्यसनाधीनतेची कारणे

प्रत्येक प्रकारच्या व्यसनाधीनतेमागे काही कारणे असतात. इथे आपण काही किंवा सर्व प्रकारच्या व्यसनाधीनतेला जबाबदार असणाऱ्या कारणांचा विचार करणार आहोत.

**(१) व्यक्तिगत कारणे :** व्यसनाधीन अवस्थेपर्यंत पोचण्याची व्यक्तिगत कारणे असतात. सहसा ही गोष्ट जाणीवपूर्वक घडत नाही. या अवस्थेपर्यंत पोचण्यासाठी काही काळ जावा लागतो. उदाहरणार्थ, काही प्रासंगिक कारणांमुळे मद्यसेवन करणारी एखादी व्यक्ती हळूहळू मद्यपी बनते.

**(२) समवयस्क मित्रमैत्रिणींचा दबाव :** समवयस्क मित्रमैत्रिणींच्या गटामध्ये सामील होण्यासाठी एखादी सवय स्वीकारण्याबद्दल प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव येऊ शकतो. हे विद्यार्थीदशेत अधिक घडते परंतु त्यासाठी वयाचे बंधन नाही. कोणत्याही वयात व्यक्ती समवयस्कांच्या दबावाखाली आल्यामुळे व्यसनाधीन होऊ शकते. उदा., मित्रांसोबत सिगारेट ओढणे/ड्रग्ज घेणे.

**(३) सामाजिक प्रतिष्ठा :** काही व्यसनांना ठराविक वर्तुळांमध्ये सामाजिक प्रतिष्ठा लाभलेली असते. ती व्यसने करताना व्यक्तीला आपल्याला प्रतिष्ठित सामाजिक वर्तुळामध्ये स्थान मिळाले आहे व त्यामुळे स्वतःचा सामाजिक दर्जा उंचावला आहे असे वाटू लागते. त्याचे प्रदर्शन करण्यासाठी त्या विवक्षित वर्तुळातील लोक ज्या प्रकारचे व्यसन करतात तेच व्यसन ही व्यक्तीही करू लागते. उदाहरणार्थ, मादक पदार्थांचे सेवन किंवा उंची दारू पिणे या गोष्टी एखाद्या वर्तुळात आवश्यक समजल्या जातात. इतरांप्रमाणे न वागल्यास एकटे पडण्याची शक्यता असते.

**(४) 'स्व'चे पुष्टीकरण :** या व्यसनाची लक्षणे विशेषत्वाने सामाजिक माध्यमांवर जरूरीपेक्षा जास्त रेंगाळणाऱ्या व्यक्तींमध्ये दिसू शकतात. उदाहरणार्थ, स्नॅपचॅट, फेसबुक, ट्विटर इत्यादी. या माध्यमांवरील सततची उपस्थिती व्यक्तीसाठी स्वतः खूप महत्त्वाची व्यक्ती असल्याचा आभास उत्पन्न करते. सध्या 'सेल्फायटिस' नावाच्या एका मानसिक अस्वास्थ्याच्या लक्षणाचा खूप प्रसार झाला आहे. (म्हणजे सेल्फी काढण्याची अदम्य उर्मी. याला 'सेल्फी सिंड्रोम' असेही म्हटले जाते.)

**(५) मानसिक अवस्था :** व्यक्ती व्यसनाधीन होण्यास अनेक मानसिक कारणे जबाबदार असतात. उदाहरणार्थ, न्यूनगंड कनिष्ठ/श्रेष्ठ असल्याचा गंड, मानसिक असुरक्षितता, भय किंवा अस्वस्थता, नैराश्य किंवा अपयशाची भावना, एकटेपणाची भावना इत्यादी.

**(६) व्यक्तीगत आयुष्यात मार्गदर्शक आदर्श व्यक्तीचा अभाव असणे :** ज्या व्यक्तीपुढे मोठे होताना तिला आदर्श वाटावी अशी व्यक्ती नसते, ती व्यक्ती आसपासच्या व्यक्तींच्या वागण्यातील व्यक्तित्व विकासाला मारक किंवा व्यक्तित्व विस्कटण्यास कारणीभूत होणारी वर्तणूक आत्मसात करतात.

### व्यसनाधीनतेचे परिणाम

**(१) मानसिक परिणाम :** कोणत्याही प्रकारच्या व्यसनाधीनतेचे मानसिक परिणाम होतात. व्यसनाधीन व्यक्ती मद्य, मादक पदार्थ, औषधे, आंतरजाल, भ्रमणध्वनी, सामाजिक माध्यमे यांवर अवलंबून राहू लागतात. त्यांच्यामध्ये त्यांच्या प्रत्येक संदेश किंवा फोटोसाठी किती 'लाइक्स', किती 'हिटस्' मिळाल्या हे सतत तपासत राहण्याची गरज निर्माण होते.

**(२) कुटुंबावर होणारा परिणाम :** व्यसनाधीनता ही फक्त तरूण वयोगटातील व्यक्तींची नसून ती सर्व वयोगटांमध्ये पाहण्यास मिळते. व्यसनाधीन माणूस हा संपूर्ण कुटुंबासाठी त्रासदायक असतो. त्याचे वागणे कौटुंबिक हिंसेला कारणीभूत होऊ शकते. भ्रमणध्वनीचे

व्यसन ज्यांना जडले त्यांना संवादाच्या अभावी एकाकी वाटू लागते. संवादाच्या अभावमुळे कुटुंबातील सदस्यांना प्रेमाला भुकेले, गौण आणि उपरे असल्याची जाणीव होऊ लागते.

**(३) आरोग्यावर परिणाम :** व्यसनाधीन व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष होते. व्यक्तीमधील तणाव, अस्वस्थता, आक्रमकता, चिडखोरपणा इतका वाढतो की त्याचा दुष्परिणाम त्या व्यक्तीबरोबर कुटुंबातील इतर सदस्यांवरही होतो.

**(४) कामावर होणारा परिणाम :** व्यसनाधीनतेच्या प्रकारानुसार कामाशी असलेली बांधिलकी, कार्यक्षमता, लैंगिक छळ किंवा अत्याचार करण्याची प्रवृत्ती, दुर्बलांना छळण्याची प्रवृत्ती, एकाग्रता करण्याची असमर्थता, वाढलेला दुराग्रहीपणा आणि कामाचा घटता आलेख असे दुष्परिणाम दिसू लागतात.

**(५) आर्थिक परिणाम :** कोणतेही व्यसन हे आर्थिक संकटाकडे नेणारे असते. कारण व्यसनाशी संबंधित सर्व गरजा पुरवण्यासाठी खूप पैसा खर्च करावा लागतो. ड्रग्जचा व्यापार जगभर चालतो. व्यसनमुक्तीचे उपचारही प्रचंड खर्चिक असतात.

**(६) एकाकीपण :** व्यसनाधीन व्यक्ती बहुतेक वेळा एकलकोंड्या असतात. समाजात मिसळणे टाळतात. उदाहरणार्थ, प्रमाणाबाहेर केलेले गेमिंग, युट्यूबवरील चित्रपट, व्हॉट्स्‌ॲपवरील विनोदांची देवाणघेवाण इत्यादींमुळे इतरांबरोबरचा आणि वास्तव जगाबरोबरचा प्रत्यक्ष संपर्क सुटू लागतो.

**कृती ६**

'आंतरजाल व्यसनाची समस्या' या विषयावर साधारण ७-१० मिनिटांचे पथनाट्य तयार करा. त्याचा शेवट एखाद्या आशादायक संदेशाने करा. तुमच्या महाविद्यालयाच्या आवारात ते पथनाट्य सादर करा आणि मग योग्य ती परवानगी मिळवून ते तुमच्या घराजवळील परिसरात सादर करा.

### व्यसनाधीनतेवरील उपाय

**(१) जागृती निर्माण करणे :** व्यसनाधीनतेची समस्या आणि त्याचे दुष्परिणाम यासंबंधी जागृती निर्माण करणे हा सर्वप्रथम आणि महत्त्वाचा उपाय आहे. कारण अनेक लोकांना व्यसनाधीनता म्हणजे काय किंवा आपण व्यसनाधीन झालो आहोत हे कसे तपासायचे याची माहितीच नसते. या संबंधात शैक्षणिक कार्यक्रम आणि शिबिरे यांच्याद्वारे जनजागृती करणे शक्य आहे.

**(२) समुपदेशन :** या विषयाशी संबंध नसलेले लोक किंवा अप्रशिक्षित व्यावसायिक यांच्या प्रयत्नांना मर्यादा असतात. त्यामुळे व्यसनाधीनतेच्या समस्येसाठी प्रशिक्षित समुपदेशक किंवा मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेणे अत्यावश्यक असते.

**(३) व्यसनमुक्ती केंद्र :** व्यसनाधीन लोकांना मदत करण्यासाठी व्यसनमुक्ती केंद्रे असतात. तिथे व्यसनमुक्ती कार्यक्रमांच्या आधारे व्यसनाधीन व्यक्तीला व्यसनमुक्तीसाठी मदत केली जाते.

**(४) कायदे :** व्यसनाधीनतेच्या समस्येसाठी कायदेशीर तरतुदी महत्त्वाच्या आणि आवश्यक आहेत. विशेषतः ड्रग्जची चोरटी विक्री करणारे, सामाजिक माध्यमांवर समाजविघातक संदेश पाठवणारे यांसारख्या जीवाशी खेळ करणारी कृत्ये करणाऱ्या लोकांवर वचक ठेवण्यासाठी कायदेशीर तरतुदींचा उपयोग होतो. जरी यामुळे ही समस्या पूर्णपणे संपणार नसली तरी त्याला प्रतिबंध करण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी उपयुक्त ठरते.

**(५) प्रसारमाध्यमे :** प्रसारमाध्यमे हे व्यसनाधीनतेबाबत जनजागृती करण्याचे प्रभावी साधन आहे. आंतरजालावर नेहमी विचारले जाणारे प्रश्न (FAQS), मदतगट, हेल्पलाईन यांसारखी संकेतस्थळे उपलब्ध आहेत. त्यांच्यामार्फत जनजागृती करता येईल.

**(६) स्वयंसेवी संस्था :** सरकारच्या बरोबरीने अनेक बिगर सरकारी संस्था व्यसनमुक्तीच्या संदर्भात काम करत असतात. उदाहरणार्थ, 'वन इंडिया वन पिपल', 'अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस (AA)', 'नार्कोटिक्स ॲनानिमस (NA)' वगैरे.

**(७) गट कार्यक्रम :** कोणतीही कृती ज्यामध्ये सामूहिक सहभागाची गरज असते असे छंदवर्ग, क्रीडा आणि खेळ यांमुळे एकाकी पडणाऱ्या लोकांमध्ये सकारात्मकता वाढण्यास मदत होते.

**प्रगती तपासा**

(१) तुमच्या एखाद्या मित्राला व्यसनाधीनतेची समस्या असेल, तर त्याला मदत करण्यासाठी तुम्ही काय करू शकाल?

(२) तुमच्या शाळेत भ्रमणध्वनी व्यसनाधीनतेवर उपायाच्या स्वरूपातील दोन सहशालेय कृती सुचवा.

(३) आंतरजाल व्यसनाधीनतेचे तीन नकारात्मक परिणाम सांगा.

**कृती ७**

विद्यार्थ्यांसाठी १० अशा कृतींची यादी करा ज्या त्यांना फावल्या वेळात करता येतील. तुमच्या वर्गमित्रांना प्रत्येक आठवड्यात एक याप्रमाणे करायला आवडतील अशा १० कृतींची नोंद करा. तुमची निरिक्षणे नोंदवून त्यांचा एक तक्ता तयार करा आणि वर्गामध्ये दाखवा.

**तुमच्या माहितीसाठी**

**महाराष्ट्रातील काही व्यसनमुक्ती केंद्रे :**

(१) जीवनज्योत व्यसनमुक्ती केंद्र, नागपूर

(२) मोक्ष व्यसनमुक्ती आणि पुनर्वसन केंद्र, नाशिक

(३) आसरा हॉस्पिटल : मानसोपचार केंद्र आणि व्यसनमुक्ती केंद्र, अहमदनगर

(४) नवचैतन्य व्यसनमुक्ती केंद्र,कोल्हापूर

(५) सेवाधन फाऊंडेशन, मुंबई

(६) मुक्तांगण, पुनर्वसन केंद्र, पुणे

## सारांश

- सामाजिक समस्या हा बहुसंख्य लोकांवर परिणाम करणारा चिंतेचा विषय आहे. त्याचे स्वरूप वैयक्तिक समस्यांपेक्षा वेगळे असते.
- वृद्धत्व ही जागतिक समस्या आहे. ती अपरिहार्य आणि सतत चालू राहणारी प्रक्रिया आहे.
- वृद्धत्वाची समस्या ही आरोग्य, एकाकीपणा, छळ, आर्थिक असुरक्षितता, सहानुभूतीचा अभाव, शोषण इत्यादींशी संबंधित असतो.
- वृद्धांबद्दल संवेदनशीलता निर्माण होण्यासाठी, त्यांच्या गरजा जाणून घेण्यासाठी, आरोग्याच्या सोयी आणि विमा, निवारा या गोष्टी मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.
- भारतीय समाजामध्ये बेरोजगारी ही वाढती समस्या आहे. अपुरी कौशल्ये, व्यवस्थेतील अपुरेपणा, कामाच्या वेळा, बदलती अर्थव्यवस्था, मागणी व पुरवठा यातील तफावत आणि हंगामी बेरोजगारी यांसारख्या गोष्टी त्यासाठी कारणीभूत आहेत.
- शिक्षणव्यवस्थेत मूलगामी बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे. ज्यामध्ये व्यवसायाभिमुख कार्यक्रम, उद्योग-शिक्षण यांच्यात दुवे निर्माण करणे, कौशल्याधारित कार्यक्रम यांचा समावेश करता येईल.
- शेतकरी आत्महत्या हा चिंतेचा विषय बनला आहे. या समस्येस कारणीभूत गोष्टींमध्ये : पर्यावरणीय ऱ्हास, जागतिकीकरणाचा परिणाम, कर्जबाजारीपणा, दुर्लक्षितता,

जमिनीचे असमान वाटप यांचा समावेश आहे.

- अडते किंवा दलालांना बाजूला करणे, पिक विमा, जलसंधारण आणि जलव्यवस्थापन, समुपदेशन, कृषी-पर्यटन या प्रयत्नांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या आटोक्यात आणता येतील.
- कौटुंबिक हिंसाचार म्हणजे कुटुंबामध्ये किंवा घरामध्ये होणारी हिंसा होय. स्त्रीया, लहान मुले, पुरुष, तृतीय पंथी, तरुण तसेच वृद्ध हे हिंसेचे बळी ठरतात.
- कौटुंबिक हिंसाचाराच्या कारणांमध्ये पुरुषप्रधान व्यवस्था, विषम लैंगिकता, असमानता, असुरक्षितता, बिघडलेले नातेसंबंध यांचा समावेश होतो.
- कौटुंबिक हिंसेवरील उपायांमध्ये, तत्संबंधी जागृती निर्माण करणे, दुर्बलांचे सबलीकरण, शिक्षण आणि प्रशिक्षण, प्रसार माध्यमांची भूमिका या गोष्टी करण्यासारख्या आहेत.
- मादक पदार्थांचे सेवन, अंमली पदार्थ, आंतरजाल आणि भ्रमणध्वनीचे व्यसन असे व्यसनाधीनतेचे प्रकार होत.
- व्यसनाधीनतेची अनेक कारणे सांगता येतील : वैयक्तिक, पुरुषप्रधानता, असंतुष्टता, सामाजिक नियमांनुसार न वागणे, समवयस्क गटाचा दबाव इ.
- व्यसनाधीनतेवरील उपायांमध्ये : जनजागृती करणे, शैक्षणिक भूमिका, प्रसारमाध्यमे, कायदेशीर तरतुदी आणि स्वयंसेवी संस्था यांची मदत घेता येते.
- सामाजिक समस्यांवरील सामान्य उपायांमध्ये जनजागृती, कायद्याची अंमलबजावणी, लोकांनी जागृक राहणे, समुपदेशन, व्यसनमुक्ती केंद्रे, स्वयंसेवी संस्था, औपचारिक शिक्षण, सामाजिक कार्यकर्ते यांची भूमिका महत्त्वाची असते.

## स्वाध्याय

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

(१) घरगुती हिंसेचा कायदा .... साली पारित करण्यात आला.

(१९९५, २००५, २०११)

(२) शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या कारणांमध्ये .... हे एक आहे.

(बहुविध पीकद्धती, कर्जबाजारीपणा, हवामानातील बदल)

**(ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व दुरूस्त करून लिहा.**

(१) i) चरस - मादक पदार्थांचे व्यसन

ii) हिंसक चित्रपट - आंतरजालांचे व्यसन

iii) सेल्फायटिस - अमली पदार्थांचे व्यसन

iv) देशी दारु - मद्याचे व्यसन

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

**अमली पदार्थ, पितृप्रधान पद्धती, लिंगभेद**

(१) उभयलिंगी व्यक्तींना भेडसावणारी समस्या.

(२) याच्यामुळे शारीरिक अस्वास्थ्याच्या समस्या येऊ शकतात.

**(ड) अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पूर्ण करा.**

(१) अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस हे अमली पदार्थांचे व्यसन करणाऱ्या व्यक्तीला मदत करते.

(२) वृद्धत्व हे कृत्रिम प्रक्रिया आहे.

**प्रश्न २ टीपा लिहा.**

(१) व्यसनाचे दुष्परिणाम

(२) वृद्धांच्या समस्यांवरील उपाययोजना

**प्रश्न ३ फरक स्पष्ट करा.**

(१) सामाजिक समस्या आणि वैयक्तिक समस्या


(२) भ्रमणध्वनीचे व्यसन आणि अमली पदार्थांचे व्यसन

**प्रश्न ४ खाली दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

(१) घरगुती हिंसा

(२) कौशल्यांचा विकास

**प्रश्न ५ (अ) संकल्पना चित्र पूर्ण करा.**




**(ब) खालील विधान चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

(१) तंत्रज्ञान हे नेहमीच सामाजिक प्रगतीसाठी उपयुक्त ठरते.

(२) व्यसनाधीनता आणि सामाजीकरण यामध्ये प्रभावी सहजसंबंध दिसून येतो.

**प्रश्न ६ आपले मत नोंदवा.**

(१) घरगुती हिंसेशी संबंधित बहुतांश तक्रारींमधील पीडित व्यक्ती या स्त्रिया असतात. या संदर्भात तुम्हांला काय वाटते?

(२) वयोवृद्ध पालकांना वृद्धाश्रमात ठेवण्याचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम काय असू शकतात, याची चर्चा करा.

**प्रश्न ७ पुढील प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा. (कमीत-कमी १५०-२०० शब्द)**

आज शेतकऱ्यांच्या आत्महत्या या सामाजिक समस्या का आहेत यावर चर्चा करा. शेतकऱ्यांना साहाय्यभूत ठरणारे योग्य सामाजिक, आर्थिक उपाय सुचवा.

**उपक्रम**

प्रसारमाध्यमावर दाखवल्या जाणाऱ्या १० ते १५ जाहिराती पहा आणि कोणती जाहिरात लिंगाधारित साचेबद्धता दर्शविते किंवा लिंगभेदाचे दृढीकरण करते/मजबुतीकरण करते याचे परीक्षण करा. याचबरोबर कोणती जाहिरात साचेबद्ध नाही हे शोधा किंवा त्याची नोंद करा.

वर्गामध्ये या जाहिरातींबद्दल चर्चा करा.

**उपक्रम**

बीड जिल्ह्यातील ऊसतोडणी महिला शेतमजूरांच्याबद्दल महाराष्ट्र विधानसभेत महत्त्वाचा कायदा बनवण्याची प्रक्रिया चालू आहे. या महिलांपैकी बऱ्याच महिलांनी ऊसतोडणी हंगामामध्ये काम करता यावे म्हणून गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया करून घेतली आहे. यालाच 'हिस्टरेक्टॉमी' असेही म्हटले जाते. यासंदर्भात माहिती गोळा करा व वर्गामध्ये चर्चा घडवून आणा.

◆ ◆ ◆

# विभाग – २



# उतारे

✲ **टीप :** पुढीलपैकी कोणत्याही एका उताऱ्यावर प्रश्न विचारले जातील. पुढील उताऱ्यांच्या आधाराने शिक्षक प्रश्न काढू शकतात. परंतु, विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना उताऱ्यातील जशीच्या तशी भाषा वापरू नये. प्रश्नांचे स्वरूप उपयोजित किंवा विश्लेषणात्मक असेल. विद्यार्थ्यांनी प्रश्नाचा संदर्भ समजून घेऊन आपल्या भाषेत उत्तर लिहिणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांचे उत्तर काळाला अनुसरून, पद्धतशीर आणि तार्किक असावे. उत्तर तुटक असू नये. केवळ विचारांना चालना देणे हा पुढील उताऱ्यांचा उद्देश आहे. (पहिल्या उताऱ्यामध्ये नमुना प्रश्न दिले आहेत.)

१. महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील, वाडा तालुक्यामधील, गायगोठा गावातील छोट्याशा झोपडीमध्ये राहणाऱ्या रूक्मिणीदेवींची ही सत्य कथा आहे. त्या वारली जमातीतील आहेत. त्यांचे पती अल्पभूधारक असून दोन एकर जमिनीवर शेती करतात. त्यांना १० वर्षांची मुलगी व ६ वर्षांचा मुलगा अशी दोन मुले आहेत. दोन्ही मुले रोज शाळेत चालत जातात व चालत येतात. (जवळ-जवळ ३ मैल.)

जेव्हा पिकाचा हंगाम संपतो (किंवा अतिवृष्टी किंवा कीड लागल्यामुळे त्यांचे भातशेतीचे नुकसान होते.) तेव्हा त्यांना बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागते. यातूनही वाचलेले धान्य ते वर्षभरासाठी स्वतःसाठी साठवून ठेवतात. स्वतःच्या वापरासाठी तुरडाळदेखील एका छोट्या जमिनीच्या तुकड्यावर पिकवतात. एका छोट्या परिसरामध्ये ते मिरची, काकडी आणि कारले यांसारख्या भाज्या पिकवतात.

जेव्हा पिकांचा हंगाम संपतो त्यावेळी दोघे पती-पत्नी वीटभट्टीवर वीटा बनवण्याच्या कामासाठी (७ मैल दूर) प्रत्येक नगावर पैसे या प्रकारचे काम करतात (म्हणजेच जितक्या वीटा तितके पैसे). पुरुषाला साधारण दर दिवशी ३०० रूपये तर स्त्रीयांना दर दिवशी १५०-२०० रूपये प्रमाणे कमाई होते. रूक्मिणीदेवी सांगतात की, ते दोघेही रोज ७ मैल चालत येतात व जातात. कारण बसचे एकावेळचे एकाचे प्रवासभाडे ३५ रूपये होते. त्यामुळे ते त्यांना परवडणारे नाही.

(१) रूक्मिणीदेवींच्या कुटुंबाला येणाऱ्या कोणत्याही तीन समस्या सांगा.

(२) या उताऱ्यामध्ये आलेली लैंगिक श्रमविभागणी दर्शवा आणि त्याची सविस्तर चर्चा करा.

२. ब्रिटीश भारतात आल्यापासून भारतातील शिक्षण धर्मनिरपेक्ष स्वरूपाचे आहे. याचा अर्थ असा, की अभ्यासाच्या विषयामध्ये पवित्र धार्मिक ग्रंथांचा समावेश नव्हता. समाजात ऊर्ध्व गतिशीलतेसाठी शिक्षण आवश्यक असते. ब्रिटिशांच्या आगमनापासून शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली. कुणालाही इंग्रजी भाषा शिकता येणार होती आणि इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्याची संधीही सर्वांसाठी खुली करण्यात आली.

विविध सामाजिक आणि आर्थिक स्तरांतील भारतीयांनी इंग्रजीतून शिक्षण घेण्याची ही पहिलीच वेळ होती. यातूनच नंतर भारतातील बुद्धिजीवी वर्ग आकारास आला. त्यांना आपण समाजसुधारक म्हणून ओळखतो. राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, पंडिता रमाबाई, महर्षी धोंडो केशव कर्वे हे समाजसुधारक आपल्या परिचयाचे आहेत. त्यांनी भारतीय समाजात धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या.

स्वातंत्र्योत्तर काळानंतर, वर्तमानातदेखील असे द्रष्टे सुधारक समाजात आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीला ७३ वर्षे झाल्यानंतर आता शिक्षणाच्या प्रचंड संधी उपलब्ध आहेत, परंतु आपण केवळ शिक्षित झालो आहोत की त्या शिक्षणामुळे नागरिकांना रोजगारही मिळाला आहे असा प्रश्न उपस्थित होतो. समाजात सूक्ष्म पातळीवर बदल घडवून आणण्यासाठी शिक्षणाने आपले प्रबोधन केले का? हा सर्वांत महत्वाचा प्रश्न आहे.

शासनाने समाजातील प्रत्येक स्तराच्या हिताचा विचार करणे गरजेचे आहे. समाजातील सर्वांच्या कल्याणासाठी प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्वपूर्ण आहे.

३. भारतीय समाजात अनेक वैविध्यपूर्ण संस्कृती नांदतात. भारतीय समाजाने प्रत्येक संस्कृतीला कसे सामावून घेतले याची साक्ष इतिहास देतो. प्राचीन काळापासून स्थलांतरित लोक भारतीय समाजात एकरूप झाले. येथील संस्कृतीवर स्थलांतरितांचा प्रभाव आहे. आपला इतिहास या सांस्कृतिक मिलाफाची साक्ष देतो. आदिवासी, ग्रामीण आणि शहरी समुदायांचा एकत्रित समाज असे आजच्या आपल्या समाजाचे वर्णन करता येईल. या प्रत्येक समुदायाच्या जीवनपद्धतीची काही अनोखी वैशिष्ट्ये आहेत, परंतु यांपैकी कोणताही समुदाय त्याच्या "अस्सल" रूपात नाही असेही निरीक्षण आहे. एकीकडे हे समुदाय परस्परांवर अवलंबून आहेत तर दुसरीकडे भाषा, श्रद्धा, प्रथा यांसारख्या सांस्कृतिक घटकांचा ऱ्हास होताना दिसतो. उदाहरणार्थ, आज शहरातील अनेक घरांमध्ये वारली आणि मधुबनी कलाकुसर सदरे/शर्ट किंवा भिंतींवर केलेली दिसते किंवा देशातील कानाकोपऱ्यात तंत्रज्ञानाचा शिरकाव देखील झाला आहे.

आता तुमच्या मनात आणखी एक प्रश्न येईल. 'अस्सल' संस्कृती असे खरच काही असते का? "भारतीय संस्कृती" म्हणजे नक्की काय? आजच्या जगात सांस्कृतिक उग्रवादाला महत्त्व असेल काय? हे प्रश्न आपल्याला विचार करण्यास भाग पाडतात म्हणून ते महत्त्वाचे आहेत. कदाचित, या प्रश्नांना एकमेव "उत्तर" सापडणार नाही.

४. समाजामध्ये मतभेद अथवा संघर्ष निर्माण होण्याची अनेक कारणे असतात. सामाजिक बदलाला प्रतिकार हे त्यातले एक कारण होय. सद्यकालीन भारतीय समाजामध्ये काही सामाजिक चिंतेच्या बाबी आहेत. घरगुती हिंसा, लैंगिक अत्याचार, बाल हक्क, वृद्धांच्या आणि स्थलांतरितांच्या समस्या, वंशवाद, धार्मिक मूलतत्त्ववाद, भाषिक निष्ठा, पर्यावरणाचा ऱ्हास, अमली पदार्थांची व्यसनाधीनता आणि उपकरण अधीनता, जमाव हल्ला इत्यादी समस्या होत.

सामाजिक समस्यांचे प्रकार आणि त्यांचे बदलते स्वरूप पाहता, सामाजिक समस्यांचे वैज्ञानिक पद्धतीने परीक्षण होणे आवश्यक आहे. समाजशास्त्र या विषयाची व्याप्ती वाढून आता हा विषय इतर अनेक शाखांमध्ये अभ्यासणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या शाखांमध्ये समाजशास्त्र या विषयाचा अभ्यास करताना, पुरुषत्वाचा अभ्यास, अल्पसंख्याकांचा अभ्यास, चित्रपट आणि प्रसारमाध्यमांचा अभ्यास, क्रीडा समाजशास्त्र, पर्यावरण समाजशास्त्र, न्यायवैद्यक समाजशास्त्र, वार्धक्याचे शास्त्र, संगीत समाजशास्त्र, वैद्यक समाजशास्त्र, विपणन समाजशास्त्र अशा वेगवेगळ्या क्षेत्रांचा शोधबोध घ्यावा लागतो.

विविध शासकीय विभाग आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये धोरण आणि योजना आखणीसाठी समाजशास्त्रज्ञांची मदत घेतली जाते. समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये लोक केंद्रस्थानी आहेत. त्यामुळे या शास्त्राच्या अभ्यासातून मानवी संबंधांबाबत जाणीव-जागरुकता आणि चर्चेला वाव मिळतो. शासन चालवणे आणि संघर्ष निवारणाकरता अशी माहिती महत्त्वाची ठरते.

५. पुढे एक काल्पनिक गोष्ट दिली आहे.

योगिनी आणि योगिता या पाटकरांच्या घरातील जुळ्या मुली. एका लहान गावातील २२५ चौ.फूट. इतक्या लहानशा खोलीत त्या राहतात. योगिनी अभ्यासात हुशार आहे. तिने कबड्डीमध्येही प्रावीण्य मिळवले आहे. योगिता क्रिकेटचा खेळ उत्तम खेळते. ती क्रिकेटमध्ये पश्चिम भारत प्रदेशाचे प्रतिनिधित्व करते. राज्यस्तरीय मराठी भाषा स्पर्धेतही तिने अव्वल क्रमांक पटकावला होता.

योगिनी आणि योगिताचे आई-वडील मराठवाड्यातील एका लहानशा खेड्यात शेती करत होते. जुळ्या मुलींचे शिक्षण आणि खेळ प्रशिक्षणाचा विचार करून त्यांनी एका शहरात राहायला जाण्याचा निर्णय घेतला.

पाटकर कुटुंबाच्या खेड्यातील सगळ्या नातेवाईकांना पाटकरांच्या जुळ्या मुलींच्या यशाकडे पाहून आपल्याही मुलांना शहरात पाठवावे असे वाटले. आपल्याही मुलांना एक दिवस यश आणि प्रसिद्धी मिळेल असे त्यांना वाटले.

आज तुम्ही एखाद्या खेड्याला भेट दिली, तर तिथे बहुतेक घरांमध्ये केवळ वृद्ध लोक राहतात असे तुमच्या लक्षात येईल. तेथील तरुणांनी आपले नशीब आजमावण्यासाठी स्थलांतर केले आहे. अशा स्थलांतराचा स्थानिक ग्रामीण समुदायावर कोणता परिणाम होईल याबाबत तुम्ही कल्पना करू शकता का?

६. कोणत्याही समाजातील सदस्यांच्या मागण्यांचा परिणाम म्हणून सामाजिक चळवळी जन्म घेतात. समाजामध्ये होणाऱ्या आंतर्क्रियांच्या माध्यमातून अशा मागण्या आणि समाजहिताच्या बाबी समाजामध्ये सर्वांपर्यंत पोहोचतात. समाजहिताच्या या बाबींना संमती देणारा एक व्यक्तीसमूह एकमताने सामाजिक बदलासाठी प्रयत्न करतो. असे प्रयत्न सामाजिक चळवळीच्या जन्मासाठी कारणीभूत असतात. सामान्यपणे सामाजिक चळवळीची काही पायाभूत तत्त्वे आणि उद्दिष्टे असतात. अनेक सामाजिक चळवळी या सामाजिक चळवळीचे प्रणेते किंवा त्यांच्या मुख्य प्रतिनिधींशी संबंधित असतात. भौगोलिक प्रदेशाचा विचार करता, एखाद्या सामाजिक चळवळीची व्यापकता वाढण्यासाठी काही वर्षे किंवा काही दशकांचाही कालावधी जाऊ शकतो.

सामाजिक सुधारणा चळवळ, व्यापार संघटना चळवळ, आदिवासी चळवळ, दलित चळवळ, स्त्री चळवळ, चिपको चळवळ, एलजीबीटी चळवळ, नागरी हक्क चळवळ, बुद्धिप्रामाण्यवादी चळवळ यांसारख्या अनेक चळवळींचा उदय आपल्या समाजात झाला. नंतर त्या चळवळींची व्यापकता वाढत गेली.

सामाजिक चळवळीला एकदा गती आली की ती समाजात सर्वांच्या परिचयाची होते. खरेतर अनेक चळवळींचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला. संशोधनासाठीही सामाजिक चळवळींचा आधार घेतला जातो. उदाहरणार्थ, श्रमिक, लिंगभाव, अल्पसंख्याक आणि पर्यावरणाचा अभ्यास करताना सामाजिक चळवळींचा अभ्यास करावा लागतो.

सामाजिक चळवळींमुळे आपण ज्या समाजाचा भाग आहोत तेथील सामाजिक प्रश्नांचा गांभीर्याने विचार करणे भाग पडते. अशाच काही सामाजिक चळवळींचा परिणाम म्हणून काही कायदे पारित केले जातात. काळाच्या प्रत्येक टप्प्यात अथवा प्रत्येक पिढीच्या काही विशिष्ट सामाजिक समस्या असतात. अशाप्रकारे, प्रत्येक टप्प्यावर नव्या सामाजिक चळवळींचा उदय होऊ शकतो.

७. मानवी समाज निर्दोष असू शकतात का? समाजामध्ये कशाला मान्यता आहे? काय योग्य आहे? काय बहुमूल्य आहे? याची उत्तरे स्थळ, काळ आणि संदर्भानुसार बदलतात.

आपण ज्या संस्कृती अथवा गटाचा भाग आहोत त्यातील समूह केंद्रीततेला प्रोत्साहन देण्याची वृत्ती नजरेस पडते. समूह केंद्रिततेची अतिरेकी भावना सामाजिक ऐक्यासाठी घातक ठरते. सामाजिक बांधिलकीसाठी इतर संस्कृतींचा आदर, स्व-समीक्षा, टीकात्मक परीक्षण, आणि आत्मचिंतन होणे गरजेचे असते. आपण ज्या वैविध्याचा भाग आहोत त्याची अनेकांगांनी प्रशंसा करण्यासाठी असा दृष्टिकोन हितकारक ठरेल. भावना, श्रद्धा आणि धोके समजून घेण्यासाठी लोकांच्या जीवनकथा उपयुक्त ठरतात.

समाजाच्या प्रगतीमध्ये बाधा आणणाऱ्या किंवा समाजाचे विभाजन करणाऱ्या घटकांचा प्रभाव कमी करण्यासाठी नागरी समाजाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरू शकेल.

८. तुम्ही गेले वर्षभर समाजशास्त्र या विषयाचा अभ्यास करत आहात. समाजशास्त्र हा मानवाच्या सामाजिक वर्तनाचा शास्त्रशुद्ध अभ्यास आहे, परंतु मानवी वर्तनाचा अभ्यास केवळ समाजशास्त्रात केला जात नाही. इतिहासकार, मानसशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ इत्यादी सर्वांसाठीच मानवी वर्तनाचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो. मग समाजशास्त्राचा अभ्यास कशासाठी करायचा? त्याचा उपयोग काय? तुम्ही समाजशास्त्राची पदवी घेऊन काय करणार? असे प्रश्न तुमच्या मनात नक्कीच आले असतील किंवा तुमच्या कुटुंबीयांनी, मित्र मैत्रिणींनी तुम्हांला असे प्रश्न विचारले असतील. कदाचित, समाजशास्त्राचा अभ्यास करून पुढे काय? असा विचार तुम्हीही केला असेल.

सर्वप्रथम तुम्ही अध्यापन क्षेत्राचा विचार करू शकता, परंतु त्यासाठी तुमचे वाचन विस्तृत असायला हवे. तुम्ही सर्जनशील असावयास हवे आणि तुमचे व्यक्तिमत्व विद्यार्थीकेंद्री असावयास हवे. तुम्हांला शिकवण्याची आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची आवड असणेही आवश्यकच आहे. संशोधन क्षेत्रात कारकीर्द घडवणे हा पर्यायदेखील काही विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध आहे. परंतु, संशोधक म्हणून कामाला सुरुवात केल्यापासून समाजशास्त्रज्ञ होण्यापर्यंतचा प्रवास खूप मोठा आहे. समाजशास्त्राचे अनेक विद्यार्थी राज्य लोकसेवा आयोग (एमपीएससी) आणि केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) आणि यांसारख्या नागरी सेवा परीक्षांमध्ये समाजशास्त्र हा मुख्य विषय निवडतात. या स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी व्यापक वाचन करावे लागते. शिवाय, संपूर्ण भारतीय समाज समजून घ्यावा लागतो. भारतीय समाजाचा भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यातील उद्दिष्टे आणि योजनादेखील समजून घ्याव्या लागतात.

इतरही अनेक पूरक व्यवसायांमध्ये समाजशास्त्राची पदवी उपयुक्त ठरते. हे सगळे व्यवसाय लोकाभिमुख आहेत. धोरण आणि कार्यक्रम निर्मिती, कौटुंबिक आणि बाल कल्याणासाठी समाजकार्य, समुदाय विकसन, वैद्यक आणि मनोविकृती चिकित्सेसाठी समाजकार्य, शालेय समाजकार्य इत्यादी पर्याय उपलब्ध आहेत.

परंतु, एक गोष्ट मात्र खरी: आजच्या काळात केवळ समाजशास्त्राची पदवी घेऊन चालणार नाही. पदवीला कौशल्ये आणि तुमच्या संवेदनशील व्यक्तिमत्वाची जोड असणे आवश्यक आहे. दैनंदिन आयुष्यातील गरजा आणि आव्हानात्मक परिस्थितीशी तुम्हांला जुळवून घ्यावे लागेल. तुम्ही संशोधन करा किंवा धोरणनिर्मिती, सक्षमीकरण योजना अथवा सामाजिक बदलाच्या योजना तयार करा; तुमचा दृष्टिकोन मानवतावादी असणे गरजेचे आहे.

९. पुणे येथील सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय कंपनीच्या धोरणनिर्मिती विभागाच्या प्रतिनिधींनी त्यांच्या कार्यकारी समितीपुढे केलेले काल्पनिक भाषण वाचा:

"सुप्रभात, कंपनीच्या संचालक मंडळाने माझ्यावर एक काम सोपवले आहे. उच्च व्यवस्थापनाने घेतलेले काही धोरणासंबंधी निर्णय तुम्हांला सांगावयाचे आहेत. आपल्या कंपनीने दोन नवी धोरणे स्वीकारली आहेत. येत्या आर्थिक वर्षापासून कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांचे गोपनीय आणि दुहेरी-मूल्यमापन केले जाईल. प्रत्येक कर्मचाऱ्याचे मूल्यमापन त्याचे वरिष्ठ, गटातील सदस्य करतील. स्व-मूल्यमापनदेखील केले जाईल. कनिष्ठ कर्मचारीही त्यांच्या वरिष्ठ कर्मचाऱ्यांचे मूल्यमापन करतील. मूल्यमापन काही निकषांच्या आधारे केले जाईल. कंपनीचे दुसरे धोरण पर्यावरणाशी संबंधित आहे. स्वच्छ आणि हरित पर्यावरणाची आंतरराष्ट्रीय बांधिलकी पाहता, कंपनीचे प्रत्येक काम आता 'पर्यावरणस्नेही' स्वरूपाचे असेल. ई-पोर्टलच्या माध्यमातून तुमच्या संबंधित विभागातील सदस्यांना कृपया तुम्ही हा निर्णय सांगा. सर्व कर्मचाऱ्यांची यावरची प्रतिक्रिया स्वागतार्ह आहे. परंतु, ई-पोर्टलच्या माध्यमातून अशी प्रतिक्रिया मानव संसाधन विभागाकडे देण्यासाठी आजपासून केवळ एक आठवड्याचा कालावधी आहे."

१०. भारतीय चित्रपटाच्या प्रारंभ, प्रसार आणि जडणघडणीला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. एकेकाळी मूक चित्रपट काढले जात. अशा चित्रपटात पडद्यावरचे चित्र पाहून प्रेक्षक चित्रपटातून नेमका काय संदेश द्यायचा आहे त्याचा अर्थ लावत असत. नंतरचा काळ दृकश्राव्य चित्रपटांचा होय. त्यानंतर कृष्णधवल (ब्लॅक अँड व्हाईट) चित्रपट आणि नंतर रंगीत चित्रपट निर्माण होऊ लागले.

आर्थिकदृष्ट्या ज्यांना परवडते ते चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहतात, काहीजण घरीच दूरदर्शनवर चित्रपट पाहतात. चित्रपटांच्या कथांनी सर्वांचे मनोरंजन होते. चित्रपटांतून कल्पना, विचारधारा, शोकांतिका, एखादा विशिष्ट विषय किंवा मूल्ये प्रेक्षकांपर्यंत पोहोचवली जातात. आता सगळेजण आंतरजालावर (इंटरनेट) किंवा मोबाईल फोनवरही चित्रपट पाहू शकतात. चित्रपटांतून प्रेक्षकांना काही सुप्त अथवा थेट संदेश द्यावयाचे असतात. काहींच्या हे संदेश लक्षात येतात तर काहींच्या येत नाहीत.

'चित्रपटात भूमिका साकारण्याचे कसब असलेला/असलेली नट/नटी' यांखेरीज चित्रपटनिर्मिती आणि चित्रपटाचे विपणन यामध्ये अनेकांचा हातभार लागतो. यामध्ये चित्रपटाचे दिग्दर्शक, पटकथा लेखक, रचनाकार, ध्वनी संयोजक, मेकअप करणारे कलाकार, उत्कृष्ट रचना उभी करण्यात प्रावीण्य असणारे, भूमिकांसाठी कलाकारांची निवड करणारे, संगीतकार इत्यादींचा समावेश असतो. असे अनेक पैलू अभ्यासण्यासाठी दृक समाजशास्त्र, जन संप्रेषण समाजशास्त्र आणि विपणन समाजशास्त्र असे विषय उपयुक्त ठरतात. माहितीचा स्रोत म्हणून आजही चित्रपटांची अनेकांगी भूमिका आहे. चित्रपट कथा आणि चित्रपटाचे प्रकार वाढतच आहेत. आता चित्रपट केवळ ठराविक साच्याच्या प्रेमकथा किंवा लिंगभावात्मक साचेबद्ध प्रतिमा घेऊन केल्या जाणाऱ्या कथांपुरते मर्यादित नाहीत. चित्रपटांमुळे एकीकडे मोठी उलथापालथ होऊ शकते किंवा नव्या विषयांकरता रुचीही निर्माण होऊ शकते. आता चित्रपटांच्या यादीमध्ये प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय चित्रपटांची भर पडली आहे. त्यामुळे विविध विषयांवर चित्रपट निघत असल्याने अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत.

११. सामाजिक समस्यांचा सामना कसा करायचा? समाजातील सामाजिक समस्यांचा सामना करण्यासाठी नेमके काय केले जाते? सामाजिक समस्या निर्माण कशा होतात? समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी अशा काही प्रश्नांची उत्तरे शोधणे अपेक्षित असते.

प्रत्येक समाजाची एक विशिष्ट संस्कृती असते; समाज आणि संस्कृती दोन्हीही मानवनिर्मित असते. हजारो वर्षांच्या मानवी संबंधांतून संस्कृती आणि समाज आकारास येतो. प्रत्येक समाजाची एक नियामक व्यवस्था असते – प्रथा, रूढी, चालीरीती, निषिद्ध बाबी, टूम, कायदे इत्यादींचा त्यात समावेश होतो. सामाजिक नियम म्हणजे मानवी वर्तनाची मार्गदर्शक तत्वे होत. समाजात वावरताना आपल्याकडून काय अपेक्षित आहे आणि इतरांकडून काय अपेक्षा करायची ते या नियमांमुळे स्पष्ट होते.

या अपेक्षा कायमस्वरूपी असतात की त्यांचे स्वरूप न बदलणारे असते? अपेक्षा कधी बदलू शकतात? त्या कोण बदलते? त्यांमध्ये बदल होणे आवश्यक का आहे? असे प्रश्न कुणालाही पडू शकतात. अशा अपेक्षा परिणामकारक पद्धतीने इतरांपर्यंत पोहोचवल्या जात नाहीत किंवा व्यक्ती अथवा गटांना या अपेक्षा अमान्य असतात तेव्हा सामाजिक समस्या निर्माण होतात. यामुळे संघर्षाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. केवळ विचारांचा संघर्ष नव्हे, तर अशा संघर्षातून इतरांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात, अत्याचार, हिंसा आणि अन्यायाला खतपाणी मिळते. यामुळे समाजामध्ये उलथापालथ होऊ शकते, अनागोंदीची परिस्थिती निर्माण होऊ शकते किंवा युद्धाचीही परिस्थिती निर्माण होऊ शकते.

१२. सर्व शिक्षा अभियान (SSA) हा भारत सरकारचा कार्यक्रम आहे. ज्यामध्ये ६ ते १४ या वयोगटातील मुलांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची व्यवस्था केली आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठी भारताचे माजी पंतप्रधान श्री. अटल बिहारी वाजपेयी यांनी १९९३-९४ मध्ये पुढाकार घेतला. त्यानंतर २०००-२००१ मध्ये हा कार्यक्रम पूर्णतः कार्यरत झाला. या कार्यक्रमामध्ये शिक्षण हा मूलभूत अधिकार मानला गेला.

याबरोबरच १५ ऑगस्ट १९९५ मध्ये भारत सरकारने 'प्राथमिक शिक्षणासाठी पोषण आधार राष्ट्रीय कार्यक्रम' (National Programme of Nutritional Support to Primary Education, NP-NSPE) राबविला. तेव्हापासूनच शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी मोफत 'माध्यान्ह भोजन' (Midday Meal) ही संकल्पना अस्तित्वात आली, जी ग्रामपंचायत आणि नगरपालिका यांसारख्या स्थानिक संस्थांकरवी राबविली जाते. मुलांना माध्यान्ह भोजन देणे सक्तीचे आहे. यामध्ये मुलांना दररोज उत्तम आणि पोषक जेवण देणे आवश्यक आहे असे मानले आहे. बऱ्याच संस्थांनी जेवण बनविणे व वेळेत शाळेत पोहोचविणे हे काम हाती घेतले.

सार्वत्रिक शिक्षण आणि पोषण एकमेकांपासून वेगळे करता येत नाही. गावातील आणि नगरपालिकेच्या शाळांमधील मुले या भोजनाची वाट पाहत असतात. बऱ्याचदा हा आहारच त्यांच्यासाठी दिवसभराचा मुख्य आहार असतो.

# इयत्ता ९ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ

ebalbharati

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता ९ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी समाजशास्त्र इ. १२ वी

₹ ७६.००